

डॉ. स्मिता दामले

# एका ओथमनचा अंत

# एका ओथमनचा अंत

डॉ. स्मिता  दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# एका ओथमनचा अंत

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# एका ओथमनचा अंत

डॉ. स्मिता दामले

३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,

कोथरूड, पुणे, ४११०३८.

मोबाईल :- ९८६७३६४६३४.

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity. com

esahity@gmail. com

APP : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन  : ३१ जानेवारी २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे आठवे पुस्तक, “एका ओथमनचा अंत” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया.

डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळया अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि

घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे “कावेरीचा दुभंग” हे पुस्तक कर्नाटकातील हैदर घराण्याच्या इतिहासावर आधारित आहे.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ-पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी "उदयास्त" ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय आणि व्यक्तिगत चरित्र नुकतंच प्रसिध्द झालं आहे. त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील शैलीदार पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली सहा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य डॉ. स्मिता दामले यांची कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

या पुस्तकातील चित्रे गुगलवरून घेतली आहेत. ती अपलोड करणाऱ्यांचे आभार.

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली डॉ. स्मिता दामले यांची इतर पुस्तके.










1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kalatani_smita_damle.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/lokmanya_-_final.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/raksha_smita.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manasokta_smita_damle.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/itihasachi_vilag_paane_smita_damle.pdf
6. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saltanat_smita_damle.pdf
7. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kavereecha_dubhanga_smita_damle.pdf












# एका
# ओथमनचा
# अंत

डॉ. स्मिता दामले.

**कै. गुरुनाथ व्यं. दिवेकर,**

**आणि**

**कै. कमल दिवेकर,**

**यांना**

**अर्पण.**

# प्रस्तावना.

अनेक खंडांनी आणि उपखंडांनी, सागरांनी आणि उपसागरांनी, नद्यांनी आणि उपनद्यांनी भरलेलं हे जग. अनेकानेक महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, तलवारींच्या पात्यावर राष्ट्र निर्माण करणाऱ्या शूर पुरुषांच्या कूटनीतीने भरलेलं हे जग, ज्यांच्यामुळे सागरी आणि खुष्कीच्या पटलावर सत्तेच्या खेळांची, अनेक लढायांची अनेक वादळं उठली, या युध्दांनी झालेल्या नरसंहारात रणांगणावरील माती रक्ताने लाल झाली, कालप्रवाहात जगभरात अशा साम्राज्यांच्या अनेक लाटा उसळल्या आणि विरल्या.

त्यातच जन्मलं, विस्तारलं आणि विलयाला गेलं असंच एक अतिविशाल ओथमन साम्राज्य. म्हणजेच ऑटोमन साम्राज्य.

१३ व्या शतकाच्या अखेरीला निर्माण होऊन २० व्या शतकाच्या सुरुवातीला संकोचलेल्या या साम्राज्याची कहाणी मनन करायची तर ज्या भूक्षेत्रावर हे साम्राज्य निर्माण झालं आणि संकोचलं त्या अनातोलिया म्हणजेच आशिया मायनर या भूखंडाची माहिती हवी. ग्रीक भाषेत अनातोलिया म्हणजे पूर्व दिशा आणि अरबी भाषेत सूर्योदय. या आशिया मायनर भूखंडाच्या ईशान्येला युरोप आणि आशिया खंडांना विभागणारा काळा समुद्र, काळ्या समुद्रातून फुटून निघालेली बॉस्फरसची सामुद्रधुनी, तिच्या प्रवाहाला सामावून घेणारा आणि पुढे जाऊ देणारा मार्मारा समुद्र, या सामुद्रधुनीजवळ युरोप आणि आशिया खंडांची जमीन अगदी जवळ येऊन भिडते, मार्मारा समुद्रातून परत एक बाहेर धावणारा आणि भूमध्य सागरात जाऊन विसर्जित होणारा दर्दनेलस् हा मोठा सागरी जलप्रवाह, आणि भूमध्य सागराच्या उत्तरेला एजियन समुद्र. भूमध्य सागराच्या भोवतालचे देश, बॉस्फरसच्या उत्तर काठावरचा बाल्कन द्वीपकल्प, बॉस्फरसच्या काठावरचं दोन खंडांना जोडणारं सध्याचं इस्तंबूल हे अत्यंत महत्वाचं दळणवळणाचं ऐतिहासिक शहर, आणि आशिया मायनरमधले अमीर, जहागिरदारांनी व्यापलेला आशिया मायनर. ओथमन साम्राज्याशी सतत संपर्कात आलेल्या देशांची ही भौगोलिक परिस्थिती.

इस्तंबूल म्हणजेच प्राचीन कॉंस्टंटिनोपल, ही प्राचीन रोम साम्राज्याची, पूर्वेकडे पसरलेल्या प्रांतांची राजधानी. त्या प्रदेशाला कॉंस्टंटाईन राजाने इ. स. ३३० मधे वसवलं म्हणून त्याची राजधानी कॉंस्टंटिनोपल या नावाने प्रसिध्द झाली. या रोम साम्राज्याच्या अतिपूर्वेच्या प्रदेशाला बिझंटाईन साम्राज्य या नावाने ओळखलं जाई. याचं कारण, प्राचीन काळी कुणा बिझास नावाच्या माणसाने इथे ग्रीक लोकांची वस्ती वसवली होती. त्यामुळे रोमन साम्राज्याचा भाग असला तरी ग्रीक भाषा आणि चालीरितीच इथे प्रचलित होत्या. आशिया मायनरमधून बॉस्फरस सामुद्रधुनी ओलांडली की त्याच्या काठावरचं राजधानीचं, कॉंस्टंटिनोपल हे अति महत्वाचं ठाणं लागतं. युरोप-आशिया-आफ्रिका या त्रिखंडांवर याची नजर. सागरिक दृष्टीनेही अतिशय महत्वाचं ठिकाण. कॉंस्टंटिनोपलच्या मागे उभा सारा युरोप आणि बाल्कन देशांचा समूह. या साऱ्या भूमीवर अनेक राज्यं अनेक शतकापासून अस्तित्त्वात होती. ही त्याकाळची राजकीय परिस्थिती होती. या सर्व ठिकाणी राजघराणी राज्य करत होती.

बिझंटाईन जवळचा बाल्कन द्वीपकल्प हा, उत्तरेला डॅन्यूब नदीमुळे युरोपपासून वेगळा झाला होता. पूर्वेला काळा समुद्र, आग्नेयेला एजीयन समुद्र, पश्चिमेला इटली आणि त्यामधला अड्रियाटिक समुद्र या ह्या द्वीपकल्पाच्या सीमा. स्लोव्हेनिया, क्रोशिया, माँटेनिग्रो, अलबानिया, मॅसेडोनिया, बल्गेरिया, आणि युरोपातील ग्रीसचा काही भाग, या देशांमुळे या द्वीपकल्पाच्या भूखंडावरच्या आपापल्या सीमा ओढल्या गेल्या होत्या. शेजारी ग्रीस उभा होता.

या देशांमधे नांदत होते, ग्रीक, मुसलमान आणि ख्रिश्चन धर्मीय लोक. या तीन खंडातील देशांच्या एकमेकांना सतत तलवारी भिडल्या त्या याच धर्म आणि सीमाविस्ताराच्या पायावर. यात येऊन मिळाला आणखी एक वंशप्रवाह. तो म्हणजे पर्शियामधल्या खोरासान प्रांतातील कायी जमातीचे तुर्की टोळीवाले. ना संस्कार, ना संस्कृती, ना परंपरा, ना शिक्षण. ही टोळी सुलेमानशहा नावाच्या आपल्या मुखियाच्या हाताखाली रूम देशामधे पोटापाण्याच्या शोधात आली त्यावेळी आशिया मायनर मधे सेल्जुक राजवट चालू होती. रोमन सम्राट काँस्टंटाईनच्या तिसऱ्या पिढीतील वंशजाचा पराभव करून सेल्जुक राजसत्ता अंमल करत होती. पण तीही ही तुर्की टोळी येईपर्यंत मंगोलियन राष्ट्राची मांडलिक झालेली होती आणि उतरणीला लागलेली होती. हा देश रुम नावाने प्रसिध्द होता.

या सेल्जुक राजवटीचा सुलतान होता अल्लाद्दीन. या अल्लाद्दीनच्या काळात ही कायी जमातीची तुर्की टोळी रूम देशात विसावली, स्थिरावली, पसरली, जेता झाली. त्यांचा नायक, सुलेमानशहाचा मुलगा, एका महान साम्राज्याचा मूळ पुरूष ठरला. त्याचं नाव ओथमन – उस्मानचा मूळ तुर्की उच्चार. एका पाठोपाठ एक पराक्रमी, धाडसी, महाप्रतापी वारस या ओथमनच्या घराण्यात जन्मले, त्यांनी जवळपासचे सर्व देश जिंकले, बॉस्फरसची सामुद्रधुनी ओलांडून बिझंटाईन राज्यात सत्ता मिळवली, काँस्टंटिनोपल ही आपली विस्तारलेल्या सीमांची राजधानी बनवली. त्यामुळे बिझंटाईन साम्राज्याचा असा डोळ्यासमोर अंत झालेला पाहिल्यावर मग, डॅन्यूब नदी ओलांडून हे ओथमन तुर्की जेव्हा युरोपात शिरायला लागले तेव्हा त्याचं आक्रमण थोपवायला सर्व ख्रिश्चन देश एकत्र आले आणि या तुर्की साम्राज्याविरूध्द त्यांनी शस्त्र उगारलं. त्यात आघाडीवर होते रशिया, इंग्लंड, फ्रान्ससारखे ताकदवान देश. या सर्व देशांच्या फौजा एकमेकांमधे सत्ताविस्तारासाठी कायम लढतच राहिल्या. बलाबलाचा लंबक कायम झुलत राहिला. कॅलिडोस्कोपमधे जशी चित्रं बदलत राहतात तशी या सर्व देशांमधली एकदा मित्रत्त्व तर एकदा शत्रूत्त्व अशी नाती बदलत राहिली. या सर्व देशांमधे राजसत्ता होत्या. युरोप, आशिया खंडातील सर्व महत्वाकांक्षी राजकारणी धुरिणांनी सीमा वाढवत नेण्याची स्वप्नं वाढवतच ठेवली. पुढे सरकत गेलेल्या शतकांनी इटालीत सुरू झालेल्या रेनेस्सान्स – पुनरुथ्थानच्या काळात सामाजिक, वैचारिक, वैज्ञानिक आणि राजकीय समीकरणं बदलत नेली.

याचाच परिपाक म्हणजे, युरोपियन ख्रिश्चन सत्ता आणि आशिया आणि युरोप या दोन्ही खंडांमधे पसरलेला मुस्लिम ओथमन तुर्कांचा देश यांच्यात घडून आलेलं पहिलं महायुध्द, ओथमन साम्राज्याची पराभव झाल्यानंतर झालेली चिरफाड, त्यातून निर्माण झालेले अनेक स्वतंत्र देश. त्यावेळच्या राखेतून शिल्लक राहिलेल्या ठिणगीने

परत दुसरं महायुध्द घडवलं. त्या पहिल्या महायुध्दानंतरही आज १०० वर्षांनंतरही या सर्व राष्ट्रांच्या सीमा रक्ताने लाल होतच राहिल्या आहेत. जखमा भळभळतच आहेत.

पहिल्या महायुध्दानंतर युरोपियन जगतात ऑटोमन एम्पायर ही ओळख असलेलं ओथमन साम्राज्य लयाला गेलं आणि रिपब्लिक ऑफ टर्की या नावाने त्याचं पुनर्वसन झालं. ओथमन घराण्याच्या नावाचा तेव्हा अंत झाला.

ओथमन तुर्कांच्या या अनेक देशांच्या सत्तासंघर्षाचा हा संक्षिप्त इतिहास आहे. युरोपखंडातील सर्वच देश ओथमन तुर्कांशी सतत संघर्षात राहिले पण त्यांचा इतिहास यातून वगळला आहे.

या लेखनासाठी खालील संदर्भग्रंथांचा आधार घेतला आहे.


1. Cambridge History of Turkey.
2. The Foundation of Ottoman Empire - by Herbert Gibbon.
3. A Modern History of the Middle East and North Africa - by Imammuddin S. M.
4. History of The Ottoman Empire including a Survey of the Greek Empire and the Crusade. - by Samual Jacob, colonel Proctot, Rev. Riddle. James M’conechy.
5. या पुस्तकात वापरलेले फोटो आणि नकाशे यांसाठी गुगल, आणि विकिपिडियाचे आभार.


ऑटोमन साम्राज्याची ओळख करुन देणारा हा इतिहास वाचकांना आवडेल अशी आशा आहे.


डॉ. स्मिता दामले.

मोबाइल नं. ९८६७३६४६३४.

इमेल –

Suhasdamle341@hotmail.com.

वेळ - सकाळची.११ वाजून १५ मिनिटं.

स्थळ - बोस्नियाची राजधानी सारायेवो.

तारीख – २८ जून १९१४.

राजधानीतली सकाळ नेहमीसारखीच होती. युरोपमधला उन्हाळा. स्वच्छ सूर्यप्रकाश होता. आकाशात शुभ्र ढगांची गर्दीही नव्हती इतकं आकाश निळंभोर होतं. राजकीय क्षितिजामधेही अनिष्ट ग्रहांची चाहूल कुणाला कुठे दिसली नव्हती. आजचा दिवस हा काही तासांच्यानंतर कोट्यावधी जीवांचा नाश करणारा ठरणार आहे याचा कोणालाही अंदाज नव्हता. जग उलथून टाकणारी घटिकाही जवळजवळ येत चालली. काल रात्रीपर्यंत महायुध्दाचा ग्रह आकाशात उगवलेलाही कुणाला दिसलाच नव्हता.

त्यादिवशी ऑस्ट्रियाचे युवराज आणि गादीचे भावी वारस, आर्चड्यूक फ्रॉंझ फर्डिनांड सारायेवोच्या भेटीला आले होते. इंपिरियल आर्म्ड फोर्सेच्या पाहाणीसाठी ते सपत्नीक सारायेवोच्या स्टेशनवर उतरले. ६ गाड्यांच्या ताफ्यातून गावात यायला निघाले. उघड्या कारमधून ते कार्यक्रमाच्या ठिकाणी निघाले होते. त्यांच्या कारच्या पुढे मागे संरक्षक गाड्यांचा ताफा होता. या ६ गाड्यांचा ताफा राजमार्गाने चालला होता. त्यांच्या शेजारी त्यांची गर्भवती पत्नी सोफियाही होती. त्या प्रवासात दोनदा त्यांच्यावर असफल हल्ला कुणीतरी केला होता. पुढे सरकणाऱ्या मोटारींचा ताफा जवळ जवळ आला तसे रस्त्यावरच्या बघ्यांच्या गर्दीतले काही तरूण अचानकपणे पुढे सरसावले. ब्लॅक हॅंड नावाच्या संघटनेचे ते सदस्य होते. ते क्रांतीकारक होते. त्यांनी जवळ आलेल्या युवराजांच्या गाडीवर बॉंबचे गोळे फेकले. ते गोळे युवराजांच्या कारवर न पडता मागून चाललेल्या गाडीवर पडले आणि त्यातील काही लोक जखमी झाले. त्याबरोबर बॉम्ब फेकणाऱ्या तरूणाने सायनाईड खाऊन लगेच आत्महत्या केली.

अचानक झालेल्या या हल्ल्याने रस्त्यावर एकदम गोंधळ माजला. युवराज फर्डिनांडला ठार करण्याच्या घातपाती कृत्याचा तरूणांचा प्रयत्न फसला होता. राजे सुखरूप होते. या हल्ल्यानंतर युवराजांच्या गाड्यांचा ताफा पुढे निघून गेला. जखमी लोकांना हॉस्पिटलमधे दाखल करण्यात आलं. अनपेक्षितपणे झालेल्या या धक्कादायक घटनेने शहरात खळबळ माजली. पण आपला नियोजित कार्यक्रम रहित न करता, आपला कार्यक्रम करून युवराज आपल्या पत्नीसह गव्हर्नरच्या बंगल्यावर विश्रांतीसाठी पोचले. आता पुढे काय करायचं यावर अधिकाऱ्यांमधे चर्चा झाली. त्यानंतर आपला मूळ कार्यक्रम रद्द करून जखमींची विचारपूस करायला युवराज फ्रॉंझ फर्डिनांड हॉस्पिटलला भेट द्यायला गेले. तेव्हा सकाळचा अनुभव लक्षात घेऊन, युवराजांवर परत हल्ला व्हायला नको म्हणून सुरक्षा अधिकाऱ्यांनी कमी गर्दी असलेल्या रस्त्याने जायचं ठरवलं पण हा नवीन अचानक ठरलेला कार्यक्रम शाही जोडप्याच्या ड्रायव्हरला माहीत नव्हता. त्याने आधी ठरल्याप्रमाणे नियोजित ठिकाणी जायला गाडी मार्गी लावली. पण लॅटीन ब्रिजवर असतांना मागून चाललेल्या सारायेवोच्या गव्हर्नरच्या ते लक्षात आलं. त्याने लगेच शाही गाडीला मागे फिरायला सांगितलं. त्या उलटं

फिरण्यामुळे मागून येणाऱ्या गाड्या थांबल्या. युवराजांच्या पुढे २ सुरक्षा गाड्या होत्या. आणि बाकी गाड्या वेगळ्या रस्त्याने गेल्या. त्यामुळे लगेच वाहतूक कोंडी झाली. शाही जोडप्याची गाडी अचानक थांबली.

नेमका तिथेच आणखी एक क्रांतीकारक, समोरच्या रस्त्यावरच्या दुकानात उभा होता. युवराजांच्या शाही गाड्या समोर आलेल्या पाहून तो सरळ आर्चड्युक फ्राँझ फर्डिनांडच्या गाडीजवळ आला, गाडीच्या फूटबोर्डवर चढला आणि आपल्या पिस्तूलाने त्याने शाही जोडप्याला गोळ्या घातल्या. त्याचं नाव गॅवरिलो प्रिंन्सिप. त्याने तो क्षण टिपला. युवराज फर्डिनांड यांच्या मानेतून गोळी गेली आणि सोफियाच्या पोटात गोळी मारली. युवराज आणि त्यांची पत्नी त्याच्या पिस्तूलाच्या गोळीचे बळी ठरले. दोघेही एका क्षणात रक्ताच्या थारोळ्यात भिजले. त्यांना तातडीने गव्हर्नरच्या बंगल्यावर नेण्यात आलं पण तोपर्यंत दोघांनीही प्राण सोडला होता.

तोच तो क्षण, जगातल्या कोट्यावधी लोकांचा भविष्य काळातील मृत्यूदिन म्हणून नक्की झाला. युवराजांच्या मानेतून गोळी त्यांचा प्राण छेदून गेली. आणि सोफियाच्या पोटात गोळी घुसली. दोघेही ठार झाले. प्रिन्सिपनेही गोळी मारून घेण्याचा प्रयत्न केला पण तो पकडला गेला.

त्या चुकीच्या वळणापाशी मृत्यूने भावी काळातील आपला पहिला बळी घेतला होता.

ऑस्ट्रियाने सर्बियाच्या ताब्यातील प्रदेश आपल्या राज्याला जोडून घेतला होता हा राग असलेल्या तरुणांचा एक क्रांतीकारक गट बनला होता. त्यांचं हे कृत्य होतं. सर्बियाला रशियाचा पाठिंबा होता. या हत्येनंतर काही दिवस शांततेत गेले. पण एक महिन्यानंतर ह्या घटनेनं युध्दाची पहिली ठिणगी पेटली. २८ जुलैला ऑस्ट्रियाने सर्बियावर युध्द पुकारलं. आणि महिनाभरात साथीचा ताप पसरावा, त्याप्रमाणे युध्दज्वर साऱ्या जगभर पसरला. विकसित-अविकसित देश त्यात ओढले गेले. सारं जग या युध्दज्वराने पछाडलं. १ ऑगस्टला जर्मनी या झगड्यात उतरली कारण ऑस्ट्रियाशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. जर्मनीने रशियावर हल्ला करायचं ठरवलं. इ. स. १८७१ च्या लढाईत फ्रान्सचा, जर्मनीशी झालेल्या लढाईत पराभव झाला होता. त्याचा वचपा काढायला फ्रान्सने जर्मनीबरोबर युध्द पुकारलं. फ्रान्सने रशियाशी युती केली. जर्मनीनेही प्रत्युत्तर म्हणून ३ ऑगस्टला फ्रान्सशी लढण्याचा इरादा घोषित केला. फ्रान्सवर हल्ला करण्यासाठी जातांना तटस्थ राहिलेल्या बेल्जियम आणि लक्झेम्बर्गवर जर्मनीने हल्ला केला. म्हणून "खवळलेल्या" इंग्लंडने जर्मनीविरूध्द दंड थोपटले.

एकंदरीत, २८ जुलैला ऑस्ट्रियाने सर्बियाविरुध्द, १ ऑगस्टला जर्मनीने रशियाविरुध्द, आणि फ्रान्सने जर्मनीविरूध्द, ३ ऑगस्टला जर्मनीने फ्रान्सविरूध्द, आणि तटस्थ बेल्जीयमवर केलेल्या हल्ल्यामुळे इंग्लंडने ४ ऑगस्टला जर्मनीविरुध्द युध्दाला सुरूवात केली. रशिया, इंग्लंड आणि फ्रान्सच्या एकत्रीकरणाला ट्रिपल एण्टिटि असं नाव पडलं आणि जर्मनी, ऑस्ट्रिया, यांच्या युतीला सेंट्रल पॉवर्स असं नाव पडलं. त्यात नंतर ऑटोमन साम्राज्याचं सरकारही जर्मनीच्या बाजूने युध्दात उतरलं. अमेरिका, जपान आणि इटली ट्रिपल एन्टिटिला म्हणजे रशिया-इंग्लंड- फ्रान्सला जाऊन मिळाले. भारतात इंग्रजांचं राज्य

होतं म्हणून भारत सरकारही त्या युध्दात ओढला गेलं. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या भारतीय नेत्यांनी इंग्रजांना आपला पाठिंबा दिला. भारतीय सैनिक युरोपमधे पाठवण्यात आले. भारतातील संस्थानिकांनी इंग्रजांना रसद पुरवायचं काम केलं.

२८ जुलै १९१४ या दिवशी सुरू झालेला हा अग्नितांडव, ४ वर्षे जगाला वणव्यासारखा कोट्यावधी जीवांना होरपळत राहिला. १९१८ सालच्या नोव्हेंबर ४ तारखेला पहिला शांतता करार ऑस्ट्रियाने केला. त्यानंतर जर्मनीनेही आपला हात पुढे करून युध्द थांबवलं. जर्मनी आणि ओथमन सरकारचा पूर्ण पराभव झाला होता. पहिल्या महायुध्दाचा अंत झाला पण यात प्रचंड उलथापालथ मानवी जीवनाच्या सर्व अंगांमधे झाली. ९० लाखांपेक्षा जास्त सैनिक, ७० लाखांवर सामान्य नागरिक, यात मरण पावले. नवीन तंत्रज्ञानाचा आणि उद्योगांचा जन्म झाला. सबमरिन बोटी, लहान स्वयंचलित बंदुका, विमानं, रणगाडे, ट्रक्स, दूर पल्ल्याच्या तोफा, असे अनेक शोध लागले. इटालीने १९११ साली लिबियावर विमानाने हल्ला केला होता. पुढल्या वर्षी इटलीने ग्रेनेड टाकणारी विमानं तयार केली. या युध्दात त्यांचा वापर होणं स्वाभाविकच होतं. त्यामुळे जमिनीवरून विमानांवर हल्ला करणारी अॅन्टी एअरक्राफ्ट गन्स नव्याने बनवली गेली. याच काळात लढाऊ विमानांचा शोध लावला गेला. नव्याने शोधल्या गेलेल्या विषारी वायूने लढाईत अनेक सैनिकांना घायाळ केलं. हा विषारी वायू हवेतून पापभीरू नागरिकांच्याही श्वासातून शरीरात पोचला आणि श्वसनसंस्था, त्वचाविकार, अशा अनेक व्याधींनी त्यांचाही मृत्यू झाला. चेहऱ्यावर लावायचे मास्क त्याकाळी बनलेच नव्हते. हे झाले महायुध्द संदर्भातील नवनवीन शोध.

या युध्दाच्या निमित्ताने ओथमन सरकारने त्यांच्या देशातील आर्मेनियन, ग्रीक आणि ख्रिश्चन लोकांचं क्रूर शिरकाण केलं. प्रत्येक देशांमधे सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले. घरादारांचा, स्थावर जंगमाचा नाश झाला तो वेगळाच.

या युध्दामुळे अनेक देशांची सीमा बदलली. अनेक देशांची निर्मिती झाली. फाळणीमुळे रशियातूनच फुटून निघालेले देश म्हणजे पोलंड, फिनलँड, आणि लॅटविया. हंगेरी, युगोस्लाव्हिया आणि झेकोस्लोव्हाकिया या देशांची निर्मिती ऑस्ट्रियातून झाली. जर्मनी – फ्रान्स – रशिया – ऑटोमन ही चार मोठी राजघराणी नामशेष झाली. या चारही ठिकाणची राजसत्ता नष्ट झाली. जुलै १९१७ मधे झारशाहीचा अंत झाला. तिथे ब्लादिमीर इलिइच उल्यानोक म्हणजेच लेनिन या बोल्शेविक पार्टीच्या क्रांतीकारक तरुणाच्या नेतृत्वाखाली झारशाहीचा अंत झाला. बोल्शेविक म्हणजे बहुसंख्य आणि मेन्शेविक म्हणजे अल्पसंख्य..विसाव्या शतकाच्या आधीपासूनच रशियातील तरूणांवर कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव वाढायला लागला होता, आणि जुलमी झारच्या दडपशाहीमुळे रशियात क्रांतीचे वारे वाहायला लागले होते. फ्रान्समधे शिक्षणासाठी गेलेल्या तरूणांना आणि लढण्याच्या निमित्ताने गेलेल्या सैनिकांना तिथला नवीन

विचार, मोकळं वैचारिक जीवन याचा परिचय झाला आणि त्याचा त्यांच्या विचारांवर परिणाम झाला होता. बोल्शेविक या नवीन सत्तेचा उदय झाल्यावर युध्दातून माघार घेण्याचा त्यांचा विचार सुरू झाला.

२४ नोव्हेंबर १९१७.

आजचा दिवस रशियातील जनतेसाठी वेगळा होता. प्रावदा आणि इझवेस्तिया वाचणारांसाठी तर फारच खळबळजनक होता. नुसती केवळ रशियन जनताच नाही तर सारं पाश्चिमात्य जगच त्यादिवशी सकाळी सकाळी हादरलं. बातमी स्फोटकच होती. देशादेशांमधलं महायुध्द अजून चालूच होतं. देश, सैनिक आणि युध्दात पोळलेली जनता, सारेच अजून सावरलेही नव्हते. रशियातील बोल्शेविक क्रांतीने झारशाहीचा अंत झालेल्या सत्तेत नवीन युगाचं दालन उघडलं होतं. नवीन नेता लेनिन सत्तेत आला होता. त्याने मॉस्कोमधल्या अर्काईव्हज्च्या कार्यालयात छापा घातला आणि त्या झडतीत जे कागदपत्र मिळाले त्याने सारं जग हादरलं.

काय होती ती बातमी?

पहिल्या महायुध्दाच्या काळात युध्द चालू असतांना इंग्लंड आणि फ्रान्सने गुप्तपणे एक करार केला. त्यांना युध्द जिंकण्याची खात्रीच होती जणू! त्या करारात खनिज तेलाने भरलेल्या भल्या मोठ्या ऑटोमन साम्राज्याच्या वाटणीचा कट सिध्द झाला. रशियाची त्या कारस्थानाला मूक संमती मिळाली आणि दोन्ही देशांमधे हालचालींना सुरुवात झाली. फ्रान्सतर्फे पिको आणि इंग्लंडतर्फे साईक या अधिकाऱ्याची नेमणूक झाली.

फ्रान्स आणि इंग्लंड या दोघांमधील साम्राज्याच्या वाटणीच्या कराराचे ते कागद होते. ट्रॉटस्कीने ते सारे कागद जगासमोर ठेवले.

मार्च १९१५ मधे रशिया आणि इंग्लंड यांच्यात पहिला गुप्त करार होऊन रशियाने साम्राज्याच्या कॉँस्टॉँटिनोपल हा राजधानीचा प्रदेश, आपल्या सीमेलगतचा आर्मेनियाचा-इर्झुरमचा प्रदेश, काळा समुद्र ते भूमध्य समुद्राला जोडणाऱ्या दार्दानेलस् सामुद्रधुनीचा आणि त्याच्या काठावरचा गॅलिपोलि हा द्वीपकल्प ताब्यात घ्यायचा असं ठरलं. रशियाला त्यामुळे समुद्र किनारा मिळणार होता. इंग्लंडने, तेलाने समृध्द मेसापोटेमिया, मध्य पर्शिया आणि ओथमन साम्राज्याचा काही भूभाग बळकावायच्या कराराला रशियाने मान्यता दिली. सिरिया फ्रान्सला द्यायचं ठरलं, या वाटाघाटींसाठी इंग्लंडतर्फे सर मार्क साईक आणि फ्रान्सतर्फे फ्रॉँकोइज जॉर्ज पिको यांची नेमणूक झाली. मे १९, १९१६ ला त्या गुप्त कराराला मूर्त रूप मिळालं.

या कराराप्रमाणे सबंध मध्य आशिया, ऑटोमन साम्राज्य तिघांनी चिरफाड करून वाटून घेतलं. आपापल्या इच्छेप्रमाणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अंमल चालवावा हेही कलम त्यात घातलं गेलं. सिरियाचा आणि हल्लीचा लेबनॉनचा मोठा भूप्रदेश, मोसूल, जॉर्डन ज्यांच्यावर अरबांचं नियंत्रण होतं, तो प्रदेश फ्रान्सच्या

नियंत्रणाखाली गेला. खनिज तेलाने संपन्न असा मेसोपोटेमियाचा मध्य आणि दक्षिण भाग, बसरा-बगदादच्या जवळपासचा भूभाग, हैफा आणि एकर ही दोन बंदरे इंग्लंडच्या हाती आली. फ्रान्स आणि इंग्लंड या दोन्ही देशांनी एकमेकांना दळणवळणाची नियंत्रणमुक्त मुभा ठेवली. पॅलेस्टाईन हे त्याच्या पवित्र, ऐतिहासिक महत्वामुळे या तिघांपासून मुक्त केलं गेलं. स्वतंत्रपणे त्याचा कारभार आतंरराष्ट्रीय लवादाकडे गेला. या करारानंतर पुढच्या काळात परत आणखी भर पडत गेली. इटालीला आपल्याकडे वळवून घेतल्यावर त्याच्यासाठीही ॲनातोलियाचा काही भाग बहाल करण्यात आला.

या ऑटोमन साम्राज्याच्या फाळणीत, जाती जमाती, संस्कृती यांचा काहीही विचार न करता, कागदांवरच सरळ रेषा मारून प्रदेशांची चिरफाड करण्यात आली. या फाळणीतून जे देश निर्माण झाले ते होतं मूळ ओथमन साम्राज्य, जे रिपब्लिक ऑफ टर्की या नवीन नावाने  तयार झालं, त्यातून सौदी अरेबिया,जॉर्डन, सिरिया, इराक, ग्रीस, रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, इजिप्त, लिबिया, अल्जेरिया, एवढे देश निर्माण झाले. युगोस्लाव्हिया हा देश १९१८ मधे क्रोशिया-सर्बिया, बोस्निया, स्लोव्हेनिया आणि कोसोवो या राज्यांचा मिळून बनला. आणि १९२८ मधे त्याला युगोस्लाव्हिया या नावाने ओळखलं जाऊ लागलं.

अवघ्या आशिया आणि युरोप खंडांची अशी चिरफाड झाली.

ही मोठी फाळणीची कामगिरी करणारे कोण होते हे दोघे, सर मार्क साईक आणि पिको ?

---



सर मार्क साईक.

सर मार्क साईक यांचा जन्म इंग्लंडमधे, वेस्टमिन्स्टर इथे १६ मार्च १८७९ ला एका उमरावाच्या पोटी झाला. लहानपणापासून आपल्या वडिलांबरोबर त्यांनी ओथमन साम्राज्यात प्रवास करून त्या देशाची ओळख करून घेतली होती. तरुणपणी केंब्रिजमधे शिक्षण घेतल्यावर विसाव्या वर्षी लष्करात प्रवेश केला. एक उत्तम पर्यटक, कॉंझरव्हेटिव्ह पक्षाचे सभासद, लेखक, मुत्सद्दी, यॉर्कशायरची प्रचंड इस्टेट आणि वडिलांकडून आलेली उमरावी अशी त्यांची ओळख होती. तरूण वयातच ऐन पंचविशीतच त्यांनी पुस्तकं लिहिली. १९०४ – ०५ या काळात जॉर्ज विन्डहॅम यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी, मग पार्लमेंटरी सेक्रेटरी, पहिल्या महायुध्दात फॉरेन सेक्रेटरी आणि नंतर १९०५ ते ०६ या काळात कॉंस्टंटिनोपलच्या ब्रिटिश दूतावासाचे मानद सभासद असा त्यांच्या यशस्वी कारकीर्दीचा प्रवास होत गेला. त्याकाळात त्यांचा त्या त्या प्रदेशाच्या अभ्यासाचा परीघ वाढत गेला. पहिल्या महायुध्दाला सुरूवात झाली तेव्हा ते पाचव्या बटालियनचे कमांडिंग ऑफीसर झाले. पण मध्य आशियातील त्यांचा अभ्यास पाहून ब्रिटीश परराष्ट्रखात्याने त्यांना सल्लागार म्हणून नेमलं. पहिल्या महायुध्दात त्यांनी फार मोठी भूमिका बजावली. ओथमन साम्राज्यातून अनेक देशांच्या निर्मितीचे ते मुख्य सूत्रधार ठरले.

१६ फेब्रुअरी १९१९ ला वयाच्या ३९ व्या वर्षी पॅरिसच्या ट्यूलरिज गार्डनच्या भागातील ला लोट्टी हॉटेलमधे त्यांच्या खोलीत त्यांचा अंत झाला. ते स्पॅनिश फ्ल्यूचे बळी ठरले. त्यांचं शव त्याच्या निवासस्थानी इंग्लंडमधे आणलं गेले आणि तिथे त्यांचा दफनविधी झाला. ते स्पॅनिश तापाचा बळी ठरल्यामुळे, ८८ वर्षांनंतर त्यांच्या पुढील वारसांनी त्यांचं शव त्याच तापाच्या अभ्यासासाठी, जंतुशास्त्रज्ञ जॉन ऑक्सफोर्ड यांच्या ताब्यात दिलं. शिसाच्या आवरणाच्या शवपेटीकेतील, त्यांच्या शरिरातील जंतू अभ्यासासाठी मिळतील आणि त्याचा उपयोग होईल असं डॉक्टरांना वाटलं. पण ती शवपेटिका मातीच्या भारामुळे तडकली असल्याचं दिसून आलं आणि शवाची परिस्थितीही फार वाईट झाली होती, त्यामुळे उपयोग झाला नाही.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

फ्राँकोइज पिको –



यांचा जन्म २१ डिसेंबर १८७० मधे पॅरिसमधे झाला. ह्यांचे वडील नावाजलेले इतिहासतज्ञ होते. तरूणपणी कायद्याचं शिक्षण घेतल्यावर इ. स. १८९५ मधे त्यांची राजदूत म्हणून नेमणूक झाली. इ. स. १८९६ मधे ते कोपनहेगनच्या राजदूताचे सेक्रेटरी बनले. पहिल्या महायुध्दाला सुरूवात होण्यापूर्वी ते कॉन्सल जनरल म्हणून बैरूटला गेले. पाठोपाठ कैरोला गेले. पण तिथे असतांनाच त्यांना फ्रेंच सरकारने बोलावून घेतलं. फ्रेंच वसाहतवादी पक्षाचे ते समर्थक होते. सिरिया, लेबॅनॉनमधे फ्रेंच वसाहती व्हाव्यात या मताचे ते समर्थक होते. ओथमन साम्राज्याच्या फाळणीच्या वाटाघाटींमधे त्यांची फ्रान्सतर्फे नेमणूक करण्यात आली. ह्या ऐतिहासिक करारामधे त्यांनी मोठी भूमिका पार पाडली. २० जून १९५१ ला पॅरिसमधे वयाच्या ८० व्या वर्षी वृध्दापकाळाने त्यांचं निधन झालं. या ओथमन साम्राज्यातून एवढे अनेक देश निर्माण झाले ते होतं तरी कसं ? ते निर्माण तरी कसं झालं ? त्याचा मूळ पुरुष कोण होता?

**शौर्य, क्रौर्य, धर्म, कर्म यांच्या सामर्थ्यावर ज्या देशांनी ओथमन साम्राज्याशी धर्मयुध्द घडवली ते बाल्कन देश. या देशांनी इतिहास घडवला आणि भूगोल बदलला.**




Balkans

## पहिल्या महायुध्दाच्या सुरवातीला सन १९१४ मधील ओथमन साम्राज्य.




1914.

# ओथमन साम्राज्याचा उदय.

ते वर्ष होतं हिजरी ६१६. म्हणजेच १२१९. देश होता पर्शिया आणि प्रांत होता पर्शियाच्या पूर्वेकडील खोरासान. त्या भागात तार्तारी पर्वतापासून अमुदरिया प्रांतापर्यंत तुर्की टोळ्या राहात होत्या. उजाड माळरानांचा, उद्योगाला वाव नसलेला. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेला हा खोरासानचा प्रदेश. त्यातच भर म्हणजे वरचेवर येणारी मंगोलियन आक्रमणं. सर्व प्रदेश टोळयांचा. (भारतात त्याचवेळी आलेले महंमद घोरी, पुढे कुतुबुद्दीन ऐबकपासून मंगोलचा बाबर येईपर्यंत याच तुर्कांनी भारतावर राज्य केलं.) या भागातून तेराव्या शतकाच्या सुरूवातीला, नवीन सुबत्ता असलेल्या प्रांताच्या शोधात सुमारे ४००० लोकांची एक टोळी जन्मभूमी सोडून ॲनातोलियामधे शिरली. (वेगवेगळया पुस्तकांमधे वेगवेगळे आकडे आहेत. काही ठिकाणी २०,००० असा उल्लेख आहे.) त्या टोळीचा नायक होता सुलेमानशहा. हे सर्व लोक कायी जमातीचे होते. त्यांच्या देशाच्या जुलमी राजवटीला कंटाळलेल्या या तुकडीने देशांतर करायचं ठरवलं होतं. त्यांना शेजारच्या रूम देशात जायचं होतं.

हा देश म्हणजे ॲनातोलिया. ग्रीक भाषेत याचा अर्थ पूर्व दिशा आणि अरबी भाषेत त्याचा अर्थ सूर्योदय. उत्तरेला काळा समुद्र, पश्चिमेला एजियन समुद्र, आणि दक्षिणेला भूमध्य समुद्राने वेढला गेलेला हा भूप्रदेश. आशिया खंडाचा समुद्रात घुसलेला पश्चिमेकडचा भूभाग म्हणजे ॲनातोलिया. इथे सेल्जुक सत्ता होती. सुलतानाचं नाव होतं अल्लादिन. रूम या नावाने हा देश ओळखला जायचा. सुलेमान शहा आणि त्याची टोळी चरितार्थासाठी या देशात हिंडले. लूटमार करत जगले. इरझोरमच्या जवळपास हिंडले आणि तिथेच स्थिरावले. पण काही काळानंतर आलेल्या मंगोलांच्या धाडीने त्यांना परत विस्थापित व्हावं लागलं. पण हे असं सतत भ्रमंती करणं किती काळ चालणार?

सतत भटकण्याला कंटाळलेल्या सुलेमानने परत आपल्या मायदेशी परतायचा विचार केला आणि ते सारे अलेप्पो मार्गाने पर्शियाकडे निघाले. वाटेत युफ्रेटिस नदी लागली. ती पार करायची होती. पण पाण्याचा अंदाज नव्हता. टोळीचा प्रमुख म्हणून सुलेमाशहाने पाण्यात आपला घोडा उतरवला. पण खोल नदीपात्रात असलेले मोठे खडक सुलेमानला कळले नाहीत. त्याचा घोडा त्या खडकांवर आपटला आणि ठार झाला. त्यावर बसलेला सुलेमानशहाही खाली पडला आणि नदीप्रवाहात नाहीसा झाला.

सुलेमानचा मृत्यू त्याच्या साथीदारांना तिथेच राहण्याचा नियतीचा संकेत वाटला. सगळे प्रवासी परत एकत्र जमले आणि पुढचा विचार करायला लागले. त्यातील काही लोकांनी परत मायदेशी जायचा विचार नक्की केला. सुलेमानचे चार मुलगेही त्या प्रवासात होते. त्यांची नावे गंबाग्दु – संगुर्तकेन - अर्तुग्रुल. आणि दुंदर. सुलेमानचे दोन मुलगे नवीन वस्तीच्या शोधात अन्यत्र निघून गेले. पण सुलेमानचे इतर दोन मुलगे, अर्तोग्रुल आणि दुंदर मात्र मागे फिरले. त्यांच्याबरोबर ४५० कुटुंबही त्यांच्या सोबतीने गेली. सर्वजण अंकारात येऊन

विसावले. (१२ व्या शतकापर्यंत अंकाराला अंगोरा म्हणत) ह्या प्रदेशाची राजधानी होती कोनिया. अल्लादिन हा त्या राज्याचा राजा. जेव्हा हा सारा समुदाय परत रूममधेच राहण्यासाठी परत फिरला, तेव्हा प्रवासात त्यांना एके ठिकाणी लढाई चालू असलेली दिसली. अर्तुग्रुल तिथेच थांबला आणि लढाईचा अंदाज घेऊ लागला. राजा अल्लादिनवर मंगोलांचा हल्ला झाला होता आणि अल्लाद्दीन शत्रूचा मार झेलत होता. अर्तुग्रुल हे सारं बघत होता. राजा अल्लादिन पराभवाच्या छायेत असतांना अर्तुग्रुलने आपल्या साऱ्या सहकाऱ्यांना एकत्र जमवलं आणि त्यांना विचारलं की या देशाच्या राजावर हल्ला झालेला दिसतोय, आणि तो पराभवाच्या छायेत आहेत, तर सांगा आपण कुणाला मदत करायची. साऱ्यांनी विजयी पक्षाच्या बाजूने मदत करण्याचा आपला निर्णय सांगितला. तेव्हा अर्तुग्रुलने ते नाकारलं आणि म्हणाला की हे शौर्याचं लक्षण नव्हे. आपण दु:खी लोकांच्या मदतीने जाणं ही ईश्वराची शिकवण असते. म्हणून आपण या राजाच्या मदतीला जाऊ. हा निर्णय घेऊन अल्लादिन राजाला तो आपल्या ४५० लढाऊ लोकांसह जाऊन मिळाला. अचानक आलेल्या या मदतीमुळे, दोघांनी मिळून मंगोल लोकांना पळवून लावलं. या विजयाने आणि आकस्मिक मिळालेल्या मदतीने अल्लादिन खूष झाला.

त्याने अर्तुग्रुलला मानाची वस्त्रं देऊन सन्मान केला आणि या नवीन लोकांना जमिनीचा एक तुकडा वस्तीसाठी दिला. ती जागा होती राज्याच्या वायव्येकडील सोगात, हा परगणा हिंवाळी वास्तव्यासाठी आणि दुमर्जी पर्वत पायथ्याखालची जागा उन्हाळी वास्तव्यासाठी जहागिर म्हणून दिली. अशा तऱ्हेने अर्तुग्रुल आपल्या लोकांबरोबर तिथे स्थिरावला आणि त्याच्या जमातीचा मुखिया बनून कारभार करायला लागला. त्यानंतर अल्लादिनच्या प्रत्येक स्वारीत तो मदतीला जाऊ लागला. पुढच्या ग्रीक आणि तार्तारांच्या आक्रमणात तो अल्लादिनचा सेनापती म्हणून यश मिळवून आला तेव्हा अल्लादिनने खूष होऊन अर्तुग्रुलला इस्कीशायर आणि करजाहिस्सार हे सोगातच्या उत्तर-दक्षिणेकडचे परगणे भेट म्हणून दिले.

एका लहानश्या जहागिरीचा जहागिरदार म्हणून अर्तुग्रुलने लावलेल्या या बीजाचं भविष्यात महाकाय डेरेदार साम्राज्यात रुपांतर होणार होतं.

अर्तुग्रुल इ. स. १२८८ मधे वयाच्या ९० व्या वर्षी मरण पावला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -




अर्तुग्रुलने सोगातला साम्राज्याचा पाया घातला. बरसाला राजधानी करण्यापर्यंतची भर ओथमनने घातली. बरसाला राजधानी करण्याची कामगिरी ओरहानने केली.

## १ ला सुलतान. ओथमन गाझी - उस्मान. जन्म –१२५८. मृत सन १३२६.

अर्तुग्रुल मरण पावला तेव्हा साऱ्या नागरिकांनी त्याच्या मुलाला, उस्मानला (ओस्मान) आपला नायक म्हणून निवडलं. उस्मानचं वय त्यावेळी ३० वर्षांचं होतं. उस्मानचा जन्म सोगात मध्येच १२५८ साली झाला होता. उस्मान या शब्दाचा तुर्की भाषेत ओथमन असा उच्चार आहे. हाच उस्मान, युरोपियन देशांनी ज्याला ऑटोमान साम्राज्य म्हणून ओळखलं त्या साम्राज्याचा तो मूळ पुरूष ठरला.

सोगातचा कारभार हाती आल्याबरोबर त्याने आपल्या वडिलांचं धोरण बदललं. अर्तुग्रुल जसा अल्लादिनचा सरदार म्हणून राहिला होता, ते धोरण त्याने बदललं. त्यामागे एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की एका स्वारीच्या वेळी ओथमन ज्या स्नेह्याच्या घरात रात्रीच्या वस्तीसाठी राहिला होता, ते घर एका शेख इदाबेली नावाच्या धर्मगुरूचं होतं. त्या घरातल्या फळीवर ओथमनला एक पुस्तक दिसलं. त्या इदाबेली धर्मगुरूला हे कसलं पुस्तक असं विचारल्यावर इदाबेलीने ते कुराण असल्याचं सांगितलं. ओथमनने ते पुस्तक हातात घेतलं आणि रात्रभर उभ्या उभ्याच ते सारं पुस्तक वाचून संपवलं इतका तो त्या मजकूराने प्रभावित झाला होता. पहाटे पहाटे ओथमन थकून झोपला. तेव्हा त्याला एक सुंदर स्वप्न पडलं.

त्याच्या स्वप्नात एक देवदूत आला. स्वप्नातच ओथमनने आपल्या वक्षस्थलातून चंद्र बाहेर पडलेला पाहिला. तो चंद्र मग शेजारी झोपलेल्या इदाबेलीच्या छातीत विसर्जित पावला. नंतर ओथमनच्या नाभीतून एक महाप्रचंड वृक्ष बाहेर पडला. त्या डेरेदार वृक्षाच्या महाकाय छायेत अनेक पर्वत, नद्या, कारंजी, बागांचा रम्य परिसर ओथमनने पाहिलं. सकाळी जाग आल्यावर ओथमनने आपलं ते विलक्षण स्वप्न इदाबेली धर्मगुरूला सांगितलं तेव्हा इदाबेली म्हणाला की याचा अर्थ असा आहे की तुझा वंश सार्वभौम सत्ता उपभोगणार आहे. या जगावर तू राज्य करणार आहेस. माझी कन्या तुझी पत्नी होणार आहे. म्हणून तू माझ्या रबियाबाला खातून या कन्येशी विवाह कर आणि वंशवृध्दी आणि राज्यवृध्दी कर. ओथमनने मग रबियाबाला खातूनशी निकाह लावला. ओथमनच्या दुसऱ्या स्त्रीचं नाव मलहूँ खातून.

त्या विवाहानंतर ओथमनने इदाबेलीचा इस्लाम धर्म आणि सुन्नी पंथ स्वीकारला.

त्यानंतर ओथमनने आपल्या लहानशा जहागिरीचा विस्तार करायला सुरूवात केली.

सोगात हा ब्रिथनियाचा भाग होता. ओथमनने आपल्या परगण्याचा विस्तार करण्यासाठी जवळपासचे किल्ले, छोटे छोटे प्रदेश जिंकायला सुरूवात केली. काही प्रदेश सामोपचाराने, काही प्रदेश वैवाहिक संबंध जोडून आणि काही भूभाग जिंकून त्याने सोगातला जोडले. ओथमनचा पहिला संघर्ष सेल्जुक सुलतानाशी आला. १३०१ साली येनिसेयर जिंकून आपलं कारभाराचं ठिकाण तेच केलं. पुढच्या वर्षी १३०२ मधे बिझंटाईन फौजांकडून नाईकिया जिंकून घेतलं. त्यानंतर उत्तरेतील साकार्या नदीच्या काठचा ते मार्मारा समुद्राजवळचा बिझंटाईन साम्राज्याचा काही भाग जिंकला. इफेसस जिंकल्यावर त्याने बरसा या महत्वाच्या शहराकडे आपली फौज वळवली. सेल्जुक सत्तेचा शेवट झाल्यावर ओथमन स्वतंत्र झाला. त्याने ग्रीसवर आक्रमण करायचं

ठरवलं तेव्हा त्याचा काका दुंदर याने ओथमनला आपला विरोध दर्शवला. भर दरबारात आपल्याला विरोध करणाऱ्या काकाला, दुंदरला, ओथमनने धनुष्यबाणाने ठार करून दरबारी प्रतिष्ठितांना आपल्या भावी धोरणांचा संकेत दिला. त्याला आणखीही एक कारण होतं. ते म्हणजे ओथमनला ठार करण्याची अनेक कारस्थानं शिजत असतांना, ते माहीत असूनही दुंदरने ओथमनला सावध केलं नव्हतं हाही राग ओथमनला होताच. ओथमनने आपल्या कारकीर्दीत लिडिया, एफिसस, पॅफ्लागोनिया, पॅराफर्गिया, मॅग्नेशा हे जवळपासचे परगणे मिळवले.

ओथमन स्वत:ला सुलतान म्हणवून न घेता तो अमीर याच नावाने जगला. त्याने सर्व धर्मीयांना सन्मानाने वागवलं. त्याच्या राजवटीत त्याचं सैन्य खूष असे. कारण स्वारी मोहिमांमधे जी काही लूट मिळे ती तो आपल्या सैनिकांमधे आणि काही भाग गोरगरिबांमधे वाटून टाकत असे. ओथमनच्या मोहिमांच्या काळात त्याचे सासरे इदाबेली कारभार सांभाळायला लागले.

ओथमनचं वय उतरणीला लागल्यावर त्याची जागा कुणाला द्यायच यावर त्याने विचार सुरु केला. ओथमनला अल्लाद्दीन पाशा, ओरहान, मलिक बे, रशिद बे, पझर्लु बे आणि कोबान बे असे ६ मुलगे होते. मोठा मुलगा अल्लादिन हा लढाऊ मानसिकतेचा नव्हता. अभ्यास, वाचन, चर्चा यातच तो रमत होता. मात्र धाकटा मुलगा ओरहान हा त्यांच्या फौजेचा सेनापती होता. शूर होता, पराक्रमी होता. म्हणून ओथमनने आपला वारस म्हणून ओरहानची निवड केली.

ओथमनचा इ. स. १३२६ मधे मृत्यू झाला तेव्हा बरसाची लढाई चालू होती. त्याने बरसाचा विजय पाहिला नाही. गाऊटच्या दुखण्याने तो वारला. त्याचा दफनविधी सोगातमधे झाला. इ. स.१२९९ ते १३२६ पर्यंत याने राज्य केलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

# ओथमन साम्राज्याची सुरूवात.

## 2 रा सुलतान ओरहान. जन्म १२८१. मृ. मार्च, १३६२.

ओथमन आणि मलहूँ खातूनचा हा मुलगा.

आपल्या नेत्याची निवड निवडणुकीने करायची ही कायी जमातीची प्रथा यावेळीही पाळली गेली. त्याप्रमाणे वडिलांच्या मृत्यूनंतर ओरहान या सोगातमधील लहानशा तुर्की जमातीचा प्रमुख बनला. तख्तावर बसण्यापूर्वी ओरहानने ओथमनची तलवार आणि तिच्या भोवती लपेटलेला चामड्याचा पट्टा हातात घेऊन समारंभ सुरू केला. तख्तावर बसण्यापूर्वी हा विधी करण्याची त्यानंतरच्या ओथमन सुलतानांची ती प्रथाच पडून गेली. ओरहानचा जन्म १२८१ सालचा आशिया मायनरमधील रूममधल्या सोगातमधला. ओरहान वडिलांच्या काळातच त्यांच्याबरोबर स्वाऱ्या करायला लागला होता. ओथमनच्या काळात मंगोलियन आक्रमण झालं तेव्हा ओरहानने आपल्या पराक्रमावर विजय मिळवून आणला होता. तो त्याचा पहिला विजय होता.

ओरहान प्रमुख झाला तेव्हा बरसा ( तुर्की उच्चार बुरसा) नुकतंच हाती आलं होतं. बरसाची लढाई १३२१ ते १३२८ अशी खूप वर्षे चालली होती. बिझंटाईन हा रोमचाच भाग असल्यामुळे त्याला रुमेलिया म्हणत. बिझंटाईनचा राजपुत्र आंद्रेनिकोस ह्याने आपल्या वृध्द आजोबाविरुध्द बंड केलं होतं आणि सत्ता मिळवायला तो उतावीळ झाला होता त्या अस्थिर काळाच्या संधीचा फायदा घेऊन ओरहान फौज घेऊन बरसावर गेला आणि त्याला वेढा घालून बसला. ही घटना इ. स. १३२१ मधली. ७ वर्षांच्या वेढ्यानंतर आतले लोक उपाशी मरायला लागले तेव्हा किल्लेदाराशी वाटाघाटी करून ओरहानने बरसा जिंकलं होतं. मारमारा समुद्राच्या दक्षिणेला वसलेलं हे बरसा गाव. निसर्ग सौंदर्याने नटलेलं आणि हिरवंगार असलेलं हे गाव येझिल बरसा म्हणजेच हरित बरसा या नावाने ओळखलं जायचं. हे कॉंस्टंटिनोपलपासून थेट अवघ्या ६० मैलांवर दक्षिणेला होतं. बरसा हाती आल्यावर ओरहानने आपली राजधानी तिथेच स्थापन केली. पुढे कित्येक वर्षे बरसाच राजधानी राहिली. ओरहानने सुंदर इमारती, मदरसे, आणि मशिदी बांधून तिच्या सौंदर्यात भर टाकली. ओथमन साम्राज्याची पहिली राजधानी म्हणून तिचं महत्व मोठं होतं.

राज्याचा विस्तार करायचं ठरवल्यावर ओरहानने आपल्या थोरल्या भावाला, रबियाबालाचा मुलगा अल्लादिनला, राज्य विभागून वाटून घेण्याचीही कल्पना सुचवली पण अल्लादिनने ती सूचना सपशेल अव्हेरली. कारण अल्लादिनला अभ्यास, धार्मिक पुस्तकांचं वाचन यांची आवड होती. शेवटी माझा वजीर तरी हो, हा ओरहानचा प्रस्ताव अल्लादिनने मान्य केला. मग ईदाबेलीच्या सल्ल्याने अल्लादिन राज्याचा कारभार सांभाळू लागला. ओथमन साम्राज्याच्या वजीरपदाचा पाया अशारितीने सुरू झाला. त्या पदाला पाशा हे नाव पडलं. (पातशहाचे डोळे-कान-नाक म्हणजे वजीर. म्हणून संक्षिप्त नाव पाशा.) अल्लादिनला अल्लादिन पाशा या नावाने संबोधलं जाऊ लागलं.

भावावर कारभार सोपवून निर्धास्त झालेला ओरहान मग बाहेरच्या स्वाऱ्या, मोहिमा करण्यात गुंतला. त्याला राज्य विस्तारायची महत्वाकांक्षा होती. त्याने आपल्या राज्यविस्ताराची सुरूवात मारमारा समुद्राच्या काठचं मुदान्या हे शहर जिंकून केली. वायव्येकडील निकोमेडिया आणि नायकिया जिंकून सीमा विस्तारायच्या होत्या. सन १३२९ सालच्या १०/११ जूनमधे झालेल्या, पेलेकानोनवरचा विजय हा ओरहानचा मोठा विजय होता. कारण त्याने बिझंटाईन साम्राज्यालाच हात घातला. निकोमेडिया आणि नायकियावरची ओरहानची पकड सोडवायला बिझंटाईन राजा आंद्रेनिकोस आपल्या सेनापती जॉन कँटाकुझीनला बरोबर फौज घेऊन निकोमेडियाकडे निघाला.

ओरहानने लढाईसाठी पर्वताच्या पायथ्याची, पेलेकानोनला मोक्याची जागा आधीच पकडून ठेवली होती. तिथे दोन्ही फौजांची गाठ पडली. घनघोर लढाई झाली. सुरूवातीला बिझंटाईन फौजेचा विजय होत होता. मध्यरात्रीपर्यंत चाललेल्या या लढाईत सेनापती जॉन कँटाकुझिन आणि बिझंटाईन राजा आंद्रेनिकोस हलकेसे जखमी झाले पण त्यांच्या फौजेत राजा ठार झाल्याची किंवा गंभीर जखमी झाल्याची खोटी बातमी पसरली आणि लढाई मोडली. बिझंटाईन फौज कॉंस्टंटिनोपलला माघारी गेली. या लढाईला ओरहानच्या दृष्टीने खूप महत्व होतं कारण हा बिझंटाईन साम्राज्य आणि ओथमन साम्राज्यातील पहिला सरळ सरळ भिडलेला सामना होता. या लढाईनंतर बिझंटाईन राजाने आशिया मायनरमधला आपला प्रदेश घेण्याचा परत प्रयत्न केला नाही.

पाठोपाठ १३३१ आणि १३३७ सालात नायकिया आणि निकोमेडिया शहरंही ओरहानच्या हाती आली. यानंतर बिझंटाईन साम्राज्याची आशिया मायनरमधून सत्ता संपुष्टात यायला सुरुवात झाली. आणि दुसरीकडे ओथमन तुर्कांचं सामर्थ्य प्रचंड वाढलं.

ओरहानला मग आजूबाजूच्या अमीर जहागीरदारांना जिंकायचं होतं. त्याचं पुढचं लक्ष्य होतं ते थ्रेस आणि मॅसेडोनिया. त्यानंतर त्याच्या फौजा शिरल्या त्या मारमारा समुद्राच्या काठावर असलेल्या मिसिया बंदरावर. ते हाती आल्यावर ओरहानच्या स्वप्नातलं राज्य निर्माण झालं. इ. स. १३४५ मधे करीसीचा राजा मेल्यावर त्याच्या दोन मुलांमधे सत्तेवरून भांडणं चालू झाली. तिथे शांतता आणायचं नाटक करून ओरहान करीसीमधे फौज घेऊन गेला. त्या लढाईत मोठा मुलगा मारला गेला आणि धाकटा मुलगा कैद झाला. या विजयाचं महत्व मोठं होतं कारण त्यात ओरहानला दर्दनेलनस् सामुद्रधुनीच्या जवळचा प्रदेश मिळाला. त्यामुळे नाविकदल उभारायचं त्याचं स्वप्न सत्यात उतरलं. करीसीच्या या लढ्यामुळे ओरहानला आता बरसा, निकोमेडिया, नायकिया, करिसी असे ४ मोठे परगणे मिळाले.

एवढा प्रदेश मिळवल्यावर त्याच्या संरक्षणासाठी ओरहानने अनेक उपाय योजले. आपल्या राज्याच्या सुरक्षेसाठी त्याने ठिकठिकाणी मजबूत किल्ले बांधले. उत्तमोत्तम ५० शहरं वसवली. मोठं पायदळ तयार केलं. ४० हजार घोड्याचं घोडदळ उभारलं. सशक्त गुप्तहेरखातं तयार केलं. सैन्याची पुनर्बांधणी केली.

ओरहानने आता स्वतःला सुलतान म्हणवून घ्यायला सुरुवात केली आणि ओथमन साम्राज्याचा पाया घातला. दुबळ्या झालेल्या बिझंटाईन राजाला न मानता तू स्वतंत्र हो हा सल्ला अल्लादिन पाशाने त्याला दिला. आणि आपल्या घराण्याचं एक राज्य स्थापन झाल्याचा इतरांना संकेत दिला. पण सन १३३३ सालात एक

मोठी दुर्घटना घडली. ज्याच्यावर कारभार सोपवून ओरहान निर्धास्त होता, तो अल्लादिन पाशा अल्लाला प्यारा झाला.

अल्लादिन पाशाने राज्य कारभाराची घडी बसवली. ओरहान नवीन प्रांत जिंकत गेला आणि अल्लादिन पाशा राज्याचा कारभार सांभाळत गेला. अल्लादिनने राज्य कारभारात शिस्त आणली. इस्लाम धर्माच्या तत्त्वांवर त्याने राज्यात कायदे लागू केले. चार इमामांची नेमणूक केली. त्याने कारभारात नवीन सुसूत्रता आणली. सारा वसूलीचे कायदे केले. आर्थिक शिस्त आणली. अधिकाराची पदं निर्माण केली. ओरहानच्या नावाने नाणी पाडली. बिझंटाईन प्रदेश जिंकल्यावर एक नवीन समस्या ओरहानसमोर उभी राहिली. ती म्हणजे नवीन ख्रिश्चन धर्मीय कैदी. त्याचं काय करायचं, आपल्या राज्यात त्यांना कसं सामावून घ्यायचं हा वाढत्या विजयांमुळे प्रश्न वाढत गेला. ओरहानने मग ख्रिश्चनांची आपल्या सैन्यातील भरती बंद केली. लष्कर पोसण्याचा मोठा कर त्यांच्यावर लादला आणि मुसलमानांना या करातून सूट दिली. मुसलमानांना ख्रिश्चन मुलींशी निकाह करायची परवानगी होती, मात्र ख्रिश्चन मुलाला मुसलमान मुलीशी विवाह करायला बंदी होती. ज्यादिवशी ख्रिश्चन माणूस मुसलमान होई त्यादिवशीपासून तो ओस्मानली या नावाने ओळखला जाऊ लागला. मुसलमानांना मिळणारे सगळे कायदे त्याला मिळायला लागले. दोन धर्मांतील दरी मिटवायला हे करणं ओरहानला जरूरीचं होतं.

राज्यविस्ताराच्या उद्योगाने झपाटलेला ओरहान सतत मोहिमांवर असे. कोणत्याही प्रांतात तो एक महिन्यापेक्षा जास्त वेळ टिकतच नसे. एकापाठोपाठ मोहिमा काढत राहण्याच्या त्याच्या ध्येयाने त्याला सतत शूर शिपायांची गरज वाटायला लागली. ती इतकी वाढली, तरूणांनी सैन्यात दाखल व्हावं म्हणून त्याने एक नवीन शक्कल लढवली. त्याने आपल्या राज्याचे लहान लहान विभाग केले आणि प्रत्येक विभाग एकेका सैनिकाला दिला. त्या सैनिकाने त्याचा भूप्रदेशाचा सांभाळ करायचा, सारा वसूल करायचा आणि नवीन प्रदेश जिंकला की तो भाग त्याच्या जहागिरीला जोडला जायचा. त्या सैनिकाचा मृत्यू झाल्यावर तो प्रदेश ओरहानच्या ताब्यात जायचा. तिथे कुणाची नेमणूक करायची ते मग ओरहानच ठरवत असे. त्यामुळे ही जमीनदारी वंशपरंपरा झाली नाही. ही एक प्रकारे सरंजामशाहीचीच सुरूवात होती. या त्याच्या आकर्षक योजनेमुळे अनेक तरूण फौजेत दाखल झाले. राज्याच्या सीमा विस्तारत गेल्या. जिंकलेल्या राज्यातून आणलेले कैदी गुलाम म्हणून फक्त मुसलमान सैनिकांना तो देत असे आणि स्त्रिया सैनिकांच्या जनानखान्यात जात किंवा दासी बनत. इतर धर्मिय सैनिकांना मात्र यातून वगळलं जाई. याचा परिणाम एकच झाला, तो म्हणजे या नवीन जिंकलेल्या प्रांतामधले ख्रिश्चन मुसलमान झाले आणि या नवीन ओस्मानली तुर्कांची संख्या खूप वाढली. मुसलमानांना मिळणारे सर्व फायदे या नवीन ओस्मानली जनतेला मिळायला लागले. ओस्मानली नावाने, इतर तुर्कांपेक्षा एक वेगळाच तुर्की समाज तयार होऊ लागला. ओरहानने नवीन जिंकलेल्या प्रांतांमधे आणि बाल्कन देशांमधे, धर्मांतरित मुसलमान तुर्कीची संख्या वाढायला लागली.

ओरहानची सैनिकांना भूखंड वाटून देण्याची कल्पना ही प्रथा फार काळ चालली नाही कारण तुर्की लोकांना शिक्षण, संस्कार, परंपरा नसल्यामुळे कारभार कसा करायचा याचं ज्ञानही नव्हतं आणि अनुभवही नव्हता.

इ. स. १३३४ ते १३५४ या वीस वर्षांमधे एजियन समुद्राच्या आणि ॲनातोलियाच्या किनाऱ्यावरची अनेक ठाणी जिंकून ओथमन राज्याच्या सीमा पसरत गेल्या.ऱ्होडस्, मॅसेडोनियापर्यंत त्याच्या फौजा पोचल्या. ओरहानच्या पराक्रमाला मर्यादा नव्हत्या. इ. स. १३३७ मधे ओरहानने कॉंस्टंटिनोपलवर अचानक हल्ला करून ते जिंकायचा प्रयत्न केला पण सेनापती कँटाक्युझिनने तो हल्ला तडाख्याने परतवला. जेव्हा जेनोआ आणि व्हेनिसमधे झगडा सुरू झाला तेव्हा ओरहानने बिझंटाईन राजाची बाजू घेतली. कँटाक्युझिनला हरवल्यानंतर त्याने आपला मैत्रीचा हात पुढे करून ओरहानशी मैत्री केली आणि आपली मुलगी ओरहानला देऊन राजकीय संबंध घट्ट केले. बिझंटाईन आणि ओरहानचा तुल्यबळ शत्रू एकच होता. तो म्हणजे सर्बियाचा स्टीफन दुशान. त्यालाही सर्बियाची सत्ता मिळवायची महत्वाकांक्षा होती. कॉंस्टंटिनोपल जिंकण्याठी दुशानने ओरहानची मदत मागितली. या संधीचा ओरहानने उपयोग करून घेतला आणि दुशानला ते अति महत्वाचं ठिकाण जिंकायला मदत पाठवली. दुशान कॉंस्टंटटिनोपलच्या लढाईत मारला गेल्यामुळे ओरहानचा एक शत्रू कमी झाला.

इ. स. १३५४ मधे ओरहानने मग आपलं लक्ष पौर्वात्य रोमन राज्याकडे वळवलं. कॉंस्टंटिनोपल ही त्यांची राजधानी होती. बिझंटाईन राजवट आता उताराला लागली होती. तो प्रदेश आपल्या राज्य विस्ताराला जोडून घेण्यासाठी ओरहानने ही स्वारी आपला पराक्रमी मुलगा सुलेमानकडे सोपवली. शहजादा सुलेमानने स्वारी यशस्वी केली आणि सिनबिचा किल्ला हस्तगत केला. याचा फार मोठा लाभ झाला तो म्हणजे दर्दनेलस्च्या सामुद्रधुनीवर युरोपियन देशाच्या बाजूला ओथमन तुर्कांचं पाऊल रोवलं गेलं. शहजादा सुलेमानपाशाने मग आणखी एक पाऊल उचललं. भूकंपामुळे उध्वस्त झालेलं गॅलिपोली शहर आपल्या निर्वासित तुर्कमन लोकांसाठी काबीज केलं. गॅलिपोली हा दर्दनेलस् आणि डावीकडे एजियन सागरात बनलेला द्वीपकल्प. सागरी स्वामित्व मिळवायला अत्यंत महत्वाचं ठिकाण. सुलेमानने ते कब्जात घेतलं. आता युरोपात जाण्याचा ओथमन सुलतानांचा मार्ग त्यामुळे मोकळा झाला.

ओरहानचं वय जसजसं वाढत गेलं, तसा ओरहान बरसामधे एकांतवासात राहू लागला. या काळात आणखी एका संकटातून ओरहान गेला. ते संकट म्हणजे ओरहान आणि निलोफरचा मुलगा खलील याला जेनोआच्या बोटीच्या कप्तानाने अपहरण करून एजियन सागराच्या एका बेटावर नेऊन ठेवलं. पण निलोफरचा भाऊ बिझंटाईनचा राजा त्याच्या मदतीला आला. चांचांनी मागितलेली १ लाखांची रक्कम भरून शहाजादाची सुटका करण्यात आली.

ओथमन साम्राज्याची अशी भरभराट चालू असतांनाच एक मोठी दुर्घटना घडली. ओरहानचा सर्वात मोठा लाडका मुलगा, सुलेमानपाशा खेळत असतांना घोड्यावरून खाली पडला आणि तत्क्षणी ठार झाला. गॅलिपोली हातात आल्यावर सुलेमानपाशाने तेच आपलं वास्तव्याचं ठिकाण केलं होतं. गादीचा वारस असा अचानक तरूण वयात मरण पावला. सुलेमानच्या अपघाती मृत्यूनंतर लगेच ओरहानही पुढच्या वर्षी पुत्रशोकाने अल्लाघरी गेला.

ओरहानचं पहिलं लग्न इ. स. १२९९ साली निलोफर या बिझंटाईनच्या राजकन्येशी झालं. निलोफरशी त्याचा जो विवाह झाला त्याचा एक किस्सा सांगितला जातो. इ. स. १२९९ मधे राजकन्या निलोफरचं लग्न बिझंटाईन राज्यामधील राज्याच्या बिलसिकच्या न्यायाधीशाशी होणार होतं. त्या न्यायाधीशाने ओथमनला आणि त्याच्या लोकांना आपल्या लग्नाला यायचं आमंत्रण दिलं. ओथमन आपल्या लोकांना घेऊन लग्नाला गेला. त्या काळच्या प्रथेप्रमाणे बिलसिकमधे आपल्या खजिन्याचे पेटारे ठेवून, ओथमन दोन तासांच्या अंतरावरील विवाह समारंभाच्या स्थळी निघाला त्यावेळी तो नवरदेवाच्या बरोबर जात होता. विवाहस्थळ जवळ आल्याबरोबर ओथमनच्या लोकांनी नवरदेवाला वेढा घातला आणि वेशीच्या दारापर्यंत नेलं. वेशीवरच्या पहारेकऱ्यांनी नवरदेवाला पाहून दरवाजे उघडले. त्याबरोबर ओथमनच्या लोकांनी त्या जागेचा कब्जा घेतला. ओथमनने तिथल्या तिथे आपल्या मुलाचं म्हणजे ओरहाननशी निलोफरचं लग्न लावलं.

हा विवाह समारंभ असा दगाफटका होऊन पार पडत असतांना तिकडे बिलसिक मधे ओथमनने जे मोठे मोठे धनाचे पेटारे ठेवले होते, त्यातील एका पेटाऱ्यामधून एक सैनिक बाहेर आला आणि त्याने इतर पेटारउघडले. ओथमनने सर्व पेटाऱ्यांमधे आपले सैनिक लपवून आणलेले होते. त्यांनी बिलसिक गावाचा कब्जा घेतला आणि तो किल्ला ओथमनच्या ताब्यात आला. निलोफरने लग्नानंतर धर्मांतर केलं. ती आधी ग्रीक वंशाची होती. हुशार, राजकारणी, मुत्सद्दी अशी तिची ख्याती होती. तिने आपल्या मुलावर, मुरादवर उत्तम संस्कार केले. ओरहानच्या मृत्यूनंतर मुराद गादीवर आला. त्यानंतर निलोफर वालिद खातुन, राजमाता अशा नावाने संबोधली जाऊ लागली. मुलगा गादीवर आल्यावर त्याच्या जिवंत असलेल्या आईला या नावाने संबोधलं जाणारी ती पहिली स्त्री होती. निलोफरचं दफन ओथमन आणि ओरहानच्या शेजारीच केलं गेलं.

ओरहानच्या इतर बेगम अशा होत्या – बायातुन खातून. हिला अपत्य झालं नाही. पोर्शा खातून. हिला इब्राहिम आणि फातिमा अशी दोन मुलं होती. इ. स. १३२४ मधे ओरहानचं सुलतानबीशी निकाह झाला. तिचा मुलगा सुलेमान पाशा. इ. स. १३४६ सालात ओरहानचं थिओडोरा या राजकन्येशी विवाह झाला तेव्हा ती राजकन्या अवघी १४ वर्षांची होती. त्याची आणखी एक पत्नी इफ्तंद खातून.

ओथमन राजवटीच्या बीजाचा डेरेदार वृक्ष बनवण्याचं श्रेय ओरहानचं आहे. ओरहानने आपली नाणी पाडली त्यावर लिहिलेले "ओथमनचा पुत्र, ओरहानला परमेश्वर साम्राज्य निर्मितीचं कारण बनो" हे शब्दच त्याचं खरं वर्णन करतात. ओरहानचा दफनविधी बरसामधे झाला. इ. स. १३२६ ते १३६२ पर्यंत ३६ वर्षे याने सत्ता गाजवली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## 3 रा सुलतान खुदाबंदगार मुराद. जन्म- २९ जून १३२६ मृ. १५ जून १३८९.

खुदाबंदगार मुराद हा ओथमन साम्राज्याचा तिसरा सुलतान.

ओरहान-निलोफरच्या मुराद या दुसऱ्या मुलाने राज्यारोहण केलं तेव्हा ३६ वर्षांचा होता. ज्या वर्षी ओथमन वारला त्याच वर्षी मुरादचा जन्म झाला. हा ओथमन साम्राज्याचा तिसरा सुलतान. इ. स. १३६२ साली तो गादीवर आला. मुराद प्रथम कारभाराला शहाणा होता. शूर होता. राज्यावर त्याचं उत्तम नियंत्रण होतं. पण तो संपूर्ण निरक्षर होता. ओरहानने आपल्या कारकीर्दीत समुद्र ओलांडून बिझंटाईनमधील काही भागावर कब्जा मिळवला तेव्हांपासून सुरूवातीला दुर्लक्षित असलेल्या ओथमन सुलतानांच्या लढायांकडे ख्रिश्चन युरोपने लक्ष द्यायला सुरुवात केली होती.

मुरादने आपल्या पराक्रमाने राज्य अनेकपटीनं विस्तारलं. इ. स. १३६३ मधे त्याने बिझंटाईन साम्राज्यातील अति महत्वाचं ठिकाण एद्रिओनोपोल जिंकून बाल्कन द्वीपकल्पात आपला पाय रोवला. मुरादने डिमिटिको जिंकून तिथे आपला राजप्रासाद आणि एक मशिद बांधली. जवळपासच्या अनेक राज्यांना आपलं मांडलिक बनवलं. आपल्या राज्याच्या सीमा, ग्रीसच्या थ्रेस, बल्गेरिया, सर्बिया, मॅसेडोनिया, अल्बानियापर्यंत नेऊन भिडवल्या. बल्गेरिया आणि सर्बिया हे अत्यंत सुपीक देश. त्या देशात गव्हाचं मोठं उत्पादन होत असे. असा सुपिक प्रदेश मुरादच्या हाती आला. बिझंटाईनचा आग्नेय भाग त्याचा मांडलिक झाला. इ. स. १३८५ मधे सोफिया जिंकलं.

बरसातून राज्य कारभाराची सूत्रं हलवत असतांना मुरादला एक गोष्ट कळून चुकली की युरोपमधे ओथमन साम्राज्याचा विस्तार करायचा असेल तर बरसामधे राहणं अडचणीचं आहे. युरोपमधे आपल्या सत्तेचा विस्तार करायचा असेल तर बरसा सोडून युरोप खंडात आपल्याला वास्तव्य करायला हवं. म्हणून त्याने लगेच आपली राजधानी एद्रिओनोपलला हलवली, आणि राजधानीचं एदिर्न असं नामकरण केलं. त्याच्या या पवित्र्याने सावध झालेल्या सर्बियाने, आशिया मायनरमधून बॉस्फरसची सामुद्रधुनी ओलांडून, युरोपात शिरलेल्या या तुर्कांना हाकलून लावण्यासाठी या ओथमन तुर्कांवर हल्ला केला. तेव्हा मुराद प्रथमचा सेनापती लाला शाहीन पाशाने पराक्रम गाजवून २६ सप्टेंबर १३७१ या दिवशी विजय मिळवला. सुलतान मुराद प्रथमने मग लाला शाहीन पाशालाच रुमेलीयाचा (थ्रेस, मॅसेडोनिया आणि मोएशिया या भागाला रुमेलिया म्हणत) गव्हर्नर करून टाकलं.

सुलतान मुरादच्या कारकीर्दीत भर टाकणारी आणखी एक कामगिरी म्हणजे येनिचेरिज- जानिसरिजची निर्मिती. जानिसरिज ही तरूण अंगरक्षकांची, लष्कराव्यतिरिक्त बनवलेली एक वेगळी फौज होती. ओरहानच्या काळात नवीन जिंकलेल्या प्रांताबरोबर तिथली ख्रिश्चन प्रजाही तुर्की ओथमन साम्राज्यात सामावली. त्या समाजाचं काय करायचं हा प्रश्न ओरहानने काही अंशी सोडवला होता. पण मुरादच्या काळापर्यंत तरूण कैदी आणि आणखी नवीन ख्रिश्चन लोकसंख्येची भर त्यात पडली. त्यावर उपाय योजणं जरूर होतं तरच समाज स्वास्थ्य टिकणार होतं. त्यातून निघाली ही जानिसरिजची कल्पना. नवीन तगडे दणकट ख्रिश्चन तरूण मुलांना निवडून, सैनिकी शिक्षणात

तरबेज करून वेगळी फौज तयार करायला सुरुवात झाली. जानिसरिज म्हणजे नवीन फौज. या तरूण मुलांना अंगरक्षक म्हणूनही वापरलं जाऊ लागलं. त्यांना मोठे पगार देण्यात आले. त्यांच्या राहण्यासाठी वेगळ्या बराकी बांधण्यात आल्या. या तरुणांच्या हातावर आणि मांडीवर गोंदवून क्रमांक टाकला जाई, सुलतानाच्या हातावर १ क्रमांक असे. त्यांना सुंदर गणवेशही देण्यात आले पण एक मोठा निर्बंध त्यांच्यावर घालण्यात आला. तो म्हणजे या नवीन फौजेतील लग्न करण्याची परवानगी नव्हती. लढाईतून मिळालेल्या लुटीतला ५ वा हिस्सा या जानिसरिजच्या खर्चासाठी राखून ठेवण्यात आला. तरुण मुलांना नोकऱ्या, मोठे पगार हा फायदा पाहिल्यावर अनेक ख्रिश्चनांनी आपल्या तरूण मुलांना जानिसरिजमधे पाठवायला सुरूवात केली. जानिसरिजच्या फौजेची सुरूवात १००० तरूणांनी झाली. गॅलिपोली हे फौज तयार करण्याचं केंद्र बनवण्यात आलं. या नवीन तुकडीची पहिली सभा झाली तेव्हा हाजी बेकताशने सर्व तरूणांना संबधित करतांना हात वर करून म्हटलं की, या नव्या तुकडीतील तरुणांना आजपासून येनीचेरी म्हणजे नवीन फौज असं ओळखलं जाईल. येनीचेरिचा अपभ्रंश म्हणजे जानिसेरिज. जानिसेरीजच्या प्रमुखाला आगा हे नाव होतं. हे सुलतानाचे निष्ठावान शिस्तशीर सैनिक असत.

सुलतान मुरादने कॉंस्टंटिनोपलच्या राजाशी मैत्री केली. नंतर मुरादला आणखी एका लढाईला सामोरं जावं लागलं. फिलिपोपलिस जिंकल्यावर तिथला सुभेदार सर्बियाच्या आश्रयाला गेला. ओथमन राज्याचा वाढता प्रभाव पाहून मुरादला थोपवण्यासाठी त्याच्या विरुध्द हंगेरी-बोस्निया-वालेकियाचे राजे एकत्र आले. दोन्ही पक्षांमधे तुंबळ लढाई झाली आणि त्यात मुरादचा विजय झाला. हे ख्रिश्चन विरूध्द तुर्कांचं धर्मयुध्द होतं. मुराद स्वत: त्या युध्दात भाग घेण्यासाठी निघाला होता. वाटेत बिघाला थांबला. ते जिंकणं महत्वाचं होतं कारण परतीच्या मार्गावर ते होतं. पण तो बिघात असतांनाच त्याच्या सेनापतीने लढाईत विजय मिळवला होता. त्यामुळे सर्बिया, हंगेरी, बोस्नियातील अनेक शहरं मुरादच्या हाती आली.

सुलतान मुराद प्रथमच्या काळात ओथमन साम्राज्य प्रचंड पसरलं. बिझंटाईनचा आणि बाल्कन देश समूहातील मोठा भाग मुरादच्या हाती गेला. काही राजे या तुर्की सुलतानांचे मांडलिक झाले. मूळ सेल्जुक राजवटीचे विखुरलेले १० प्रांत होते. त्यातील कहोरासी मुरादने जिंकला. हमीद प्रांत विकत घेतला. कारमियानच्या अमीरने आशिया मायनरमधील इतर अमीर एकत्र करून सुलतान मुरादवर हल्ला केला. त्यात या सर्व अमीरांचा पराभव झाला. या लढाईनंतर कारमियाचा अमीर अल्लादिनने मुरादशी मैत्री करून मांडलिकत्व मान्य केलं.

नंतरची ५/६ वर्षे मुरादने सुखात, शांततेत, आणि ऐश्वर्यात घालवली. इ. स. १३६५ सालात रिपब्लिक ऑफ रागुसाच्या राजाने मुरादचं सार्वभौमत्व मान्य केलं आणि त्याची मदत मागितली. त्याबदल्यात मुरादला खंडणी देण्याचं मान्य केलं. हा करार जेव्हा मुरादसमोर आला तेव्हा त्या करारावर स्वाक्षरी करण्याची गरज होती. पण मुराद निरक्षर असल्यामुळे त्याने आपले हात शाईत बुडवले आणि आपल्या हाताचा ठसा कागदावर उमटवला. तेव्हापासून शिक्का म्हणून ओथमन सम्राटांनी हाताचा ठसा उमटवण्याची प्रथा सुरु झाली. हा पुरातन कागद रागुसाच्या म्युझियममधे पाहायला मिळतो.

सन १३७० मधे मुरादला आपल्याच कौटुंबिक कलहाचा सामना करावा लागला. हा प्रसंगही फार गंमतीचा होता. मुरादची आणि बिझंटाईन सम्राट जॉन पोलोलोगसची लढाई चालू असतांना जॉन पोलोलोगसने

इतर युरोपियन देशांकडून मदतीची मागणी केली. तेव्हा परिणाम असा झाला की पोलोलोगसलाच, त्याने पैशाचं देणं न फेडल्याच्या कारणावरून व्हेनिसमधे अटकेत पडावं लागलं. त्या सुटकेसाठी भरपूर खंडणीची मागणी झाली. पण या संधीचा फायदा पोलोलोगसचा मुलगा आंद्रेनिकोसने घेतला. त्याच्या हाती सत्ता अचानक आली त्याबरोबर बापाच्या सुटकेसाठी केलेली खंडणीची मागणी त्याने नाकारली आणि स्वत:कडे सत्ता घेतली. तेव्हा पोलोलोगसने पैसा उभारण्यासाठी आपल्या ताब्यातील एक टेनेडॉस नावाचं बेट विकून खंडणी भरली आणि आपली सुटका करून घेतली.

या युवराज आंद्रेनिकोसला जाऊन मिळाला मुरादचा मुलगा सावसीन. कारण त्यालाही दोन थोरले भाऊ असल्यामुळे कधीही सत्ता मिळणार नव्हती. उलट ते सत्तेत आल्यावर प्राणही गमवावा लागणार होता. आपले दोन्ही मुलगे सत्तेसाठी आपल्याविरूध्द एकत्र आलेले पाहून दोन्ही बाप या दोन्ही मुलांच्या उपद्व्यापाने चकित झाले. सावसीनने आपल्या बंडासाठी राज्याचा खजिनाही पळवला होता. तेव्हा दोन्ही मुरलेले मुरब्बी राजकारणी सम्राट एक झाले आणि आपल्या मुलांच्या विरूध्द फौजा घेऊन गेले. सुलतान मुरादने शहजादा सावसीनच्या फौजेला आपल्याकडे वळवून घेतलं. आपल्याविरुध्द आलेल्या बापांना पाहून दोन्ही मुलगे दिदिमॉंतिओला पळून गेले. त्यांना तिथून पकडून आणावं लागलं तेव्हा मुलांचं बंडाचं अवसान ओसरलं. मुरादने आपल्या मुलाला, सावसिनला अटक करून आंधळं केलं आणि कैदेत टाकलं. पण नंतर विचार बदलून ठारच केलं. (या सावसीनचा मुलगा पुढे हंगेरीला पळून गेला आणि नंतरच्या सुलतानाला डोकेदुखी होऊन बसला.) पोलोलोगसने मात्र आपल्या युवराजाबद्दल मवाळ भूमिका घेतली. त्याला एका डोळयाने डोळयात व्हिनेगार ओतून, आंधळं केलं आणि जन्मभर कैदेत ठेवलं. पण आपला पुढचा वारस म्हणून आपला दुसरा मुलगा मॅन्युअलच्या नावाची घोषणा केली.

इ. स. १३८५ मधे सोफिया देश सुलतान मुरादच्या हाती आला. पण पुढील वर्षात सन १३८६ साली झालेल्या प्लोकनिकच्या लढाईत सुलतानाच्या सेनेला सर्बियन सैन्याकडून सपाटून मार खावा लागला.

सुलतान मुराद प्रथमने ३० वर्षे कारभार केला. आपल्या कारभारासाठी आपल्या विस्तीर्ण साम्राज्याचे त्याने दोन भाग केले. अनातोलिया आणि बाल्कन प्रांतांचा कारभार विभागल्यामुळे कारभाराचे निर्णय घेणं सोपं केलं. वयाच्या ७०व्या वर्षीही त्याने परत हातात तलवार धरली आणि सर्बियाविरूध्दच्या लढाईत भाग घेतला. ही कोसोवोची लढाई त्याच्या आयुष्याचा अंत करणारी ठरली. सर्बिया आणि मुरादच्या तुर्की फौजा सर्बिया-बल्गेरियाच्या सरहद्दीवर कोसोवोजवळ १५ जून १३८९ या दिवशी एकमेकांना भिडल्या. सर्बियन राजा लझार हा मुरादशी लढण्यासाठी मैदानात उतरला. सुलतान मुराद प्रथम त्याला सामोरा गेला. मुरादच्या उजव्या हाताला शहजादा बायेझिद आणि डाव्या हाताला याकुब उभे राहिले. लढाई घनघोर झाली. या लढाईत वयाच्या सत्तराव्या वर्षी, इ. स. १३८९ मधे मुरादचा मृत्यू झाला. सर्बियाचा राजा, लझार हरबिलविनाकसुध्दा याच लढाईत मरण पावला.

सुलतान मुरादच्या मरणाबद्दल अनेक प्रवाद आहेत. कोसोवोच्या रणांगणावरून परतत असतांना वाटेत मरून पडल्यासारखं वाटणाऱ्या एक सर्बियन सैनिकाने अचानक उठून मुरादला ठार केलं असा एक प्रवाद होता तर एका प्रतिष्ठित सरदाराने मुरादचा मृत्यू कसा झाला याची सविस्तर बातमी बोस्नियाच्या राजाला कळवली. त्यात सुलतान मुराद प्रथम, शामियानात विश्रांती घेत असतांना त्याच्या अंगरक्षकांमधून मार्ग काढून अचानक मिलोस ओबिलि आणि १२ सर्बियन सैनिक मुरादच्या शामियानात शिरले आणि त्यांनी मुरादला ठार केलं. हा शेवट खरा मानला जातो. काही महत्वाचं बोलायचं आहे, सुलतानाची भेट घ्यायची आहे म्हणून ते शामियानात आले. मुराद सुलतानासमोर गुडघे टेकून बसले आणि अचानक कट्यार काढून सुलतान मुरादला त्यांनी ठार केलं अशीही कहाणी सांगितली जाते. सुलतान मुराद ठार झाल्यावर दरबारातील शिपायांनी लगेच मारेकऱ्यांना पकडून ठार केलं. या घटनेनंतर सुलतानाच्या भेटीला येणारांना कायम दूर उभं केलं जाऊ लागलं.

सर्बियाच्या रणांगणावरच सुलतान मुरादच्या मृत शरीराचा काही भाग दफन केला गेला. मुरादच्या शरीराचा काही भाग बरसाला आणला. आता बापाचं तख्त मिळवायची घाई शहजादा बायेझिदला होती. तख्त हवं तर हक्क सांगणाऱ्या याकूब या भावालाही नाहीसं करायला हवं होतं. मुरादचं शव अजून उचललंही नव्हतं तेव्हाच, बायेझिदने आपल्या भावाला, याकूबला शामियानात बोलावून घेतलं आणि धनुष्याच्या दोरीने गळा आवळून याकुबचा खून केला. मग बरसाच्या मौलवीला गुप्तपणे निरोप पाठवून सुलतान मुरादच्या मृत्यूची बातमी गुप्त ठेवण्यास सांगितली. शहजादा बायेझिदने बरसाला याकूब आणि मुरादचं शव आणल्यावर त्यांचा दफनविधी झाला.

मुरादने बिझंटाईन आणि बल्गेरियन स्त्रियांशी लग्न केलं होतं. याची बेगम गुलचेचक खातून आणि थमरा खातून. गुलचेचकचा मुलगा बायेझिद मुरादनंतर गादीवर आला.

इ. स. १३६२ ते १३८९ ही ३० वर्षे मुराद प्रथमने सत्ता उपभोगली. कोसोवाचा विजय आणि जानिसेरिजची व्यवस्थित निर्मिती हे मुरादचं श्रेय. ओथमन सुलतान बरसा ते एदिर्नपर्यंत आपली राजधानी नेली होती.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -




**बरसा-एदिर्न-कॉंस्टंटिनोपल. तीन राजधान्या.2020**




**१५ जून १३८९. कोसोवाची लढाई.                    2020.**

## ४ था सुलतान बायेझिद प्रथम. जन्म १० मे. १३५४. मृ. ३ मार्च १४०२.
## वीजेसारखा कोसळणारा यिल्दरिम सुलतान.

सुलतान मुराद आणि गुलचेचक खातूनचा बायेझीद प्रथम हा मुलगा.

यिलदरिम म्हणजे वज्राघाती बायेझिद प्रथम हा साम्राज्याचा चौथा सुलतान. सुलतान ए रुम हा किताब त्याने घेतला.

चौदावं शतक संपायला एक दशक उरलेलं असतांना, मुरादनंतर गादीवर आला तो बायेझिद प्रथम. १६ जून १३८९ मधे हा चौथा सुलतान झाला. आपल्या तरूण मुलांना आपल्या जिंकलेल्या सुभ्यावर सुभेदार म्हणून नेमायची प्रथा ओथमनने सुरू केली होती. त्याप्रमाणे नंतरचे वारसही अनुभवासाठी सुभेदार म्हणून इतर प्रांतांमधे काम पाहात असत. बायेझिदही असाच सुभेदार होता.

दवलतशाह खातून, देस्पिना, दवलतशाह, मारिया, हफसा खातून या त्याच्या बेगमा. ओथमन तुर्कांच्या राज्याचा विस्तार याच्याही काळात चालूच राहिला. हाही शूर होता. मुरादचं शव अजून शामियानातील दिवाणखान्यातून उचललंही नव्हतं, त्याआधीच बायेझिदने गादी तर बळकावलीच पण आपला भाऊ याकूबला तिथेच गळा आवळून ठार करून त्याने आपल्या मार्गातील भविष्यातील काटा दूर करून टाकला. त्या आधी ओथमन या घराण्यात असं घडलं नव्हतं. देशात अस्थिरता येण्यापेक्षा प्रतिस्पर्ध्याला ठार करणं योग्य या धर्मवचनाचा त्यासाठी आधार घेतला गेला. तुर्की घराण्यात भावांना मारून गादीवर येण्याचा पडलेला हा पायंडा मग पुढच्या पिढ्यांमधे कायम झाला.

सत्तेत आल्याबरोबर मुसलमान देशांशी मैत्री आणि ख्रिश्चनांशी सामना हे धोरण बायेझिदने नक्की करुन टाकलं. दुसरा निर्णय म्हणजे सर्बियाच्या राजाशी मैत्री करून टाकली. सुलतान बायेझिद प्रथमने पहिली स्वारी सर्बियावर केली. भरपूर खंडणीच्या कबूली तहानंतर ती लढाई थांबली. सर्बियाच्या राजाने बायेझिदला खंडणी द्यायची, आपली फौज स्वारीच्या वेळी मदतीला पाठवायची आणि त्याबदल्यात बायेझिदने लुटीतला अर्धा हिस्सा त्याला द्यायचा असा करार ठरला. ही मैत्री घट्ट करण्यासाठी बायेझिदने सर्बियाच्या राजकन्येशी, देस्पिनाशी निकाह लावला.

सन १३९१ मधे भूमध्य समुद्रावरचं अदालिया हे पहिलं बंदर सुलतान बायेझिदने जिंकलं. बायेझिदच्या मोहिमांचा तडाखा सुरू झाला. बायेझिदची फौज झपाट्याने शत्रूवर वीजेसारखी कोसळायला लागली. त्यामुळे बायेझिदने स्वत:ला “यीलदरिम” म्हणजे वज्राघाती हा किताब घेतला. त्याने आपली फौज इतकी समर्थ केली होती, त्या तोडीची फौज इतर कोणत्याही देशाकडे नव्हती.

यानंतर त्याची स्वारी झाली ती बिझंटाईन राजावर. त्याचं कारण म्हणजे एका डोळ्याने आंधळा करून कैदेत टाकलेला राजपुत्र आंद्रेनिकोस बापाच्या कैदेतून पळाला आणि सुलतान बायेझिद प्रथमकडे आश्रयाला आला. त्याने मागितलेल्या मदतीवरून सुलतान बायेझिदने या लढाईत सहज विजय मिळवला. म्हाताऱ्या

पोलोलोगस राजाला आणि त्याच्या मुलाला, मॅन्युअलला कैदेत टाकून राजपुत्र आंद्रेनिकोसला गादीवर बसवलं. काही काळानंतर हाच नाट्यमय प्रसंग परत घडला आणि यावेळी मॅन्युअल कैदतून पळाला आणि सुलतान बायेझिदच्या आश्रयाला आला. सुलतान बायेझिदने या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन आंद्रेनिकोसवर आक्रमण केलं. या लढाईत हरलेल्या आंद्रेनिकोसने बायेझिदचा निर्णय मान्य केला. सुलतान बायेझिदने उरलंसुरलं बिझंटाईन साम्राज्य दोघांच्यात वाटलं. कॉंस्टंटिनोपलला मॅन्युअलची नेमणूक करून काही प्रदेश आंद्रेनिकोसला काढून दिला. दोघांकडून भरपूर खंडणी मागून घेतली. याचा परिणाम म्हणजे कॉंस्टंटिनोपल आणखी खिळखिळं झालं.

सुलतान बायेझिद या मोहिमेत गुंतला असतांना ऐदिनच्या मदतीने कारामानियाच्या अल्लादिन अमीरने बायेझिदचा प्रदेश लुटण्यासाठी स्वारी केली. या युध्दात सुलतान बायेझिदच्या सेनापतीने यश आणलं. अमीर अल्लादिनचे दोन्ही मुलगे पकडले गेले. सुलतान बायेझिदच्या सेनापतीने त्या दोघा मुलांना ठार करून टाकलं. सुलतान बायेझिदला त्या लढाईत मोठा विजय मिळाला आणि कारामानियाचा प्रदेश ओथमन साम्राज्याला जोडला गेला. आता सेल्जुक राजवटीचा सर्वप्रदेश बायेझिदला मिळाला. बायेझिद दुसऱ्या मोहिमेत गुंतलेला पाहून कॉंस्टंटिनोपलची तटबंदी भक्कम करण्याच्या हालचाली मॅन्युअल पोलोलोगस करतोय ही बातमी आल्याबरोबर सुलतान बायेझिदने त्याला विरोध करून ते काम थांबवलं. लवकरच म्हातारा जॉन पोलोलोगस मरण पावला आणि मॅन्युअलच्या हाती सत्ता आली.

सुलतान बायेझिदने आपली नजर आता युरोपकडे वळवली. इ. स. १३९० मधे कॉंस्टंटिनोपलला ओथमन तुर्कांचा पहिला वेढा पडला. पण जय मिळाला नाही. ४ वर्षांनी परत सुलतान बायेझिदने त्या राजधानीला वेढा घालून जिंकायचा प्रयत्न केला. पण दोन्ही वेळा कॉंन्स्टंटिनोपल हाती आलं नाही. सुलतान बायेझिदने मग डॅन्यूब ओलांडून वालेकिया जिंकण्यासाठी आपल्या फौजांना तिकडे नेलं. पण दलदल आणि घनदाट जंगलं यामुळे त्याला विजय मिळाला नाही. इ. स. १३९४ मधे कॉंस्टंटिनोपलवर त्याने परत स्वारी केली. यावेळी बिझंटाईनला मॅन्युअल दुसरा सत्तेत होता. पण तेवढ्यात हंगेरीचा सत्ताधीश सिगिसमंद, फ्रेंच आणि जर्मन फौजांच्या मदतीने ओथमन साम्राज्य जिंकायला आला. २८ सप्टेंबर १३९८ रोजी फ्रेंचांच्या आततायी घाईमुळे बायेझिदला मोठा विजय मिळाला. निकोपोलिसला घनघोर युध्द झालं. हंगेरीचा सिगिसमंद जीव वाचवून पळाला आणि सुरक्षितपणे पोचला. या युध्दात बायेझिदचे ६०,००० सैनिक मारले गेले. त्यावर आपल्या ताब्यातले ख्रिश्चन कैदी ठार करून, सुलतानाने त्याचा सूड घेतला. या लढाईमुळे ओथमन सुलतानांचा युरोपमधला दरवाजा सताड उघडला. हंगेरीचा मार्ग त्याच्या हाती आला. ओथमन साम्राज्य आता विशाल झालं होतं.

या काळात सुलतान बायेझिदने आपलं आरमार भक्कम केलं. गॅलिपोलिला नौदलाच्या लढाऊ बोटी जय्यत तयारीत ठेवल्या. बॉस्फरस, मारमारा या सागरी मार्गावर ताबा ठेवला. सिनोपचं उत्कृष्ट बंदरही त्याच्या हाती होतं.

आजवर सर्वत्र विजय मिळवत राज्यविस्तार करणाऱ्या बायेझिद प्रथमला कडवा प्रतिकार झाला तो मंगोलचा क्रूरकर्मा तैमूरलंगकडून. आजपर्यंत बायेझिदचे असंतुष्ट प्रतिस्पर्धी तैमूरकडे आश्रयाला गेले होते, आणि तैमूरचे असंतुष्ट अधिकारी सुलतान बायेझिदकडे आले होते. त्यामुळे दोघांच्यातील वैर वाढत चाललं होतं. पण

बायेझिद इस्लामिक राज्याचा विस्तार करतो आहे म्हणून तैमूरने बायेझिदविरुध्द लढणं टाळलं होतं. तैमूर आपलं साम्राज्य वाढवत चालला होता. इ. स. १३९८ पर्यंत त्याने पर्शिया, रशियाचा भाग जिंकला होता. भारतातही तो १३९८ सालात दिल्लीपर्यंत येऊन केवळ आपल्या स्वाऱ्या मोहिमांमुळे झालेल्या पैसावसूलीसाठी भरपूर लूट घेऊन गेला होता. मग त्याने ओथमन साम्राज्याकडे आपली नजर वळवली. कारण सुलतान बायेझिदने तैमूरच्या मांडलिकांकडून खंडणी मागितली हे निमित्त झालं.

सन १४०१ मधे तैमूर, सिरियाचा भाग असलेलं सिवास जिंकायला ओथमन साम्राज्यात शिरला आणि ते जिंकून घेतलं. त्या लढाईत सुलतान बायेझिदचा अर्तुग्रुल हा शहजादा मरण पावला. त्यावेळी सुलतान बायेझिद कॉंस्टंटिनोपलच्या वेढ्यात गुंतला होता. तैमूरच्या या आक्रमणाची आणि आपला मुलगा मरण पावल्याची बातमी कळताच, कॉंस्टंटिनोपलचा वेढा उठवून, इ. स. १४०२ मधे मंगोल आक्रमणाला टक्कर देण्यासाठी बायेझिद नदीच्या काठाने अंकाराला पोचला. सर्बिया आणि वालाकिया फौजा सुलतानाच्या मदतीला होत्या. सुलतान बायेझिद आणि तैमूरलंगच्या फौजा अंकारा इथे भिडल्या. दोन्हीकडची फौज मोठी होती. तैमूरलंगने आधीच मोक्याची जागा पकडून ठेवली होती. तुंबळ युध्द झालं. प्रचंड नरसंहार झाला. तैमूरने सुलतानाच्या फौजेला पाणीपुरवठा करणारा ओढा विषारी करून टाकला. ओथमन फौज तहानेने व्याकूळ झाली. सुलतान बायेझिदला पराभव समोर दिसायला लागला तेव्हा तो थोडं घोडदळ घेऊन जवळच्या पर्वताच्या आश्रयाला गेला. पण तैमूरने त्या पर्वताला वेढा घातला आणि बायेझिदला पकडलं.

सुलतान बायेझिदचा पूर्ण पराभव झाला. हा पराभव होणार हे दिसल्याबरोबर सर्बियाच्या राजाने सुलतानाचा खजिना आणि सुलेमान शहजादाला घेऊन रणांगण सोडलं. बायेझिद हे युध्द हरला त्याचं मुख्य कारण म्हणजे बायेझिदने आपल्या सैन्याची पहिली फळी, मंगोल वंशाचे तार्तार सैनिकांची केली होती. ते तैमूरच्याच वंशातील होते. तैमूरलंग समोर आल्याबरोबर ते सैनिक त्याला जाऊन मिळाले. दुसरं कारण होतं ते हे की बायेझिदच्या गुप्तहेरखात्याने बायेझिदला सपाट माळरानावर शत्रूला न भिडण्याचा सल्ला दिला होता, तो त्याने ऐकला नाही. तैमूरने धनुष्यबाणाबरोबर पेटते बोळेही बायेझिदच्या फौजेवर टाकले. बायेझिद शेवटपर्यंत लढत राहिला. पण शेवटी युध्द हरला. सुलतान बायेझिद प्रथम तैमूरच्या कैदेत पडला.

जेव्हा सुलतान बायेझिदला हात बांधलेल्या अवस्थेत मध्यरात्री तैमूरसमोर नेण्यात आलं तेव्हा तैमूर आपल्या शामियानात आपला मुलगा शाहरूखबरोबर बुध्दिबळ खेळत बसला होता. सुलतान बायेझिदचं रुबाबदार, ताठ मानेनं उभं राहणं पाहून तैमूरने आपल्या अधिकाऱ्यांना बायेझिदला सन्मानाने वागवण्यास सांगितलं. काही झालं तरी बायेझिद सार्वभौम सम्राट होता. सुलतान बायेझिदबरोबर त्याची बेगम देस्पिनाही कैदेत पडली. दोन शहजादे शहजादा मुसा आणि मुस्तफाही पकडले गेले. या युध्दात पराभव दिसू लागल्यावर सुलतान बायेझिदचे मुलगे, सुलेमान, इसा, महंमद रणांगणावरुन पळून गेले.

तैमूरने कैदेत असलेल्या बायेझिदला सन्मानाचीच वागणूक दिली. पण जेव्हा पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या बायेझिदला पकडलं गेलं तेव्हा मात्र तैमूरने त्याला अत्यंत क्रूरपणे वागवायला सुरूवात केली. रात्री

झोपेतसुध्दा त्याच्या पायात लोखंडी बेड्या असत. काही इतिहासकार असं म्हणतात की तैमूर बायेझिदच्या पाठीचं टेबल करून आपले पाय त्याच्यावर विसाव्यासाठी ठेवत असे किंवा घोड्यावर चढतांना त्याच्या पाठीवर तैमूर पाय ठेवत असे. बायेझिदची राणी देस्पिना तैमूरच्या जेवण आणि मद्य देण्याच्या सेवेत असायची. नंतर तिची रवानगी तैमूरलंगने आपल्या जनानखान्यात केली. देस्पिनाचं अपमानित जगणंही सुलतान बायेझिदला मनस्तापाचं होत होतं. त्याचं दुसरं शल्य होतं की रणांगणावरून पळून गेलेले शहजादे आपल्या बापाला सोडवायला फौज घेऊन तैमूरवर हल्ला करायला आले नाहीत. असं म्हटलं जातं की देस्पिनाच्या या अपमानित अखेरीनंतर ओथमन सम्राटांनी कोणत्याही प्रतिष्ठित राजघराण्यातील राजकन्येशी निकाह लावला नाही. कायम आपल्या जनानखान्यातील उपस्त्रियांशी त्यांनी निकाह लावला.

तैमूरलंग सुलतान बायेझिदला आपल्याबरोबर लष्कराबरोबर नेत असतांना कोनिया प्रांतातील अक्सेहेर गावात, ८ महिन्यांच्या अपमानित आणि कष्टमय छळानंतर बायेझिद कैदेत असतांनाच इ. स. १४०३ च्या ९ मार्चमधे मरण पावला. असं म्हणतात की लष्कराबरोबर प्रवास करतांना तैमूरने लोखंडी पिंजऱ्यात सुलतान बायेझिदला ठेवलेलं असे. त्या सळयांवर डोकं आपटून बायेझिदने डोक्याला जखम करून घेतली आणि रक्तस्त्रावाने तो मरण पावला. तैमूरने त्याचं शव त्याच्या मुसा या मुलाच्या ताब्यात अंत्यसंस्कारांसाठी सोपवलं आणि सुलतान बायेझिदचा कैदेतील मुलगा मुस्तफा याला समरकंदला नेलं. बरसाला सुलतानाचं दफन झालं.

सुलतान बायेझिद प्रथमच्या मृत्यूनंतर ओथमन देशात अस्थिरतेचा काळ आला. सर्व शहजादे सुलतान होण्यासाठी एकमेकांशी लढू लागले. त्यात ११ वर्षे गेली. सन १४१३ च्या लढाईत महंमद शहजादा जिंकला आणि परत एकछत्री राज्यकारभाराला सुरूवात झाली.

सुलतानाचा एक मुलगा अर्तोग्रुलला आधीच तैमूरने ठार केलं होतं. सुलेमान, इसा, महंमद, मुसा, मुस्तफा, कासिम आणि युसुफ हे बायेझिदचे मुलगे. अंकाराच्या लढाईत बायेझिदचे सर्व मुलगे त्याच्याबरोबर लढत होते. अंकाराच्या या पराभवानंतर सुलतान बायेझिदचे तीन मुलगे रणांगणावरून परागंदा झाले. त्याचा एक मुलगा सुलेमान हा आपल्या वजीरासह आणि जानिसरीच्या मुख्य हसन या आगाबरोबर पळून गेला आणि राजधानी एदिर्नला (एद्रिआनापोलिस) पोचला. तिथे जाऊन त्याने युरोपचा प्रदेश आणि गादी बळकावली आणि सुलतान बनला. दुसरा मुलगा इसा याने जुनी राजधानी बरसा ताब्यात घेऊन बरसाला आपला कारभार सुरू केला. सगळ्यात धाकटा मुलगा महंमद याने अमेशियाला आपलं राज्य सुरू केलं.

निकोपोलिसचा विजय आणि अंकाराची तैमूरशी लढाई ही बायेझिदच्या नावावर होणारी नोंद.

इ. स. १२९९ मधे सुरू झालेल्या ओथमन राज्याच्या विस्ताराला, सन १४०२ च्या अंकाराच्या या लढाईनंतर १०० वर्षात पहिली खीळ बसली. ओथमन घराण्याच्या वारसांच्या राज्यकारभार आणि लष्करी प्राविण्य या दोन्हीमुळे ओथमन साम्राज्याचा पाया भक्कम बनला होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -




2020

**तैमूरलंगची बायेझिद प्रथम बरोबरची सिवासला पहिली लढाई झाली. ज्यात बायेझिदचा मुलगा मारला गेला.**

**मग सन १४०२ मधे बायेझिद आणि तैमूरच्या अंकारावर दोन्ही फौजा भिडल्या.**

## भाऊबंदकीचा अस्थिर काळ. सन १४०२ ते १४१३.

इ. स. १४०२ मधे सुलतान बायेझिद प्रथमच्या मृत्यूनंतर ओथमन साम्राज्य भाऊबंदकीच्या जाळयात गुरफटलं गेलं. आधीच अंकाराचा पराभव साम्राज्याला संकटात बुडवून गेला होता. मोठा नरसंहार झाला होता. राज्य अधोगतीला लागलं. आर्थिक स्थिती अत्यंत खालावली. खजिनाही रिकामा झाला. आपल्या भावांना ठार करूनच सत्ता मिळवायची ही भ्रातृहत्येची प्रथा आता सर्व भावांमधे आणि प्रत्येक पिढीमधे कायमचीच झाली. सुलतान बायेझिदनंतर सर्व मुलांनी साम्राज्याचे एकेक प्रांत मिळवले. पण एकहाती सत्ता आणि सिंहासन मिळवायचं तर इतर भावांना ठार करणं जरूरीचं होतं आणि कुणीतरी एकानेच जिंकणं प्राप्त होतं. श्रेष्ठ मुलालाच तख्ताचा वारस नेमण्याची प्रथा तुर्कांची नव्हती. सत्ता मिळवायला सिंहासनावर बसायचं तर कुलसंहार हीच सत्तेची शिडी होती.

ओथमनच्या या समृध्द राज्याच्या वाटण्या झाल्या आणि सर्व शहजादे भाऊ आपलं वर्चस्व आणि आपली सत्ता वाढवण्यासाठी एकमेकांच्यात लढायला लागले. पहिलं भांडण झालं ते अमेशियाचा महंमद आणि बरसाचा इसामधे. महंमदने संपूर्ण राज्य दोघांच्यात वाटून घेण्याचा प्रस्ताव इसासमोर ठेवला. पण तो इसाने नाकारला. त्याला संपूर्ण राज्यावर सत्ता हवी होती. दोघांच्यात मग युध्द हाच पर्याय राहिला. त्यात इसा हरला आणि पळून गेला आणि कारमानाला पोचला. तिथे महंमदच्या लोकांनी न्हाणीघरात घुसून इसाला ठार केलं. विजयी महंमदच्या हातात बरसा आलं. दुसरीकडे एदिर्न राजधानीतून शहजादा सुलेमानने आपल्या नावाने द्वाही फिरवली होती.

तैमूरने सुलतान बायेझिदचं शव मुसाच्या हाती देऊन त्याला माघारी पाठवलं. त्यामुळे मुसा सुटून आला आणि राज्य मिळवण्याच्या प्रयत्नांना लागला.  आणि त्याने पहिला प्रयत्न बरसा जिंकण्याचा केला. त्यात बरसाच्या इसा शहजादाने मुसाचा पराभव केला. तेव्हा मुसा पळून जाऊन कुथाया राजधानी असलेल्या जरमियाँ या प्रांतात लपून बसला आणि योग्य संधीची वाट पाहात राहिला.

त्यावेळी बॉस्फरस ओलांडून शहजादा सुलेमान एदिर्नवरुन मोठ्या फौजेसकट महंमदवर चालून आला होता. त्याने बरसाही जिंकलं होतं. शहजादा महंमदने यावेळी आपल्या सुटून आलेल्या मुसा या भावाला शहजादा सुलेमानच्या ताब्यातील थ्रेसमधील प्रदेशावर हल्ला करायला पाठवलं. त्यामुळे आपला भाग सोडवायला आणि एदिर्न राजधानी वाचवायला शहजादा सुलेमानला मुसाच्या मागे जावंच लागलं. कॉस्मिडनची ही लढाई सन १४१० मधली. त्यात सुलेमान वरचढ होता, मात्र इ. स. १४११ मधे एदिर्नला शहजादा मुसाने शहजादा सुलेमानचा पराभव केला आणि मुसा सुलतान म्हणून घोषित झाला. शहजादा सुलेमान फाशी गेला.

आतापर्यंत शहजादा मुसा जिंकला. आता तोच सुलतान होणार होता पण अजून शहजादा महंमदला संपवणं जरूरीचं होतं. बिझंटाईन राजा मॅन्युअल पोलोलॉगस हा शहजादा सुलेमानचा मित्र होता म्हणून त्यालाही धडा शिकवण्यासाठी शहजादा मुसाने कॉस्टंटिनोपलवर स्वारी केली. त्या शहराला वेढा घातला. आता मॅन्युअल

पोलोलॉगसने महंमदला मदतीला बोलावलं. शहजादा महंमद येतांना सर्बियाची मदत घेऊन आला. म्हणून शहजादा मुसाने सर्बियावर हल्ला चढवला. दोन्ही फौजा चामुर्लीच्या पठारावर एकमेकांना भिडल्या. शहजादा महंमदच्या जानिसरीजचा मुख्य आगा, हसन मुसावर चालून आला, त्यात शहजादा मुसा जखमी झाला. शहजादा मुसा पळून जायला लागला तेव्हा त्याला पकडून आणलं आणि गळफास लावून ठार करण्यात आलं. शहजादा मुसाच्या क्रूरपणाचा एक किस्सा सांगितला जातो. सर्बियाच्या लढाईच्या वेळी मुसाने सर्बियन सैनिकांच्या शवांच्या ढीगावर टेबल ठेवून मुसाने आपल्या सेनाधिकाऱ्यांना मेजवानी दिली होती.

२० जुलै १४०२ ला सुरू झालेला हा अस्थिर काळ ५ जुलै १४१३ मधे संपला.

तुर्की प्रथेप्रमाणे, जो जिता वही सिंकदर या न्यायाने शहजादा महंमद नवीन सुलतान बनला. ओथमन घराण्याचा आणि राज्याचा विस्तार परत नव्याने सुरू झाला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ५ वा सुलतान महंमद प्रथम. जन्म १३७९. मृ २६ मे, १४२१.

## पुनर्रचनाकार सुलतान महंमद.

बायेझिद प्रथम आणि देवलत खातून यांचा हा मुलगा.

बायेझिदच्या मुलांमधील सत्तेसाठी चाललेली स्पर्धा संपली आणि अंततः महंमद हा बायेझिदचा पुढचा वारस ठरला. ५ जुलै, इ. स. १४१४ मधे हा नवीन पाचवा सुलतान झाला. आपल्या भावांच्या तुलनेत अमेशिया हा शहजादा महंमदला मिळालेला सर्वात लहान प्रांत. पण आता त्याचे सगळे प्रतिस्पर्धी ठार झाले होते. या मधल्या काळाचा एकच परिणाम झाला तो म्हणजे राज्यात अस्थिरता आली. राज्याचं वैभव घसरणीला लागलं. यात दहा वर्षे खर्च झाली. या दहा वर्षांच्या काळात तुर्कांचे मांडलीक असणारे सारे प्रदेश मुक्त होण्याच्या प्रयत्नात यशस्वी झाले. बल्गेरिया, बोस्निया आणि ग्रीस ओथमन तुर्कांच्या पंजातून मोकळे झाले. तैमूरने परत जातांना ओथमन साम्राज्याचं भरपूर वैभव लुटून नेलं होतं. त्यामुळे शहरं भकास झाली होती. सगळंच अस्ताव्यस्त झालं होतं. नागरिकही धास्तावलेल्या मनाने वावरत होते.

महंमद प्रथम सत्तेत आला त्याआधी तो आयालेसचा सुभेदार होता. अंकाराच्या अपमानास्पद लढाईत सुलतान बायेझिदच्या वजीराने सुलतान महंमदला अमेशियाला सुखरूपपणे हलवलं होतं. म्हणूनच तख्त मिळताच महंमद प्रथमने बायेझिद पाशाला आपला मुख्य वजीर करून टाकलं. मुस्तफा तैमूरच्या अटकेत पडला होता. बाकी शहजादांचा निकाल लागला होता. महंमद प्रथमला परत नव्याने साम्राज्य उभं करायचं होतं. नवी आर्थिक घडी बसवायची होती. पराभवाने खचलेल्या लष्कराला उभारी द्यायची होती. गेलेली प्रतिष्ठा परत आणायची होती.

सुलतान महंमद प्रथमला दहा वर्षांच्या अस्थिर वातावरणाला परत स्थिर करण्यासाठी त्याला शांतता हवी होती. राज्यात परत समृध्दी आणायची होती. अत्यंत हुशारीने त्याने राज्यकारभार हाकायला सुरूवात केली. इतर धर्मीयांनाही त्याने सन्मानाची वागणूक दिली. तो स्वतः अभ्यासाचा आणि साहित्याचा भोक्ता होता. त्याने सुरुवातीला अनातोलिया आपल्या कब्जात घेतलं. शेजारी देशांशी मैत्रीचा हात पुढे केला. राज्याच्या कारभाराला शिस्त आणली.

पण तेवढ्यात एक संकट उभं राहिलं. तैमूरलंग सन १४०४ मधे मरण पावल्यावर तैमूरच्या कैदेत असलेला शहजादा मुस्तफा सुटून परत आला आणि गुप्तपणे आपल्या देशात राहू लागला. मग मॅन्यूअल द्वितीय पालालोगस, वालाकियाचा राजा आणि ऐदिनचा अमीर यांच्या मदतीने सुलतान महंमदकडे आला आणि राज्य मागू लागला. महंमद सुलतानामधे आणि मुस्तफामधे परत युध्द झालं. या लढाईत मुस्तफा हरला आणि गॅलिपोलीला जाऊन राहला. मुस्तफा पळून मग तो बिझंटाईन राज्यात गेला. तेव्हा महंमदच्या सूचनेप्रमाणे बिझंटाईन राजा मॅन्युअलने मुस्तफाला हाकलून लावलं. मग सुलतान महंमदचा पुतण्या ओरहान याला हाताशी धरून बिझंटाईन राजा मॅन्युअलने सुलतान महंमदच्या हत्येचा कट रचला पण तो वेळीच उघडकीला आल्याने महंमद वाचला आणि ओरहानला फाशी झाली.

सुलतानाच्या काळात आणखी एक प्रश्न चिघळला तो शेख बद्रुद्दीन याने चालवलेल्या चळवळीचा. पण ४ वर्षे चाललेल्या या चळवळीचा शेवट बद्रुद्दीनला फाशी देण्याने झाला.

या सगळ्या दगदगीनंतर वयाच्या चाळीसाव्या वर्षीच सुलतान महंमदला सुलतानपद सोडायचं होतं आणि त्याचा मुलगा मुरादला तख्तावर बसवायचं होतं. पण मुराद तेव्हा अवघा १० वर्षांचा होता. त्यामुळे ते शक्य झालं नाही. शेवटी ८ वर्षे राज्य करून वयाच्या ४७ व्या वर्षी, २६ मे, इ. स. १४२१, या दिवशी, महंमद प्रथम मरण पावला. त्याचं दफन बरसामधेच करण्यात आलं. त्याची हिरव्या रंगाची असलेली सुंदर देखणी वास्तू प्रसिध्द आहे. याच्या बेगम शहजादी खातून, एमिन खातून, कुमरू खातून. यांचे मुलगे मुराद द्वितीय, महंमद, युसुफ, अहंमद आणि कुकक.

सुलतान महंमद प्रथमने उध्वस्त झालेलं साम्राज्य पुनर्गठित केलं. जनतेला स्थैर्य दिलं. कारभाराची घडी बसवली. त्यामुळे त्याला इतिहासकारांनी सेकंड फाऊंडर असं गौरवलं आहे. त्याची कारकीर्द अवघी आठ वर्षांची होती. विस्कळीत झालेलं ओथमन साम्राज्य विवेकाने, धोरणीपणाने, आपल्या एकछत्री अंमलाखाली आणलं ही त्याची भरीव कामगिरी गाजली.

ओथमन साम्राज्याचा सहावा सुलतान म्हणून साहित्य, कला, यांची रुची असलेला महंमदचा प्रथमचा मुलगा मुराद द्वितीय हा इ. स. १४२१ मधे नवीन सुलतान झाला तेव्हा तो १६ वर्षांचा होता.

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

## ६ वा सुलतान मुराद द्वितीय. जन्म १६ जून १४०४. मृ. ३ फेब्रुअरी १४५१.

महंमद प्रथम आणि एमिन खातून यांचा हा मुलगा.

मुरादचं बालपण अमेसियात गेलं. १० वर्षांचा झाला तेव्हा वडिलांबरोबर एदिर्न राजधानीत आला. आजवरच्या प्रथेप्रमाणे, कारभाराचा अनुभव येण्यासाठी मुराद द्वितीयलाही त्याच्या जन्मगावी म्हणजे अमशियाला सुभेदार म्हणून नियुक्त केलं होतं. सुलतानपदी मुराद द्वितीयची नियुक्ती सर्वसंमतीने झाली. त्यासाठी त्याने आपली प्रतिमा लोकप्रिय होण्याकडे लक्ष दिलं. कोणत्याही धर्माचा असला तरी गुन्हेगारांना शासन करायचं, अशी भूमिका त्याने घेतली त्यामुळे तो लोकप्रिय झाला. जनतेचा विश्वास मिळवण्याकडे त्याने जास्त लक्ष दिलं त्यामुळे त्याची जनमानसातील प्रतिमा जनतेचा राजा अशी झाली तो स्वतःला गाझी म्हणवून घेत असे. त्याने मुद्दामहून साधी रहाणी स्वीकारली.

सुलतान मुराद द्वितीयचा मुकुटही काटेरीच होता. त्याचा अनुभव त्याला लगेच आला. अंकाराच्या रणांगणावरून पळून गेलेल्या मुस्तफा या मुरादच्या भावाला बिझंटाईन राजा मॅन्युएल द्वितीय याने दूरच्या एका बेटावर नेऊन ठेवलं होतं. नव्याने सत्तेत आलेला मुराद आणि त्याच्या भावात भांडण लागावं आणि ओथमन सल्तनत खिळखिळी व्हावी म्हणून मॅन्युएलने मुस्तफाला मोकळं केलं आणि आपली फौजही त्याच्या मदतीला पाठवली. शिवाय मुस्तफाकडून, त्याची सुटका केल्याबद्दल ओथमन साम्राज्यातील महत्वाची मोठी बरीच शहरं बदल्यात मागितली. फौज घेऊन आलेल्या मुस्तफाशी लढायला मुरादचा सेनापती बायेझिद पाशा बाहेर पडला. पण सेनापती बायेझिद पाशाचा पराभव झाला कारण त्याची तुर्की फौज मुस्तफाला जाऊन मिळाली. विजयाने उन्मादित झालेल्या मुस्तफाने स्वतःला ओथमन साम्राज्याचा सुलतान म्हणून घोषित केलं.

आता शहजादा मुस्तफाला संपवायचं काम सुलतान मुराद द्वितीयला करायचं होतं. शहजादा मुस्तफा दर्दनेल्स सामुद्रधुनी ओलांडून आशियात प्रवेश करणार हे पाहिल्यावर आता त्याचा समाचार घ्यायला स्वतः सुलतान मुराद द्वितीय बाहेर पडला. उलाबाद नदीच्या काठी दोन्ही भावांचा तळ पडला. सुलतान मुरादचा सेनापती मुस्तफावर तुटून पडला आणि त्याला पराभूत केलं. या लढाईत सुलतान मुरादचा विजय झाला. शहजादा मुस्तफा पळून जाऊन एदिर्नला पोचला आणि सर्व खजिना घेऊन वालाकियाच्या आश्रयाला निघाला तेव्हा जेनोआचा सेनापती सुलतान मुरादच्या मदतीला आला. त्याने मुस्तफाला पकडलं. मग मुरादने मुस्तफाला फाशी देऊन आपला मार्ग निर्वेध केला. मुस्तफाच्या मृत्यूबद्दल अनेक लोकापवाद आहेत. तो शेवटपर्यंत बरसामधे राहिला आणि प्लेगच्या दुखण्यात गेला अशीही नोंद आहे.

रोमन सम्राटाची, मॅन्युअलची ही लबाडी सुलतानाने लक्षात ठेवली आणि तेच कारण घडलं ग्रीक साम्राज्याची वैभवाने तळपणारी राजधानी कॉँस्टंटिनोपलवर द्वितीय मुरादने स्वारी करण्याचं. मुरादने

कॉंस्टंटिनोपलवर स्वारी करून त्या शहराला वेढा घातला. आपला वेढा उठवण्यासाठी बिझंटाईन राजाने अनातोलियामधील स्वतंत्र असलेल्या अमीर मुख्यांना एकत्र करून मुरादशी लढण्यासाठी उद्युक्त केलं आणि मुरादचा १३ वर्षांचा धाकटा भाऊ कुकक याला बंडाळीसाठी प्रवृत्त केलं. त्याचा योग्य तोच परिणाम झाला. सुलतान मुरादने कॉंस्टंटिनोपलचा वेढा उठवला आणि तो आपल्या भावापासून आपली सत्ता वाचवायच्या मागे लागला. त्यात मुराद जिंकला आणि मग या बंडाळीत साथ देणाऱ्या सर्व अमीर मुख्यांवर आक्रमण करून त्यांचे प्रांत आपल्या राज्याला जोडून घेतले.

त्यानंतर त्याने सर्बिया, व्हेनिसवर स्वारी करून ते प्रांत आपल्या अधिपत्याखाली आणले. पोलंडही हाती आलं. रोमन सत्तेच्या जागी तुर्की राजवटीला सुरुवात झाली ती तेव्हाच. आपल्या साम्राज्याच्या सीमा त्याने आणखी वाढवल्या. या वेळेपर्यंत ओथमन तुर्की सत्ता एक महासत्ता म्हणून ओळखली जाऊ लागली.

सन १४४४ ची मुराद द्वितीयची वार्नाची जॉन हुन्यादीबरोबरची लढाई खूप गाजली. या लढायांमधून मिळालेल्या लुटीतून मुरादने आपल्या काळात अनेक हॉस्पीटल्स, विद्यापीठं, शाळा बांधल्या. या लढाईची हकिकत अशी होती की की सर्बियाचा राजा १४३७ मधे मरण पावला. हा हंगेरीचा राजा सिगिसमंड हा एका मोहिमेवरुन परत येत असतांना त्याची गाठ जॉन हुन्यादीबरोबर पडली. हा खूप शूर आणि इटालीच्या लढाईत पराक्रम गाजवलेला सरदार घराण्यात जन्मलेला होता. याने तुर्कांशी लढून त्यांचा पराभव करण्याचं ठरवलं आणि ओथमन फौजांना बेदम मारही दिला. इ. स. १४४२ मधे सुलतान मुराद द्वितीयने बेलग्रेडवर हल्ला केला तेव्हा हा हुन्यादी हंगेरीच्या राजाच्या मदतीला आला.

बेलग्रेड म्हणजे हंगेरीचं प्रवेशद्वार. डॅन्युब नदीच्या काठावर हे गाव वसलं आहे. या शहराजवळ वासा नदीचा संगम होतो. जलमार्ग आणि भूमार्गावरुन या शहरावर मुरादने हल्ला केला. ते वाचवायला हुन्यादी आला. त्याने मुरादची २० हजार फौज कापून काढली आणि सुलतान मुरादचा सेनापती मझिदलाही ठार केलं. निस्साजवळ ही लढाई झाली. सुलतान मुरादने काळ ओळखून सर्बियाशी १० वर्षाचा शांतता करार केला या काळात सर्बिया स्वतंत्र झाला आणि वालाशिया हंगेरीला मिळालं. ही दोन वर्षे चाललेली लढाई सन १४४४ मधे समाप्त झाली.

मग आयुष्यभर सतत रणांगणावर लढण्यात जीवन व्यतित केलेला सुलतान मुराद द्वितीय निवृत्तीच्या विचाराला लागला. सुलतान मुराद आपल्या १२ वर्षाच्या शहजादा महंमद द्वितीय याच्या हाती कारभार देऊन स्वतः पायउतार झाला. मॅग्नेशियाला जाऊन राहू लागला. पण ते विश्रांतीचं सुख त्याला फार दिवस लाभलं नाही. त्याला परत लढाईत उतरण्यासाठी सत्तेत यावं लागलं. त्यात एक कारण होतं देशाची उत्तम समजली जाणारी जानिसरिज फौजच मोठं बंड करून उठली. आणि ते बंड मोडून काढायला त्याला परत तख्तावर बसावं लागलं.

आणि दुसरं कारण होतं ते सर्बियाशी झालेला १० वर्षांचा शांतता करार मोडायला हंगेरीच्या राजाने सुरुवात केली. हंगेरीचा राजा सिगिसमंड सन १४३७ सालात हा मरण पावल्यावर सिगिसमंडचा जावई पोलंडचा

युवराज कारभार पाहायला लागला होता. सिगिसमंडच्या मृत्यूनंतर त्याला मुलगा झाला तो वयात आल्यावर राजा बनला. सर्बियाशी १० वर्षांचा शांतता करार करुन अजून हंगेरीतील ओथमन फौजा पूर्णपणे माघारी आल्याही नव्हत्या तेव्हाच यांच्यावर हंगेरियन फौजा हुन्यादीच्या हाताखाली चालून गेल्या. अनेक ठिकाणी चकमकी घडत राहिल्या आणि हुन्यादीला विजय मिळत गेला.

ओथमन सुलतानाविरुध्द धर्मयुध्द छेडण्याची मूळ कल्पना पोप युजीन चतुर्थ याची. त्याला मदत करायला हंगेरी आणि पोलंडचा राजा किंग व्लादिस्लास तयार झाला. बाकी सर्बियन, झेक, जर्मनी, पोलंड. मोल्दिविआ, हे युरोपियन देशही त्यात सामील झाले. ओथमन सुलतानच्या फौजाही मुरादच्या हाताखाली शत्रूशी भिडायला निघाल्या. दोन्ही फौजांची गाठ पडली. सेनापती हुन्यादी तुर्की फौजांशी शूरपणे लढत होता. ओथमन फौजांवर मिळणाऱ्या विजयामुळे ख्रिश्चन सैन्याला उत्साह आला.

सन १४४२ मधे सुरु झालेल्या या युध्दात नेतृत्व करण्यासाठी, तख्तावर आलेल्या महंमद द्वितीयने आपल्या बापाला, मुरादला मदतीला बोलावलं. मुरादने ते नाकारलं तेव्हा सुलतान बनलेल्या महंमद द्वितीयने मुरादला उलटा निरोप पाठवून आज्ञा केली की मी सुलतान आहे म्हणून माझा हुकूम पाळा नाहीतर सुलतान म्हणून तरी या. शेवटी मुराद परत युध्दात उतरला. ६०००० फौजेसह हा ओथमन सुलतान वार्नाजवळ उतरला. ओथमन फौजेला कापून काढण्यासाठी हुन्यादी वार्नापर्यंत पोचला. घनघोर लढाईला तोंड फुटलं. हुन्यादी अतिफाजील आत्मविश्वासाने उघड्यावर पठारावर सुलतान मुरादशी जाऊन भिडला. लढाईला सुरुवात होणार इतक्यात प्रचंड मोठा वादळी वारा सुटला. हंगेरियन ध्वज सोडून बाकी सर्व ध्वज खाली पडले. तो मोठाच अपशकून होता. हंगेरीचा राजा अति उत्साहाने मुरादच्या फौजेवर चालून गेला आणि यात ठार झाला. त्याबरोबर त्याची फौज पळून गेली.

१० नोव्हेंबर १४४४ या दिवशी मुरादचा मोठा विजय झाला. बोस्निया आणि सर्बिया हरले. सर्व युरोपियन फौजांची वाताहत झाली. दोन्हीकडचे मिळून लाखो सैनिक प्राण गमावून बसले. वार्नाच्या लढाईनंतर अवघ्या ९ वर्षात कॉंस्टंटिनोपल सुलतानाच्या हाती पडलं कारण त्यावेळी वार्नाच्या पराभवाने खचलेली इतर देशांची मदत बिझंटाईन राजाला मिळाली नाही. हा वार्नाच्या विजयाचा परिणाम होता.

या विजयी धर्मयुध्दानंतर मुराद द्वितीय परत मॅग्नेशियाला जाऊन निवृत्त जीवन जगायला लागला.

सन १४४८ साली परत कोसोवाला मोठी लढाई झाली ती त्याने पाहिली. पुढची लढाई तैमूरलंगचा मुलगा शाहरूख याच्याशी झाली, त्यात शाहरूखचा पराभव झाला. हा विजय मिळवून आपल्या घराण्यावर झालेल्या मानहानीकारक पराभवाचा सुलतान मुरादने सूड उगवला.

सन १४२१ ते १४४४ पर्यंत राजसत्ता गाजवून मुराद निवृत्त झाला. परत लढाईला उतरला. मुराद द्वितीयचा मृत्यू, काहीही दंगाधोपा न होता, सरळ साधा शांतपणे आजारपणामुळे त्याचा मृत्यू झाला. इ. स. १४२१ ते १४५१ पर्यंत ३० वर्षे त्याने सत्ता उपभोगली. त्याच्या बेगम येनि खातून, सुलतान खातून, हुमा खातून, मारा खातून आणि मुलगे अहंमद, अल्लाद्दिन, महंमद, ओरहान, हसन.

बरसामधेच त्याचा दफनविधी झाला. वार्नाची लढाई ही त्याची मोठी कामगिरी.




**14 April 2009**

## ७ वा सुलतान महंमद द्वितीय. जन्म.३० मार्च १४३२ मृ. ३ मे १४८१.
## विजेता – द काँकंरर महंमद द्वितीय हा ओथमन साम्राज्याचा सातवा सुलतान. कैसर-ए-रोम.

मुराद द्वितीय आणि त्याची उपस्त्री हुमा खातून यांचा हा मुलगा.

मुराद द्वितीयच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा महंमद द्वितीय गादीवर आला. हा सातवा सुलतान दोनवेळा गादीवर बसला. ९ फेब्रुअरी १४५१ पासून ३ मे १४८१ याने राज्य केलं. हा सुलतान अत्यंत बुध्दिमान होता, अभ्यासू होता. याला ५ भाषा अस्खलितपणे बोलता येत होत्या. हा कवीमनाचा होता. हा उत्कृष्ट कविता करत असे. म्हणूनच त्याने आपल्या कारकीर्दीत कवींसाठी दरमहा पेन्शन योजना तयार केली होती. शिक्षणावर अत्यंत भर असलेल्या या सुलतानाने खूप शिक्षणसंस्था उभारल्या. विद्वानांची त्याला कदर होती. म्हणूनच सुलतान मुरादने आपल्या या बुध्दिमान मुलाच्या शिक्षणासाठी उत्तम शिक्षकांची नेमणूक केली होती. सुलतान मुरादच्या आग्रहामुळे महंमदला जेव्हा तख्तावर बसवण्यात आलं तेव्हा तो अवघा १२ वर्षांचा होता. त्याने ओथमन साम्राज्याचा प्रचंड विस्तार केला. म्हणून सुलतान महंमद द्वितीय हा ओथमन साम्राज्याच्या इतिहासात जेता ‘ द कॉन्करर ‘ या नावाने ओळखला जातो.

सुलतान महंमद द्वितीय २१ व्या वर्षी गादीवर आला. सुलतान मुरादच्या मृत्यूच्या वेळी तो मॅग्नेशियाला होता. बापाच्या निधनाची बातमी कळल्याबरोबर तो आपल्या फौजेला घेऊन तातडीने राजधानी एदिर्नला पोचला. सत्ता त्वरेने मिळवणं जरुरीचं होतं, त्याने केलेली पहिली कृती म्हणजे त्याने आपल्या बाल्यावस्थेतील भावाला ठार केलं. याच्या मागचं कारण म्हणजे महंमद द्वितीय हा दासीपुत्र होता. पण सर्बियन राणीचा आणि सुलतान मुरादचा औरस मुलगा बाल्यावस्थेत असला तरी भविष्यात त्याच्या सुलतानपदाला धोका होऊ शकला असता. सुलतान महंमद द्वितीयने आपल्या अधिकाऱ्याला त्या बालकाला पाण्यात बुडवून ठार करायला सांगितलं, आणि मग त्या अधिकाऱ्यालाही ठार केलं. त्यानंतर सूडबुध्दीने सर्बियन राणीला एका गुलामाशी लग्न करायला लावलं. सुलतान महंमद द्वितीय इतका आतल्या गाठीचा आणि खोल स्वभावाचा होता की, एकदा एका अधिकाऱ्याने त्याला विचारलं की आपला पुढचा बेत काय आहे, तर तो उत्तरला की माझ्या मनातील विचार माझ्या दाढीतील केसाला जरी कळला तरी मी तो केस उपटून टाकीन.

अशा सुलतानाने कारभाराला सुरुवात केल्यावर आपलं लक्ष काँस्टंटिनोपलकडे वळवलं. काँस्टंटिनोपल. युरोप आणि आशिया खंडांवर प्रभुत्व मिळवायचं तर या नगरीचं महत्व अलौकिक होतं. युरोपमधे प्रवेश करण्यासाठी या शहरात प्रवेश करावाच लागे. एक उत्कृष्ट बंदर म्हणून त्याची मोठी ख्याती होती. या नगरीचा त्रिकोणी आकार, सभोवतालने वाहणारं बॉस्फरसचं संथ, खोल पाणी यामुळे मोठी मोठी गलबतं आणि जहाजं बंदरापर्यंत आत शिरू शकत होती. समुद्रसपाटीपासून उंची वाढवत नेणाऱ्या भूपृष्ठभागामुळे पाण्याचा निचरा सहज

होत असे. त्यामुळे वसाहत करण्यासाठी हा भूप्रदेश अत्यंत सोयीचा होता. म्हणूनच कॉंस्टंटाईन राजाने इथे शहर वसवण्याचा विचार केला होता. या शहराला न्यू रोमची राजधानी बनण्याचा मान इ. स. १०५७ मधे मिळला. त्यानंतर देशोदेशीची व्यापाराची जहाजं इथे थांबू लागली. देशोदेशीचा माल बंदरात उतरवणं चढवणं यामुळे आर्थिक भरभराटीला तेव्हापासून सुरुवात झाली. व्यापारासाठी येणाऱ्या अनेक देशांना परवानगी देण्यातूनच कितीतरी आर्थिक उत्पन्न बिझंटाईन राजाला मिळू लागलं. एवढी समृद्धी आल्यावर वास्तूकला, शिल्पकला, शिक्षण, यांना अमाप प्रोत्साहन मिळायला लागलं आणि ही नगरी इंद्रनगरीप्रमाणे सुंदर दिसायला लागली. श्रीमंतांचे आलिशान प्रासाद बनायला लागले. शहरात आलेले देशोदेशीचे प्रवासी तिचं वैभव पाहून हरखून जात.

खलाशांना या शहरात शिरण्याची परवानगी नव्हती. त्यांच्यासाठी शहराच्या बाहेर जागा दिली होती. त्या भागाला पेरा म्हणजे पलिकडे असा शब्द होता. शहराच्या उतारावर ज्यू, व्हेनिस, आणि जिनोआ लोकांची वस्ती होती. त्या भागाला गलाटा म्हणत. गलाटा शब्द गवळयांची वस्ती यावरून आला किंवा इटालियन शब्द गाले म्हणजे उतार या शब्दावरुन आला असावा असा प्रवाद आहे. या राजधानीचं संरक्षण करण्यासाठी तिच्याभोवती ६० फूट उंचीच्या भक्कम तटबंदीच्या दोन रांगा बांधण्यात आल्या. या दोन रांगांमधे खंदक करण्यात आला त्याची खोली २० फूट आणि रुंदी २५ फूट होती. शिवाय ७ उंच मनोरे समुद्रातील दूरवरच्या हालचालींवर नजर ठेऊन होते. या नगरीचं मूळ नाव इस्कोम्बोली होतं, त्यावरुन इस्तंबूल असा अपभ्रंश तयार झाला.

या रोमन राजधानीला जिंकण्याचा सुलतान महंमद द्वितीयच्या पूर्वजांनी आधीही खूप प्रयत्न केले होते. पण त्यांना यश आलं नव्हतं. युरोप आपल्या साम्राज्याला जोडून घ्यायचा असेल तर बिझंटाईन राजधानी आपल्या हातात ठेवायलाच पाहिजे याच महत्वाकांक्षेने सुलतान महंमद द्वितीयने कॉंन्स्टंटिनोपलवर स्वारी करण्याचं ठरवलं. या आधी सुलतान बायेझीद प्रथमने नोदोलहिस्सारला आशिया खंडाच्या बाजूला बॉस्फरस किनाऱ्यावर आपला एक बळकट किल्ला कॉंस्टंटिनोपलला शह देण्यासाठी आपल्या हयातीत बांधून ठेवलाच होता.

सुलतान महंमद द्वितीयने बॉस्फरसचा प्रवाह जिथे सर्वात जास्त आकुंचित होतो तिथे सामुद्रधुनीच्या पलिकडे आपला आणखी बळकट असा एक किल्ला रुमेलिहिसारला बांधला. हजारो मजूर आणि गवंड्यांनी तो किल्ला ३ महिन्यांमधे बांधून पूर्ण केला. त्याचवेळी रोमन राजधानी तुर्कांच्या ताब्यात जाणार हे निश्चित झालं होतं. सुलतान महंमद द्वितीयची ही रणनीती त्याला यश देणार होती. शिवाय तोफांचा वापर यावेळी या लढाईत प्रथमच केला गेला. त्यातील ४ तोफा इतक्या मोठ्या होत्या की प्रत्येक तोफ ६० बैलांच्या गाड्यावरून २००० कामगार वाहून नेत होते. एका वेळी एक तोफेतून १५०० पौंड वजनाचा गोळा शहराच्या तटबंदीवर पडत होता. या तोफांच्या बांधकामासाठी त्याने हंगेरीच्या राजाकडून पळून आलेल्या ओबरन आणि उबरन या दोन इंजिनियर मुलांना नेलं होतं.

सुलतान महंमद द्वितीयने पहिली रणनीती आखली ती म्हणजे आजूबाजूचा लहानसहान प्रदेश आधीच्या सुलतानांनी बळकावला होताच. मग त्या राजधानीची रसद बंद पडू शकण्याची परिस्थिती निर्माण

करण्याइतपत प्रगती झाल्यावर त्याने कॉन्स्टंटिनोपलवर हल्ला चढवला. ८०,००० फौज, ३२० लढाऊ गलबतं, घेऊन सुलतान महंमदने कॉस्टंटिनोपलला वेढा घातला. पण पाण्याने वेढलेल्या या राजधानीत शिरायचं तर गोल्डन हॉर्नजवळ नदी मुखाजवळ मोठमोठे साखळदंड घालून नगरीचा भक्कम बंदोबस्त केलेला होता. सुलतानाने बॉस्फरसची सामुद्रधुनी अडवून धरल्यामुळे इतरांची मदतही कॉस्टंटाईन पालालोगोस राजाला कॉस्टंटिनोपलवर पोचू शकली नाही. २ महिने वेढा चालला. या काळात कॉस्टंटिनोपलपासून पूर्वेकडून सुलतानाने जंगल साफ करुन गुप्तपणे रस्ता बनवला. तोफांच्या आवाजात मोठमोठे वृक्ष कोसळण्याचा आवाज राजधानीच्या सैनिकांना आला नाही. शेवटी अचानक तुर्की सैन्य आत शिरलेलं बिझंटाईन फौजेला दिसलं. दुसरीकडे, तोफांचा मारा आणि भुयार खणून सुरुंग उडवण्याची तयारी सुलतानाकडून चालूच होती.

या मोहिमेत सुलतानाचा अमाप पैसा खर्च होत होता, सैनिक हानीही होत होती, तरीही ही राजधानी घ्यायचीच या हट्टाने सुलतान महंमद द्वितीय पेटून उठला होता. शेवटी ४० दिवसांच्या सततच्या माऱ्यानंतर तटबंदीला खिंडार पडलं तेव्हा, सुलतानाने बिझंटाईन राजा कॉस्टंटाईन पोलोलोगासला शरण यायचा शेवटचा निरोप पाठवला. राजाने शरण येणं आणि मांडलिक होणं नाकारलं. २९ मे या दिवशी सुलतानाने नौदल आणि लष्कर या दोन्ही बाजूंनी हल्ला चढवला. फुटलेल्या खिंडारातून फौज आत शिरली तेव्हा तटबंदीपलिकडचे खंदक सुलतानाने मृत सैन्याच्या शवांनी भरून काढले. सुलतानाने सुरुवातीला जखमी, आजारी मरणासन्न सैनिक शहरात पाठवले त्यात अनेक मारले गेले आणि मग आणि राखीव ठेवलेली जानिसरिज फौज शहरात शिरवली. त्यांनी राजधानीचा दरवाजा उघडला. सुलतानाच्या शिरकावानंतर मोठा नरसंहार झाला. शहरात प्रचंड लुटालूट झाली.

राजधानीमधे मोठी लढाई झाली. बिझंटाईन राजा कॉस्टंटाईन शौर्याने लढला. रणांगण सोडणं त्याने नाकारलं. शेवटी एका बाणाने त्याचा प्राण घेतला. मृत सैनिकांच्या अनेक शवांच्या ढिगात त्याचाही मृतदेह मिसळला. ११०० वर्षांपूर्वी एका कॉस्टंटाईन नावाच्या पराक्रमी तरूणाने लढाई जिंकून याच शहरात रोमान सत्तेचा पाया घातला होता. २९ मे १४५३ या दिवशी, त्याच नावाच्या त्याच्या वारसाच्या मृत्यूने बिझंटाईन साम्राज्याचा शेवट झाला. रोमन साम्राज्य नावाची एक मोठी लाट कालसागरात विरून गेली आणि ओथमन तुर्की नावाची नवीन मोठी लाट तयार झाली आणि सामर्थ्य दाखवायला लागली होती. ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम धर्म यातील हे मोठं धर्मयुध्द इतिहासाला नवीन वळण देऊन गेलं.

शेवटी २९ मे १४५३ हा दिवस महंमद द्वितीयचा भाग्याचा ठरला. सुलतान महंमद द्वितीयचा विजय झाला. बिझंटाईन साम्राज्याचा अस्त त्याने घडवून आणला. ३ दिवस प्रचंड जाळपोळ, लुटालूट, कत्तल झाली. सर्व युध्दांमधे होतं तसं या युध्दात क्रूरतेचं प्रचंड थैमान जगाने पाहिलं. घरांना लागलेल्या आगी, आणि लूटीने नागरिकांचं आयुष्य दयनीय झालं. शहरातील तरूण मुला-मुलींना पकडून एका दोरखंडाला बांधून ओथमन फौजेने त्यांना गुलामांच्या बाजारात विकायला नेलं. शहरातील सेंट सोफायासह, सर्व प्रार्थनास्थळं, मशिदींमधे रुपांतरित झाली. या मोठ्या विजयाने ओथमन साम्राज्याचा विस्तार आता युरोपमधेही झाला. त्यानंतर

सुलतानाने लगेच एदिर्नची राजधानी कॉंस्टंटिनोपलला हलवली. सुलतान महंमद द्वितीयने आपल्याला कैसर – ऐ – रोम पदवी घेतली.

आता तो स्वत:ला पातशहा म्हणवून घेऊ लागला.

सुलतानाला राजधानी आता स्थिरावायला हवी होती. म्हणून परागंदा झालेल्या सर्व नागरिकांना अभय देऊन त्याने परत बोलावलं. राजधानीची भरभराट केली. आजवर तुर्कस्तानला फक्त गॅलिपोलीचा द्वीपकल्पाचा समुद्र किनारा मिळाला होता. कॉंस्टंटिनोपल हाती आल्यावर समुद्राच्या काठावरची राजधानी हाती आल्यावर सुलतान महंमदने आपलं नौदल समर्थ केलं. नवीन युध्दसामग्री आणि लष्करी शिस्त आणून आपल्या लष्करालाही बलवान केलं.

सुलतान महंमदने पुढील २ वर्षांनी १४५६ मधे सर्बिया जिंकलं. त्यानंतर सन १४६३ ला चढाई केली ती बोस्नियावर. व्हेनिस फौजेशी त्याने युध्द केलं ते त्याच्या पाठोपाठ. इ. स. १४६६ ते १४७८ पर्यंत त्याच्या स्वाऱ्या चालूच राहिल्या. त्यात अल्बानिया, क्रिमिया देश होते. ओथमन साम्राज्याचा विस्तार चालूच होता. काही ठिकाणी तह, काही ठिकाणी मांडलिकत्व अशा अनेक मार्गाने सुलतान महंमद द्वितीयने साम्राज्याचा कळस उंचावत नेला.

त्यानंतर महंमद द्वितीयने बेलग्रेडवर हल्ला केला. पण तिथे मात्र त्याला पराजय पाहावा लागला. बेलग्रेडच्या फौजेच्या प्रतिकारानंतर त्याला आपला वेढा उठवावा लागला आणि तो माघारी फिरला. या युध्दात त्याचे ५०,००० सैनिक मारले गेले. या पराभवानंतर २० दिवसांनी द्वितीय महंमद सुलतानचा मृत्यू झाला. याच्या काळात तुर्की साम्राज्य वैभवाच्या शिखरावर होतं.

उत्कृष्ट कारभार, चतुर राजकारण आणि अतुलनीय शौर्य या सर्व आघाड्यांवर वर्चस्व असलेला सुलतान महंमद द्वितीय साहित्य, कला, ज्ञान यातही जाणकार होता. सैनिकांसाठी तो दयाळू होता. त्यामुळेच कारभारावर त्याचं उत्तम नियंत्रण होतं. तो त्याच्या सरदारांच्या आणि दरबारी सल्लागार मंडळाच्या विचाराने चालणारा नव्हता, त्यामुळे योग्य तो निर्णय घेण्यास समर्थ होता. किंबहुना, त्याच्या दरबारी मंडळींना तो जरा अपमानानेच वागवी. त्याला आपल्या तुर्की वंशाचा प्रचंड अभिमान होता. आपल्या साम्राज्याच्या अंतर्गत विकासाकडेही त्याने खूप लक्ष दिलं. परदेशातील उत्तमोत्तम कारागीर आणून शहरांच्या सौंदर्यात भर टाकली. अनेक चर्चेस मोठ्या भव्य मशिदींमधे रुपांतरीत केले. जुना किल्ला पाडून ७ मनोऱ्यांचा नवीन किल्ला बांधला. लष्करात शिस्त आणली. न्यायालयांची स्थापना केली. मुस्लीम आणि इतर धर्मीयांमधे एकच न्यायपध्दत चालू केली. सरकारी कामकाजासाठी अर्थ-न्याय-सारावसूली अशी निरनिराळी खाती तयार करून त्यावर मंत्री नेमले. देशाची अनेक विभागात वाटणी केली आणि त्यावर प्रमुखाची नेमणूक करून त्यांना बेग हुद्दा दिला. एकट्या युरोपातील प्रदेशांचे ३६ विभाग बनले होते. एवढा मोठा साम्राज्य विस्तार झाला होता. प्रत्येक बेगने सुलतानाला ४०० सैनिक पुरवायचे होते. १ लाख पायदळ आणि १ लाख घोडदळ उभारलं. स्वारी झाल्यावर जी लूट मिळायची त्याचा विनियोग शाळा, दवाखाने, धर्मशाळा बांधण्यात खर्च करत असे.

उद्योजकांना आणि व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देऊन अर्थिक भरभराट केली. पर्शियन भाषेला उत्तेजन दिलं. शेहदी नावाच्या कवीकडून ओथमन सम्राटांवर शहानामा नावाचा ग्रंथ लिहून घेतला.

दोन साम्राज्यं, दोनशे शहरं, आणि चौदा राजघराण्यांचा शेवट करणारा हा महाप्रतापी सुलतान होता. कॉंस्टंटिनोपलमधे दफन झालेला तो पहिला ओथमन सुलतान होता. इ. स. १४५१ ते ८१ पर्यंत ३० वर्षे त्याने सत्ता उपभोगली. इ. स. १४८१ साली अतिसाराच्या दुखण्याने आजारी पडला. आणि ३ मे १४८१ या दिवशी मरण पावला. गुलबहार आणि गुलशाह या त्याच्या बेगम होत्या.

कॉंस्टंटिनोपल जिंकल्यावर त्याने स्वत:ला सुलतान अल् बरायाँ वल् बहारयाँ हा किताब घेतला. त्याचा अर्थ तो २ स्थल आणि २ जल-सागरांचा स्वामी बनला. अनातोलिया आणि बिझंटाईन हे दोन भूप्रदेश आणि काळा समुद्र आणि एजियन सागर हे दोन जलसागर. याच सुलतानाने कॉंस्टंटिनोपलमधे टोपकाप्प राजावाडा बांधायला सुरूवात केली. टोपकाप्पचा अर्थ तोफ असा आहे. त्यानंतर पुढील सर्व वारस याच राजवाड्यात जन्मले. पण इ. स. १८५४ नंतर या वास्तूचं महत्व संपलं.

महंमद द्वितीय सुलतानाचा पुढचा वारस होता बायेझिद द्वितीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -




**2020**

**२९ मे १४५३ या काँस्टंटिनोपलच्या विजयाने बिझंटाइन साम्राज्याचा अंत होऊन ओथमन राजवटीला सुरुवात झाली.**

## ८ वा सुलतान. बायेझिद द्वितीय. जन्म ३डिसेंबर १४४७. मृ.२६ मे१५१२.

महंमद द्वितीय आणि गुलबहार खातूनचा हा मुलगा. याचा जन्म डिमोटिकामधे झाला, शिक्षणही अमासियामधे झालं. अमासियाचा सुभेदार म्हणून कारभाराचे धडे त्याने तिथेच घेतले. इ. स. १४८१ मधे तो सुलतान बनला.

सुलतान महंमदाचा मृत्यू झाल्याची बातमी त्याच्या सर्व मुलांपर्यंत पोचली आणि सत्तेचा ताबा घ्यायला जो राजपुत्र आधी पोचला त्याचं नाव होतं, बायेझिद द्वितीय. त्यामुळे ओथमन साम्राज्याचा हा आठवा सुलतान बनला. त्याने राजधानीत शिरताच जानिसरिजचा ताबा मिळवला. ज्याच्या हाती ही सुरक्षा फौज त्याचा सत्तेवर कब्जा हे तर स्पष्टच होतं. त्याला एकच भाऊ होता मुस्तफा. बायेझिदचं त्याच्याशी युध्द झालं, भाऊ हरला आणि इजिप्तच्या आश्रयाला गेला. तिथे त्याचा कैदेत मृत्यू झाला. सत्तेत आल्यावर सुलतान बायेझिद द्वितीयने हर्झगोविना जिंकलं. सन १४९९ ते १५०३ पर्यंत व्हेनिसशी युध्द चालू राहिलं. त्यात ओथमन तुर्कांना विजय मिळाला. हा नाविक दलाचा मोठा विजय होता. या युध्दात इतिहासात सुलतानाच्या जहाजांवर प्रथमच तोफा चढवण्यात आल्या होत्या. व्हेनिसने सुलतानाला ३०,००० ड्युकाटस् दरसाल देण्याचं मान्य करुन तह केला.

सुलतान बायेझिदला आणखी एका सावत्र भावाशी सामना करावा लागला. तो होता झेम. हा चेचक खातूनचा मुलगा आपल्याला गादी मिळावी म्हणून बरसावर चालून गेला पण येनिसेहेरला त्याचा पराभव झाल्यावर तो इजिप्तला पळून गेला. तिथून मक्का आणि मदिनाची यात्रा करून आल्यावर परत त्याने अनातोलिया जिंकायचा प्रयत्न केला. पण तिथेही सुलतान बायेझिद द्वितीयच्या फौजेने त्याचा पराभव केला. मग त्याने ऱ्होडस् गाठलं. तिथल्या लोकांनी त्याला पोप द इनोसंटकडे पाठवलं. या पोपने ओथमन तुर्कांना युरोपमधून हाकलण्यासाठी त्याचा वापर करायचं ठरवलं. पण पोपला त्यात यश आलं नाही. शेवटी झेमचा तुरुंगवासातच मृत्यू झाला. झेमला तोतया म्हणूनही संबोधलं जातं.

सुलतान बायेझिदच्या काळात साम्राज्यात शांतता नांदली. त्याने साम्राज्य विस्तारात भर घातली नाही की नवीन फौज उभारली नाही. इ. स. १४९३ मधे स्पेनने आपल्या देशातील ज्यू आणि मुसलमान जनतेला देशाबाहेर हाकलून लावलं, तेव्हा सुलतान बायेझिद द्वितीयने त्या सर्व लोकांना आपल्या देशात आसरा दिला. त्या लोकांना नागरिकत्व दिलं. त्यांच्या गुणांना प्रोत्साहन दिलं, त्यामुळे त्याच्या कारकीर्दीत कला साहित्य, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची खूप भरभराट झाली. इ. स. १४९४ मधे एदिर्नमधे छापखाना एका ज्यूने काढला. सन १४९९ ते १५०३ पर्यंत चाललेल्या युध्दाने सुलतानाने व्हेनिसवर सत्ता मिळवली.

सुलतान बायेझिने आपल्या मुलांना निरनिराळ्या प्रांती गव्हर्नर म्हणून कारभार करायला पाठवलं होतं. सुलतान बायेझिद द्वितीयने आपण निवृत्त होत असून शहजादा अहंमद हा आपला वारस राहील हे घोषित केल्यावर संतापलेल्या शहजादा सलिमने बापाविरूध्द बंड पुकारलं. सुलतानाची परवानगी न घेताच एक दिवस त्याने

राजधानीत प्रवेश केला. सुलतानाच्या सुरक्षा फौजेने, जानिसेरिजने त्या राजपुत्राला साथ दिली पण सुलतान बायेझिदने हुशारीने आपल्या मुलाचा पराभव केला. मग हा पुत्र सलीम क्रिमिया राज्याच्या आश्रयाला गेला. आपल्या इतर मुलांनीही राजधानीत येऊ नये म्हणून सुलतान बायेझिदने द्वितीयने राजधानीत येण्यास बंदी घातली. पण क्रिमिया राजाच्या मदतीने परत सलीमने आपल्या राजधानीवर हल्ला केला. राजप्रासादाच्या वेशीवर सुरक्षा सैनिकांनी त्याच्यासाठी दार उघडलं. सलीम राजपुत्राने सुलतानाची भेट मागितली. पण सुलतानाने भेट घेणं नाकारलं. तेव्हा जानिसरिजचा मुख्य आगा मध्यस्थी करायला आला. त्याने सुलतानाला सलीमची भेट घ्यायला सांगितलं. सुलतानाने ते कबूल केलं. सलीम भेटीला आला तेव्हा त्याने सुलतानाला पदत्याग करायला सांगितलं. जानिसरिनेही त्याला पाठिंबा दिला, काळाची पावलं ओळखून सुलतान बायेझिद द्वितीय स्वतःहून पायउतार झाला. आपली मुद्रा, शिक्का त्याने शहजादा सलिमला सुपूर्द केलं. आपलं उर्वरित आयुष्य आपल्या जन्मगावी घालवायचं ठरवलं. सलीमने परवानगी दिली.

सुलतान बायेझिद द्वितीय आपल्या जन्मगावी डिमिटोकाला पोचण्यापूर्वीच तिसरे दिवशी मरण पावला. सुलतान बनलेल्या सलीमने विष घालून आपल्या बापाला ठार केलं.

इ. स. २२ मे १४८१ ते २४ एप्रिल १५१२ पर्यंत बायेझिद द्वितीय सत्तेत होता. निगार, शिरिन, बुलबुल, गुलबहार, गुलफाम, गुलरू, या त्याच्या राण्या. सलीम प्रथम, सुलतान अब्दुल्ला, सुलतान अहंमद, शहजादा कोरकुद, शहाजहान, आलमशाह, महंमद आणि महंमुद हे त्याचे शहाजादे.

याचा दफनविधी इस्तंबूलमधे करण्यात आला.

सुलतान द्वितीय बायेझिदनंतर ओथमन साम्राज्य शहजादा सलिम प्रथमच्या हाती आलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ९ वा सुलतान सलिम प्रथम. जन्म १० ऑक्टोबर १४७०. मृ.२२ सप्टेंबर १५२०. दुर्दम्य सुलतान.

बायेझिद द्वितीय आणि गुलबहार खातूनचा हा मुलगा. गुलबहार राजघराण्यातील होती.

इ. स. १५१२ पासून नववा सुलतान सलीम प्रथम सत्तेत फक्त ८ वर्षे राहिला, पण एवढ्या थोड्या अवधीत त्याने आपल्या साम्राज्यात पाचपट भर घातली. सुन्नी पंथाचा प्रसार हा त्याच्या राजकीय कारकीर्दीचा मध्यवर्ती गाभा होता. त्यामुळे याला पहिला खलिफा सुलतान म्हणूनही नावाजलं गेलं. यापूर्वी सुलतान मुरादलाही खलिफा संबोधलं जाई पण ते अजिंक्य सुलतान या अर्थी होतं. पण सुलतान सलिम प्रथमला खलिफा नावाजलं गेलं,

सलिम प्रथमने ३१ डिसेंबर १५१६ ला इजिप्तवर आक्रमण केलं. जानेवारी १५१७ ला इजिप्तचा राजा तुम्मन बे याच्याशी युध्द जुंपलं. त्यात तुम्मन बेचा सरदार खैर बे हा फितूर होऊन सुलतान सलिमला जाऊन मिळाला. त्यात तुम्मन बे हरला. इजिप्त सुलतान सलिमच्या हाती पडलं. सुलतान सलिमने इजिप्तचा काही भाग ओथमन साम्राज्याला जोडला, खैर बेला इजिप्तचा पाशा नेमलं. त्याच्या हाताखाली २४ अधिकारी दिले. जेव्हा कैरो जिंकलं. तेव्हा तिथला शेवटचा अब्बासिद खलिफ अल् मुकवक्कील तृतीय (महंमद पैगंबराच्या काकांचा वंशज) याला पकडून कॉंस्टंटिनोपलला आणलं. त्याच्याकडून खलिफा हा किताब आणि मानचिन्हंही काढून घेतली. तेव्हापासून ओथमन सुलतानांनाच खलिफा म्हणून संबोधलं जाऊ लागलं. (पण याबद्दल इतिहासकारांमधे मतभेद आहेत)

सुलतान सलिम प्रथमच्या काळात, राज्यविस्तारासाठी इ. स. १५१६ पासून सतत युध्द होत राहिली. सिरिया, अल्जिअर्स त्याने साम्राज्याला जोडलं. पाठोपाठ इजिप्त आणि मामलक साम्राज्य आपल्या अधिपत्याखाली आणलं. मामलक हा सेवकांनी स्थापलेला प्रांत होता. पण सेवक म्हणजे गुलाम, नोकर नव्हेत. वरच्या पाताळीवरचे राज्याचे सेवक. (भारतात सत्ता गाजवून गेलेला कुतुबुद्दीन ऐबक आणि त्यानंतरचा अल्तमश हे गुलामांच्या बाजारात विकले गेल्यावर, या मामलक राज्यातून भारतात आले होते) सिरिया, पर्शिया, अरेबिया प्रांतापर्यंत त्याने आपपल्या राज्याच्या सीमा विस्तारल्या. तो अत्यंत अभ्यासू राजा होता. रात्री जनानखान्यात, मौज मजेत, ख्यालीखुशालीत वेळ न दवडता तो अभ्यासात वेळ घालवी. त्यामुळेच याच्या कारकीर्दीत त्याने जाणकार अभ्यासू लोकांना उच्च पदावर नेमलं.

एकीकडे अत्यंत अभ्यासू, स्वतंत्र विचारांचा तर दुसरीकडे त्याच्यासारखा क्रूर कुणी नाही, अशी त्याची दोन रूपं होती. सत्ता मिळवल्यावर आपल्या मुक्या पहेलवानांकडून आपल्या ५ बालक पुतण्यांना गळे आवळून मारतांना तो शांतपणे पाहात राहिला होता. कारण ते त्याचे भावी हक्क सांगणारे वारसदार होते. त्याने मौत नावाची फौज तयार केली होती, जी त्याच्या एका इशाऱ्यावर तत्क्षणी त्या व्यक्तीचा प्राण घेत असे. या

त्याच्या अत्याचारातून त्याचे ७ वजीर, मित्र, दरबारी, अनेक अधिकारी, आपला जीव गमावून बसले. त्याच्या या क्रूर कृत्यामुळे रागाने "तुझा वजीर होवो" असा वाक्प्रचार त्याकाळात लोकांच्यात पसरला होता.

सलीम प्रथम सुलतान झाला तेव्हा त्याचे दोन भाऊ कोरकुद आणि अहंमद, सुभेदार म्हणून इतर प्रांतात कारभार करतच होते. सुलतानपदाची आस त्यांनाही होतीच. सत्ता मिळवण्यासाठी ते दोघे सुलतान सलिम प्रथम विरुध्द एक झाले आणि त्यांनी सलीमवर हल्ला करून गेले. सुलतान सलीम प्रथमने कोरकुदचा तात्काळ पराभव केला आणि त्याच्या ५ मुलांनाही गळफासाने ठार केलं. दुसरा शहजादा अहंमद सहा महिने झुंज देत राहिला आणि शेवटी पराभूत झाला. त्यालाही सलीमने ठार केलं. त्यामुळे सुलतान सलीमचा मार्ग पूर्णपणे निष्कंटक झाला. पण शहजादा अहंमदचा मुलगा, शहजादा मुराद मात्र जीव वाचवून शेजारच्या पर्शियन देशात आसरा घ्यायला गेला.

सुलतान सलीमची पुढची चाल म्हणजे त्याने शिया पंथियांविरूध्द शस्त्र धरलं. तो स्वतः सुन्नी पंथाचा होता, त्याला शिया पंथ संपवायचा होता. म्हणून त्याने पर्शियावर आपली नजर वळवली. पर्शियाचा शाह इस्माईल तेव्हा सत्तेत होता. त्याने सफाविद पंथाची स्थापना केली. सफाविद हा सूफी विचारांवर आधारित पंथ होता. शाह इस्माईलने त्याचा सर्व शिया पंथ सफाविद पंथात रुपांतरित केला. त्या पर्शियाच्या या विचारांचा ओथमन जनतेतही प्रसार होऊ लागला तेव्हा कट्टर सुन्नी सुलतान सलिम संतापला आणि पर्शियाविरूध्द त्याने शस्त्र धरलं. सलीमने मग गुप्तहेरांची फौज तयार केली आणि पर्शियात कोण कोण शिया पंथाचे आहेत त्यांना शोधून ठार करायची आज्ञा दिली. या गुप्तहेरांनी पर्शियातील ७०,००० शिया लोक शोधले. त्यातील ४०,००० लोकांना ठार केलं आणि इतरांना कैदेत टाकलं. सलीमच्या या अघोरी कृत्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.

त्याच्या या कृत्याने पर्शियाचा शाह इस्माईल भडकला आणि त्याने सलीमविरूध्द युध्द घोषित केलं. हे अटळच होतं. पर्शियाची पहिली खेळी म्हणजे अहंमदचा एक मुलगा जिवंत राहिला होता, त्याला शाह इस्माईलने हाताशी घेतलं. इकडे इ. स.१५१४ च्या मार्चमधे सुलतानाने मोठी फौज जमवली. २३ ऑगस्टला खाल्दारिनमधे दोन्हीकडील फौजा जमल्या. दोन्ही फौजांमधे मोठं युध्द झालं. सुलतान सलीम प्रथम, शाहवर चाल करून गेला. तुफान धुमश्चक्री झाली. रणांगणावर शाह इस्माईल घोड्यावरून पडला. आणि जखमी झाला. त्याच्या विश्वासू सेवकांनी त्याला उचलून राजधानीत न नेता दुसरीकडे नेलं म्हणून तो वाचला. शाह इस्माईल युध्द हरला. या घनघोर युध्दात सलीम जिंकला आणि पर्शिया त्याच्या हाती आलं. राजधानी ताब्रिजमधे सुलतान सलिम प्रथमने ७ सप्टेंबरला १५१४ ला मोठ्या दिमाखात प्रवेश केला.

पर्शियाचं हे युध्द इतिहासात गाजलं कारण हे सुन्नी विरूध्द शिया पंथियांमधील धर्मयुध्द होतं. दुसरं म्हणजे सुलतान सलिमकडे उत्कृष्ट आणि अत्याधुनिक युध्दसाहित्य होतं. तोफा होत्या. हे सर्व शाह इस्माईलकडे नव्हतं. सुलतान सलिमने शाहचा सारा जनानखाना आणि राण्या आपल्या जनानखान्यात आणल्या. त्यानंतर अति दु:खाने इस्माइल शाह मद्यव्यसनात बुडाला आणि त्याचा मुलगा तहमास्प शाह बनला.

त्यानंतर सुलतान सलिम इजिप्त आणि सिरियावर चालून गेला. तेही देश त्याने आपल्या साम्राज्याला जोडले. आपल्या ८ वर्षांच्या कारकीर्दीत सलिमने इराण, अझरबैजान, मेसोपोटेमिया, अरमेनिया, खोरासान, पूर्व अनातोलिया, एवढा प्रदेश आपल्या राज्याला जोडला. कार्तलि आणि खाकेति या दोन राजांना मांडलिक करून घेतलं. सलिमची सत्ता मक्का मदिनापर्यंत पोचली. इ. स. १५१६ मधे दमास्कस जिंकलं. मग इजिप्तच्या मामलक राजाशी युध्द सुरू झालं आणि इजिप्तवरही विजय मिळवला.

मामलकच्या मोठ्या विजयानंतर आपल्या राजधानीत म्हणजे एदिर्नला (एड्रिओनोपल) सुलतान सलीम प्रथम परतत असतांना, आपल्या बापाच्या बायेझिद द्वितीयच्या गावाजवळच असतांना सलीमला ताप यायला लागला. त्याला त्वचा रोग झाला की कॅन्सर हे अज्ञात आहे, कारण हा त्वचारोग सतत घोड्यावर बसल्यामुळे चामड्याच्या स्पर्शाने होत असे. सुलतान सलीम प्रथमच्या मांडीला हा रोग झाला वयाच्या ५० व्या वर्षी सलिम मरण पावला. इस्तंबूलमधे त्याची कबर आहे.

हाफसा आणि आयेशा सुलतान या त्याच्या राण्या. त्याच्या शहजादांची नावं सुलेमान पाशा, हातिस सुलतान, शाह सुलतान, बेहान आणि युवेस.

२४ एप्रिल १५१२ ते २२ सप्टेंबर १५२० हा सुलतान सलीम प्रथमचा राज्यकाळ अवघा ८ वर्षांचा होता. पण त्या आठ वर्षांमधे त्याने केलेला साम्राज्य विस्तार आणि त्याची पर्शियाविरुध्द झालेली लढाई, सुन्नी पंथाच्या प्रसारासाठी त्याने घेतलेले परिश्रम याने तो काळ गाजला. मक्का आणि मदिनासंदर्भात त्याने केलेलं काम त्याला लोकप्रियता देऊन गेलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १० वा सुलतान सुलेमान द्वितीय. जन्म ६ नोव्हेंबर १४९४. मृ.६ सप्टेंबर १५६६. द मॅग्निफिसंट या नावाने तो पराक्रम करून गेला.

सुलतान सलीम प्रथम आणि हाफसा खातून यांचा हा मुलगा.

इ. स. १५२० च्या सप्टेंबरपासून १५६६ च्या सप्टेंबरपर्यंत दहावा सुलतान बनलेला सुलेमान द्वितीय पाश्चिमात्य इतिहासात सुलेमान द मॅग्निफिसेंट म्हणून ओळखला जातो आणि इस्लामिक देशात कानूनी सुलतान या नावाने नावाजलेला आहे. याच्या अद्वितीय कर्तृत्वामुळे ओथमन साम्राज्य कळसाला पोचलं होतं. आपल्याकडे भारतात जेव्हा मुघल सम्राट अकबर राज्य करत होता, तेव्हा ओथमन साम्राज्याच्या गादीवर सुलेमान विराजमान झाला.

याला कानूनी सुलतान असं नावाजलं गेलं, याचं कारण म्हणजे या सुलतानाने धार्मिक कायदे आणि न्यायालयीन कायदे यांच्यात सुसूत्रता आणली. त्याने आर्थिक-सामाजिक-लष्करी-करवसूली आणि गुन्हेगारी कायद्यांमधे अनेक सुधारणा घडवल्या. त्याला आव्हान देणारा कुणी दुसरा राजपुत्र नसल्यामुळे शहजादा सुलेमानला तख्त मिळवायला त्रास झाला नाही. शूर, चतुर कारभारी, प्रजेचं हित पाहणारा असं त्याचं वर्णन इतिहासकारांनी केलंय. तुर्की राजघराण्याच्या प्रथेप्रमाणे सत्तेत येण्यापूर्वी सुलेमानही काफ्फा, एदिर्न इथे सुभेदार म्हणून अनुभव घेऊन कारभारात आला. आपल्या बापाप्रमाणे, सलिम सुलतानाप्रमाणे त्याने फौजेचे हाल केले नाहीत म्हणून तो सैनिकांमधेही प्रिय झाला. आपल्या बापाने कैद केलेले ग्रीक सैनिक त्याने सोडून दिले त्यामुळे ग्रीकही खूष झाले. असे दयाळू बरेच निर्णय त्याने घेतले.

कारभाराला सुरूवात करताना त्याने आपला मित्र परगली इब्राहिम पाशाला मुख्य वजीर केलं. हा इब्राहिम गुलाम म्हणून सुलेमानकडे आणला होता. इब्राहिमच्या हुशारीवर सुलतान सुलेमान द्वितीय इतका खूष झाला की त्याने इब्राहिमला वजीर म्हणून नेमलं. इब्राहिम सुलेमानच्या एवढ्या मर्जीतला आणि विश्वासातील होता की दोघे एका थाळीत जेवायचे, एका महालात झोपायचे. आपल्या बहिणीचं लग्न सुलतान सुलेमानने इब्राहिमशी लावून दिलं होतं. इब्राहिमला ग्रीक, पर्शियन, भाषा यायच्या. तो विद्वान होता. जगातील ज्ञान सुलतानाला सांगून तो सुलेमान सुलतानाचं ज्ञान वाढवत असे. राजकारण आणि लष्करी कौशल्य इब्राहिमकडे होतं. तो मुत्सद्दीही होता. जानिसेरिज फौजही त्याच्या लगामात होती. त्यामुळे इब्राहिमला लोक प्रति सुलतान मानत.

कारभार हाती घेताच सुलतान सुलेमानने हंगेरीच्या राजाकडे आपल्या राजदूताला न मिळालेली खंडणीची रक्कम मागायला पाठवलं, तेव्हा हंगेरीच्या राजाने रक्कम तर नाकारलीच पण त्या राजदूतालाही ठार केलं. तेव्हा संतापलेल्या सुलतान सुलेमान द्वितीयने लगेच फौज जमवली आणि १ लाख फौज, ३०० तोफा घेऊन हंगेरीवर चाल करून गेला आणि बेलग्रेडला वेढा घातला. बेलग्रेडच्या कैद्यांना आपल्या राजधीत पाठवलं आणि अनेकांना ठार केलं. अशारितीने बेलग्रेड सुलतान सुलेमानच्या हाती आलं. बेलग्रेडनंतर सुलेमाच्या फौजांनी हंगेरीचे अनेक महत्वाचे किल्लेही जिंकून घेतले.

त्यानंतर सन १५२२ सालच्या उन्हाळ्यात मोठी फौज आणि १०० तोफा घेऊन सुलतानाने ऱ्होडस्वर हल्ला केला. भूमध्य सागरात आपलं नाविक वर्चस्व निर्माण करण्यासाठी हे बेट जिंकणं सुलतानासाठी महत्वाचं होतं. ऱ्होड्सच्या रक्षणासाठी इटली, इंग्लंड आणि स्पेनच्या फौजा एकत्र आल्या होत्या. ३ भक्कम तटबंदींनी सुरक्षित असलेल्या या किल्ल्यावर ओथमन फौजांनी वारंवार हल्ले केले. पण शूर ऱ्होड्स फौजांनी ते वरचेवर परतवले. ५ महिने अटीतटीची लढाई झाली. पण या झुंजीत शेवटी अपरिमित मनुष्यहानी झाल्यावर आणि किल्ल्यातील रसद संपल्यावर ऱ्होड्सची फौज शरण आली. सुलतान सुलेमानने शरणार्थींना सुखरुप बाहेर पडू दिलं आणि या बेटावर सुलतानाचा अंमल चालू झाला. सुलतान सुलेमानच्या या वर्तनाची शरणागतांकडून फार प्रशंसा झाली. ओथमन सत्तेचाही युरोपच्या दिशेने विस्तार सुरु झाला.

नंतर बसरा, बगदाद, मोसुल, जिंकलं. आपली पुढील मोहीम ऑस्ट्रियातील महत्वाचं शहर व्हिएन्नावर सुलतान सुलेमानने सन १५२९ मधे सुरु केली. ऑस्ट्रियावर हल्ला करण्यासाठी त्याला आयतं कारण मिळालं. फ्रेंच राजा फ्रान्सिस प्रथमने सुलतान सुलेमानची मदत मागितली. इ. स. १५१६ मधे राजा लुईस द्वितीय गादीवर आला होता. राजा लुईस द्वितीय हा हंगेरी, बोहेमिया आणि क्रोशियाचा राजा होता. या काळात हंगेरीची आर्थिक फरिस्थिती अगदी डबघाईला आली होती.

सुलेमान सुलतानला ही सर्व बातमी कळत होती. बेलग्रेडनंतर उरलेली हंगेरी मिळवायची हीच संधी सुलेमानला होती. म्हणून मोठी फौज घेऊन सुलतान सुलेमानची फौज हंगेरीवर निघाली. २९ ऑगस्ट १५२६ या दिवशी मोहॅचवर पठारावर दोन्ही फौजांची गाठ पडली. लुईसकडे मोठी फौज नव्हती. चांगल्या तोफाही नव्हत्या. त्यामुळे सुलेमानच्या फौजांनी शत्रूवर सहज विजय मिळवला. सुलेमानच्या तोफांनी आणि जानिसेरिज फौजांनी तुफानी हल्ला केला. या मोहॅचच्या लढाईत लुईस राजा मरण पावला. आपला पराभव होतो आहे हे पाहून तो पळून जाऊ लागला, तेव्हा त्याचा घोडा पाण्यात पडला आणि राजा लुईस अंगावरच्या जड चिलखतामुळे उभा राहू शकला नाही. त्यात तो मरण पावला. या युध्दात ३० हजार सैनिकांसह, हंगेरीचे मोठे सरदारही जीव गमावून बसले. मोठा नरसंहार झाला. हंगेरीची वाताहत झाली.

राजा लुईस निपुत्रिक होता. त्यामुळे पश्चिम हंगेरीच्या गादीवर फर्डिनांडची नेमणूक झाली. आता हंगेरीवर हक्क सांगायला दोघे उभे राहिले. लुईसने ऑस्ट्रियाच्या मेरी या राजकन्येशी विवाह केला होता. आणि लुईसच्या बहिणीचं मेरीच्या भावाशी, फर्डिनांडशी लग्न झालं होतं. फर्डिनांड हा लुईसचा मेहुणा, त्याच्याविरुध्द ट्रान्सीलवानियाचा झपोलिया हा सरदार उभा राहिला. दोघांच्यात भांडण सुरु झालं ते सुलेमानच्या पथ्यावर पडलं. सुलतान सुलेमानने झपोलियाचा हंगेरीच्या गादीवरचा हक्क मान्य केला. झपोलियाला संपवण्यासाठी आणि संपूर्ण हंगेरीवर कब्जा मिळवण्यासाठी फर्डिनांड बाहेर पडला तेव्हा सुलेमानने ती संधी सोडली नाही. तो झपोलियाच्या मदतीला निघाला. व्हिएन्ना हे शहर जिंकणं अति महत्वाचं होतं. म्हणून सुलतानाने आपली पुढची मोहीम व्हिएन्नावर आखली.

पण निसर्गाने या नगरीच्या बाजूने कौल दिला आणि तिचं रक्षण केलं. एकदा धुवँधार पाऊस, एकदा अपरिमित बर्फवृष्टी यातून सुलतानाला सपशेल माघार घ्यावी लागली. या पावसाने तोफा दारुगोळा भिजला,

सैन्यात रोगराई पसरली आणि सुलेमानची फौज माघारी जायची भाषा बोलू लागली. जानिसेरिज फौजही लढायला तयार नव्हती. तेव्हा सुलतानाने शेवटचा प्रयत्न म्हणून निकराचा हल्ला व्हिएन्नावर केला पण तोही अपयशी ठरला. त्याच्या हाती काही लागलं नाही पण शत्रूचं जास्तीत जास्त नुकसान मात्र झालं. इतिहासकारांच्या मते हीच सुलतानाची इच्छा असावी. व्हिएन्नाचे शूर शिपाई प्राणपणाने लढले. त्यामुळे सुलेमान सुलतानचं ऑस्ट्रिया जिंकण्याचं स्वप्न अधुरंच राहिलं.

पहिल्या पराभवानंतर सुलतान सुलेमानने ३ वर्षांनी परत एकदा व्हिएन्नावर हल्ला चढवला. १४४१ या सालात हे मोहीम सुरु झाली आणि १४४७ मधे ५ वर्षांच्या शांतता कराराने थांबली. हंगेरीच्या फर्डिनांडने ३० हजार ड्युकाट सुलतानाला द्यायचं ठरलं. पण वारंवार ओथमन प्रांतांवर हल्ला करुन, सुलतानाला त्रास देण्याचं हंगेरीने काही थांबलं नाही.

सुलतान सुलेमान द्वितीयने आपलं नाविक दल सामर्थ्यवान केलं. त्याच्या नावाचा दबदबा सर्वदूर पसरला. ओथमन साम्राज्याच्या नाविक दलावर फडकणारा ध्वज बा-ए-हुमायूँ नावाने ओळखला जाई. सुलेमानचा नौदल प्रमुख खैर-ऐ-दिल हा त्याच्या लाल दाढीमुळे बारबारस्सा या किताबाने ओळखला जाई. आपलं नाविक दल बळकट करण्यासाठी सुलेमानने सरळ दर्यात चांचेगिरी करणार्यांना हाताशी धरलं आणि आपल्या नौसैनिकांना त्यांच्याकडून शिक्षण दिलं. त्यासाठी या लूटमार करणाऱ्या चाच्यांना भरपूर पगारावर ठेवलं.

यानंतर सुलेमान द्वितीयने आपलं लक्ष पर्शियाच्या राजसत्तेविरूध्द म्हणजेच शिया पंथियांवर केंद्रित केलं. त्याला कारणंही तशीच घडली. पर्शियाच्या शाह तहमास्पने सुलेमानशी एकनिष्ठ असलेल्या बगदादच्या गव्हर्नरला ठार करुन त्याजागी आपला गव्हर्नर नेमला. बितलिसच्या गव्हर्नरने आपली भूमिका बदलली आणि पर्शियाच्या शाह तहमास्पशी संबंध जोडले. (याच तहमास्प शहाने त्याच्याकडे आश्रयाला आलेल्या बाबरचा मुलगा हुमायुँ याला सैन्याची मदत केली होती.) त्यामुळे सुलेमान द्वितीयने पर्शियावर स्वारी करायचं ठरवलं. सन १५३३ मधे त्याने आपला सेनापती इब्राहिम पाशा याला फौज घेऊन पर्शियावर पाठवलं. इब्राहिम पाशाने पर्शियाचं राजधानीचं शहर ताब्रिज विनासायास मिळवलं. पर्शियाच्या शाहने तुर्की फौजेशी सरळ लढत द्यायचं टाळलं.

पाठोपाठ पुढील वर्षी सुलेमान द्वितीयने बगदादही घेतलं. एवढ्या विजयानंतर शाहला संपवून टाकण्याच्या उद्देशाने जेव्हा सुलेमान सुलतान परत पर्शियावर चालून गेला तेव्हा पर्शियाच्या शाहने त्याला आत आत येऊ दिलं आणि मग तिथल्या हाडं गोठवणाऱ्या थंडीत अडकवलं. तेव्हा मात्र सुलतान सुलेमानने माघार घेतली आणि जॉर्जियातील काही किल्ले, अझरबैजानचा काही मुलूख आणि वॉन प्रांत ह्या मिळवलेल्या प्रांतावर समाधान मानून तो परतला. इ. स.१५५३ सालच्या सुलतान सुलेमान द्वितीयच्या मोहिमेत मात्र कोणत्याच पक्षाचा जय-पराजय न होता, शाह आणि सुलेमानमधे तह झाला. ताब्रिज पर्शियाच्या शाहकडे गेलं, पण बगदाद, मेसोपोटेमियाचा दक्षिण भाग, युफ्रेटिस आणि तैग्रिस नद्यांच्या

मुखाजवळचा प्रदेश आणि पर्शियन आखाताजवळचा काही भाग सुलेमानला मिळाला. शाहनेही तुर्की प्रदेशांवर तो करत असलेले हल्ले थांबवले आणि शांतता प्रस्थापित झाली.

सुलतान सुलेमान द्वितीयच्या अधिपत्याखाली त्यावेळी ४०,००० चौरस मैलांचा प्रदेश होता. रुमालिया, कारमानिया, इल्किद्रिया, कुर्दिस्तान, अझरबैजान, येमेन, जेरुसलेम, इजिप्त, त्रिपोली, ट्युनिशिया, अल्जेरिया एवढे देश होते. सुलतान सुलेमानने या आपल्या प्रचंड देशाचे २१ प्रांत, आणि २९० जिल्हे बनवले होते. प्रत्येक जिल्ह्यावर एक प्रमुख अधिकारी होता, त्याला बे नाव होतं. शिवाय तरूण शिस्तबध्द जानिसारिज फौजही होतीच. एक हजारापेक्षा जास्त तोफा चालवणारे तोपची होते. सर्व फौजेला त्याने जुगार आणि मद्यपानापासून दूर ठेवलं होतं. एवढं बलशाली साम्राज्य सुलेमान द मॅग्निफिसंट समर्थपणे चालवत होता.

द्वितीय सुलेमानची नजर आता भारताकडे वळली. वडिलांकडून तैमूरलंगचा वंशज आणि आईकडून चंगीजखानचा वंशज असलेला मुघल, बाबर सोळाव्या शतकाच्या सुरूवातीला दिल्लीतील इब्राहिम लोदीला संपवण्याच्या कामगिरीवर मदतीला म्हणून भारतात आला होता. पानिपतावर २६ मे १५२६ साली झालेल्या युध्दात लोदीला संपवून दिल्लीमधे त्याने मुघल घराण्याचा पाया घातला. त्याचा नातू अकबर याचेही या ओथमन सुलतानाशी संबंध होतेच.

यावेळी पोर्तुगीजांशी सुलेमानच्या तुर्की फौजा भारतीय किनाऱ्यावर लढत होत्या. तुर्कांचा भारताशी जो व्यापार चाले, त्यात पोर्तुगीजांचा अडथळा होत असे. तुर्की फौजांच्या पोर्तुगीज फौजांशी सतत चकमकी चालत. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेलं पोर्तुगीजांनी बळकावलेलं दीव हे बंदर ओथमन तुर्की फौजांनी गमावलं कारण त्यांना रसद पुरवठा झाला नाही. त्याचप्रमाणे भारतातील मुसलमानांना एकत्र करुन त्यांची मदत घेण्याचं राजकारणही केलं नाही. त्यामुळे सुलेमानच्या फौजेला दीवचा वेढा उठवावा लागला. नाहीतर सुलेमान सुलतानाचा पाय भारतातही रोवला गेला असता. सुमात्रा आणि जावाच्या राजांनीही सुलेमानची पोर्तुगिजांविरूध्द मदत मागितली. सुलतानाने त्यांनाही मदत दिली.

सुलतान सुलेमान द्वितीयचा काळ हा ओथमन साम्राज्याचा सुवर्णकाळ होता. साम्राज्याचा विस्तार तर प्रचंड झाला होताच, पण सुलतान सुलेमानने अनेक कला, वास्तू, शिक्षणसंस्था, यांना प्रोत्साहन दिलं. तो स्वतः एक उत्तम कवी होता. त्याने आपल्या राजधानीच्या सौंदर्यात भर घातली.

सुलेमान द्वितीयला दोन बेगम होत्या. एक अल्बानियाची राजकन्या, माहेदेरन, दुसरी हुर्रम. दोघींना मिळून ८ मुलगे होते, जे कुणीही तख्ताला वारस होऊ शकले असते. माहेदेरनला दोन मुलगे होते. त्यांची नावं महंमद आणि मुस्तफा. आणि हुर्रमला सहा मुलगे होते. त्यांची नावं, महंमद, मिहिरिमा, अब्दुल्ला, सलिम, बायेझिद, जहांगिर. त्यातील काही लहान वयातच मरण पावले होते. याशिवाय सुलतान सुलेमान द्वितीयला बाकी दासीपुत्रही होते.

हुर्रम ही सुलतान सुलेमान द्वितीयची आवडती बेगम होती. सुलेमानकडे येण्यापूर्वी हुर्रम तार्तार लोकांकडून पकडली गेली. ती एका धर्मगुरूची मुलगी होती. रुख्साना या नावानेही ती प्रसिध्द होती. सुलतान

सुलेमानकडे येण्यापूर्वी तार्तारांनी तिला कॉंस्टंटिनोपलच्या गुलाम बाजारात विकलं होतं. तिथून तिची रवानगी सुलेमान द्वितीयच्या जनानखान्यात झाली, पण स्वतःच्या हुशारीवर तिने सुलेमानचं मन इतकं जिंकलं की घराण्याच्या परंपरेविरूध्द जाऊन सुलतान सुलेमानने, ती गुलाम म्हणून राजवाड्यात आली असली तरी, तिच्याशी निकाह लावला आणि तिला पत्नीचा दर्जा दिला. जनानखान्यातील उपस्त्रियांशी लग्न करणारा तो पहिला सुलतान. हुर्रमच्या हुशारीमुळे दरबारात हजर राहण्याची तिला परवानगी सुलतानाने दिली होती. कारभारात निर्णय घेण्याइतकं तिचं वर्चस्व होतं. पण तिचा मुलगा माहेदेरन बेगमच्या सर्वात मोठ्या मुस्तफा या राजपुत्रापेक्षा लहान होता, आणि तो शहजादा विवेकी, हुशार आणि कर्तबगारही होता. त्यामुळे आपल्या मुलाला गादी मिळेल याची तिला खात्री नव्हती. पण हुर्रम महत्वाकांक्षी होती.

या सुलतानांचा जनानखाना हा त्याकाळी एक फार मोठा राजकारणाचा अड्डा असे. जनानखान्यातील बेगम-उपस्त्रिया-दासी-रखेल- कामाच्या मुली अशा एकूण स्त्रियांची संख्या ५०० / ६०० पर्यंत असे. त्यामुळे एकमेकींचा मत्सर-द्वेष यावर आधारित अनेक अफवा, कारस्थानं, या जनानखान्यातून बाहेर पडत. शिवाय जानिसरिज सैनिक या बेगमांच्या दिमतीला असत. त्यातून हुर्रम ही तर राजकारणात मुरलेली.

मोठी बेगम माहेदेरानचा मुलगा मुस्तफा जर सुलतान बनला तर आपले सगळे मुलगे तो यमसदनाला पाठवणार हे ती नक्की जाणून होती. शिवाय गादीचा पुढचा वारस मुस्तफा याला नाहीसं केलं की पुढचा सुलतान तिचा मुलगा होणं शक्य होतं. त्यामुळे तिची कारस्थानं सुलतान सुलेमान द्वितीयचा विश्वासू वजीर इब्राहिम पाशाला मार्गातून हटवण्यापासून सुरू झाली. इब्राहिम पाशा वजीराने अमाप संपत्ती जमवली आहे आणि तो सुलतानाला पदच्युत करणार आहे ही अफवा सुलतानाच्या कानावर जाईल याची तिने व्यवस्था केली. सुलतान सुलेमानने या आरोपांवरून इब्राहिम पाशा वजीराला देहदंड दिला आणि हुर्रमचा जावई रुस्तुम पाशाला वजीर म्हणून नेमलं. तीही चाल हुर्रमचीच होती.

हुर्रमच्या कटकारस्थानांना आता आणखीनच बळ आलं. पर्शियाविरूध्दच्या स्वारीच्या वेळी सुलेमान द्वितीय हजर नव्हता, तेव्हा वजीर रुस्तुम पाशाने, आपलं सैन्य बंडावा करून मुस्तफाला सुलतान करणार असल्याची बातमी सुलेमानपर्यंत पोचवली. हुर्रम आणि मुख्य वजीर रुस्तुम पाशा या दोघांनी मिळून हे कारस्थान रचलं होतं. संतापलेल्या सुलतान सुलेमानने ह्या बातमीचं खंडन करायला शहजादा मुस्तफाला आपल्यासमोर बोलावलं. शहजादा मुस्तफा आपली बाजू स्वच्छ करण्यासाठी सुलतानासमोर पोचला तेव्हा सुलेमानच्या रक्षकांनी त्याला ठार मारलं.

सुलतान सुलेमान द्वितीय पैशाचा फार लोभी होता. त्याला पैशाची किंमत माहीत होती. म्हणूनच त्याने आपली तिजोरी कायम भरलेली ठेवली होती. त्याच्या काळातील काळी बाजू म्हणजे भ्रष्टाचाराने त्याच्या राजवटीत बीज रोवलं होतं. यामुळे कोणतीही नेमणूक करण्यासाठी पैशाचा भरपूर उपयोग लाच म्हणून केला जायला लागला. त्याचा परिणाम म्हणजे नालायक लोकांची नेमणूक मोठ्या पदांवर व्हायला लागली. वजीराने तर प्रचंड माया जमवली. तो रोग खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत जाऊन पोचला. दुसरीकडे

हुर्रममुळे जनानखान्याची राज्यकारभारात ढवळाढवळ होऊ लागली. सुलतानच्या बेगमा, बहिणी, नातेवाईक स्त्रिया, यांच्या मर्जीनुसार निर्णय बदलू लागले. याचा परिणाम राजकारणावर होऊ लागला. साम्राज्याला योग्य होणारे निर्णय घेण्यावर गदा आली. तिथेही भ्रष्टाचाराने प्रवेश केला होताच.

सुलतानचे सलीम आणि बायेझिद हे यानंतर दोनच शहजादे उरले होते. सुलतानपद तर एकालाच मिळणार होतं. दोन्ही हुर्रमचे मुलगे होते. काही काळानंतर या दोघांच्यात लढाई झाली. त्यात सलीम जिंकला. आणि बायेझिद परांगदा होऊन पर्शियाच्या शाहकडे आसऱ्याला गेला. तेव्हा सुलेमान सुलतानाने पर्शियाच्या शाहला सोन्याच्या रुपात खूप मोठी दौलत देऊन त्याच्या आश्रयाला गेल्या बायेझिदला ठार करायची आज्ञा दिली. त्याप्रमाणे पर्शियाच्या शाहने बायेझिद आणि त्याचे ४ मुलगे यांना ठार केलं. सलीमचा एक भाऊ महंमद हा देवीच्या दुखण्यात गेला होता. सावत्र भाऊ मुस्तफाचा अंत झालाच होता. आता बायेझिदही ठार झाला. त्यामुळे गादीचा वारस ठरला ठरला तो शिल्लक राहिलेला सलीम द्वितीय.

सत्तरीत असलेला सुलतान सुलेमान, सततच्या स्वाऱ्या आणि मोहिमांमुळे थकत चालला होता. हंगेरीच्या स्वारीवर असतांना ७२ वर्षाचा हा सुलतान सुलेमान ‘ द मॅग्निफिसेंट ‘ वाटेतच मरण पावला. हंगेरीविरूध्द सुगतवार इथे झालेल्या लढाईत सुलेमानच्या फौजेचा विजय झाला. ही बातमी कळण्यापूर्वीच सुलतान सुलेमान द्वितीय सुगतवारमधे मरण पावला होता. त्याच्या वजीराने सुलतानाच्या निधनाची ही बातमी गुप्त ठेवली. ज्या डॉक्टरने सुलतान मृत झाल्याची घोषणा केली, त्याला लगेच ठार करण्यात आलं. ताबडतोब नवीन सुलतानाला म्हणजे सलीम द्वितीयला बोलावून घेतलं. वजीर आणि सलीम दोघेही बेलग्रेडला पोचले. बेलग्रेडला वजीर आणि सलीमची भेट झाली. शहजादा सलीमच्या येण्यानंतर सुलतान सुलेमान मृत झाल्याची घोषणा करण्यात आली. आणि तिथेच सलीम द्वितीयची सुलतान म्हणून घोषणा करण्यात आली. सलीमने सोकुल्लुला आपला मुख्य वजीर म्हणून नियुक्त केलं. मोहिमेवरून परतल्यावरच त्याच्या निधनाची बातमी जनतेला कळली. सुलतान सुलेमानचा दफनविधी इस्तंबूलमधे झाला. इ. स. १५२० ते १५६६ अशी ४६ वर्षे राजसत्ता भोगून ओथमन साम्राज्याला सुवर्ण कळस चढवून सुलतान सुलेमान मरण पावला. सुलेमान एक न्यायी सुलतान म्हणून नावाजला गेला.

आणि त्याच्यानंतर सत्तेत आला शहजादा सलीम द्वितीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

# तुअरा-तुघरा. निशाणी.



ओथमन घराण्याच्या सम्राटांची तुअरा ही राजमुद्रा होती. पहिला सुलतान ओरहानच्या काळात ही राजमुद्रा तयार कण्यात आली. सुरुवातीच्या सुलतानानांची मुद्रा साधी होती पण “द मॅग्निफिसंट” सुलेमानने तयार केलेली ही आपली राजमुद्रा विशेष सजवलेली होती. या तुअराला अर्थ होता. डावीकडील दोन कंस हे भूमध्य सागर आणि काळा समुद्र या दोन सागरांचं प्रतिक होतं. उजवीकडील तीन उभ्या रेषा टग या स्वातंत्र्य दाखवणाऱ्या होत्या. त्यावरील वक्र रेषा, जुल्फ, या पूर्वेकडून पश्चिमेकडे साम्राज्याच्या वरून जाणारा वायू हे सूचित करत असत. तळाशी उजवीकडे जाणारी रेघ ही तलवारीचं प्रतिक असे, तळाशी सुलतानाचं नाव लिहिलेलं असे. प्रत्येक सुलतानाची निशाणी, राजमुद्रा वेगवेगळ्या प्रकारची असे. सरकारी कागदपत्रांवर यांची निशाणी उठत असे.

\- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ११वा सुलतान. सलिम द्वितीय. जन्म. २८ मे १५२४. मृ. डिसेंबर १५७४.

मद्यपी सलिम अशी त्याची ओथमन वंशाच्या इतिहासात नोंद आहे...

सुलेमान द्वितीय आणि हुर्रम सुलतानाचा हा मुलगा.

उत्कर्षातच अपकर्षाची बीजं दडलेली असतात. इ. स. १२८८ पासून १५६६ पर्यंत ३०० वर्षे एकापेक्षा एक असे प्रत्येक पिढीत, शूर, उत्कृष्ट राजकारणी, साम्राज्याची भरभराट करणाऱ्या समर्थ अशा १० ओथमन सुलतानांच्यामुळे साम्राज्य अत्युच्च कळसाला पोचलं होतं. यावेळी ओथमन साम्राज्य प्रचंड विस्तारलं होतं. उत्तरेला हंगेरी ते पर्शियन गल्फपर्यंत, दक्षिणेला सुदानपर्यंत, बेलग्रेडचा उत्तर प्रदेश, कोसोवो, सोफिया, गॅलिपोलि, पश्चिमेला अल्जिअर्स, ट्युनिस, त्रिपोली, मालटा, मोरिया, दक्षिणेला अलेक्झांड्रिया, कैरो, मक्का-मदिनापर्यंत, सुएझ, जेरुसलेम, युफ्रेटिस-तैग्रिसच्या मुखाजवळचा भाग, पूर्वेला पर्शियन गल्फ, बसरा, अंकारा, कोनया, ऱ्होडस्, असा प्रचंड देश बनला. थोडक्यात उत्तरेला युरोप, पश्चिमेला अल्जरिया, दक्षिणेला आफ्रिका, आग्नेयाला मक्का-मदिना, बसरा, बगदाद, असा भुमध्य समुद्राच्या भोवतालचा प्रदेश, काळा समुद्र, लाल समुद्र, पर्शियन गल्फ ते कॅस्पियन समुद्राच्या पश्चिमेचा भाग एवढा ओथमन साम्राज्याचा विस्तार झाला होता.

या महाकाय साम्राज्याचा तो सुवर्णकाळ होता, आणि अत्युच्च शिखर होतं. एकदा तिथे पोचलं की त्या शिखरावरून पुढे न जाता उतरणीचा मार्ग सुरू होतो. तोच भोग आता ओथमन साम्राज्याच्या नशिबी आला. साम्राज्याच्या घसरणीची ती सुरवात होती आणि ती संपूर्णपणे संपायला इ. स. १९१७ साल, एवढा काळ जावा लागला. त्याला सुरूवात केली ती सलीम द्वितीयने.

सलिम द्वितीय सुलतान बनला ते साल होतं इ. स. १५६६. सुलतान बनल्यावर त्याने सायप्रस जिंकण्यावर मोठी मेहनत घेतली. त्याचं कारण होतं त्याचा मित्र जोसेफ नास्सी. हा ज्यू मित्र सलिम कुथियाचा सुभेदार असतांना त्याच्या संपर्कात आला आणि सुलतानाचा मित्र बनला होता. या नास्सीची कल्पना होती की सायप्रस जिंकायचं आणि सायप्रस वाईन बनवायची त्यासाठी नास्सी, सायप्रस जिंकून घेण्यासाठी सुलतान सलिमच्या मागे लागला. सुलतान सलिम द्वितीयच्या फौजा मग सायप्रस जिंकून आल्या. त्याच्या सेनापतीने अरेबियावरही कब्जा मिळवला. त्यानंतर सलीम द्वितीय मौज मजेत रमला.

तख्तावर येण्यापूर्वीच त्याची आई हुर्रम सुलताना मरण पावली होती. त्यामुळे कारभाराचा सल्ला द्यायला जवळचं विश्वासातलं कुणीही नव्हतं. सुलतान सलीमची थोरली बहीण आता वालिदिची भूमिका करायला लागली. त्यामुळे सलीमवरच सर्व जबाबदारी होती. पण सलीमला राज्यकारभार करण्याची जराही इच्छा नव्हती, ना समज होती. जनानखान्यात वेळ घालवणं, स्त्रियांचा षौक करणं एवढंच त्याला माहीत होतं. त्याबरोबरीने येणारं मद्याच्या अतिरेकाचं व्यसन होतंच. व्हेनिसच्या शहजादीबरोबर याचा निकाह

झाला. तिचं नाव नूरबानो. त्यांना एक मुलगा झाला. तो मुराद तिसरा. इतर उपस्त्रियांपासून त्याला एकूण ७ मुलगे आणि ५ मुली झाल्या.

ओथमन घराण्यात, मुख्य वजीराने देशाचा कारभार स्वत:च्या मर्जीने करण्याचा नवीन पायंडा या सुलतानाच्या नाकर्तेपणाने सुरू झाला. सुलतान सलीम द्वितीयने कारभार हाकललाच नाही. सर्व कामकाज त्याचा मुख्य वजीर महंमद सोकुल्लु आणि सुलतानाची बेगम नूरबानोच पहात होते. सुलतान सलिम तख्तावर बसला त्याचा फायदा जानिसेरिजच्या सैनिकांनी घेतला. त्यांनी पगारवाढीसाठी मोठं बंड केलं. या सैनिकांना शांत करण्यात राज्याचा खजिना खूप कमी झाला. त्यातच लढायांची कटकट नको म्हणून सुलतानाने हंगेरी, क्रोशिया, डाल्मेशिया, मोल्दाव्हिया आणि ट्रान्सिलवानियाशी शांतता करार करून टाकले. सन १५६७ सालामधे सुमात्राची मोहीम आखली गेली. सन १५७१ मधे ओथमन तुर्की साम्राज्याविरुध्द सर्व युरोपियन देश एकत्र आले आणि परत एकदा धर्मयुध्द छेडलं गेलं. त्यात ७ ऑक्टोबर १५७१ या दिवशी लेपेन्टोला, स्पेन आणि व्हेनिसबरोबरच्या लढाईत ओथमन सरकारचं मोठं आरमार नष्ट झालं. सुलतान सलिमचा त्या लढाईत दारूण पराभव झाला. त्याच्या २८० युध्दनौका नष्ट झाल्या. ३० हजार सैनिकांची कत्तल झाली. ३४०० लढवय्ये कैद झाले इतका हा दारूण पराभव होता. या काळात ओथमन साम्राज्याचे दोन मोठे शत्रू होते ते ऑस्ट्रिया आणि पर्शिया. यांच्याशी सततच्या लढाया ओथमन सुलतानांना लढाव्या लागल्या.

इ.स. १५७४ मधे सुलतान सलिम द्वितीय मरण पावला. तापाच्या भरात सुलतान हमामखान्यातील फरशीवर पडला आणि डोक्याच्या जखमेने त्याला मरण ओढवलं. हमामखान्यात काम चालू होतं त्यामुळे त्याला ही जखम झाली. जेव्हा सलीम द्वितीयचा मृत्यू झाला तेव्हा त्याची बेगम नूरबानो महालातच होती. तिने ही बातमी गुप्त ठेवली. तिचा मुलगा शहजादा मुराद तृतीय दूर होता. नूरबानोने त्याला तातडीने बोलावून घेतलं. तोपर्यंत सुलतान सलीमचा मृत देह बर्फात ठेवला आणि त्याच्या मरणाची बातमी गुप्त ठेवली. मुराद राजवाड्यात पोचल्यावरच नूरबानोने सुलतानाच्या निधनाची बातमी सर्वांना कळवली. त्यामुळे नूरबानोचा मुलगा मुराद तृतीय आता सुलतान बनला.

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

# वजीर सोकोल्लु पाशा

कमकुवत, असमर्थ सुलतान सलिमचा कारभार सांभाळण्यासाठी ओथमन साम्राज्याचा प्रत्यक्ष कारभार प्रथमच वजीराच्या हाती आला. सुलतानाच्या हयातीत सर्व कारभार पाहात होता तो त्याचा मुख्य वजीर सोकोल्लु महंमद पाशा. कमकुवत, असमर्थ राजाकडून साम्राज्य वजीराच्या हाती येणं हीच उतरणीला लागलेल्या साम्राज्याची पहिली पायरी होती. कोणत्याही राजवटीचा उतार असाच होतो. भारतातील हजार वर्षांपासून बदलत गेलेला राजप्रवाहही हेच सांगतो.

मुख्य वजीर सोकोल्लु महंमद पाशा. बोस्नियाच्या ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेला हा मुलगा, सुलतानाच्या जानिस्सारी सुरक्षा फौजेसाठी वयाच्या ११ व्या वर्षी निवडला गेला आणि मग शिक्षण संपल्यावर फौजेत भरती झाला. फौजेत असतांना त्याची कामगिरी सुलतान सुलेमानच्या नजरेत भरायला लागली आणि सोकोल्लु आपल्या हुशारीने एकेक पद वर चढत गेला. पर्शियाच्या सफदवी सत्तेचा, बायेझिदला आश्रय देणाऱ्या पर्शियाच्या शाहविरुध्दच्या मोहिमेचा लढा आणि राजकारण पाहात या लढायांच्या अनुभवाने तो संपन्न होत गेला. सुरुवातीला एक सामान्य सैनिक, नंतर नौदलाचा अधिकारी, मग रुमालियाचा गव्हर्नर जनरल, आणि शेवटी वजीरपदाच्या ३ पायऱ्या पार करत मुख्य वजीर अशी एकेक पायरी चढत १४ वर्षांच्या नंतर तो मुख्य वजीर म्हणून कारभार पाहायला लागला.

त्याच्या आधीचा रुस्तुम पाशा हा बेगम खुर्रमचा जावई वजीर मरण पावल्यावर इ. स. १५६१ साली महंमद सोकोल्लु वजीराच्या पदाची आणखी एक पायरी वर चढला. इ. स. १५६६ मधे सुलतान सुलेमाननेच सोकोल्लुलाच मुख्य वजीर म्हणून निवडलं. शहजादा सलिमच्या मुलीबरोबर महंमद सोकोल्लुचा निकाह झाला. त्यामुळे घरातला जावईच राज्याची सूत्रं चालवायला लागला. सुलतान सलिमने शेजारी देशांशी शांतता करार करून टाकल्यामुळे वजीरही आपली काही स्वप्नं पूर्ण करण्याला अवसर मिळला. महंमद सोकोल्लुने १५७१ मधे सायप्रसवर विजय मिळवला.  कारभारावर नियंत्रण मिळवलं.

आपल्या कारकीर्दीत त्याने अनेक सुंदर पूल बांधले. त्याचं मोठं स्वप्न म्हणजे रशियातील डॉन आणि वोल्गा नद्या कालव्याने एकत्र जोडून रशियावर हल्ला करायचा. त्यासाठी त्याने आपली २५,००० फौज आणि तार्तार लोकांची ३०,००० फौज मदतीला घेऊन व्होल्गा नदीच्या मुखाजवळच्या अस्त्राकानला पाठवली. पण रशियाला हे कळल्याबरोबर त्याने आपलं सैन्य तिथे पाठवलं. दोन्ही फौजांमधे मोठी लढाई झाली. त्यात तुर्कांचा आणि तार्तारांचा पूर्ण पराभव झाला. तुर्कांचे फक्त ७००० सैनिक परत आले एवढी मोठी जीवीतहानी सुलतान सलिमला सोसावी लागली. आणि हा बेत सोकोल्लुला सोडून द्यावा लागला. त्याचं दुसरं मोठं स्वप्न होतं ते काळा समुद्र आणि हिंदी महासागराला जोडणारा सुएझ कालवा निर्माण करण्याचं. यामुळे व्यापार आणि फौजेची मोठी सोय होणार होती. त्याने तो प्रयत्नही केला पण हुशार इंजिनिअर्स न

मिळाल्याने त्याचा हा प्रयत्न फसला. दुसरं कारण होतं ते हे की हा सुवेझ कालवा झाला तर आपल्या राज्याला धोका आहे याची भीती क्रिमियाच्या राजाला वाटली म्हणून त्यानेही त्यात अडचणी आणल्या.

पण इ. स. १५७४ मधे सुलतान सलीमचा मद्याच्या अतिरेकाने मृत्यू झाला. आणि सोकुल्लुचा कारभाराचा व्याप वाढला.

रशियाबरोबर झालेली लढाई दोघांच्यात तह होऊन संपली. नंतर व्हेनिसच्या स्वारीत व्हेनिसबरोबरही तह झाला. इंग्लंड-स्पेन-स्वित्झर्लंड-फ्लोरेन्स, यांच्याशी झालेल्या करारातही सोकोल्लुचीच सही होती. पण पर्शियाविरूध्दच्या मोहिमेच्या वेळी सोकोल्लु आणि सुलतानाचे संबंध बिघडले. सुलतान सलीमने त्याचे विश्वासू आणि मोठ्या पदावरचे अधिकारी एकेक करून बाजूला सारायला सुरुवात केली. सोकोल्लुने आपल्या कारकीर्दीत अलोट संपत्ती कमावली. ती भ्रष्टाचाराच्या मार्गानेच आली होती. सुलतान सलिमचा अंत झाल्यावर त्याच्या मुलाला, मुराद तृतीयला सुलतान बनवण्यात सोकोल्लुचाच हात होता. बेगम नूरबानोच्या मदतीला जाऊन सोकुल्लुने कारभार आपल्याच हाती ठेवला होता. पण आता वासे फिरले होते. हळूहळू त्याच्याविरूध्द जनानखान्यातूनच विरोधाचे वारे वाहू लागले होते.

शेवटी १५७९ सालच्या ११ ऑक्टोबरला सोकोल्लुचा खून करण्यात आला. जनानखान्यातलं राजकारण, या स्त्रियांची कारभारातील ढवळाढवळ हे त्याच्या खुनामागचं मुख्य कारण होतं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १२ वा सुलतान मुराद तृतीय. जन्म ४ जुलै. १५४६. मृ. १६ जानेवारी १५९५.

सलिम द्वितीय आणि नूरबानोचा हा ज्येष्ठ पुत्र मनिसा मधे जन्मला.

आजवरच्या ओथमन घराण्याच्या प्रथेप्रमाणे तरूण मुराद तृतीयला सुलतान सलिमने आपल्या मुलाला कारभाराची ओळख व्हावी म्हणून सुभेदार म्हणून कुठेही कामाला पाठवलं नाही. उलट त्याला मनिसा मधेच ठेवलं. आपल्या बापाप्रमाणेच हा कधीही मोहिमेवर लढाईला गेला नाही. शुक्रवारी नमाज अदा करायला शाही मशिदीतही गेला नाही. उलट आपल्याविरूध्द खूनाचा कट होतोय हे कळल्यावर त्याने बाहेर पडणंही बंद केलं. सुलतान बनल्याबरोबर त्याने पहिलं कृत्य केलं ते म्हणजे आपल्या सर्व ५ भावांना ठार करून टाकलं.

त्याचा दिनक्रम असा होता, सकाळी नमाज पढायचा, बागेत फिरायचं, थोडं वाचन करायचं, दिवाणखान्यात अधिकाऱ्यांना भेटायचं, परत नमाज, मग झोप, हाच कार्यक्रम सकाळी आणि संध्याकाळी चालत असे. सतत मदिरापान आणि सतत स्त्रिया एवढंच कार्य त्याने केलं. जनानखान्यात त्याच्या कलावंतीण स्त्रियांपासून त्याला १०३ मुलं झाली. साम्राज्याचा कारभार आई नूरबानो आणि मुरादची सफिया बेगम पाहात होत्या. त्यामुळे राज्यकारभारात निर्णयाचे घोटाळे माजू लागले. आपल्या मुलावरचा त्याच्या बेगमचा प्रभाव कमी करण्यासाठी राजमाता नूरबानोने मुरादला आणखी २ सुंदर सुना महालात पाठवल्या.

सुलतान मुरादच्या काळात राज्याची कारभाराची घडी इतकी बिघडली की आता जनानखान्यातून महत्वाचे निर्णय घेतले जाऊ लागले. त्यात महत्वाचा हस्तक्षेप होता तो राजमाता नूरबानो, मुरादची बहीण इस्मिहान, बेगम सफिया आणि वजीरची पत्नी आणि मुरादच्या आवडत्या दोन कलांवंतीणी.

सुलतान मुरादला एकून १०३ मुलं झाली. त्यातील २२ मुलगे ओरस होते. त्यातील ९९ मुलांना पुढच्या सुलतानाने ठार केलं. २८ मुली, त्यातील २६ मुली प्लेगने वारल्या.

याच्या काळात ओथमन साम्राज्याच्या पूर्व पश्चिमेकडील सर्वच देशांमधून विरोधाला सुरूवात झाली होती. पर्शियामधे तहमास्प शहाच्या मृत्यूनंतर कारभार विस्कळीत झालेला पाहून सुलतान मुराद तृतीयने पर्शियाशी आजवर झालेला सामंजस्य करार मोडला आणि पर्शियावर हल्ला केला. पण यात त्याला विजय न मिळाल्यामुळे शेवटी तह करून लढाई थांबवण्यात आली. सुलतान मुराद तृतीयने अमेरिकेत वसाहत करण्याचाही प्रयत्न केला पण तो निष्फळ ठरला. त्यानंतरची कटकट जानिसरिजकडून झाली. त्या सैनिकांनी दरबारात प्रवेश करून जबाबदार मंत्र्यांचा शिरछछेद करण्याची मागणी केली. इजिप्तनेही या असमर्थ सुलतानाचा फायदा घेत बंडाळी केली.

या काळात सततच्या लढाया, नवीन नवीन युध्दसाहित्यांची खरेदी यामुळे आर्थिक व्यवस्था ढासळली. हा सगळा व्यवहार चांदीत होई. पण चांदी चलनात जास्त आल्यावर चलनाचं प्रमाण बिघडलं आणि त्याचा परिणाम पगारांवर झाला. सैनिकांना आणि जानिसरिज फौजेला दिले जाणारे पगार कमी झाले. त्यामुळे त्यांच्यात असंतोष माजला. त्यातच दरबारात, सरकारी नेमणूकांमधे प्रचंड भ्रष्टाचार माजला. सरकारी कार्यालयातील सर्व नेमणुका आर्थिक देवाणघेवाणीवरून ठरायला लागल्या. असमर्थ आणि अपात्र लोकांच्या नेमणुकीमुळे देशाचं सामर्थ्य

कमकुवत व्हायला लागलं. स्वत: सुलतान कोणत्याही गव्हर्नरपदाच्या नेमणूकीसाठी २०,००० ड्यूकाट (चलन) घेत असे. या काळात इंग्लंडला मात्र सुलतान मुराद तृतीयशी मैत्री हवी होती, कारण दोघांचा शत्रू स्पेन हा एकच होता.

सुलतान मुराद तृतीयला इ. स. १५९६ मधे थोडा ताप आला. त्यावेळी इजिप्तशी लढण्याचे त्याचे विचार चालू होते. इजिप्तच्या गलबताने सुलतानाच्या सन्मानासाठी जो तोफेचा गोळा उडवला तो नेमका जिथे सुलतान झोपला होता त्या खिडकीवर आदळला. अंधश्रध्देने घर केलेल्या सुलतानाला हे अवलक्षण वाटलं आणि तो दुसरे दिवशी मरण पावला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

सुलेमान ' द मॅग्निफिसेंट ' नंतर साम्राज्याला उतरती कळा लागली त्याला देशांतर्गत कारणं होती तशी जागतिक कारणंही होती. त्यातलं महत्वाचं कारण म्हणजे समर्थ, शूर सुलतान साम्राज्याला मिळाला नाही.

या वेळेपर्यंत मोठ्या साम्राज्याचे सर्व दोषही कारभारात आले होते. दूरवर पसरलेल्या प्रदेशाचे दोर सांभाळणं कठीण होत होतं. या साम्राज्यात काही सत्ता मांडलिक होत्या तर हंगेरीसारख्या काही सत्ता नियमितपणे खंडणी देणाऱ्या होत्या. काही देशप्रमुख, सुलतानाला मदत लागेल तेव्हा आपल्या फौजेची मदत देण्याच्या करारांनी बांधले गेले होते. तर क्रिमिया, वालाकियासारख्या काही ठिकाणी सुलतानाचेच अधिकारी कारभार पाहात होते. या विविध तऱ्हेच्या सत्ताप्रकारांमुळे सुलतानाचा अंकुश या देशांवर नव्हताच. त्यामुळे एवढा मोठा साम्राज्याचा डोलारा सांभाळायला जे खंबीर पराक्रमी आणि साहसी नेतृत्व लागतं, ते ओथमन साम्राज्यात आता शिल्लक नव्हतं. सुलेमान द मॅग्निफिसंट नंतर आलेले वारस एकापेक्षा एक व्यसनी आणि कारभार हाकायला दुबळे ठरत गेले आणि साम्राज्य घसरणीला लागलं.

समर्थपणे राज्यकारभार चालवायला जसा राजा समर्थ पाहिजे, तशी फौजही शूरांची पाहिजे. पण त्यातही कमकुवतपणा आला होता. युरोपियन, ग्रीक, अरब, ख्रिश्चन, तुर्की, ज्यू, पर्शियन देशांमधले सैनिक, मिळून लष्कर तयार झालं होतं. ज्यांना बळजबरीने इस्लाम धर्माची दीक्षा दिली गेली होती, ते मनाने त्यांच्या मूळ धर्मालाच मानत होते आणि मूळ देशाला पूजत होते. त्यांच्या श्रध्दा त्यांच्या मूळ धर्माशीच होत्या. त्यामुळे नवीन मोहिमेच्या वेळी मनापासून शौर्य पराक्रम दाखवत नव्हते. भ्रष्टाचाराने तर कारभार नासलाच होता. ती कीड सर्व अधिकाऱ्यांमधे पसरली होती. त्यामुळे लायक व्यक्तीची योग्य जागी नेमणूक होणं थांबलं होतं. आणखी एक महत्वाचं कारण म्हणजे जनानखान्यातील स्त्रियांचा कारभारातील हस्तक्षेप. त्यामुळे कारभारासंबंधी घेतलेले निर्णय सतत बदलत जात. वजीरांची, अधिकाऱ्यांची नेमणूक यातही भ्रष्टाचाराने शिरकाव केला. या सर्व संस्कृतींची भेसळ होऊन एक नवीनच टर्कीश समाज निर्माण झाला. या सर्व संस्कृतींच्या भाषा सरमिसळ होऊन भाषाही नवीन तयार झाली. यातही तुर्की समाज शिक्षणात, संस्कारात, संस्कृतीत खूप मागे होते. त्याउलट ख्रिश्चन आणि पर्शियन समाज विज्ञान आणि विचारांमधे खूप पुढे होते. यातूनच ज्यू आणि अरबांमुळे धार्मिक कल्पनांमधे गूढवादाचे धुमारे फुटले. राजघराण्यातील स्त्रियाही वेगवेगळ्या देशांमधून आलेल्या असल्याने आणि कारभारावर त्यांचाच प्रभाव वाढल्याने देशांशी असलेल्या संबंधावरही त्याचा परिणाम होऊ लागला.

जानिसेरिज फौजही आक्रमक झाली. त्यांच्यावर विवाह न करण्याचं जे बंधन होतं ते त्यांनी झुगारून टाकलं. त्यांच्या कौटुंबिक भरीमुळे समाजस्वस्थ्य आणखीनच बिघडलं. सर्व सुलतान आपल्या वजिरांवर अवलंबून राहू लागल्यामुळे वजीर आणि सुलतानांच्या राजमाता, बेगम यांची ताकद वाढली. जनानखान्यातील प्रत्येक महत्वाच्या स्त्रीकडून दरबारातील कामकाजात होणाऱ्या ढवळाढवळीमुळे वजीरांचं आसनही डळमळीत

झालं. तेही वरचेवर बदलले जाऊ लागले. फौजा बंड करून आपल्याला हवं ते मागायला लागल्या आणि न मिळाल्यास बंड, खून, दंगेधोपे करायला लागल्या.

इ. स. १५७४ मधे सुलतान सलीम द्वितीय मरण पावल्यावर नंतर जेवढे पुढील सुलतान गादीवर आले ते सर्व अल्पजीवी ठरले. ते होते -

मुराद तृतीय - इ. स. १५७४ ते १५९५.

महंमद तृतीय - इ. स. १५९५ ते १६०३.

अहंमद प्रथम - १६०३ ते १६१७.

मुस्तफा - १६१७ ते १६१८

उस्मान दुसरा - इ. स. १६१८ ते १६२२.हा अष्मतचा शहजादा.

मुस्तफा दुसऱ्यांदा सुलतान झाला - एकच वर्ष सत्तेत राहिला.

मुराद चतुर्थ - इ. स. १६२३ ते १६४०.

इब्राहिम – इ. स.१६४० ते १६४८

महंमद – इ. स. १६४८ ते १६८७

सुलेमान द्वितीय – इ. स. १६८७ ते १६९१

अहंमद – इ. स. १६९१ ते १६९५.

थोडक्यात, सुलेमान द मॅग्निफिसंनटच्यानंतर ना कुणी समर्थ सुलतान सत्तेत आला, ना कुणी समर्थ मुख्य वजीर राज्यकारभाराला मिळाला. सतत जनानखान्यातील स्त्रियांचीच सत्ता चालली. भ्रष्टाचार मोकाट सुटला. सर्व नेमणुका ह्यावरच आधारलेला कारभार खिळखिळा झाला. यासर्वांचा परिणाम साम्राज्य घसरणीला लागण्यावर झाला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १३ वा सुलतान महंमद तृतीय. जन्म. २६ मे १५६६. मृ. २२ डिसेंबर १६०३.

सुलतान मुराद तृतीय आणि सफिया सुलतनाचा हा मुलगा.

मुराद तृतीयच्या मृत्यूची बातमी, त्याचा मुलगा महंमद येईपर्यंत गुप्त राखली गेली. वजीर महंमद सोकोल्लुच तेव्हा मुख्य वजीर होता. महंमद राजधानीत आल्यावर सुलतान पदावर त्याला बसवलं. सफिया खातूनचा हा मुलगा तख्तनशीन झाला आणि त्याने पहिलं काम केलं ते आपल्या सर्व १९ भावांना यमसदनास पाठवण्याचं. तो एवढ्यावरच थांबला नाही. त्याने आपल्या बापाच्या ज्या गर्भवती स्त्रिया होत्या त्यांनाही ठार केलं. पाठोपाठ आपला सर्व कारभार आपल्या आईच्या, राजमाता सफियाच्या हाती सोपवून तो मोकळा झाला. त्याच्या दोन वजीरांमधील भांडण हा सुलतानाचा आणखी एक कटकटीचा भाग होता. वालाकिया आणि हंगेरीकडून पराभवाच्या बातम्या आल्यावर तो घाबरला आणि त्याने आपल्या सर्व नागरिकांना ईश्वराची कृपा व्हावी म्हणून प्रार्थना करण्याचा हुकूम सोडला. पाठोपाठ तीन दिवसांचा उपवासही करायला लावला.

त्याच्या आयुष्यात घडलेल्या दोनच मोठ्या ठळक घटना म्हणजे हाब्सबर्गची लढाई. सुलेमान सुलतानानंतर युध्दभूमीवर हजर राहणारा हा पहिला सुलतान होता. हाब्सबर्ग फौज चालून येते आहे हे कळल्यावर सुलतान फौजेसकट निघाला खरा पण वाटेतच त्याने मागे फिरायचा निर्णय घेतला. पण सेनापतीने तसं करु दिलं नाही तेव्हा लढाईत हजर राहिला. त्या लढाईत विजय मिळाल्यावर त्याला इतका आनंद झाला की पुढच्या मोहिमेत हजर राहण्याचं त्याने ठरवून टाकलं. पण पुढच्या मोहिमेच्या वेळी अति मद्यपान आणि अति आहार यामुळे त्याचं शरीर स्वास्थ्य बिघडलं होतं. म्हणून डॉक्टरांनी त्याला मोहिमेवर जाऊ दिलं नाही. दुसरी घटना म्हणजे त्याचाच एक सरकारी अधिकारी उर्फा शहर जिंकून सुलतान म्हणवून घेऊ लागला. त्याचा शेवट सुलतान महंमद तृतीयने केला.

याच्या काळात हंगेरी, ऑस्ट्रिया, पर्शिया सर्वांनीच ओथमन साम्राज्यावर हल्ले सुरू केले. त्यातच अचानक महंमद तृतीय मरण पावला. तो कसा मरण पावला याबद्दल अनेक प्रवाद आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १४ वा सुलतान अहंमद प्रथम. जन्म १८ एप्रिल. १५९० मृ. २२ नोव्हेंबर १६१७.

महंमद तृतीय आणि हनदान खातूनचा हा मुलगा.

अहंमदच्या हाती सत्ता आली तेव्हा तो अवघा १३ वर्षांचा होता. त्याची आजी सफिया जिवंत होती. आपल्या बापाने घराण्यातील सर्व मुलांचा केलेला संहार पाहून विषण्ण झालेल्या अहंमदने आजवरची सर्व पुरुषांना ठार करून गादीवर बसण्याची परंपरा मोडली. आपल्या भावाला, मुस्तफाला जुन्या राजवाड्यात राहायला पाठवून दिलं. त्याला पिंजरा म्हणजेच काफे (चेख तुर्की शब्द) म्हणत. तुर्की राजघराण्यात घडलेली ही पहिली घटना. हा तुरूंगासारखा राजवाडा होता. जनानखान्याला लागून याची जागा होती. पहारेकऱ्यांचा २४ तास पहारा चालत असे. कुणालाही आत जाऊन नजरकैदेत असलेल्या शहजादाशी बोलता येत नसे. त्याच्या गरजा भागवण्यासाठी जेवणखाण आणि एक वांझ रखेल त्याला पुरवली जाई. त्याच्यापासून मूल होऊ नये एवढाच त्यामागे हेतू असे. कुणाशीही संबंध न आल्याने या शहजाद्याला बाहेरच्या जगाचं काहीही भान नव्हतं, की ज्ञान मिळत नसे.

या सुलतानाने युध्द थांबवण्यासाठी ऑस्ट्रिया, हंगेरीशी शांतता करार केले.

आधीचा सुलतान महंमदच्या हयातीत पर्शियाशी युध्द सुरू झालं होतं. सुलतान अहमंदने आपला सेनापती युसुफ सिनान पाशाच्या हाताखाली सन १५ जून १६०४ मधे सेना पाठवली. पण नोव्हेंबरमधे पर्शियात हिंवाळा सुरू झाला होता. त्यामुळे सेनापती पाशाने इर्झुरमच्या जवळ तळ ठोकण्याचं ठरवलं. पण त्यामुळे सेना बिथरली. हिंवाळा संपताच पाशा जेव्हा कूच करून पर्शियाची राजधानी जिंकायला निघाला तेव्हा साफाविद फौजेने त्याला पकडलं. सेनापती पाशाने मग आत्महत्या केली. ओथमन सेनेच्या युरोपियन देशांशी लढाया चालूच होत्या. सेनापती आणि वजीर कारभार सांभाळत होते.

सुलतान अहंमदने डच देशाशी प्रथमच व्यापार करार केला. इंग्लंड, फ्रान्स, रागुसा, जेनोआबरोबर व्यापार चालू ठेवला. या सुलतानाने निळ्या रंगाची सुंदर मशिद उभारली.

सुलतान अहंमद प्रथम १६१७ मधे टॉयफाइडने मृत्यू पावला. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमात काहीही भर न टाकता तो मरण पावला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १५ वा सुलतान मुस्तफा. जन्म १५९१. मृ.२० जानेवारी १६३३.

सुलतान अहंमद प्रथम आणि कौशिम सुलतानाचा हा मुलगा.

सुलतान अहंमदच्या मृत्यूनंतर त्यानंतर दरबारात गोंधळ माजला तो सुलतान कुणी व्हायचं या प्रश्नावरून. सुलतान अहंमदने जिवंत ठेवलेला आपला भाऊ मुस्तफा आणि अहंमदच्या कलावंतीणीचा लहान मुलगा उस्मान, हे दोघेही गादीला वारस होते. या मुस्तफाला अहंमद सुलतानची बेगम कोशिम सुलतानाने सांभाळलं होतं. आणखी इतरही मुलगे वारस म्हणून आपला हक्क मागू लागले. पण इसाद इफेन्डी आणि सोफु अहंमद पाशाने मुस्तफाला सुलतान बनवायचं ठरवलं. त्यामुळे मुस्तफाच सुलतान बनला. मुस्तफाचं आजवरचं आयुष्य दूर एकांतवासात गेलं होतं. मानसिक दृष्टीनेही तो कमकुवत होता. तरीही त्यालाच तख्तावर बसवायचं हा निर्णय वजीरानेच घेतला. २२ नोव्हेंबर १६१७ ते २६ फेब्रुवारी १६१८ पर्यंत त्याची पहिली राजवट झाली. आजवरचा, वारसाने सुलतान बनायचं हा पायंडा यावेळी मोडला गेला आणि भाऊ गादीवर आला. मुस्तफाची मानसिक अवस्था वाईट असल्याने त्याची आईच कारभार पाहायला लागली. पण मुस्तफाचे वेडे चाळे पाहून वर्षभरातच त्याला परत सुलतानपदावरून हटवण्यात आलं आणि ओथमन हा मृत अहंमदचा १४ वर्षांचा लहान मुलगा तख्तावर बसवण्यात आला.

ओथमन घराण्याच्या इतिहासात सुलतान मेल्यावर त्याच्या मुलांनी सुलतान व्हायचं अशी परंपरा होती. पण अहंमदने ती मोडली. त्यामुळे मुस्तफाच्या वेड्या चाळयांना आवरण्यासाठी त्याला पदच्युत करून परत दुसरा मुलगा ओथमन द्वितीय याला तख्तावर बसवलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १६ वा सुलतान ओथमन द्वितीय. जन्म. ३ नोव्हेंबर १६०४. मृ.२० मे १६२२.

सुलतान अहंमद प्रथम आणि महाफिरुझ खातून यांचा हा मुलगा.

हा ओथमन द्वितीय हा सुलतानपदी बसवला गेला. एकूण १८ वर्षाचं आयुष्य त्याला मिळालं. तो उत्तम कवी होता. अनेक भाषांमधे पारंगत होता. हुशार होता आणि काही करून दाखवायची त्याच्यात धमक होती. पण विषारी झालेल्या राजकीय वातावरणात तो जगू शकला नाही. जनानखान्यातील स्त्रियांचा वाढता हस्तक्षेप आणि जानिसरिजचा वाढलेला प्रभाव यात तो गुदमरला. त्याने जानिसरिज फौजांच्या भेटायच्या जागा बंद करून टाकल्या. त्यामुळे ते सैनिक नाराज झाले. ओथमनला सत्ता हातात घेतल्याबरोबर लगेच पोलंडच्या स्वारीवर निघावं लागलं. या लढाईत ओथमन फौजेला सपाटून मार खावा लागला. खूप सैनिक ठार झाले. त्यामुळे स्वत: स्वारीत हजर असलेल्या ओथमनने आपली नाराजी बोलून दाखवली. जानिसरीज फौज आणि ओथमनमधे कडाडून भांडण झालं.

राजधानीत परत आल्यावर जानिसरिज फौजेने बंड केलं आणि आम्हाला मुस्तफाच हवा अशा घोषणा केल्या तेव्हा मुस्तफाच्या आईच्या हुकूमाने ओथमनचा गळा आवळून खून करण्यात आला आणि वेड्या मुस्तफाला शोधून आणून परत सुलतान बनवण्यात आलं. पण नंतर वर्षभरातच त्यालाही पदच्युत करुन तुरुंगात अडकवलं गेलं.

राजघराण्यातील सुलतानाचा घरातच वध करण्याची ओथमन साम्राज्याच्या इतिहासातील ही पहिली काळी घटना. साम्राज्यात बंडाळी, खून, भ्रष्टाराची, अस्थिरतेची काजळी लागली. साम्राज्य उतरणीला लागलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १७ वा सुलतान मुराद चतुर्थ. जन्म. २७ जुलै १६१२. मृ. ८ फेब्रुअरी १६४०. मुरादला चतुर्थला ओथमन निरो म्हणून संबोधलं जातं.

अहंमद प्रथम आणि खुशुन सुलतानचा हा मुलगा.

इ. स. १६३२ मधे, ३० वर्षांच्यानंतर, सल्तनत सांभाळली ती सुलतान मुराद चतुर्थने. ३० वर्षांच्यानंतर गादीवर आलेल्या या मुराद चतुर्थने आजवर होऊन गेलेल्या आपल्या आजोबा-पणजोबांपेक्षा जरा वेगळं कर्तृत्व दाखवलं. तोपर्यंत मधल्या काळात झालेले सगळे सुलतान नामधारीच होते. देशात अनाचार माजला होता. जानिसरीजला खूष करण्यासाठी खजिना रिता झाला होता. तरीही फौज बंड करून उठली होती आणि त्यांनी मुख्य वजीराला ठार केलं होतं. पर्शियाने बगदाद जिंकून घेतलं होतं.

हा सुलतान १२व्या वर्षी गादीवर आला पण तेव्हा त्याची आई खुशनु सुलतानाच कारभार पाहात होती. विसाव्या वर्षी त्याने राज्य आपल्या हातात घेतलं. त्याच्या साथीला होता त्याच्या बहिणीचा नवरा, कारा मुस्तफा खान. कारा मुस्तफा खान काही वर्षे इजिप्तचा सुभेदारही होता. मुराद चतुर्थ शूरही होता, राजकारण आणि लढाया जाणत होता. आपल्या साम्राज्याचा ढासळणारा डोलारा सावरण्याचा त्याने आपल्या हयातीत थोडासा प्रयत्न केला. देशातला भ्रष्टाचार निपटून काढायला देहांताची सजा द्यायला सुरूवात केली. तंबाखू, कॉफी आणि मद्य जो कुणी सेवन करेल त्याचा सरळ जीव घेतला जाई. त्यामुळे जनतेत घबराट पसरली. सुलतान मुराद चतुर्थ स्वतः वेषांतर करून रात्री अपरात्री अशा लोकांना शोधायला बाहेर पडत असे आणि त्यांना ठार करत असे. पण स्वतःही तो मनस्वी मदिरापान करत असे. त्याने कायद्यांची कडक अंमलबजावणी सुरू केली ती इतकी की त्याच्या मुख्य वजीराने स्वत:च्या सासूला मारलं म्हणून मुरादने वजीराला ठार करून टाकलं. मुराद त्याच्या राजप्रासादाच्या बाहेरच्या तलावाच्या बाहेर झोपडीत बसायचा आणि समोरून जो नाविक जाईल त्याला धनुष्य बाण चालवून ठार करायचा.

सुलतान बनल्यावर कॉंस्टंटिनोपल आणि आपल्या इतर प्रांतावर वचक ठेवण्याचा मुरादने निर्धार केला. फौजही फार हाताबाहेर गेली होती. मुराद त्यांनाही काबूत आणण्याच्या प्रयत्नात होता. पण या शिपायांनी सन १६३२ मधे सरळ राजवाड्यावरच हल्ला चढवला आणि सुलतानाचे मुख्य वजीर आणि १६ इतर अधिकाऱ्यांची डोकी उडवायची मागणी केली. अत्यंत कठोरपणे सुलतान मुराद चतुर्थने हे शिपायांचं बंड मोडून काढलं.

मुरादच्या आयुष्यातील पर्शियाविरूध्द झालेली लढाई गाजली. पर्शियाची राजधानी ताब्रिज, हमादान, बगदाद, यावर मोठे विजय मिळाले. बगदादचा वेढा ४० दिवस चालला आणि नंतर बगदाद हाती आलं. बगदादवर असतांना भारतातून मुघल बादशहा शहाजहानचा वकील त्याला भेटायला आला होता. उत्तमोत्तम वस्तूंचा नजराणा त्यांनी मुरादला दिला. मुरादने आपल्या लोकांना बसरापर्यंत वकिलांना साथ करायला सांगितली.

इ. स. १६४० पर्यंत याने ८ वर्षे राज्य केलं. मृत्यूसमयी जलोदर दुखण्याने आजारी होता. त्याचा मृत्यू जवळ आलाय हे जेव्हा त्याला कळलं तेव्हा त्याने राजमातेला आपला धाकटा भाऊ इब्राहिमला ठार

करण्याचा हुकूम सोडला. राजमातेला ते मान्य नव्हतं. पण सुलतानाचा हुकूम मोडणं कठीण होतं. म्हणून तिने इब्राहिमला ठार केल्याचा खोटाच निरोप पाठवला. ती बातमी ऐकल्यानंतर मुराद चतुर्थ भेसूर हसला आणि लगेच मरण पावला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १८वा सुलतान इब्राहिम जन्म. ५ नोव्हेंबर १६१५ मृ. १८ ऑगस्ट१६४८.

सुलतान अहंमद प्रथम आणि कोसुम सुलतानाचा हा मुलगा.

मुराद चतुर्थने आपल्या वेडसर भावाला ठार करण्याचा जरी हुकूम देऊन प्राण सोडला तरी खुशुम सुलतानाने, राजमातेने, इब्राहिमला वाचवलं, आणि सन १६४४ मधे सुलतान बनलेल्या या इब्राहिमने ८ वर्षे कारभार चालवला. याचं आयुष्य काफमधे गेलं होतं. काफ म्हणजे तुरुंगवास. याला कोणत्याही माणसाला भेटू दिलं जात नसे. नजरकैदच असे ती!

याला तख्तावर बसवायला अधिकारी आणायला गेले तर हा घाबरून जनानखान्यात लपून बसला होता. त्याला बळजबरीने दरबारात आणावं लागलं. पण अजूनही मुराद जिवंत आहे आणि आपल्याला तो अचानक येऊन ठार करेल अशी भीती त्याला सतावत असे. त्यामुळे तो सुलतान बनायला तयारच नव्हता पण कारा मुस्तफा पाशा आणि आईने सारा प्रासाद हिंडून तो इथे नाही आहे हे सांगितल्यावर तो सुलतान बनला.

गादीला वारस तो एकुलता एक होता. त्यामुळे कसाही असला तरी सुलतान तोच होणार होता. तो वेडसर मनाचा होता. पण मुख्य वजीर कारा मुस्तफाखान याच्या समर्थ कारभाराच्या मदतीने हा सत्ता सांभाळत राहिला. रात्री अपरात्री वेषांतर करून सुलतान शहरात फेरफटका मारून नागरिकांच्या मनाचा अंदाज घेई आणि वजीराला सुधारणा सुचवत असे. पण अधून मधून येणाऱ्या वेडाच्या झटक्यांनी तो सतत आजारी असे. राजमातेच्या दृष्टीने गादीला वारस हवा ही मोठी काळजी होती. त्यासाठी ती दक्ष होती. तिने जनानखान्यात अनेक मुली त्याच्या दिमतीला दिल्या त्यामुळे शेवटी इब्राहिमला तीन मुलगे झाले. ते म्हणजे महंमद चतुर्थ, सुलेमान द्वितीय आणि अहंमद द्वितीय. या काळात खुशुम सुलतानाच कारभार पाहात होती. पण इब्राहिम मात्र जनानखान्यातील आठ रखेल्यांच्या मर्जीप्रमाणे आपली मतं बनवायला लागला होता. त्यांच्यावर दौलत उधळत होता. त्याची रखेल साकरपारा खातून आणि त्याचा अंगरक्षक जो खोजा होता, यांनी त्याला भरपूर लुटलं. त्याने सुलतानाची सेवा करतांना अनेक देणग्या उकळल्या आणि त्याने गब्बर माया जमवली. आपल्या मित्रांना मोठ्या अधिकाराची पद दिली आणि मग त्यांच्या सल्ल्याने त्याने आपले सल्लागार आणि अधिकारीही बदलले. त्याने आपला मित्र युसुफ आगाला आरमाराचा मुख्य अधिकारी केलं. त्यामुळे सततच्या वादावादीमुळे राजमातेला राजप्रासाद सोडून दुसरीकडे राहायला जायची वेळ आली.

ओथमन साम्राज्याचा सगळा कारभार मुस्तफा कारा पाशाच्या हाती आला आणि त्याने तो समर्थपणे निभावला. त्याने अनेक आर्थिक आणि शासकीय सुधारणा केल्या. पोलंड, ऑस्ट्रिया आणि पर्शियाशी शांतता करार करून राज्यात स्थैर्य आणलं. जानिसरीतील सैनिकांची संख्या कमी केली. गव्हर्नरांची ताकद कमी केली. समुद्रातील चांचेगिरीला आळा घातला. पण याच वजीराची जनानखान्यातील स्त्रियांच्या सांगण्यावरून हत्या करण्यात आली. त्यानंतर सुलतानजादा महंमद मुख्य वजीर बनला.

इ. स. १६४४ मधे काही माल्टाच्या चाच्यांनी मक्केला जाणाऱ्या यात्रींची बोट पकडली. हे चांचे क्रेट बेटावर वस्ती करून होते म्हणून युसुफ आगा, नौदल प्रमुखाने सुलतानाला क्रेटवर हल्ला करण्यास चिथावलं. तुर्कांनी व्हेनिसवर हल्ला चढवला. ओथमन तुर्कांना हा हल्ला फार भारी पडला कारण पुढच्या २४ वर्षांपर्यंत हे युध्द चाललं. व्हेनिसच्या लढाईत अपयश आल्यावर मुख्य वजीराबद्दल राज्यात नाराजी पसरली. तेव्हा मुख्य वजीराने काही महत्वाच्या नाराज अधिकाऱ्यांना ठार करायचं ठरवून आपल्या घरातील समारंभाला जेवायला बोलावलं. पण या अधिकाऱ्यांना समारंभाला जाण्यापूर्वीच या कारस्थानाची माहिती मिळाली. आणि ते सगळे जानिसरिज फौजेला जाऊन मिळाले तिथे सर्वांची चर्चा झाली आणि मुख्य वजीराला संपवण्याचा निर्णय झाला. सुलतानाने परवानगी नाकारल्यावरही फौजेने मुख्य वजीराला ठार केलं.

व्हेनिसबरोबर चाललेल्या सततच्या युध्दामुळे खजिन्यावर ताण पडला पण इब्राहिमच्या विलासी जीवनात काहीही जीवनात फरक पडला नाही. त्यातच व्हेनिसने दर्दनेलस् सामुद्रधुनी अडवून धरल्यामुळे राज्यात जीवनोपयोगी वस्तूंची चणचण निर्माण झाली. मंत्रीमंडळही इब्राहिमच्या लहरीपणाला कंटाळलं. त्याआधीही मुख्य वजिर सलिहा पाशा, याच्या मदतीने राजमाता खुशुम सुलतानाने इब्राहिमच्या हत्येचा कट रचला. पण तो अयशस्वी ठरला होता. त्यामुळे राजमाता खुशुम सुलतानाला राजप्रासादातून हाकलून देण्यात आलं.

पण पुढील वर्षी जानिसरी फौजेने बंड केलं. नवीन नेमलेल्या अहंमद पाशा मुख्य वजीराचे हजार तुकडे करण्याइतकी त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. त्याच दिवशी इब्राहिमला कैद करण्यात आलं आणि त्याच्या ६ वर्षांच्या लहान मुलाला, महंमदला, तख्तावर बसवण्यात आलं. नवीन आलेल्या मुख्य वजीराने, सोफु महंमद पाशाने, इब्राहिमला फाशी देण्याची परवानगी मागितली. हा सुलतान आपल्याला सुखाने जगू देणार नाही, आणि देशावर नियंत्रणही ठेवू शकणार नाही, म्हणून याला काढून टाका असं म्हणत राजमाता खुशुम सुलतानानेही आपली संमती कळवली. पण त्याला ठार न करता बंदिवासात ठेवा असा तिचा हुकूम होता. शिपायांनी हो म्हटलं, पण नंतर तुरूंगात टाकल्यावर गळा आवळून त्याला ठार केलं. काहीजणांच्या मते दोन लोकांनी हा राजवध केला आणि इतरांनी राजप्रासादाच्या खिडकीतून खाली चाललेला हा वध पाहिला. सुलतान इब्राहिमला १८ ऑगस्ट १६४८ ला फाशी देण्यात आलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

### ३०० वर्षांमधे झालेला ओथमन साम्राज्याचा विस्तार.




२०२०

## १९ वा सुलतान महंमद चतुर्थ. जन्म २ जानेवारी १६४२. मृ.६ जानेवारी १६९३.

सुलतान इब्राहिम आणि तुर्हान हातिस खातूनचा हा मुलगा. ४० वर्षे म्हणजे खूप मोठ्या काळापर्यंत याने कारभार केला.

मुख्य वजीराने याला गादीवर बसवलं तेव्हा हा फक्त ६ वर्षांचा होता. हा महंमद तान्हा असतांना सुलतानाचं आणि याच्या आईचं इतकं कडाक्याचं भांडण झालं की सुलतानाने आईच्या कडेवर बसलेल्या महंमदला तिच्या हातून ओढलं आणि सरळ पाण्यात फेकलं. मग धावपळ करून जनानखान्यातील नोकर चाकरांनी याला वाचवलं.

महंमद चतुर्थ इ. स. १६४८ मधे सुलतान बनला. या काळात लष्कर हाताबाहेर गेलं होतं. सैनिक म्हणतील तो सुलतान होणार आणि ते म्हणतील तो मुख्य वजीर होणार इतकं वर्चस्व लष्कराने कारभारावर मिळवलं होतं. याने ३० वर्षे कारभार केला म्हणजे याच्या सोफी महंमद पाशा या मुख्य वजीराने सुरुवातीला देश सांभाळला. या वजीराला जानिसरिजच्या हट्टाप्रमाणेच नेमलं गेलं होतं. या काळात सुलतान इब्राहिमला ठार करणाऱ्या शिपायांना शिक्षा करण्याची जानिसरिजची मागणी पुढे आली. त्यावरून साध्या शिपायांनी बंड केलं. वजीर सोफी पाशाने उद्दामपणे ते बंड हजारो शिपायांना ठार करून मोडून काढलं. परत दंगे उसळले. महंमद चतुर्थचा हा काळ सतत शिपायांचं बंड, दंगे धोपे, सतत अधिकारी बदलणं आणि जनानखान्यातील स्त्रियांची कारभारात ढवळाढवळ यात वाया गेला. या सगळ्या अस्थिरतेवर उपाय म्हणून सोफी महंमदलाच ठार करण्याचा निर्णय जनानखान्यातून घेतला गेला. देशाला काहीही स्थैर्य नव्हतं. कुणातरी खंबीर वजीराची आवश्यकता वाटायला लागली. तेव्हा कोप्रुल्लुचं नाव पुढे आलं.

पण याच काळात सुलतान महंमद चतुर्थची आई तोर्हान खातून आणि बेगम खुशूमखान यांच्यात अधिकारावरून रस्सीखेच सुरू झाली होती. दोघींकडे आपापल्या जानिसरिजच्या फौजा होत्या. त्यामुळेच त्यांची राजवाड्यातील लुडबुड आणि त्यांचा सुळसुळाट वाढला होता. त्या फौजांमधे सतत चकमकी होत असत. या भांडणाचा शेवट झाला तो खुशुमखानच्या हत्येने. शेवटी जिंकलेल्या राजमाता तुर्हान खातूनने कोप्रुल्लुला पूर्ण अभय आणि अधिकार दिले.

# कोप्रुल्लु युग. महंमद पाशा.

मराठी रियासतीत १८ व्या शतकातील संभाजीपुत्र शाहू राजाच्या काळात बाळाजी विश्वनाथ भट यांच्या घराण्यातील पेशवाई हा जसं अत्यंत महत्वाचं पर्व मानलं जातं, दिल्लीचे बादशहा असमर्थ झाल्यावर जसे वजीर सत्ता चालवू लागले तसंच ओथमन रियासतीत कोप्रुल्लु काळ हा अत्यंत महत्वाचा ठरतो. सुलतान असमर्थ झाल्यावर ओथमन साम्राज्याची धुरा या कोप्रुल्लू घराण्याकडे १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत राहिली. एकापाठोपाठ ६ मुख्य वझीर या घराण्यातून साम्राज्याला मिळाले.

या घराण्याचा मूळ पुरुष महंमद कोप्रुल्लु. या मुख्य वजीर पदावर याची नेणूक केली तेव्हा हा ८० वर्षांचा होता. हा कोप्रुल्लु एशिया मायनरच्या अल्बानियातील एका रुदनिक नावाच्या गावातला हा तरूण मुलगा राजवाड्यात नोकर म्हणून आला. मग सुलतानच्या मुदपाकखान्यात नोकर म्हणून शिरला. बघता बघता आपल्या हुशारीने त्याने सर्वांवर आपल्या हुशारीची छाप पाडली. मग लष्कराच्या चाकरीत गेला. त्याची पहिली नेमणूक कोप्रुल्लु गावात झाली. त्याने तेच नाव धारण केलं. बघता बघता त्याने वरचे हुद्दे मिळवले. नौदलावर राहिला. अनेक खात्यांचा अनुभव घेत राहिला. पुढे गव्हर्नर म्हणून नेमला गेला. या सर्व ठिकाणी त्याने आपल्या उत्तम कारभाराची छाप टाकली. त्यामुळे जेव्हा कर्तृत्ववान वजीरासाठी शोध सुरू झाला तेव्हा सर्वांच्या मते कोप्रुल्लुचं नाव पुढे आलं इतकी कर्तबगारीची प्रसिध्दी कोप्रुल्लुने आपल्या कामामुळे मिळवली होती. त्यामुळे राजमाता तुर्हान खातूनने कोप्रुल्लुच्या हाती सर्व अधिकार सोपावले.

जेव्हा वजीर पदावर त्याची निवड झाली तेव्हा त्याने ते पद आधी नाकारलं आणि कारभाराचं, निर्णयाचं पूर्ण स्वातंत्र्य राजमातेकडे आणि सुलतानाकडे मागितलं. ते जेव्हा मिळालं तेव्हा पहिलं महत्वाचं काम केलं ते, सुलतानाकडून कारभारात त्याच्या निर्णयांमधे कुणीही ढवळाढवळ करणार नाही, विरोध करणार नाही, आणि प्रश्नही विचारणार नाही, ज्या नेमणूका तो करेल आणि ज्यांना पदच्युत करेल, त्याबद्दलही विचारलं जाणार नाही, जे लोक त्याच्याविरूध्द सुलतानाचे कान भरायला येतील, त्यांच्यावर सुलतान विश्वास ठेवणार नाही, हे सर्व त्याने सुलतानाकडून कबूल करून घेतलं.

**१४ सप्टेंबर १६५६ मधे कोप्रुल्लु मुख्य वजीर झाला. सन १६४८ ते ५६ एवढी ८ वर्षे राजधानीत आणि त्यामुळे इतर प्रांतांमधे साम्राज्यात अस्थिरता चालू होती ती थांबली.**

वजीरपद हाती आलं. त्यानंतर मात्र कोप्रुल्लु कामाला लागला आणि देशात शांतता नांदावी म्हणून अत्यंत कठोर उपाय आणि योजना आखल्या. त्याने पहिलं काम केलं ते सुलतानाला महालाच्या बाहेर काढून सर्व प्रदेशांमधे हिंडायला आणि जुनी राजधानी एदिर्नच्या प्रासादात रहायला सांगितलं. सुलतानालाच कॉंस्टंटिनोपालमधून दूर नेल्यावर त्याच्या खुषमतगारांची कोप्रुल्लुच्या कामातली ढवळाढवळ थांबली. जनानखाना दूर झाला, त्यामुळे त्यांचीही लुडबुड संपली. ४ जानेवारी, १६५७ मधे प्रासादातील सुरक्षा शिपायांचं बंड घडवून आणणाऱ्या प्रमुखांना ठार केलं. जानिसरीजच्या मदतीने ते मोडून काढलं. विरोधक, कामचुकार, कट

कारस्थानी, भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांना निलंबित तरी केलं किंवा ठार करून टाकलं. या शिक्षा त्यांच्या गुन्ह्याच्या प्रमाणात केल्या. व्हेनिसने दर्दनेलस् अडवून धरला होता. तो मोकळा करण्यात अपयश आणणाऱ्या नौदल प्रमुखाला आणि त्याच्या साथीदारांना ठार केलं. याची तक्रार सुलतान महंमद पाशाकडे गेल्यावर लगेच आपल्या पदाचा राजीनामा दिला तेव्हा शेवटी सुलतानाने कोप्रुल्लुला परत मुख्य वजीर नेमलं.

सन जुलै १६५७ मधे व्हेनिस आणि दर्दनेल्स हा चिघळत राहिलेला प्रश्न सोडवायला फौज पाठवून व्हेनिसचा पराभव केला आणि काही प्रदेशही मिळवला. व्हेनिसचा नाविक दल अधिकारी आपल्या युध्दनौकांची परेड करत ओथमन किल्ल्याच्या समोरून जात असतांना तोफखान्यातून निघालेल्या प्रचंड गोळ्याने त्या नौका एका क्षणात उध्वस्त झाल्या आणि ओथमन नाविक दलाला मोठं यश मिळालं. त्याबरोबर कोप्रुल्लु पाशाने त्या सर्व अधिकाऱ्यांचा मानाची वस्त्रं देऊन सन्मान केला. आणि ज्यांनी कामचुकारपणा केला त्यांना ठार केलं. त्याबरोबर जानिसरिज फौजेत एकदम दहशत आली. कोप्रुल्लु स्वत: ट्रान्सीलवानियाच्या मोहिमेवर मोठी फौज घेऊन हजर राहिला आणि त्याने तिथेही विजय मिळवला. कोप्रुल्लु या मोहिमेवर असतांना त्याच्याविरूध्द अनेक गव्हर्नरांनी एकत्र येऊन अलेप्पोच्या गव्हर्नरच्या पुढाकाराखाली बंड पुकारलं. कोप्रुल्लुला काढून टाकण्याची त्याची मागणी सुलतानाने नाकारली. ते बंडही, बंडातील सर्व अधिकाऱ्यांना ठार करून चिरडण्यात आलं. १६६० मधे इस्तंबूलमधे मोठी आग लागली. अनेक घरं जळून खाक झाली. तेव्हा कोप्रुल्लुने स्वत: लक्ष घालून पिडितांना घरं बांधून देणं, त्यांच्या पुनर्वसनाचं अत्यंत चोखपणे काम केलं. त्यामुळे त्याचं नाव आणखीनच गाजलं.

अवघ्या ५ वर्षांमधे कोप्रुल्लु सन १६६१ सालामधे आजारी पडला. आता त्याच्या हातून काम होणार नाही हे पाहिल्यावर, त्याची विचारपूस करण्यासाठी भेटायला आलेल्या सुलतान महंमद चतुर्थला त्याने आपल्या मुलाला वजीर करण्याची विनंती केली आणि सुलतानाने ती मान्यही केली. त्यानंतर महंमद कोप्रुल्लु मरण पावला नि त्याच्या जागी त्याचा मुलगा फझल अहंमद मुख्य वजीर झाला. आपल्या कारकीर्दीत कोप्रुल्लुने ३६,००० पेक्षा जास्त लोकांना ठार केलं. आणि आजारपणात मृत्यूशय्येवर असतांनाही आणखी लोकांना ठार केलं. पण जनतेने आणि सुलतानाने त्याला दोष दिला नाही कारण त्यामुळेच साम्राज्यात शांतता नांदली होती.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## कोप्रुल्लु फझल अहंमद पाशा सन १६६१ ते १६७६ पर्यंत वजीरपदावर राहिला.

मुख्य वजीर म्हणून काम पाहाण्यापूर्वी कोप्रल्लु फझल पाशा इर्झोरमचा गव्हर्नर म्हणून काम पाहात होताच. आर्थिक घडी बसवण्यासाठी करवसूलीत नवीन शिस्त आणणे, शिक्षणात सुधारणा करणे यात त्याने लक्ष घातलं आणि दुसरीकडे युध्द आघाडीवरही पराक्रम गाजवला. राज्यकारभार हातात आल्याबरोबर अनेक दिवस चिघळत राहिलेला ट्रान्सीलव्हॅनियाचा प्रश्न मिटवून टाकण्यासाठी त्याने पाऊल उचललं. त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. मग हंगेरी, मोराविया आणि सिलेशिया जिंकून मुख्य वजीर परत आला. त्या लढाईनंतर राजधानीतील गुलामांच्या बाजारात ८०,००० पकडून आणलेले कैदी विकायला होते एवढा मोठा विजय मिळाला होता. सन १६६३-६४ सालामधे त्याने क्रोशियाच्या किल्ल्याला वेढा घालून जिंकला. पुढचा हल्ला क्रेट बेटावर चढवला. कॅंडियाचा त्याचा वेढा २ वर्ष चालला. शेवटी मोठा विजय मिळवून फझल अहंमद कोप्रुल्लू वजीर सन १६६९ ला कॉंस्टंटिनोपलला परतला. त्यानंतर ओथमन सैन्याला ऑगस्ट १६७२ सालामधे पोलंडच्या लढाईत त्यांचा सेनापती जॉन सेबेस्कीने पराभव दाखवला. ३२,००० तुर्की फौजेपैकी फक्त १५०० तुर्की सैनिक जीव वाचवून परत आले एवढा मोठा नरसंहार फझल पाशाला सोसावा लागला. ४ वर्षे हे युध्द चाललं. शेवटी झुरानोच्या तहाने हे युध्द संपलं.

ह्या लढाईचा तह चालू असतांनाच फझल अहंमद पाशा वजीर जलोदराने मरण पावला. वाईन आणि ब्रँडीच्या अतिसेवनाने त्याला हा रोग जडला. या युध्दांचं महत्व इतकंच की ओथमन साम्राज्याच्या आजवर सतत लढाया चालू होत्या त्यात कधी पराभव तर कधी निसटता विजय होत साम्राज्य आकसत चाललं होतं.

सुलतान महंमद चतुर्थची कारकीर्द या दोन पिता पुत्र कोप्रुल्लु वजीरांच्या उत्तम कारभारामुळे जोरात चालू होती ओथमन साम्राज्याला या दोघा वजीर पितापुत्रांनी परत मिळवून आणलेल्या विजयामुळे सामर्थ्य आलं होतं. ओथमन फौजेने एजियन समुद्रातील बेटं, युक्रेनमधला भागही जिंकला होता.

---

## कारा मुस्तफा पाशा. सन १६७६.

फझल अहंमद पाशानंतर त्याच घराण्यातील कारा मुस्तफा पाशा याने मुख्य वजीर म्हणून सूत्र हाती घेतली. हा वर्णाने काळा होता, म्हणून याला कारा-काळा मुस्तफा म्हणत. कोप्रुल्लु महंमद पाशाचा हा जावई आणि फझल अहंमद पाशाचा मेहूणा, राजकारणात होताच. त्याआधी कारा मुस्तफा कोप्रुल्लू फझल अहंमदचा सहाय्यक म्हणून दरबारचं काम पाहातच होता. पोलंडवरच्या स्वारीत सेनापती म्हणूनही त्याने जबाबदारी घेतली होती. ओथमन साम्राज्याचं वजीरपद मिळाल्याबरोबर ऑस्ट्रियाच्या बंडखोर सरदारांना मदत करून तो देश आपल्या साम्राज्याला जोडून घेण्याचा नवीन डाव कारा मुस्तफाने रचला. बंडखोर सरदार तेकेलिच्या हाताखाली ओथमन तुर्की फौज आणि त्यांना येऊन मिळालेली तार्तार फौज हंगेरीवर चालून गेली. त्याआधी तो रशियन फौजेशी लढत राहिला होता. युक्रेनवर त्याने सतत हल्ले चालू ठेवले. कोसॅक जिंकून घेतलं.

इ. स. १६८३ मधे सुलतानाची परवानगी घेऊन मुख्य वजीर कारा मुस्तफाने व्हिएन्नावर स्वारी केली. व्हिएन्नाला त्यावेळी गोल्डन अपल या नावाने ओळखलं जाई. डॅन्यूब नदीच्या काठावर वसलेल्या या महत्वाच्या शहराला जिंकल्यानंतर ओथमन सुलतानाला युरोपमधे शिरण्याचा मार्ग मोकळा होणार होता. म्हणूनच सुलतान सुलेमान द मॅग्निफिसंटच्या काळापासून ऑस्ट्रियाचं हे महत्वाचं शहर जिंकण्याची ओथमन तुर्कांची धडपड चालू होती.

कॉंस्टंटिनोपलहून निघालेली ओथमन फौज बेलग्रेडला पोचली. तिथे वजीर कारा मुस्तफा त्यांना भेटला. १४ जुलै, १६८३ ला १०,००० सैनिक घेऊन त्याने व्हिएन्नाला वेढा घातला. ओथमन फौज स्वारी करायला येते आहे हे कळल्यावरही व्हिएन्नाच्या राजाला त्याचं गांभीर्य नव्हतंच. तो आपल्या शिकारीच्या छंदात दंग होता. मात्र ओथमन फौज अगदी जवळ येऊन ठेपली आहे हे कळल्याबरोबर त्याने सर्व चर्चमधून येशूची करुणा मागायची आज्ञा केली, स्वत: राजधानी सोडून निघून गेला आणि सेनापती स्टारेन्बर्ग व्हिएन्ना शहर सांभाळत बसला.

त्यावेळी व्हिएन्नामधे जेमतेम ४००० फौज होती. काही ८० हजार ग्रेनेड आणि तोफा एवढ्यावरच सेनापतीला लढाई जिंकायची होती. शहरातील सर्व नागरिक गाव सोडून निघून गेले. वजीर कारा मुस्तफा प्रचंड फौजेनिशी व्हिएन्नावर चालून आला. त्याच्या सैन्याने शहराला वेढा घातला. आणि मग सेनापतीला शरण येण्याचा खलिता पाठवला. शरण न आल्यास, नरसंहार आणि जीव गमावशील ही धमकीही लिहून पाठवली. पण सेनापती स्टारेन्बर्गने राजधानी कारा मुस्तफाच्या स्वाधीन करणं नाकारलं. तेव्हा कारा मुस्तफाने खंदक खणून त्यात सुरूंग भरून शहराची तटबंदी उडवायची योजना आखली. तुर्की तोफा शहरावर धडधडू लागल्या. युध्दाला तोंड फुटलं.

शहरातील जे काही नागरिक शिल्लक होते तेही प्लेग आणि अतिसाराच्या रोगाने हैराण झाले होते. तेव्हा तुर्की फौजा एकेक पाऊल टाकत विजयाकडे वाटचाल करत असतांनाच सप्टेंबरमधे जर्मन, पोलंड आणि हंगेरी आणि लॉरेनच्या सर्व ख्रिश्चन फौजा एकत्र आल्या. कारण आपला पराभव होणार हे दिसताच व्हिएन्नाच्या सेनापतीने आपल्या ख्रिश्चन धर्मबांधवांकडे मदतीची हाक दिली. तुर्की वर्चस्वाला रोखण्याचं गांभीर्य या देशांना कळलं. नाहीतर सारा युरोप इस्लामी धर्माचा होणार होता. तेव्हा सर्व ख्रिश्चन देशांच्या फौजा गोळा झाल्या. पोलंडचा राजा जॉन तृतीय सोबेस्कीच्या हाताखालच्या फौजेने व्हिएन्नाच्या दिशेने कूच केलं.

१२ सप्टेंबर १६८३ हा व्हिएन्नासाठी निर्वाणीचा दिवस होता. शहराभोवतालच्या भक्कम तटबंदीला भगदाड पडू लागलं होतं. रसद संपली होती, खूप सैन्य मरण पावलं होतं. व्हिएन्नाची भक्कम तटबंदी अजून सगळे तोफगोळे अंगावर झेलत उभी होती. १२ व्या शतकात इंग्लंडचा राजा चार्ल्स हा प्रवास करत ऑस्ट्रियाजवळ आला तेव्हा ऑस्ट्रियाच्या ड्यूकने त्याला पकडलं आणि कैदेत टाकलं होतं. आपली सुटका करून घेण्यासाठी या इंग्लंडच्या राजाने ड्यूकला ६ रांजण भरुन चांदी दिली होती. त्या चांदीचा उपयोग त्याकाळच्या ड्यूकने भरभक्कम तटबंदीसाठी खर्च केली होती. ती आजही अभेद्य होती.

व्हिएन्नाचा सेनापती अगतिकतेने मित्रांच्या मदतीची वाट पहात असतांनाच सोबेस्कीची प्रचंड फौज तुर्की फौजांच्या पाठीमागील डोंगरावरून कालेनबर्गवरुन अचानक खाली उतरली. प्रचंड तलवारबाजी झाली. कारा

मुस्तफाने मागची बाजू बंदोबस्तात ठेवली नव्हती. पाठीमागून अचानक झालेल्या या हल्ल्याने लढाईचं पारडं व्हिएन्नाच्या बाजूने झुकलं. ख्रिश्चन देशांच्या विजयाचा भाग्यविधाता पोलंडचा राजा सोबेस्की आणि लॉरेनचा राजा हे दोघे होते.

ओथमन फौजेचं सर्व युध्दसाहित्य लुटलं गेलं. नंतर तुर्की फौज हंगेरीला सरकली. वजीर कारा मुस्तफा बेलग्रेडला पळून गेला. बेलग्रेडमधे नवीन फौज जमवण्याच्या प्रयत्नात असतांनाच सुलतानाचा निरोप घेऊन अधिकारी बेलग्रेडमधे पोचले आणि झोपलेल्या कारा मुस्तफाचा, त्याला उठवून, गळा आवळून अंत करण्यात आला. त्याकाळात मोठ्या पदावरील व्यक्तींना फाशी देण्यासाठी सन्मानाने मृत्यू आल्याचं दाखवण्यासाठी रेशमी वस्त्राचा उपयोग केला जायचा.

ताबडतोब नवा वजीर पाशा नेमला गेला. पण हा इब्राहिम पाशाही दुर्दैवीच ठरला. त्याने नवीन फौज जमवली आणि हंगेरीची राजधानी बुडावर (आताचं बुडापेस्ट) हल्ला चढवला पण तिथेही पराभवाला सामोरं जावं लागलं. मोहॅचला रणांगणावर ओथमन सैन्याची मोठी कत्तल झाली. १६० वर्षांपूर्वी ज्या तुर्कांकडून मार खाल्ला होता, त्याच तुर्कांना हंगेरीने आता उधळून लावलं आणि विजय मिळवला होता. मुख्य वजीर कारा मुस्तफा व्हिएन्ना पराभवामुळे संपला. तिकडे जानिसरिजच्या फौजांनी या पराभवाला कारण ठरलेल्या सुलतान महंमद चतुर्थला पदच्युत करून सुलतानाचा भाऊ सुलेमानला सुलतान करून टाकलं. ते साल होतं इ. स. १६८७.

या व्हिएन्नाच्या विजयाचे आणि लढाईचे दूरगामी परिणाम झाले. ओथमन साम्राज्याच्या अनिर्बंध सत्तेला आणि युरोपातील वर्चस्वाला लगाम बसले. त्याच्या घसरणीला सुरुवात झाली. युरोपात हास्बर्गचं राजघराणं आणखी सामर्थ्यवान झालं. त्याचे परिणाम ऑस्ट्रियन सत्तेवर झाले. या लढाईत फ्रान्सच्या राजाने भाग घेतला नव्हता. कारण त्याच्या प्रतिस्पर्ध्यांची ताकद कमी होणं त्याला हवं होतं. पण फ्रान्सशिवाय आपण युध्द जिंकू शकतो हे त्यामुळे इतर युरोपियन देशांना दाखवून देता आलं.

कॉंस्टंटिनोपलमधे नवीन सुलतानाची राजवट सुरु झाली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २० वा सुलतान सुलेमान द्वितीय. जन्म १५ एप्रिल १६४२ मृ.२२ जून १६९१.

सुलतान इब्राहिम आणि अशुब सुलतानाचा हा मुलगा.

सावत्र भाऊ महंमद चतुर्थ ज्या दिवशी सुलतान बनला तेव्हाच सुलेमान द्वितीयचं केफ मधे म्हणजे पिंजऱ्यात-एकांतवासाच्या कोठडीत राहणं ठरून गेलं होतं. एकूण ३८ वर्ष हा कैदेत होता.

महंमद चतुर्थ या सुलतानाला ठार करून जानिसरिज फौजेने सुलेमान द्वितीयला सुलतान करायचं ठरवलं त्यामुळे हा नजरकैदेतून बाहेर पडला आणि जानिसरिजच्या ताब्यात गेला. सन १६८७ मधे याला अचानक राजयोग मिळाले. सुलेमान द्वितीय पातशहा बनला, पण त्यावेळी राजधानीतील परिस्थिती हाताबाहेर गेलेली होती. लष्करातील शिपाई आणि जानिसरिजची सेना यांनी शहरात क्रौर्याचा हैदोस घातला. त्यांनी प्रतिष्ठित सरदारांना लुटलं, त्यांच्या जनानखान्यातील स्त्रियांची अब्रू लुटली. मग जानिसरिजचे सैनिक घराघरात शिरले तेव्हा मात्र सामान्य माणसाच्या हातातही स्वसंरक्षणासाठी शस्त्रं आली. जाळपोळ, लुटालूट, स्त्रियांची अब्रू या सर्वांचा कहर उडाला. शेवटी नागरिकांनीच स्वसंरक्षणासाठी हातात शस्र धरलं. बेबंद गोळीबार झाला. नाहक नरसंहार झाला. आता हा अनाचार थांबवण्यासाठी सुलतानाला लगेच उपाय करणं भाग होतं.

यावर तोडगा म्हणून सुलतान सुलेमान द्वितीयने जुन्या कोप्रुल्लु वजीर घराण्यातीलच फझल अहंमद पाशाचा भाऊ, मुस्तफा पाशा याला सन १६८९ मधे मुख्य वजीर पदावर नेमलं. या वजीराच्या हाताखाली सन १६९० सालात ओथमन फौजा बेलग्रेड जिंकायला बाहेर पडल्या. या वजीराने हातून गेलेला मोठा प्रदेश परत मिळवला. साम्राज्याला अशी अस्थिर आणि दाहक अवस्था आलेली असतांनाच पाठोपाठ २ महिन्यांमधेच सुलेमान द्वितीय इ. स. १६९१ सालात जलोदराच्या दुखण्याने मरण पावला. त्याच्या जाण्याने देश आणखी संकटात गेला. या अस्थिरतेचा फायदा शत्रू राष्ट्रांनी लगेच घेतला आणि आपापली राज्यं स्वतंत्र करायला सुरूवात केली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २१ वा सुलतान अहंमद द्वितीय. जन्म.२५ फेब्रुवारी.१६४३ मृ. ६ फेब्रुवारी १६९५.

सुलतान इब्राहिम आणि मुआज्जा सुलतानाचा हा मुलगा.

अहंमद द्वितीय तख्तावर बसला पण ओथमन घराण्याचं नष्टचर्य संपलं नव्हतं. मुस्तफा पाशा कोप्रुल्लुच मुख्य वजीरपदावर राहिला. बेलग्रेडचं यश मिळवल्यावर १९ ऑगस्ट १६९१ मधे तो परत मोहिमेवर बाहेर पडला. डॅन्युब ओलांडून ऑस्ट्रिया-हंगेरी-क्रोशिया यांच्या संयुक्त फौजांशी, तिसा नदीच्या काठावर भिडला, पण स्लान्कमेनच्या लढाईत वजीराचा दारुण पराभव झाला. या युध्दात त्याला मोठा पराभव पहावा लागला. वजीर कोप्रुल्लु स्वत:च जखमी होऊन मरण पावल्यावर ओथमन तुर्की फौज रणांगण सोडून पळून गेली. सुलतानाचं सर्व युध्दसाहित्य, तोफा, खजिना, सर्वकाही शत्रूच्या हाती लागलं. २०,००० ओथमन फौज रणांगणावर मरण पावली. इतका जबरदस्त पराभव ओथमन तुर्कांचा झाला. त्यानंतर पोलस् – ऑस्ट्रियन- व्हेनिशियन फौजांनी आपली गेलेली भूमी परत मिळवायला सुरुवात केली. या सगळीकडे तुर्की फौजांना पराभव पहावा लागला. ही संकटं कमी की काय म्हणून नवा सुलतानही अल्पावधीत अखेरच्या घटका मोजायला लागला.

सन १६९५ मधे हाही नवीन पातशहा जलोदरानेच मरण पावला. सुलतान पदावर येईपर्यंत याचंही आयुष्य तुरुंगवासातच गेलं होतं. ओथमन घराण्यातील या अल्पायुषी वारसांमुळे ओथमन घराणंच घसरणीला लागलं.

याच्यानंतर पुढचा वारस झाला तो मुस्तफा द्वितीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २२ वा सुलतान मुस्तफा द्वितीय. जन्म ६ फेब्रुवारी १६६४. मृ. २९ डिसेंबर १७०३.

सुलतान महंमद चतुर्थ आणि गुलनश सुलतानाचा हा मुलगा.

आजपर्यंत गेलेलं साम्राज्य परत मिळवायचं या निश्चयानेच मुस्तफा द्वितीय सुलतानपदावर बसला. त्यासाठी तो स्वत: प्रत्येक मोहिमेत हजर राहू लागला. कारभार हाती आल्याआल्या, लगेचच सन१६९५ मधे, व्हेनिसने जिंकलेलं आदल्या वर्षीचं चिओस बेट त्याने परत जिंकून घेतलं. पाठोपाठ ऑगस्टमधे लिपोवा त्याने जिंकून घेतलं. नंतर त्याच्या फौजा हाब्सबर्ग सेनेशी भिडल्या. लुगासच्या लढाईत हाब्सबर्ग सेनेचा पराभव केला.

सुलतान मुस्तफा द्वितीयची दुसरी मोहीम अझोव विरुध्द झाली. अझोव किल्ला, अझोव समुद्राच्या काठावर होता. हा समुद्र कर्च नावाच्या लहान सामुद्रधुनीने काळया सुमुद्राशी जोडला गेला होता. हा मोक्याच्या जागचा अझोव किल्ला मिळवून रशियाला काळा समुद्र, आणि त्यामार्गे भूमध्य समुद्रात शिरता येणार होतं आणि आपलं नाविक दल सामर्थ्यवान करता येणार होतं. आपलं सामरिक बळ वाढवण्यासाठी, आजवर कायम ओथमन सरकारच्या ताब्यात असलेलं हे ठिकाण जिंकण्यात रशियाला मनस्वी इच्छा होती. म्हणून तिथे रशियाने ऑगस्टमधे वेढा घातला होता. स्वत: पीटर द ग्रेट फौज घेऊन तिथे हजर होता. सुलतान मुस्तफा द्वितीयला हा महत्वाचा किल्ला रशियापासून सुरक्षित ठेवण्यात त्याला यश आलं. दुसरीकडे हाब्सबर्ग फौजांना उलाशच्या रणांगणावर ओथमन फौजांनी पराभूत केलं. तिथे ओथमन फौजा गुंतलेल्या असतांना, रशियाने दुसऱ्यांदा वेढा घालून अझोव समुद्रकाठावरचं हे किल्ल्याचं शहर जिंकून घेतलं. या पराजयाचा ओथमन सरकारला मोठा फटका बसला कारण अझोव हाती आल्यावर रशियाला अझोव समुद्रातून त्याला भूमध्य सागरापर्यंत पोचण्याचा मार्ग खुला झाला. १४५ वर्ष ताब्यात असलेलं अझोव ओथमन तुर्कांनी गमावलं हा त्यांच्यासाठी मोठा पराभव होता.

रशिया…

इ.सन पूर्व काळात, हजार वर्षे, कवटीतून पाणी पिणाऱ्या रानटी भटक्या जातींचा हा प्रदेश होता. या जमातीला पहिल्यांदा नागर स्वरुप दिलं ते रुरिक या रुस नावाच्या कुटुंबातील पुरुषाने. उत्तरेकडील वारिआग या नावाने ही जमात ओळखली जायची. ९ शतकाच्या मध्यावर या रुरिक पुरुषाने रुस देशाचा पाया घातला. वसाहतीला सुरुवात केली. रुरिकनंतर त्याचा मुलगा इगोर कारभार करु लागला. किव हे राजधानीचं ठिकाण झालं. इगोर वारला तेव्हा त्याची पत्नी ओल्गा हिने समर्थपणे कारभार चालवला. या ओल्गाने ख्रिश्चन धर्म स्विकारला. हिचा नातू व्लादिमिर गादीवर आला आणि ११४७ मधे मोस्कवा ही राजधानी झाली. त्यानंतर रशियाचं महत्वाचं ठिकाण मॉस्को हे कायम झालं. अशा या रशियाने पुढील शतकांमधे एक महत्त्वाची सत्ता म्हणून ओळख निर्माण केली आणि जागतिक राजकारणात आपलं स्थान निर्माण केलं. या रुरिक घराण्याला त्झार म्हणजेच कैसरचा अपभ्रंश, ही मान्यता इव्हान चतुर्थच्या काळात मिळाली. ओथमन वजीर सोकुल्लुचा व्होल्गा नदीचा जोड प्रकल्प

यानेच धुडकावून लावला होता. अशा या ५०० वर्षात उदयाला आलेल्या रशियाने ओझोव किल्ला जिंकून ओथमन साम्राज्याला शह दिला.




2020.

**अझोव समुद्र, काळ्या समुद्राला जोडणारा कर्च जलप्रवाह.**




2020.

**काळ्या समुद्रातून बॉस्फरस सामुद्रधुनीतून, मारमारा समुद्रातून दर्दनेल्सच्या प्रवाहातून भूमध्य सगरातील नाविक जलमार्गवर हुकमत ठेवण्यासाठी सर्व युरोप आणि आशिया खंडातील राष्ट्रांची कायम स्पर्धा झडत राहिली.**

सुलतान मुस्तफा द्वितीयची तिसरी मोहीम झिटाची (आताच्या सर्बियात) झाली. ही लढाई तिसा नदीच्या काठावर झाली. ११ सप्टेंबर १६९७ ला रशिया आणि पोलंडने एकत्र येऊन केलेल्या या लढाईत सुलतान मुस्तफा दारूण द्वितीयचा पराभव झाला. हाब्सबर्ग फौजेने अचानक केलेला हल्ला या पराभवाला कारण ठरला. यात सुलतानाची २०,००० फौज मारली गेली. १०,००० फौज पाण्यात बुडली. सुलतानाचा मुख्य वजीर एल्मास महंमद पाशा या युध्दात ठार झाला. एवढंच नव्हे तर सुलतानाचे दुय्यम ३ वजीर, जानिसरिजचे ३० आगासुध्दा मारले गेले. सुलतानाच्या तळावर प्रचंड लुटालूट झाली. त्याचा मौल्यवान खजिनाच काय पण ध्वज आणि सुलतानाची निशाणीची मुद्राही लुटली गेली. एवढं प्रचंड नुकसान झाल्यावर साम्राज्याचं वैभवच मातीला मिळालं. ओथमन साम्राज्याने परत गतवैभव पाहिलंच नाही. या युध्दातील मोठी हानी म्हणजे हंगेरीवरची सत्ता सुलतानाच्या ताब्यातून कायमची गेली.

या महायुध्दानंतर २६ जानेवारी १६९९ या दिवशी, सर्बियातील कार्लोविचला इंग्लंड आणि हॉलंडच्या मध्यस्थीने तह झाला. या तहानंतर नंतरच्या सुलतानांच्या धोरणांमधे खूप फरक झाला. आजवर ख्रिश्चन धर्मीयांना जी गुलामांसारखी वागणूक मिळत असे ती बंद झाली. त्यांना त्यांचे हक्क मिळायला लागले. युरोपियन देशांकडून येणाऱ्या राजदूतांना सन्मानाची वागणूक मिळायला लागली.

या लढाईनंतर सुलतानाने एक नवीन निर्णय घेतला. तो म्हणजे आपलं राज्य लष्करी शिपायांमधे वाटून देऊन त्यांनाच आपल्या जहागिरीचा सांभाळ करण्याची जबाबदारी द्यायची. त्याला तिमार हे नाव हे नाव होतं. पण तो प्रयोग फसला.

याच काळात वजीर कोप्रुल्लुवर एक कौटुंबिक संकट आलं. त्याचा पुतण्या सुलतानाच्या जनानखान्यातील स्त्रीच्या प्रेमात पडला. कोप्रुल्लुच्या शत्रूंना हे कळल्यावर त्यांनी सुलतानाचे कान भरले. सुलतानाला हे कळल्यावर मोठाच गहजब झाला. सुलतानाने लगेच या दोन्ही प्रेमिकांना ठार करून टाकलं. कोप्रुल्लुलाही आपल्या या पुतण्याच्या प्रकरणाने राजीनामा द्यावा लागला. काही महिन्यातच तोही मरण पावला. आता नवीन मुख्य वजीराची नेमणूक जानिसरिजच्याच सल्ल्याने होणार होती.

कोप्रुल्लुच्या जागी सुलतान मुस्तफा द्वितीयने आपला सेनापती फैझुल्लाच्या सांगण्यावरून मुख्य वजीर पदावर सन १७०२ मधे दल्तबान पाशाची नेमणूक केली. हा वजीर पूर्णपणे निरक्षर होता, पण उत्तम योध्दा होता. वजीरपदी आल्याबरोबर याने तुर्की, ख्रिश्चन आणि ज्यू स्त्रियांच्या पेहरावाचा फतवा काढला. या त्याच्या निर्णयामुळे सनातनी तुर्क खूष झाले. मग वजीराने कोप्रुल्लु घराण्याच्या दौलतीवर छापा घालून ती हस्तगत केली. त्यानंतर तो रशियाच्या स्वारीचा बेत आखायला लागला.

पण त्याचवेळी मुख्य सेनापतीने विरोध केल्यावरून, वजीर दल्तबान पाशाने सेनापती फैझुल्लाला ठार करण्यासाठी घरी बोलून विष द्यायचं कारस्थान केलं. पण हा कट आधीच उघडकीला आला त्यामुळे तो वाचला. सेनापती फैझुल्लाने सुलतान मुस्तफाला आपल्याविरुध्द झालेला हा सर्व कट सांगितला. सुलतान मुस्तफाने दल्तबानला दरबारात बोलावलं. त्याला कैद केलं आणि तीन दिवसांनी त्याला ठार केलं. हा वजीर मेला आणि पुढचा वजीर रामी पाशा झाला.

कार्लोविचच्या तहाच्या वेळी हा वजीर हजर होता. रामी पाशाने कारभार हाती घेतला पण काही दिवसांमधेच त्यालाही बंड करणाऱ्या जानिसरिजचा सामना करावा टाकला. पगार थकलेल्या फौजेने हा बंडावा केला होता. शिवाय रामी पाशाची सेनापती फैझुल्लाशी असलेली मैत्री कुणालाच आवडली नव्हती. आणखी एक गोष्ट नागरिकांच्या असंतोषाला कारण झाली होती. पहिल्या कोप्रुल्लु वजीराने सुलतानांना एदिर्नच्या (एद्रिआनोपल) राजवाड्यात राहायला पाठवल्यापासून नंतरचे सर्व सुलतान तिथेच राहात होते. इस्तंबूलमधे कधीच आले नव्हते म्हणून चिडलेले नागरिकही या बंडाव्यात सामील झाले.

मग सर्व बंडखोर जमाव एद्रिआनोपोलला गोळा झाला. शहरात आलेल्या या संतप्त जमावाला घाबरून सुलतान मुस्तफा चतुर्थ घाईघाईने आपल्या अहंमद या भावाकडे गेला. त्याला सुलतान होण्याची विनंती केली.

आपल्याजवळची निशाणीची राजमुद्रा त्याच्या हातात ठेवली. अशारितीने अहंमद तृतीय अचानक सुलतान बनला. नंतर चिडलेल्या जमावाला शांत करण्यासाठी त्यांच्या मर्जीप्रमाणे मुफ्ती फैझुल्लाला मुख्य वजीर केलं.

दुसरे दिवशी सकाळी सुलतान अहंमद तृतीय एद्रिओनोपलच्या मशिदीत गेलेला असतांना बंडखोरांनी त्याच्याकडे नवीन वजीर मुफ्तीच्या देहदंडाची मागणी करत त्याला त्या लोकांसमोर आणण्याची सुलतानाला ताकीद दिली. त्यावर सुलतानाने मुफ्तीला बंडखोरांच्या ताब्यात दिलं. तीन दिवस सेनापती मुफ्ती फैझुल्ला बंडखोरांच्या ताब्यात होता. सुलतानाने मुफ्तीला ठार मारण्याचा फतवा काढल्यावर बंडखोर जमावाने मुफ्ती फैझुल्लाला एका घोडयावर मागे तोंड करून बसवलं, त्याची धिंड काढली आणि त्याचं मुंडकं उडवलं आणि मग जनतेने त्याच्या शरिराचे अनेक तुकडे करुन हालहाल करुन ठार करण्यात आलं.

हे सगळं एद्रिओनोपलला घडल्यावर नवीन सुलतान अहंमद कॉंस्टंटिनोपलला राजधानीत परतला. तिथे त्याचा सत्ताग्रहणाचा, ओथमनची तलवार हाती घेण्याचा राज्याभिषेक समारंभ आयुब मशिदीत मोठ्या थाटात पार पडला. त्यानंतर आधीचा सुलतान मुस्तफा आणि त्याचे कुटुंबिय, सर्व जनानखाना यांना मिरवणूकीने अत्यंत अपमानास्पदरितीने फिरवण्यात आलं आणि मग सुलतान मुस्तफा आणि त्याचे चार मुलगे यांना कैदत टाकण्यात आलं. कैदेत पडलेला सुलतान मुस्तफा काही महिन्यातच मरण पावला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २३ वा सुलतान अहंमद तृतीय. जन्म ३० सप्टेंबर १६७३. मृ. १ जुलै १७३६.

महंमद चतुर्थ आणि गुलनुश सुलतानाचा हा मुलगा.

हा दुसरा मुलगा हा अहंमद तृतीय अचानक राजेपदी बसला. पण त्याचाही मुकुट पहिल्या सुलतानांप्रमाणे तितकाच काटेरी होता. सन १७०३ मधे हा सुलतान बनला. याच्या कारकीर्दीपासून पुढील काही वर्ष वजीरपदाची नेमणूक अस्थिरतेत गेली. सतत नवीन वजीर नेमले गेले आणि काढले गेले. शेवटी १७११ सालामधे बेल्तंजी महंमद पाशा मुख्य वजीर म्हणून नेमला गेला. त्याच्या नेमणूकीनंतर रशियाच्या स्वारीवर सुलतान स्वत: मुख्य वजीरासह बाहेर पडला.

ओथमन साम्राज्यासाठी हे १८ वं शतक अनेक घडामोडींनी भरलेलं होतं. कधी विजय कधी पराजय या मार्गाने ओथमन फौजांच्या लढाया चालूच होत्या. सन १७१०-११ मधे ओथमन फौजा रशियाशी लढायला बाहेर पडल्या. प्रुथ इथे दोन्ही फौजांची गाठ पडली. हे युध्द स्वीडनचा राजपुत्र चार्ल्स बारावा याच्यामुळे घडून आलं होतं. स्वीडनचा राजा चार्ल्स बारावा हा रशियाबरोबरच्या पोल्टोवाच्या लढाईत जखमी झाला आणि ओथमन सुलतानाच्या आश्रयाला आला. त्याच्या आग्रहामुळे सुलतान अहंमद तृतीय, रशियाशी लढायला तयार झाला. त्यावेळी मोल्दाविया रशियाच्या मदतीला गेला. रशियाशी झालेल्या या लढाईत रशियाचा पराभव होत आला होता. तेव्हाच रशियाच्या राणीने मोठी जडजवाहिराची लाच सुलतानाच्या वजीराकडे पोचवली. त्यामुळे वजीराने तह करून टाकला. वजीराचा हा लबाडीचा डाव उघड झाल्यावर सुलतानाने वजीराला काढून टाकलं आणि अली नावाचा नवीन मुख्य वजीरपदावर आला. प्रुथ नदीच्या काठावर झालेल्या या लढाईने परत राजकारण बदललं..

यात तुर्कांचा मोठा फायदा म्हणजे अझोव समुद्रावरचा अझोव किल्ला आणि शहर रशियाने परत केलं. त्याचबरोबर स्वीडनचा राजा चार्ल्स बारावा याला स्वीडनला सुखरूप परत जाण्याची अटही रशियाने कबूल केली. लगेच सन १७१४ मधे ऑस्ट्रिया आणि व्हेनिसबरोबर ओथमन फौजांच्या लढाया झाल्या. सुलतान अहंमद तृतीयने आपल्या राजवटीत पर्शियाचा पश्चिम भाग आपल्या साम्राज्याला जोडून घेतला. चिनी मातीच्या वस्तूंच्या उद्योगांना त्याने खूप प्रोत्साहन दिलं. देशाची आर्थिक स्थिती सुधारली. ग्रीक प्रांत तिथल्याच लोकांनी चालवायची परवानगी दिली. हा महत्वाचा निर्णय होता.

दुसरीकडे प्रुथला पूर्ण विजय न मिळाल्याने, त्याचा बदला घ्यायला रशियाची पावलं पडत होती. म्हणून रशियाकडून विचारणा झाली तरी इंग्लंड आणि फ्रान्स रशियाच्या मदतीला गेले नाहीत. कारण रशिया बळावेल अशी त्यांना भीती वाटली.

हा अहमंद सुलतान प्रचंड विलासी होता. याचा काळ हा ट्यूलिप काळ म्हणून ओळखला जातो. हा काळ सन १७१८ ला सुरू झाला आणि अपरॉन हलिल बंडानंतर म्हणजे इ. स. १८७६ मधे, अहंमद सुलतानाच्या पदच्युतीनंतर संपला. या काळात ट्यूलिप फुलांचं प्रस्थ प्रचंड वाढलं. त्याला कारण होता तो सुलतानाचा वजीर नेवसरली दामाद इब्राहिम पाशा. हा सुलतानाचा जावईच होता. या इब्राहिम पाशाला या ट्यूलिप फुलांचं प्रचंड वेड होतं म्हणून त्याने याची शेती करायला सुरूवात केली. याच्या जावयाने तर या फुलांच्या ४४ नवीन जाती निर्माण

केल्या. हे ट्यूलिप फुलांचं वेड दरबारी प्रतिष्ठितांमधे पसरलं. रेशमी वस्त्रांवर, चित्रांमधे सर्वत्र ट्यूलिप फुलं रंगवली जाऊ लागली. मग ते सामान्य लोकांच्या घराघरांमधेही शिरलं. अचानक झालेल्या या नवीन वेडामुळे जो तो शेतकरी ट्यूलिप फुलांचं पीक काढायला लागला. त्या फुलांचे बाजारात भाव प्रचंड वाढले. ट्यूलिप फुलं श्रीमंतीचं विलासाचं एक प्रतिक बनलं. याच काळात बोरोक पध्दतीच्या वास्तू निर्माण झाल्या. सुलतान अहंमदने उभारलेलं कारंजं हे त्याचंच प्रतिक होतं. बोरोक शब्द मूळ फ्रेंच भाषेतून आला. बोरोक पध्दतीत व्यस्त, असमतोल, पध्दतीने बांधकाम केलं जात असे.

दरबारात त्याने केलेल्या या सर्व उधळपट्टीवर जनता नाराज झाली. पण त्यामुळेच याच्या आमदानीत शिल्प-चित्र-वास्तूकलांना प्रोत्साहन मिळालं आणि सुंदर वास्तूंमुळे देशाच्या सौंदर्यात सुंदर भर पडली. याच्या कारकीर्दीत, इ. स. १७२८ मधे कॉंस्टंटिनोपलमधे हंगेरीच्या इब्राहिम मितफेरिकाने पहिला छापखाना काढला. पण तो छापील कागद बघून जनता खूप घाबरली.

हळूहळू देशाची जनता या उधळपट्टीवर नाराज होऊ लागली. २८ सप्टेंबर १७३० मधे त्या देशाच्या नवीन रुजू झालेल्या पध्दतीप्रमाणे जानिसरिजने उठाव केला. अरोना हलिलच्या नेतृत्वाखाली सर्व बंडखोर सैनिक राजवाड्यावर जमले. त्यांनी मुख्य वजीर दामाद इब्राहिम पाशाच्या देहदंडाची मागणी केली. त्याप्रमाणे वजीराला गळा आवळून ठार करण्यात आलं. सुलतान अहंमद तृतीय पदच्युत झाला. आपल्या पूर्वजांप्रमाणेच बंदिवासात पडला आणि ६ वर्षांनी कैदेत असतांनाच मेला. सिंहासन सोडण्यापूर्वी याने आपला पुतण्या महंमुद प्रथमला तख्तावर बसवलं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २४ वा सुलतान महंमुद प्रथम. जन्म. २ ऑगस्ट १६९६. मृ.१३ डिसेंबर १७५४.

मुस्तफा द्वितीय आणि सल्हा सुलतान यांचा हा मुलगा.

महंमुद प्रथम या बंडखोरांच्या परवानगीने सुलतान बनू शकला पण त्याचं आयुष्य बंडखोरांच्याच हाती होतं. या बंडखोरांवर ताबा मिळवायचं काम क्रिमियाच्या खानच्या मदतीने शांत करण्यात आलं. त्यात बंडखोर हलीलला फाशी झाली आणि वातावरण थोडसं निवळलं. पुढच्या २० वर्षांमधे महंमुद प्रथमने पर्शिया युध्द, सफावीद पंथाची घसरण आणि १७३५ ते १७३९ पर्यंत चाललेलं रशिया ऑस्ट्रियाविरुध्द तुर्की युध्द एवढ्या घटना पाहिल्या. ओथमन साम्राज्य अर्थातच मुख्य वजीर चालवत होता. इ. स. १७३६ सालात पर्शियात नादिरशहा सत्तेत आला. अत्यंत पराक्रमी, धाडसी आणि शूर असा हा नादिरशहा, दुसरा अलेक्झांडर-पर्शियाचा नेपोलियन आणि पर्शियाची तलवार म्हणून पर्शियात नावाजला गेला. या नादिरशहाने आपल्या मनगटाच्या जोरावर आजूबाजूच्या देशांमधे धुमाकूळ घातला. सुरुवातीला सफाविद राजवटीत शहाला सैन्य पुरवायचं काम याच्या नेतृत्वाखाली होत असे.

सन १७४३मधे नादिरशहाने ओथमन सुलतानाविरूध्द युध्द पुकारलं. पण त्याला विजय मिळवता आला नाही. शेवटी १७४६-४७ मधे नादिरशहाचा मानसिक तोल सुटला. तो वेड्यासारखा आपल्याच नागरिकांना मारायला लागला. तेव्हा त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी त्याचा खून केला. नादिरशहा नावाच्या वादळाचा असा अंत झाला. (हाच नादिरशहा युध्दासाठी झालेला आपला खर्च वसूल करण्यासाठी भारतात येऊन इ. स. १७३९ मधे दिल्लीच्या मुघल पातशाहीचा थरकाप उडवून गेला होता. त्यावेळी थोरले बाजीराव महाराष्ट्रात संभाजीपुत्र थोरल्या शाहूराजांच्या पदरी पेशवा होते आणि दिल्लीची पातशाही बाजीराव या नावालाही अशीच घाबरत होती.)

इ. स. १७५४ मधे सुलतान महंमुद प्रथमचा आपल्या राजप्रासादातच मृत्यू झाला आणि त्याचा शहजादा अवघ्या तीन वर्षांसाठी सुलतान म्हणून राहिला. त्याचं नाव होतं ओथमन तृतीय. ओथमनच्या पाठोपाठ आला तो मुस्तफा तृतीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २६ वा सुलतान मुस्तफा तृतीय. जन्म. २८जानेवारी१७१७. मृ.२१ जानेवारी १७७४.

अहंमद तृतीय आणि मेहेरुन्निसा कादिन यांचा हा मुलगा.

या सुलतानाचा मुख्य वजीर होता कोका रजिब पाशा. त्याने शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचं धोरण ठेवलं. या सुलतानाने आपला फ्रेंच अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार आपल्या लष्करात मोठे बदल घडवले. नवीन अत्याधुनिक युध्दशस्त्रं आणली. लष्करात मोठे बदल घडवले. आणि फौज समर्थ केली. नवीन धान्य गोदामं बांधली. देशात करवसूलीच्या अनेक सुधारणा केल्या. हा सुलतान अल्पजीवीच ठरला. २४ डिसेंबर १७७३ ला सुलतान मुस्तफा तृतीय, हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावला. यानंतर सुलतान बनला तो अब्दुल हमीद.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २७ वा सुलतान अब्दुल हमीद. जन्म २० मार्च १७२५. मृ. ७ एप्रिल १७८९.

अहमंद तृतीय आणि शर्मी कादिन यांचा मुलगा.

सुलतान अब्दुल हमीद प्रथमच्या सत्ताकाळातच ओथमन साम्राज्य, शेवटचे आचके देण्याइतकं दुर्बल झालं. सुलतान बनण्यापूर्वीचे दिवस यानेही तुरुंगवासातच काढले होते. दुर्बल सुलतान, दुर्बल मुख्य वजीर आणि मोडकळीला आलेलं आर्थिक, सामाजिक, चक्र यात गेल्या शंभर वर्षांपासून खालावत जाणारं चित्र बदललं नव्हतं. हा सुलतान जेव्हा तुरुंगवासात होता, तेव्हा याच्या आईने याला उत्तम शिक्षण दिलं होतं. त्याला सुलेखन पध्दत शिकवली होती. हा अत्यंत धार्मिक विचारांचा होता. त्यामुळे देशवासीय त्याला संत समजत होते. सत्तेत आल्यावर याने नाविक शिक्षणासाठी शिक्षण संस्था काढली. लष्करात नावीन सुधारणा आणल्या. जानिसरीत बदल घडवले. इ. स.१७८२ मधे कॉंस्टंटिनोपलमधे मोठी आग लागली ती विझवण्यासाठी सुलतानाने स्वत: लक्ष घातलं. उत्तम घोड्यांची पैदास करणं ही त्याची आवड होती.

(या सुलतानाच्या आमदानीतच भारतातील मैसूरचा नबाब टिपू सुलतान याने इ. स. १७८० मधे आपले ४ वकील कॉंस्टंटिनोपलला पाठवले होते. टिपू सुलतानला मैसूरच्या नबाबपदावर बसण्याची खलिफाकडून मान्यता आणि इंग्रजांविरुध्द लढण्यासाठी लष्करी मदत हवी होती. नबाबपदाची मान्यता त्याला मिळाली पण लष्करी मदतीची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. पण त्याच काळात रशियाबरोबर झालेल्या युध्दात सुलतानाची फौज अडकलेली असल्यामुळे टिपू सुलतानच्या वकिलांना यश आलं नाही.)

त्यानंतर कुकक कैनारीचा तह २१ जुलै १७७४ ला पार पडला. हा देशाला अधोगतीकडे नेणारा करार या अब्दुल हमीद सुलतानाच्या काळात पार पडला. सुलतान अब्दुल हमीदच्या कारकीर्दीत, रशिया आणि तुर्कांच्या मधे १७६८ पासून चाललेल्या युध्दाचा सन २१ जुलै १७७४ ला शेवट जो झाला तो ओथमन साम्राज्यावर पडलेला जबरदस्त घाव होता, ज्यातून तुर्कांचं सार्वभौमत्व लयाला गेलं. या पराभवामागची खरी सूत्रधार होती ती अत्यंत महत्वाकांक्षी, कुटील, राणी, द ग्रेट कॅथरिन. रशियाचा झार पीटर द थर्ड मरण पावल्यावर त्याची पत्नी कॅथरिनने सर्व सूत्र लगेच आपल्या हातात घेतली होती.

ओथमन साम्राज्याच्या चरित्रात या कराराला एक फार मोठं महत्व आहे. इ. स. १२९९ ला अनातोलियामधे ओथमनच्या रूपाने रुजलेलं तुर्की साम्राज्याचं बीज पुढील प्रत्येक शतकात त्या घराण्यात जन्मलेल्या पराक्रमी वारसांमुळे वाढतच गेलं. हे सर्व दहावा सुलतान सुलेमान द मॅग्निफिसंटच्या काळापर्यंत चाललं. मग सागरालाही ओहोटी असते या न्यायाने ही उतरती कळा ओथमन साम्राज्याला लागली. नियतीचाच तो खेळ असल्यामुळे पुढील पिढ्यांमधे पराक्रमी पुरूष जन्मलाच नाही. जे जन्मले ते व्यसनी निघाले अथवा अल्पायुषी ठरले. त्यानंतर मोठ्या चिरेबंदी वाड्याचा एकेक चिरा ढासळायला लागावा तसा ओथमन साम्राज्याचा महाकाय आकार कमीकमी होऊ लागला.

रशियाची राणी कॅथरिन द ग्रेटने ओथमन साम्राज्यावर हा घाव घालायची रणनीती आखली. तिला तिच्या देशाचं साम्राज्यात रुपांतर करायचं होतं. सन १७६८ पासून या दोन तगड्या देशांच्यामधे झुंज सुरू झाली. त्याचा

शेवट कुकुक कैनारि तहात झाला. तुर्कांच्या वतीने मुसुलजादे महंमद पाशा आणि रशिया तर्फे त्यांचा सेनापती प्युतोर रुमयोन्झी यांच्यात २१ जुलै १७७४ मधे हा करार झाला. ही लढाई कोईलुझाच्या रणांगणावर झाली.

या युध्दाचे अनेक परिणाम झाले. क्रिमिया तुर्कांच्या पंजातून स्वतंत्र झालं पण रशियाचं मांडलिक झालं. वालाकिया आणि मोल्दोव तुर्कांकडे राहिलं पण या दोन ठिकाणच्या ख्रिश्चनांच्या संरक्षणाचे हक्क रशियाकडे राहिले. त्यानिमित्ताने तुर्कांच्या कारभारात ढवळाढवळ करण्याची संधी रशियाला मिळाली. अझोवावर रशियाने हुकमत हस्तगत केली. त्यामुळे अझोव समुद्रातून काळा समुद्र आणि भूमध्य सागराचा जलमार्ग रशियाला खुला झाला. ओथमन साम्राज्यांचा या दोन जलमार्गावरचा ताबा संपला. रशियाची जहाजं आता या काळा समुद्र, भूमध्य समुद्र आणि बॉस्फरस आणि दर्दनेल्स या सामुद्रधुनीतून जाऊ शकणार होती. कॉंस्टंटिनोपलमधे ख्रिश्चन चर्च उभारण्याची सवलत रशियाला मिळाली. सुलतान ओर्हानपासून, १३ व्या शतकाच्या सुरूवातीपासून ख्रिश्चनांचं जे इस्लामीकरण सुरू झालं होतं आणि जी गुलामांची वागणूक ख्रिश्चनांना मिळत होती ते दिवस संपले. रशिया स्वतंत्र, समर्थ, सार्वभौमाकडे वाटचाल करणारा झाला. त्याचवेळी ओथमन साम्राज्य निस्तेज व्हायला लागलं. १३०० सालापासून १७७४ सालापर्यंत, ५७५ वर्षे सर्वश्रेष्ठ असणारी ओथमन सत्ता विलयाला जाऊ लागली. साम्राज्याचा घसरणीचा काळ जोरात जवळ येऊ लागला.

कुकक कैनारी तहाने रशियाला ओथमन साम्राज्यातील चर्चमधे हस्तक्षेप करायला मिळाल्यावर रशियाने त्या संधीचा पुरेपुर फायदा घेतला. त्याचा अतिरेक इतका झाला की सुलतान अब्दुल हमीदने रशियावर परत एकदा १७८७ मधे आक्रमण केलं. ऑस्ट्रियाने रशियाशी हातमिळवणी केली. परत एकदा रशिया-तुर्की फौजा एकमेकांना भिडल्या. ६ डिसेंबर १७८८ या दिवशी चाकोव्ह रशियाने जिंकलं. पण त्यातील सर्व नागरिक कापून काढले. किलबर्न इथे तुर्की फौजेचा सपशेल पराभव झाला. ह्या भयंकर नरसंहाराने व्यथित झालेला हा अब्दुल हमिद सुलतान ४ महिन्यात मरण पावला.

सन १७८९ मधे हृदयविकाराच्या दुखण्याने हा अब्दुल हमीद सुलतान वयाच्या ६४ व्या वर्षी मरण पावला. इस्तंबूलच्या फत्ते मशिदीत त्याचा दफनविधी झाला. त्याच्या जागी आला तो सलिम तृतीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २८ वा सुलतान. सलिम तृतीय. जन्म २४ डिसेंबर १७६१. मृ. २८ जुलै १८०८.

मुस्तफा तृतीय आणि मिहरिसवा सुलतान यांचा मुलगा.

एकोणीसावं शतक उजाडलं ते वेगळ्याच घटनांची मालिका घेऊन. आजपर्यंत ओथमन साम्राज्यामुळे घडत गेलेल्या सर्व राजकीय, सामाजिक आणि धार्मिक विश्वात जी सरमिसळ होत गेली होती तिचे दुष्परिणाम आता दिसू लागले होते. प्रचंड मोठ्या झालेल्या साम्राज्याच्या डोलाऱ्यामुळेही अनेक गैर मार्गांना फाटे फुटले होते. जबरदस्तीने केलेल्या धर्मांतरामुळे, त्यांच्यात झालेल्या विवाहांमुळे, सुलतानांनी आणलेल्या परदेशातील राण्यांमुळे निखळ तुर्कींची संख्या खूप कमी झाली होती. जानिसरिजचं सामर्थ्य वाढण्यामुळे, दुर्बल सुलतानांमुळे आणि कारभारावर वचक नसलेल्या मुख्य वजीरांमुळे साम्राज्याचं तारू भरकटायला लागलं होतं. तशातच युरोपियन राष्ट्रांमधे वैचारिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, औद्योगिक क्रांतीमय सुधारित बदलांमुळे आपण या सर्व क्षेत्रात फार मागे आहोत याची ओथमन साम्राज्यातील विचारवंतांना हळूहळू जाणीव व्हायला लागली होती. त्यातूनच काही विचारवंत एकत्र येऊन आपली राजसत्ता याला कारण आहे या निष्कर्षाला आली होती. मरत चाललेल्या देशाला वाचवायचं असेल तर युरोपातील वैज्ञानिक आणि शैक्षणिक बदल आपल्याकडेही आले पाहिजेत हे विचारमंथन व्हायला लागलं होतं. जेव्हा ओथमन सैन्य पुढारलेल्या देशांमधे लढायला जात असे तेव्हा त्या सैन्यांची शिस्त, गणवेश, मोकळे विचार यांचा प्रभाव या सैनिकांवर पडत असे. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेतही बदलाची गरज जाणवायला लागली होती. या सर्व विचारवंतांना आणि लष्कराला दिसत होती ती फ्रेंच राज्यक्रांती. नेपोलियन या उगवत्या ताऱ्याने फ्रान्समधे त्यांच्यासमोर क्रांतीचा आदर्श निर्माण केला होता. फ्रान्समधील राजघराणं जर मोडू शकतं तर आपल्या ओथमन घराण्याचाही बदल घडवायला लागेल असं साम्राज्यातील प्रभावी विचारवंतांना वाटायला लगलं होतं. लोकांचा विरोध आणि बदलती मानसिकता लक्षात घेऊन सुलतानांनीही थोडेफार बदल घडवायला सुरूवात केली. पण आपली शक्ती कमी होणार हे लक्षात आलेली जानिसरिज फौज नवीन विचारांना सपाटून विरोध करायला लागली. त्यामुळे देशाचं प्रगतीचं गाडं पुढे हलेना. मुख्य वजीराचीही या जानिसरिजला साथ होती.

१९ व्या शतकाची सुरूवात अशा स्थित्यंतराने सुरू झाली होती.

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला चारच देश महत्त्वाच्या महाशक्ती होत्या. रशिया, फ्रान्स, इंग्लंड आणि ऑस्ट्रिया. प्रशिया अजून दुसऱ्या क्रमांकावर होता आणि इटाली बाल्यावस्थेत होता. फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टने ओथमन तुर्की तरूणांना एक क्रांतीचं स्वप्न दिलं होतं. त्यामुळे फ्रेंचांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आदर निर्माण झाला होता. सुलतानशाहीमुळे आपल्या पायात सुधारणांच्या आणि वैचारिक स्वातंत्र्याच्या बेड्या पडल्या आहेत याची जाणीव देशातील विचारवंतांना व्हायला लागली होती. छापखान्यात छापले गेलेले नवीन विचार तरुणांपर्यंत पोचायला लागले होते. त्यामुळे विद्यालयीन सामान्य तरुणांनाही नवीन विचार, कळायला लागले होते.

नवीन आलेल्या सलिम तृतीय सुलतानाने या वास्तवाची दखल घेतली. त्याने आपल्या देशाचा कारभार सुटसुटीत करण्यासाठी ओथमन साम्राज्यातील प्रदेशांचे तीन भाग वेगवेगळे केले. प्रत्येक प्रांतावर एक अधिकारी नेमला. त्याला पाशा ही पदवी दिली. त्याच्या हाताखाली तीन अधिकारी दिले. आशिया युरोप आणि आफ्रिका खंडात असणारे प्रांत जे तयार झाले ते २६ प्रांत होते, आणि १२६ जिल्हे होते. लष्करात पगारी आणि बिनपगारी फौज निर्माण केली. फ्रेंच धर्तीवर नवीन सैनिकांचीही भरती केली. या फौजेला निझाम-ऐ-झदिद या नावाने ओळखलं जाऊ लागलं. या सर्व सुधारणांसाठी फ्रेंच अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला गेला. फ्रेंच राजदूत सबास्तिनि हा सुलतानाचा मुख्य सल्लागार होता. यामुळे देशावर सुलतानावर, वजीरावर एकेकाळी सत्ता गाजवणारी जानिसरिज फौज एकदम शक्तिहीन बनली. सुलतानाने मुख्य वजीराची कारभारातील ताकदही कमी केली. देशातील सरंजामशाही मोडून काढली. जमीन कसणाऱ्या माणसाचा मृत्यू झाला की ती जमीन सरकारजमा होऊ लागली. सारा वसूलीसाठी वेगळेच अधिकारी नेमले गेले. दर ३ वर्षांनी नवीन सुभेदारांची नेमणूक व्हायला लागली. यामुळे सुभेदारांचे पंख कापले गेले. प्राथमिक शाळा, महाविद्यालये, छापखाने यांना प्रोत्साहन दिलं. मुख्य वजीराची ताकद कमी करण्यासाठी मुख्यमंत्र्याला कारभारात जबाबदार धरलं जाऊ लागलं. त्यामुळे मुख्यमंत्री सक्षम झाला. सुलतानाचे हुकूम न पाळणारे गव्हर्नर्स सुलतानाच्या पाळतीमुळे जबाबदारीने वागू लागले. या सर्व सुधारणांचा एकच परिणाम झाला.

तो म्हणजे सलिम तृतीयला ठार मारण्यात आलं. जानिसरीजच्या सामर्थ्याला लगाम लावणाऱ्या सलिम तृतीयच्या विरूध्द जानिसरी फौज लागली तेव्हा सलिम जीव वाचवण्यासाठी टोपकप्प राजवाड्यात पळून आला तिथे शहजादा मुस्तफा उभाच होता. सलिम तृतीयने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण मुस्तफाने त्याला वाचवलं. सलिम तृतीयच्या या पदच्युतीची माहिती कळल्यावर त्याचा पाठीराखा, मुस्तफा बैरखदार नावाच्या सेनाधिकाऱ्यांने फौज जमवून राजवाड्यावर हल्ला केला. त्यानंतर मुस्तफाने सलिम तृतियला आणि त्याच्या भावाला महंमुदला ठार केलं, फौजेला सलिमचं शव दाखवण्यात आलं. आणि मुस्तफा चतुर्थ सुलतान बनला. मुस्तफानेच एकदा सुलतान सलिमला वाचवलं आणि मग त्यानेच ठारही केलं.

सलिम ठार झाला. त्याचं दफन इस्तंबूलमधेच लालेलि मशिदीत झालं. त्याच्याबरोबर त्याने केलेल्या सुधारणांचाही शेवट झाला. आजवर क्रौर्य, खून, या मार्गाने जाणारे तुर्क अजूनही बदल घडवायच्या मानसिकतेला पोचले नव्हते. त्यांच्या वैचारिक बदल झाला नव्हता. नव्या युगाचे नवीन वारे त्यांच्यापर्यंत पोचलेच नव्हते.

सुलतान सलिम तृतीयनंतर सुलतान बनला तो मुस्तफा चतुर्थ.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## २९ वा सुलतान मुस्तफा चतुर्थ. जन्म. ८ सप्टेंबर १७७९. मृ.११ नोव्हेंबर १८०८.

अब्दुल हमीद आणि सिनेपरवर यांचा मुलगा.

हा शहजादा सुलतानपदावर एकच वर्ष टिकला. मुस्तफाने सलिम आणि त्याचा सख्खा भाऊ महंमद द्वितीयला राजवाड्यात ठार केलं होतं. पण महंमद द्वितीय जिवंत राहिला होता कारण राजवाड्यातील हमामखान्यातील, न्हाणीघराच्या शेगडीत तो लपून बसला होता. बाहेरची दंगल शांत झाल्यावर तो बाहेर आला. त्याने आपला वारसा हक्क शाबित केला, जानिसरी फौजेच्या मदतीने सुलतान बनलेल्या मुस्तफाला काढून टाकण्यात आलं. आपल्या इतर पूर्वजांप्रमाणेच खून होऊन तो जग सोडून निघून गेला.

मग सन १८०८ मधे सुलतान बनला तो महंमुद द्वितीय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ३० वा सुलतान महंमुद द्वितीय. जन्म. २३ जुलै. १७८५. मृ. १ जुलै १८३९.

अब्दुल हमीद प्रथम आणि नक्शदिल सुलतानाचा हा मुलगा. टोकाप्प राजवाड्यात याचा जन्म झाला.

महंमुद द्वितीयचं सुलतान बनणं हा एक नियतीचा चित्तथरारक खेळ होता. जानिसरिज सैनिकांनी सलिम तृतीयला आणि महंमद द्वितीयला ठार केलं. पण महंमुद जिवंत होता. त्याची आई नक्षदिल वालिद सुलतानाने महंमुदला वाचवलं आणि न्हाणीघराच्या पाणी तापवण्याच्या शेगडीत लपवून ठेवलं. जानिसरिजचे बंडखोर निघून गेल्यावर महंमुद द्वितीय सुलतानला म्हणून घोषित करण्यात आलं. त्याला वाचवण्यात जो प्रमुख होता तो मुस्तफा पाशा मुख्य वजीर म्हणून नियुक्त झाला. या सुलतानाच्या कारकीर्दीत ओथमन साम्राज्यात आणि त्याच्या शेजारील युरोपियन देशांमधे अनेक परिवर्तनं घ़डली.

फ्रान्समधील राज्यक्रांतीनंतर आधीच्या शतकापासून चालू झालेला हा काळ युरोपात नेपोलियनच्या तडाखेबाज विजयांच्या मालिकांचा होता. युरोपातील सगळं राजकारण नेपोलियन बोनापार्ट आपल्या मुठीत घेऊन नाचवत होता. त्याचं रशियाशी युध्द चालू होतं. इ. स. १८०८ च्या काळात या वेळी युरोपियन राजकारणात फ्रान्समधल्या नेरमन नदीच्या काठावर, टिलसित झालेला तह, सत्तेचा लंबक परत हलवून गेला. त्यामुळे रशिया आणि फ्रान्समधे चाललेलं युध्द थांबलं. नेपोलियनने जिंकलेल्या प्रदेशाचे तीन भाग केले त्यावरही या टिलसित करारातून मान्यता मिळाली. रशियाला युध्दात मदत करणं आणि रशियाने फ्रान्सला मदत करणं हे या कराराने नक्की झालं. हे करार दोन वेळा झाले. ७ जुलै १८०७ मधे रशियाचा झार अलेक्झांडर प्रथम बरोबर, पहिला रशिया आणि फ्रान्समधे. ९ जुलै १८०७ मधे दुसरा प्रशिया आणि फ्रान्समधे.

महंमुद द्वितीय सुलतान बनला तेव्हा नेपोलियन ऐन पराक्रमाने चमकत होता. नेपोलियन दुहेरी खेळ खेळत होता. एकिकडे रशियाला कमकुवत करण्याचा डाव होता आणि दुसरीकडे ऑस्ट्रियाशी ओथमन साम्राज्य वाटून घेण्याची लालूच दाखवून स्वत: ससलतानाशी चाललेलं युधआद लांबवत बसला होता. पण नेपोलियनला पुरुन उरला तो इंग्लंडचा परराष्ट्र राजदूत, मुत्सद्दी कॅनिंग.. त्याने नेपोलियनचा दुटप्पीपणा उघड करत नवीन करार अंमलात आणला तो बुखारेस्टचा इ. स. १८१२ मधे घडून आलेला करार. युरोपवर नेपोलियनच्या ग्रँड आर्मीने दरारा निर्माण केला होता. त्याच्या आग्रहामुळे रशियाने तुर्कांशी १८१२ मधे बुखारेस्ट तह केला. तुर्कांना सगळा मुलुख परत केला. पण वालाकिया आणि मोलदिविया दिले नाहीत. इंग्लंडने नेपोलियनचा पराभव केल्यावर महंमद अली पाशा वजीराने १८१३ मधे मक्का आणि मदिना परत जिंकून घेतलं. इ. स. १८१५ मधे फ्रान्सचं नेपोलियन नावाचं वादळ शांत झालं.

नेपोलियनमुळे घडलेल्या, युरोपियन विश्वाला विस्कटून टाकणाऱ्या लढायांमुळे कारण ठरलेला सन १८१४-१५ सालचा, रशिया-प्रशिया-ऑस्ट्रिया आणि इंग्लंड या प्रमुख महासत्तांमधे व्हिएन्ना करार पार पडला. ऑस्ट्रियाचे युवराज आणि परराष्ट्रमंत्री, क्लेमेन मेटेरनिच यांच्या पुढाकाराखाली झालेला हा करार युरोपसाठी

अत्यंत महत्वाचा होता. युरोपात शांतता नांदावी म्हणून बॉस्फरस सामुद्रधुनी युध्दनौकांसाठी वापरणं बंद करण्याचा निर्णय व्हिएन्नात भरलेल्या महासत्तांच्या परिषदेत घेण्यात आला. हा इ. स. १८१५ चा व्हिएन्ना करार, भविष्यातील जग बदलून टाकणाऱ्या बदलांची नांदी म्हणून गाजला. फ्रान्सच्या वाढत्या आक्रमणांवर आवर घालणं, युरोपातील देशांमधे सत्तेचा समतोल ठेवणं हा या कराराचा मुख्य उद्देश होता. व्हिएन्ना करारात आणखी एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला तो म्हणजे, नेपोलियनमुळे झालेल्या लढायांमधल्या सर्व देशांच्या सीमांच्या रेषा पूर्ववत करण्यात आल्या.

१९ व्या शतकाची ओथमन साम्राज्याच्या इतिहासात नोंद आहे ती "तांझिमात" म्हणजे पुनरुत्थानाचा काळ अशी, ज्यामुळे ओथमन तुर्कांच्या वैचारिक पुरोगामी पध्दतीची लक्षणं दिसू लागली. पुरातन, पारंपारिक सुलतानी एकाधिकारशाहीचे दुर्गुण जनतेच्या, विचारवंतांच्या, पुरोगामी विचारसरणीच्या लोकांना दिसायला लागले आणि त्यातून त्यांनी तो मार्ग टाकून प्रजासत्ताक या नव्या संसदीय मार्गाची निवड केली. हा काळ इ. स. १८३० पासून सुरू झाला.

पण या काळात सुलतान महंमुद द्वितीयला अनेक आव्हानांना सामोरं जावं लागलं. तो मार्ग खाचखळग्यांचा होता. याच्याच काळात ओथमन सत्तेखाली असलेले देश स्वतंत्र व्हायला लागले. सन १८२१ पासून ग्रीकांची स्वतंत्र होण्यासाठी चळवळ सुरू झाली होती. त्या मागे रशियाची चिथावणी होती. ग्रीसची ही चळवळ मोडून काढायला सुलतान महंमुद द्वितीयने इजिप्तचा गव्हर्नर महंमद अली पाशाला मदतीला बोलावलं. त्यात मोठा नरसंहार झाला पण काही भाग सुलतानाकडे राहिला. त्याचवेळी रशिया, इंग्लंड आणि फ्रेंच युध्दनौका ओथमन इजिप्तच्या नाविक दलाशी लढण्यात उतरल्या. त्या झगड्यात ओथमन नाविक दलाचा नवरिनो उपसागरात पुरता पराभव झाला. या लढ्यात ग्रीसला स्वातंत्र्य मिळालं.

त्याआधी महंमुद द्वितीय सुलतानाने ग्रीसच्या लढाईत मदत केल्यास, इजिप्तचा सुभेदार महंमुद अली पाशाला सिरियाचा आणि तार्तसचाही सुभेदार करण्याचं कबूल केलं होतं. त्यासाठी गव्हर्नर महंमद अली पाशाचा मुलगा सुलतानाच्या मदतीलाही गेला होता. पण ग्रीसशी लढाई संपल्यावर सुलतानाने सिरियाचं सुभेदारपद नाकारलं तेव्हा संतापलेल्या पाशाने मुलाला बरोबर घेऊन स्वतःच सिरियावर हल्ला केला. सन १८३२ मधे कोनयामधे ओथमन फौजेचा धुव्वा उडवला आणि महंमुद पाशाच्या फौजा जेव्हा कॉंस्टंटिनोपलवर चालून यायला लागल्या तेव्हा सुलतान महंमुद द्वितीयने इंग्लंडची मदत मागितली. पण इंग्लंडचा मित्र फ्रान्स, ग्रीसला मदत करत असल्यामुळे इंग्लंडने मदत दिली नाही. त्यामुळे सुलतानाने रशियाकडे मदतीची याचना केली. धूर्त रशियाने ही सुवर्णसंधी गमावली नाही. रशियाच्या फौजा सुलतानाच्या मदतीला गेल्या. त्यानिमित्ताने रशियाच्या युध्दनौका बॉस्फरस सामुद्रधुनीतून प्रवास करायला मोकळ्या झाल्या. सुलतानाला रशियाने आपलं नाविक दल लगेच मदतीला पाठवलं. सुलतान महंमुद द्वितीयने सिरियावर हल्ला केला पण २४ जुलै १८३९ मधे सुलतानाच्या फौजांचा निझीप इथे पराभव झाला. महंमद अली पाशाचा सूड उगवायच्या भावनेतून महंमुद द्वितीय सुलतानाने सिरियावर हल्ला करण्यासाठी फौजा पाठवल्या पण त्यात ओथमन फौजांचा पराभव झाला. आता रशिया बळावेल

या भीतीने इंग्लंड आणि फ्रान्सने सिरिया रशियाला देऊन युध्दसमाप्ती घडवून आणली. हा तह कर्तिबामधे झाला. या काळात युरोपातील सत्तेच्या तराजूची पारडी सतत खालीवर होत राहिली.

ग्रीसच्या पाठोपाठ ग्रीसप्रमाणेच फ्रान्सच्या मदतीने अल्जेरियाही स्वतंत्र झाला.

या लढायांच्या पराभवातून सुलतान महंमुद द्वितीय एकच धडा शिकला. तो म्हणजे लष्कर आणि राज्यकारभारात नवसुधारणा करण्याची वेळ जवळ आली आहे याची त्याला जाणीव झाली. आपलं लष्कर सामर्थ्यवान करण्यासाठी त्याने जहागिरदारांकडून येणारी फौजेची मदत घेणं बंद केलं. कारण त्यात वाट्टेल त्या शिपायांचा भरणा असे. त्यासाठी सुलतानाने लष्करी शिक्षणासाठी नवीन शाळा उघडल्या. आपल्या अधिकाऱ्यांसाठी प्रशियाहून लष्करी अधिकारी आमंत्रित केले. आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी इंग्लंडमधे पाठवलं.

त्याचा सर्वात धाडसी निर्णय होता तो संपूर्ण जानिसरीजचंच उच्चाटन करून टाकणे. या निर्णयामुळे ओथमन तुर्कांच्या प्रगतीचा, आधुनिकीकरणाचा मार्ग मोकळा होणार होता. हा निर्णय सुलतानाने १६ जून १८२६ मधे अंमलात आणला. या दिवशी १४,००० प्रशिक्षित फौजेसकट सुलतानाने जानिसरिज फौजेवर हल्ला केला. त्यामुळे जानिसरिज फौज संपुष्टात आली. त्यात सल्लागार होता तो इजिप्तचा महंमद अली पाशा. सुलतान महंमुद द्वितीयने जानिसरिजला संपवण्यासाठी नवीन फौज उभारली. तिला कवायती शिक्षण दिलं गेलं. जनतेसाठी युरोपियन राहणीचा पुरस्कार केला. सुलतान महंमुद द्वितीयला तुर्की विचार, राहणी आवडत नसे. म्हणून त्याने आपल्या जनतेसाठी युरोपियन राहणीचा पुरस्कार केला. त्यामुळे युरोपियन पध्दतीचा पोशाख जनतेत लोकप्रिय होऊ लागला. ओथमन साम्राज्यातील तांझिमातची म्हणजे आधुनिकीकरणाची ती पहाट होती. सुलतानाने सरकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यायला सुरूवात केली. त्यांचे पगार वाढवले. सारावसुलीत नवीन सुधारणा आणल्या. साम्राज्याच्या प्रांतीक गव्हर्नरांना देहांताच्या शिक्षेचा जो अधिकार होता, तो काढून घेतला गेला. या सर्व सुधारणांमुळे मध्यवर्ती केंद्रिय सत्ता सामर्थ्यवान ठरली.

सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सुलतानाने देशात प्राथमिक शाळा सुरू केल्या, आपल्या देशातील हुशार मुलांना युरोपियन शिक्षणासाठी परदेशात पाठवलं. जुनाट सनातनी विचारांच्या देशातील सुलतान महंमद द्वितीयचं हे धडाडीचं पाऊल होतं. त्याची आणखी एक सुधारणा म्हणजे तीरंदाजी कलेला त्याने दिलेलं प्रोत्साहन. आपल्या देशातील मुस्तफा कानी या तीरंदाज पटुला तीरंदाजीवर पुस्तक लिहायला सांगितलं

इ. स. १८३९ मधे सुलतान महंमद द्वितीयचा क्षयाने मृत्यू झाला. निजिब इथला ओथमन तुर्की फौजेचा झालेला पराभव सुलतानाच्या कानावर पोचण्यापूर्वीच सुलतान महंमुद मरण पावला होता. पुढचा सुलतान बनला तो त्याचा मुलगा अब्दुल मजीद. हा नवीन सुलतान आला तेव्हा १९ व्या शतकाच्या या पहिल्या ४० वर्षांमधे युरोपियन खंडावर अनेक लढाया आणि करारांनी वेग घेतला होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ३१ वा सुलतान. अब्दुल मजिद. जन्म २५ एप्रिल १८२३. मृ. २५ नोव्हेंबर १८६१.

महंमद द्वितीय आणि बेझमाइलान सुलतानचा हा मुलगा.

अब्दुल मजीद ना कसलेला योध्दा होता, ना उत्तम प्रशासक. याचं शिक्षण परदेशात झालं होतं. हा सुलतान फ्रेंच भाषा सफाईदारपणे बोलत असे. साम्राज्य उतरणीला लावायचं असेल तर ज्यांच्यामुळे उतरणीला वेग येईल अशा योग्यतेचा होता. मात्र त्याचे तीन प्रशासक रशिद पाशा, फौद पाशा, आणि अली पाशा हे सुधारणावादी विचारांचे आणि मोठ्या कर्तृत्वाचे होते. पुनर्निर्माणाच्या काळात ओथमन साम्राज्याला यांचीच गरज होती. रशिद पाशाला ब्रिटीश राजदूत स्ट्रॅटफोर्ड कॅनिंग याचा सल्ला आणि मार्गदर्शन मिळत गेलं. कॅनिंगने खूप सुधारणा आणल्या. त्यात ख्रिश्चन मुसलमान भेद केला नाही.

जॉन रसेल हा १८४६ ते ५२ या कालात इंग्लंडचा पंतप्रधान व्हिक्टोरियाच्या काळातील होता. त्याने ओथमन साम्राज्याचं वर्णन "अंथरूणाला खिळलेला रुग्ण" अशी संभावना केली होती.

ओथमन साम्राज्यातील तांझीमात काळ धरला जातो तो सन १८३० पासून सुरू झाला आणि १८७६ सालापर्यंत चालला. घसरणीला लागलेलं साम्राज्य सावरणं, आकुंचत पावत चाललेल्या सीमा परत विस्तारणं, औद्योगिक क्रांतीचा पाया रोवणं, खजिन्यातील सतत होणारी तूट भरून काढणं आणि सतत होणारे युध्द पराभव थांबवणं या सर्वांसाठी ह्या काळाची नितांत आवश्यकता होती. त्या गरजांप्रमाणे धोरणं आखली गेली आणि अंमलात आणली गेली तो काळ म्हणजे तांझीमात काळ. या सर्व सुधारणांवर फ्रान्सच्या विचारांचा प्रभाव होता. या सर्वांमुळे पारंपारिक कट्टरवाद्यांचा काळ संपत आला.

सुलतान अब्दुल मजीदने ३ नोव्हेंबर १८३९ या दिवशी खास फर्मान काढून राष्ट्राची पुनर्बांधणी करायचं ठरवलं. त्यात रशिद पाशा, फौद पाशा, आणि अली पाशा या तिघांनी सुधारणांचा सपाटा लावला. पण त्याला मूर्त आणि अधिकृत स्वरूप सुलतान अब्दुल मजीदच्या फर्मानाने मिळालं. पहिल्या प्रथम साम्राज्यासाठी राष्ट्रगीत रचलं गेलं आणि राष्ट्रध्वज तयार झाला.

यातील मोठ्या सुधारणा म्हणजे १. देशातील सर्व मुस्लिम आणि मुस्लिमेतर नागरिकांना समान हक्क मिळाले. २. करप्रणालीतही समानता आली. ३. ख्रिश्चनांना करसवलती मिळाल्या. ४. मदरशातील धार्मिक शिक्षण बंद झालं. ५. नवीन प्राथमिक शाळा, कॉलेजं निघाली. ६. व्यापाराला चालना मिळावी म्हणून उद्योगांच्या आड येणारे कायद्याचे अडसर दूर करण्यात आले. ७. युरोपियन शिक्षणप्रणाली उचलली. ८. देशातील नागरिकांना वैचारिक स्वातंत्र्य मिळालं. युरोपातील नवविचारांचा प्रभाव नवीन पिढीवर पडायला लागला. ९. तुर्की फौजांचा युरोपियन सैन्याशी संपर्क आल्यामुळे त्यांच्या शिस्तीची, शिस्तशीर हालचालींचा फायदा तुर्की फौजेला कळायला लागला. १०. अत्याधुनिक युध्दसाहित्याने युरोपियन सेना जिंकतात हे लक्षात आल्यामुळे त्या शस्त्रांची गरज सैन्याला भासायला लागली. ११. लष्करासाठीही नवीन कायदे निघाले. त्यातून लष्करी अधिकाऱ्यांमधेही बदल

झाले. १२. नवीन न्यायालये, वकील, न्यायमूर्ती तयार झाले. १३. त्यांच्या आचार विचारच नव्हे तर राहणी, वेषभूषेचाही प्रभाव नव्या पिढीवर पडायला लागला. १४. मुसलमानांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारणं शिक्षेला पात्र राहिलं नाही. असे अनेक बदल सरकारात झाले. या नवीन सुधारणांचा तरूण वर्गावर मोठा प्रभाव पडला. १५. याच काळात पोस्ट ऑफिसांची निर्मिती झाली. १६. कागदी नोटांचं चलन सन १८४० मधे चलनात आलं. १७. दिवाणी गुन्हेगारीसाठी नवीन कायदे तयार झाले. १८. सन १८४४ मधे जनगणना प्रथमच घेतली गेली. पण त्यात स्त्रियांचा समावेश नव्हता. १९. प्रत्येक नागरिकाला ओळखपत्रांची सक्ती करण्यात आली. २० गुलाम आणि गुलामांचे विक्री बाजार बंद करण्यात आले. या सर्व सुधारणांमुळे ओथमन साम्राज्याची संसदीय राज्यपध्दतीकडे वाटचाल सुरू झाली.

त्यातून यंग टर्क नावाचा तरूण वर्ग तयार झाला. एवढ्या सवलती आणि एवढ्या सुधारणा केल्यावरही तांझीमातचं, नवयुगाचं स्वप्न सत्यात उतरलं नाही. जनतेची मानसिकता अजून तयार झाली नव्हती. त्यामुळे प्रगती भराभर झाली नाही.

सुलतान अब्दुल मजिदच्या कारकीर्दीतील सर्वात मोठी घटना म्हणजे युरोपात इ. स. १८४८ मधे युरोपातील ५० देशांमधे घडून आलेली क्रांती. ही क्रांती सशस्त्र उठावाची नव्हती, लष्कराची नव्हती, तर वैचारिक लोकाग्रहाची होती. एकापाठोपाठ एक राष्ट्र या बंडखोरांच्या उठावामुळे ग्रासलं गेलं. या बंडाची सुरुवात इटालीतील सिसिलिमधून झाली. आणि साथीचा रोग पसरावा तशी सीमा पार करत सर्व युरोपभर ही क्रांती पसरली. ही राज्यक्रांती स्प्रिंग ऑफ नेशन्स या नावानेही ओळखली जाते. आणखी एक मोठा मानसिक बदल म्हणजे राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. यात बंडखोरांची प्रमुख मागणी प्रजासत्ताक राष्ट्र हवं अशी होती. राजेशाही राजवटीचा शेवट व्हावा ही त्यांची इच्छा होती. याला कारण होतं ते याच काळात घडून आलेली औद्योगिक क्रांती हे होतं. इंग्लंडमधे वाफेच्या इंजिनाचा शोध लागला, रेल्वे सुरु झाली, आणि तिच्या सर्व देशाला जोडणाऱ्या जाळ्यामुळे, सर्व जगच बदलून गेलं. कारखाने निघाले, त्यातून उद्योजक मालक वर्ग, मध्यम वर्ग, कामगार वर्ग, असा नवीन समाज निर्माण झाला. गुलाम पध्दत बंद झाल्यामुळे गुलामांचे बाजारही बंद झाले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्स आणि ऑस्ट्रियाविरुध्द बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली, जर्मनीने केलेल्या आक्रमणामुळे जर्मनीचा नकाशा बदलला. ग्रीस सन १८३० मधे आधीच स्वतंत्र झालं होतं. ऑस्ट्रिया-हंगेरी यांच्यात फूट पडली पण नंतर ते एकत्र आले. रोम इटालीला मिळालं पण पोपने सेंट पिटरची भूमी रोमला द्यायचं नाकारलं. अफेअर्स ऑफ डचिज यामधे परत देशांची सीमारेषा बदलली. बेल्जियम, सर्बियाही स्वतंत्र झाले. एवढा मोठा, देशांचे नकाशे, सीमारेषा बदलून टाकणारा इतिहास या शतकात घडला.

विचारवंतांनी वैचारिक बदल घडवून आणले ते छापखान्यांमुळे पुस्तकांमधून, लेखांमधून सर्व देशांमधील सुजाण नागरिकांपर्यंत पोचले. यातच आणखी एका विचारवंताची भर पडली. तो होता कार्ल मार्क्स. त्याच्यामुळे साम्यवादाचा प्रसार झाला. या सर्व उठावाला कारण होतं ते म्हणजे अन्नधान्याचं दुर्भिक्ष्य, आर्थिक मंदी, औषधांमुळे वाढलेलं जीवनमान आणि त्यामुळे वाढलेली लोकसंख्या. राजसत्ताक पध्दती असलेले युरोपातील

सर्वच देश या उठावामुळे ही क्रांती चिरडून टाकण्याच्या मागे लागले. काही देशांमधे हा प्रयोग सपशेल फसला. पण त्यातून अनेक देश स्वतंत्रही झाले.

या काळात ओथमन सरकार स्वत:ला या क्रांतीकारकांपासून कसं वाचवायचं या चिंतेत होतं. कारण बाल्कन द्वीपकल्पातील देशांमधे चालू झालेली ही प्रजासत्ताक राजवटीची मागणी सुलतानांनाही संपवणारी होती. बोस्नियातून अनेक तरुण बंडखोर सीमा ओलांडून ओथमन देशात उठाव करण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. ओथमन सरकारने मग गुप्तहेरांच्या मार्फत देशात येणाऱ्या लोकांवर पाळत ठेवण्याचं काम चालू केलं. परदेशातून येणाऱ्या प्रवाशांसाठी ओळखपत्र तयार करण्यात आली. परदेशातील क्रांतीकारकांवरही लक्ष ठेवण्यात आलं. ओथमन सुलतानाला या युरोपियन उठावाचा सामना करावा लागला नाही, पण समाजात पसरू लागलेले नवविचारांचे वारेही सरकार थांबवू शकलं नाही.

या सुधारणा चालू असतानांच क्रिमियन युध्दाने रणांगण गाजलं. ऑक्टोबर १८५३ ते फेब्रुवारी १८५६ पर्यंत हे युध्द चाललं. याचं कारण वेगळंच होतं. या लढाईत रशियाची ओथमन, इंग्लंड, फ्रान्स या सर्वांशी असलेली दोस्ती संपली. ख्रिश्चनांची पवित्र भूमी, होलि लँड ही ओथमन साम्राज्याचा भाग होती. फ्रेंच सरकारने रोमान कॅथॉलिक आणि रशियाने इस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्चची बाजू घेतली. या भांडणात इंग्लंड आणि फ्रान्सला, विझत आलेल्या ओथमन साम्राज्याचा भाग रशियाकडे मिळू द्यायचा नव्हता. रशियाचा झार निकोलस आणि फ्रान्सचा नेपोलियन तृतीय यांच्यात समझोता झाला नाही. रशियाच्या झारने, ओथमन तुर्की देशातील ख्रिश्चनांना रशियाच्या संरक्षणाखाली घेण्याची योजना जाहीर करून टाकली. इंग्लंडने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. फ्रान्स आणि इंग्लंडकडून मदत मिळते आहे हे पाहून ओथमन सुलतानाने रशियाविरूध्द युध्दच पुकारून टाकलं. बाल्कन देशांमधे युध्दाला सुरूवात झाली. मुख्य वजीर ओमर पाशाच्या हाताखाली तुर्कांची फौज गोळा झाली. सिनोपजवळ तुर्कांनी मार खाल्लेला पाहून इंग्लंड आणि फ्रान्स सुलतानाच्या मदतीला आले. इंग्लंडने काळ्या समुद्रावरील क्रिमियन द्वीपकल्पावरील सेवास्तोपोल इथला रशियाचा नाविक तळ उध्वस्त करून टाकला. दोन्ही पक्षांची झुंज चालूच राहिली. शेवटी विजय इंग्लंड आणि फ्रान्सचा झाला. रशियाने तहाचा प्रस्ताव मांडला.३० मार्च १८५६ या दिवशी पॅरिसमधे रशिया आणि दोस्त राष्ट्रांमधे तह झाला.

या लढाईचं वैशिष्ट्य हे की या युध्दात प्रथमच, नवीन तंत्रज्ञनाचा उपयोग करण्यात आला. आगगाडी आणि टेलिग्राफचा नवीन शोध लागला होता, त्याचा वापर केला गेला. यावेळी चित्रीकरणाचाही वापर केला गेला. वैद्यकशास्त्रातील जखमांवरील उपचारांची, फ्लोरेन्स नायटिंगलने केलेली नवीन पध्दत यावेळी वापरली गेली. या दृष्टीने हे युध्द विशेष गाजलं.

या युध्दातूनच पुढच्या १८७७ सालच्या लढाईची बीजं पेरली गेली.

या युध्दाच्या दरम्यान इ. स. १८६१ मधे अब्दुल मजीद क्षयाच्या दुखण्याने मरण पावला. इस्तंबूलमधेच याची कबर बांधली गेली. त्यानंतर त्याचा सावत्रभाऊ अब्दुल अझीज सुलतान बनला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ३२ वा सुलतान अब्दुल अझीज. जन्म. ६ फेब्रुवारी. १८३०. मृ.४ जून १८७६.

महंमद द्वितीय आणि परतुननियत यांचा मुलगा.

संगीताची आवड, साहित्याची आवड, कविता करणारा, नौदलाची आवड असलेला हा शहजादा २५ जून १८६१ मधे सुलतान बनला. फौद पाशा, अली पाशा, मिध्दत पाशा हेच त्याचे वजीर होते. त्यामुळे पहिली १० वर्षे सुरळीत गेली. पण इ. स. १८७२ मधे अली पाशा मरण पावल्यावर महंमुद नदिम मुख्य वजीर झाला. तेव्हा सगळं चक्र उलटं फिरायला लागलं कारण हा नवीन वजीर निरक्षर होता आणि सनातनी होता. त्याच्यामुळे देशात प्रचंड भ्रष्टाचार माजला. नालायक लोकांना पदं दिली गेली. जनता यामुळे नाखूष होऊ लागली. सुलतान अब्दुल अझीझ सर्व सत्ता आणि खजिना आपल्या हाती एकवटण्याच्या मागे लागला. त्यात दिवाळखोरीकडे देशाची वाटचाल सुरु झाली. तेव्हा मिध्दत पाशाने सुलतानाची २ तास भेट घेऊन सर्व परिस्थिती समजावून सांगितली तेव्हा सुलतान अब्दुल अझीझने महंमुद नदिमला काढून टाकलं आणि परत मिध्दत पाशाच्या हातात कारभार दिला.

आपल्या कारकीर्दीत त्याने इंग्लंड आणि फ्रान्सशी सलोख्याचे संबंध जोडले. ओथमन नौदलावर त्याने जास्त लक्ष दिलं. त्यावेळी ओथमन नाविक दल हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचं समर्थ नाविक दल होतं. त्यांच्याकडे १७३ युध्दनौका होत्या. आपलं नाविक दल आणखी अत्याधुनिक बनवण्यावर या सुलतानाने खूप खर्च केला. पण त्यात खजिना कमी झाला. त्याच काळात शेतीवर आलेल्या संकटामुळे सारावसूलीही कमी झाली. सन १८५६ मधे रेल्वेची उभारणी देशात झाली होती. पण त्याचा विस्तार करण्याचं आणि जाळं तयार करण्याचं काम या अब्दुल अझीझ सुलतानाने केलं. त्यासाठी मोठी मोठी टर्मिनल्स उभारली. सन १८६३ मधे पहिला पोस्टाचा स्टँप बनवला गेला. परदेश दौरा करणारा हा पहिला सुलतान होता. याने इस्तंबूलहून प्रवासाला सुरुवात केली. नेपल्स, तुलॅन, मार्सेल्ले, पारिस, डोव्हेर, ब्रुसेल्स, व्हएना, बुडापेस्ट, ओरशवा, रुस, वार्ना, असा प्रवास करत तो परत आला. पॅरिसमधील म्युझियम्स बघून त्याने इस्तंबूलला आल्यावर ओथमन सुलतानांचा इतिहास सांगणारं म्युझियम उभारलं.

या सुलतानाच्या काळात इंग्लंड आणि फ्रान्स बँकेडून मोठी कर्ज घेतली गेली. पण या काळात दिवाळखोरी सुलतानाने जाहीर केली आणि त्यातून उभं राहिलं १८७७ चं रशिया ओथमन युध्द. आता मात्र देशाला वाचवायलाच हवं होतं. देशाची ही ढासळती परिस्थिती पाहून ६००० थिऑसॉफिस्ट विद्यार्थी सुलातानाच्या वाड्यासमोर रात्री जमले. त्यांनी सुलतानाच्या मुख्य खोजाला सुलतानाला उठवायला सांगून, त्याच्या हातात शेख उल् इस्लामने आणलेला फतवा वाचायला सांगितला. फतव्यामधे असमर्थ राजाने पायउतार व्हायलाच पाहिजे असं फर्मान होतं.

त्याप्रमाणे सुलतान अब्दुल अझीझ पदच्युत झाला. ४ दिवसांनी ५ जून सन १८७६ ला याचा मृत्यू झाला तोही रहस्यमय होता. सुलतान अब्दुल अझिजने सकाळी दाढीसाठी कात्री मागितली आणि थोड्याच वेळात सुलतान रक्ताच्या थारोळ्यात मृत होऊन पडलेला सापडला. १७ डॉक्टरांच्या पथकाने त्याची तपासणी केली

आणि अतिरक्तस्रावाने त्याचा मृत्यू झालेलं जाहीर केलं. तो खून होता की अपघात ते मात्र कुणाला कळलं नाही. त्याची कबर इस्तंबूलमधे, फत्तेहमधेच आहे.

त्याच्या जागी मग मुराद हा सुलतान बनला. हा मनोरुग्ण होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ३३ वा सुलतान मुराद. जन्म २१ सप्टेंबर १८४०. मृ.२९ ऑगस्ट १९०४.

अब्दुल मजीद आणि सुवअफ्जा यांचा हा मुलगा.

३० मे १८७६ ते ऑगस्ट ७६, फक्त ४ महिनेच हा सुलतान होता. याला मानसिक रुग्ण या नावाखाली ठार करण्यात आलं. त्यानंतर सुलतान बनला तो अब्दुल हमीद.

अब्दुल हमीद नवा सुलतान बनेपर्यंत १९ व्या शतकाने पाऊणशे वर्ष संपवली होती. जगाच्या इतिहासात १९ वं शतक अनेक क्रांतीकारक घटनांचं शतक होतं. युरोप, आणि ओथमन तुर्कांच्या जुन्या परंपरा मोडून सारं विश्व कात टाकल्यासारखं मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाने उलथापालथीने झळाळून गेलं होतं. धर्म, राजकारण, उद्योग, शिक्षण, भूगोल, विज्ञन, शास्त्र, जीवनमान या सर्वच क्षेत्रांमधे क्रांतीने बदल घडवून आणला होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## ३४ वा सुलतान अब्दुल हमीद द्वितीय. जन्म २१ सप्टेंबर १८४२. मृ १० फेब्रुवारी १९१८.

अब्दुल मजीद आणि ताया मुस्कान कगनचा मुलगा पण वाढला पेरेस्तु कादिनकडे.

सन १८७६ हे साल, ओथमन तुर्कांच्यासाठी क्रांतीकारक घटना होती. कारण या वर्षात पहिली घटनात्मक रचना अस्तित्वात आली. मिध्दत पाशा हा त्याचा कर्ता होता. पण ही परिस्थिती दोनच वर्ष टिकली. अब्दुल अझीझ, अब्दुल मजीद, आणि मुरादच्या काळात तयार झालेला तांझिमात काळ परिपक्व झाला त्याचं फलीत म्हणजे ओथमन साम्राज्याची पहिली घटना तयार झाली. प्रशियाच्या घटनेचा यावर प्रभाव होता. सुलतान मुरादच्या काळात मिध्दत पाशा आणि सुलतानाचा भाऊ अब्दुल हमीद यांच्यात गुप्त बैठका होऊन देशाच्या संसदीय घटनेचा पाया तयार झाला. मुस्लीम आणि मुस्लिमेतर असं या देशात कुणीही न राहता, सर्वांना यंग ओथमन असं संबोधलं जावं हा त्यामागचा हेतू होता. या घटनेच्या तयारीच्या वेळी असंही गुप्तपणे ठरलं की मुरादला मानसिक रुग्ण म्हणून संपवायचं आणि अब्दुल हमीद सुलतान बनला की देशाची घटना लागू करायची. त्याप्रमाणे १३ डिसेंबर १८७६ यादिवशी सुलतान अब्दुल हमीद द्वितीयने देशाच्या पहिल्या घटना लेखनावर आपली सही केली. पण २ वर्षांमधे १८७८ साली राज्यघटना सुलतानाने मोडीत काढली.

ओथमन सरकारचं सन १८७७ हे वर्ष रशियाने परत युध्द पुकारल्यामुळे त्यात खर्ची पडलं. बाल्कन द्वीपकल्पातील रुमानिया, सर्बिया, अशा देशांमधे ग्रीससारखं स्वतंत्र होण्याची भावना वाढीला लागली. या सर्वच देशांमधे राष्ट्रभावना वाढायला लागली. तांझीमात सुधारणाही अंमलात येईनात. त्यामुळे सर्वत्र असंतोषाचं वातावरण तयार व्हायला लागलं. त्याचा परिणाम म्हणजे रशियाने हे देश तुर्कांना जाऊन मिळू नयेत म्हणून युध्द छेडलं. ओथमन तुर्कांच्या आशियातील भागात रशियाचा पराभव झाला आणि युरोपियन भागात ओथमन तुर्कांची पिछेहाट झाली. यामुळे इ. स. १८७८ मधे रुमानिया, सर्बिया आणि माँटेनिग्रो देश ओथमन साम्राज्यातून मुक्त झाले. मजूर-मालक करारावर आधारित स्टॅन स्टिफानोच्या या तहामुळे तुर्कांची अवस्था आणखी वाईट झाली.

सुलतान अब्दुल हमीदच्या विरूध्द ख्रिश्चन नागरिकांमधे असंतोष पसरला तेव्हा सुलतानाने धर्म हे नवीन शस्त्र काढलं. ते पॅन इस्लामिक नावाने गाजलं. यात युरोपातील सर्व मुसलमान एकत्र आले. सुलतानाने अरबांवर विशेष कृपा दाखवली. त्यांना आपल्या संरक्षणाचं काम दिलं. मोठ्या अधिकारांच्या जागांवर नेमलं. जेरुसलेम, मक्का आणि मदिना या पवित्र स्थळांवर मोठा खर्च करून ती सुशोभित केली. तिथे चांगले रस्ते बांधले. या त्याच्या भूमिकेमुळे सुलतान अब्दुल हमीद मुस्लिम जगतात फारच लोकप्रिय झाला. हळूहळू सुलतान अब्दुल हमीदने आपल्या मंत्रीमंडळाच्या अधिकारांवर नियंत्रण आणलं. विचार-वाचा आणि वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आली. या दडपशाहीतून एक भयंकर नरसंहार सुलतानाने घडवला. त्यात आर्मेनियन नरसंहार झाला. यात क्रूरतेचा कळस होऊन ८०,००० ते १ लाख लोक नाहक मारले गेले. ५०,००० तर बालकंच होती. ३ लाखांपर्यंत लोक जखमी झाले. सुलतान अब्दुल हमीद द्वितीयला या लोकांमधे क्रांतीचे विचार घोळायला लागले आहेत हे कळलेलं

होतं. त्यात या आर्मेनियन वंशाच्या लोकांनी शेतसारा भरायचं नाकारलं. एवढ्या निमित्तावर सुलतानाने मोठा क्रूरतेचा कहर केला. त्यानंतरही सुलतानाची आर्मेनियन लोकांवरची दडपशाही संपली नाहीच.

देशातील नवविचारांना रोखण्यासठी सुलतानाने मग तरुण तुर्क-यंग टर्क्सवर बंदी आणली पण या काळात हुशार झालेले तरूण तुर्क, यंग टर्क्स मात्र स्वस्थ बसलेले नव्हते. सुलतानाच्या या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या निर्णयामुळे सुधारणावादी मुस्लिम आणि मुस्लिमेतर, जे एकत्रपणे काम करत होते ते बिथरले. सुलतानाच्या गुप्तहेरांनी ही नवविचारांच्या तरूणांची संघटना मोडण्यासाठी त्यांच्यातील काही तरूणांना पैसे चारून फोडलं. या तरूणांची जिनिव्हामधे जेव्हा परिषद झाली, त्यात ही गोष्ट सर्वांच्या लक्षात आली. यावर उत्तर म्हणून एक गुप्त संघटना निर्माण झाली. त्या संघटनेचं नाव होतं सियुपी, म्हणजेच कमिटी ऑफ युनियन अँड प्रोग्रेस. या संघटनेत ओथमन आणि युरोपियन साम्राज्यातील सर्व वंशांचे आणि भाषांचे तरूण गोळा झालेले होते. एवढंच नव्हे तर सुलतानाच्या कारभाराला विरोध करणारे सरकारी बाबू, लष्करातले सेनाधिकारी, आणि वकील, डॉक्टर्सही गुप्तपणे येऊन मिळाले. सुलतान अब्दुल हमीद द्वितीयच्या मंत्रीमंडळाने सुलतानाला घटनेनुसार सत्ता स्थापन करायचा सल्ला दिला. २२ जुलैला संसदीय विधीमंडळ स्थापन होण्याची घोषणा सुलतानाने केली.

त्यानुसार लगेचच भ्रष्ट मंत्री हटवले गेले. बंडखोरांचे गव्हर्नर्स, मंत्री, अधिकारी आणि ऑफीसर्स जागोजाग नेमले गेले. सुलतानाने फर्मान काढून त्याचे गुप्तहेर काढून टाकल्याची घोषणा केली. सुलतानाने बंदिवासात टाकलेल्या विचारवंतांना चळवळीच्या नेत्यांना मोकळं करण्यात आलं. या वेळी विचारवंत आणि यंग टर्क्ससंघटनेमधेही अनेक पक्ष तयार झालेले होते. त्यातही परत मतभिन्नता होती. कुणाला सत्तेचं विकेंद्रीकरण हवं होतं, तर कुणाला मध्यवर्ती सत्ता मान्य होती. त्यामुळे परत या संघटनेत मतभेदांमुळे वेगळे प्रवाह आले.

१० डिसेंबर १९०८ हा दिवस ओथमन साम्राज्याच्या इतिहासातील अविस्मरणीय दिवस ठरला कारण यादिवशी पार्लमेंटचं उद्घाटन सुलतानाच्या हस्ते झालं. सुलतानाचा पहिला वजीर मतदानाने कामावरून काढला गेला आणि यंग टर्क्सनी हिल्मि पाशा या विचारवंताला पहिला पंतप्रधानपदी नेमलं.

हे सगळं घडत होतं ते सुलतानाच्या मनाविरूध्दच होत होतं. जनमताच्या रेट्यापुढे त्याचं काहीही चालत नव्हतं. देशाचा कारभार कसा चालवायचा याचं ज्ञान आणि अनुभव नसल्यामुळे या विचारवंतांनी राज्य कारभाराकडे लक्ष दिलं पण लष्कराची बाजू त्यांना सांभाळता आली नाही. यंग टर्क्सनी तिकडे लक्षच दिलं नाही. त्याचा फायदा सुलतानाच्या अंगरक्षकांनी घेतला. देशातील परंपरावादी जे होते त्यांना तरूण तुर्कांचे हे विचार पटले नव्हते. त्यात सुलतानाचे अल्बानियन अंगरक्षक सामील होते. त्यांनी या संसदीय राज्यघटनेचा निषेध केला. हे सगळं जुलैनंतरच्या प्रजासत्ताक सरकार स्थापनेनंतर ६ महिन्यातच, एप्रिल १९०९ मधे घडायला लागलं. या अल्बानियन सुरक्षा अधिकाऱ्यांना देशातील उलेमा सामील झाले. परत संसदीय राज्यघटना मोडीत निघाली. परत इस्लामिक कायदे वापरात आले. परत अब्दुल हमीद द्वितीय सुलतान सामर्थ्यवान झाला.

याचा परिणाम म्हणजे अटक होऊ नये म्हणून बंडखोर सुधारक चळवळे पळून मॅसेडोनियाच्या आश्रयाला गेले. तिथे गेल्यावर पळून गेलेले तरूण तुर्क परत एकत्र आले. परत एक होऊन मॅसेडोनियाहून महंमद शौकत

पाशाच्या नेतृत्वाखाली कॉंस्टंटिनोपलवर चालून आले. सुलतान अब्दुल हमीदला पदच्युत करून त्यांनी मुराद पंचम याला सुलतान बनवलं.

२५ एप्रिल १९०९, या दिवशी ओथमन साम्राज्यात खरीखुरी सुलतानशाही संपुष्टात आली. घटनात्मक राज्यपध्दती चालू झाली. धार्मिक आणि सांस्कृतिक भेद नाहीसे करून राष्ट्रीय एकात्मतेवर देश उभा करण्याचं त्यांचं स्वप्न होतं. पण या भेदाभेदावर तयार झालेल्या समाजातील काही लोक स्वत:ला तुर्की समजायला तयार नव्हते. त्याचा फायदा शेजारील युरोपियन देशांनी लगेचच घेतला.

त्यात भर म्हणजे मॅसेडोनियाचे ख्रिश्चनसुध्दा ओथमन साम्राज्यात रहायला तयार नव्हते. त्यांनाही आता स्वातंत्र्याचे वेध लागले होते. सांस्कृतिक आणि भाषिक फरकांमुळे त्यांना स्वत:चा देश निर्माण करायचा होता. त्यांना फूस मिळाली ती रशियाची. कॉंस्टंटिनोपल मिळवणं, बॉस्फरस, दर्दनेल्स जलमार्ग आपल्या हाती ठेवणं या उद्देशाने १९१२-१३ मधे रशियाने ओथमन तुर्कींविरूध्द परत शस्त्र उगारलं. मॅसेडोनियामधे सुधारणा आणाव्यात ही त्यांची मागणी होती. सुलतान अब्दुल हमीदने ती नाकारली. यासाठी सर्बिया, बल्गेरिया, ग्रीस, आणि मॉंटेनिग्रो सर्व देश एकत्र आले आणि त्यांनी तुर्कांवर चारही बाजूंनी हल्ला चढवला. त्याबरोबर सावध झालेल्या महाशक्तींनी लंडनमधे शस्त्रबंदी करार करण्यासाठी परिषद बोलावली पण यंग तुर्कांनी ती मागणी झिडकारली आणि सुलतान जर या कराराला तयार झाला तर त्यालाही पदच्युत करायची धमकी दिली. त्यामुळे हा करार अंमलात आलाच नाही. युध्द सुरूच राहिलं. पण ओथमन फौजांचा सपशेल पराभव झाला. कॉंस्टंटिनोपल सोडून बराचसा मुलुख तुर्की साम्राज्यातून वगळला गेला.

यंग टर्क्स चळवळ जोरात चालू होती. त्याचा पुढचा परिणाम म्हणजे यातूनच दोन पक्ष तयार झाले. त्या दोन पक्षात सत्ता स्पर्धा सुरू झाली. ते दोन पक्ष होते, एक होती लिबरल ऑकॉर्ड पार्टी, किंवा लिबरल युनियन आणि दुसरी होती ती पार्टी ऑफ युनियन अँड प्रोग्रेस. या दोघांच्या संघर्षात सियुपि वरचढ ठरली. या पक्षाने आपल्या तीन पाशांच्या मदतीने सारा ओथमन देश आपल्या ताब्यात घेतला. परत सत्ता संघर्ष घडून आला आणि त्यात तीनही पाशा पळून गेले, पसार झाले. या महायुध्दात परत एकदा तरूण तुर्कांनी आर्मेनियन लोकांचा संहार केला आणि क्रौर्यतेत आपणही सुलतानापेक्षा काही कमी नाही हे दाखवून दिलं. यातही आर्मेनियन लोक लाखांच्या संख्येने ठार झाले. पहिल्या महायुध्दाच्या पेटलेल्या होमकुंडात अनेक निरपराधी, अपराधी ठार होत होते, त्यात हे आर्मेनियनही ठार झाले.

ऑस्ट्रिया सर्बियातील वादामुळे आणि युवराजाच्या हत्येमुळे युध्दकुंड पेटलेलंच होतं. युरोपातील सर्वच देश या निमित्ताने युध्दात उतरले. ओथमन सरकारही तटस्थ राहून लांब राहू शकत नव्हतं. आजूबाजूला चाललेल्या युध्दाचा संसर्ग त्यांना लागणारच होता. तुर्कांमधेही दोन पक्ष बनले होते. जो जहाल पक्ष होता, ते युध्दात सामील होण्याच्या विचारांचे होते. आणि जे मवाळ विचारांचे होते, ते तटस्थ राहावं या मताचे होते. पण शेवटी जहाल पक्षाचे नेते, अन्वर पाशा, झुबेद पाशा, आणि मुस्तफा कमाल हे जहाल पक्षाचे नेते विजयी झाले आणि ओथमन सरकार युध्दात उतरलं. रशियाशी तुर्कांचं वैर होतंच. मात्र जर्मनीशी त्यांची बऱ्याच काळापासून मैत्री होती. जर्मनीने ओथमन देशाच्या शिक्षणासाठी व्यापारासाठी, औद्योगिकरणासाठी कायमच ओथमन तुर्कांना मदत केली होती.

त्यामुळे ओथमन सरकार जर्मनीच्या पक्षात गेलं. शतकानुशतके सतत भांडत आलेल्या सगळ्या युरोपियन जगात युध्दाचा वणवा पेटला. मोठा संहार झाला. सर्व महासत्तांनी या युध्दात भाग घेतला. इंग्लं-फ्रान्स-रशियाचा विजय झाला. जर्मनी आणि ओथमन सरकारांचा पराभव झाला. १९१४ च्या २ नोव्हेंबरला ओथमन देश महायुध्दात उतरला, त्या चक्रव्यूहात सापडला, चिरला गेला आणि नवीन रिपब्लिक ऑफ टर्की या नावाने शिल्लक राहिला. या नवीन राष्ट्राचा कमाल पाशा अध्यक्ष झाला. प्रचंड मोठ्या ओथमन साम्राज्यातून अनेक देश तयार झाले.

१० ऑगस्ट १९२० ला फ्रान्समधील सेवरा गावातील पोरसेलिन फॅक्टरीच्या हॉलमधे करार झाला. इटाली, इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याबरोबर ओथमन सरकारच्या वतीने माजी राजदूत हादी पाशा, शिक्षणमंत्री रिझा बोलुकबासी, आणि बर्नच्या वकिलातीतील राजदूत रिशाद हालिस या तिघांनी करारावर सह्या केल्या.

आपल्या समुदायाला घेऊन आसऱ्यासाठी रूम देशात आलेल्या ओथमनने स्वप्नात पाहिलेलं महाकाय वृक्षाच्या महाकाय सावलीचं, कारंजी, नद्या, पर्वत, हिरवळ, याचं स्वप्न १२९९ ते १९२० या ६२१ वर्षांनी भंग पावलं होतं. ओथमन नावाचं रुजलेलं साम्राज्याचं रोपटं वटवृक्षाच्या पारंब्यांसारखं युरोप, आफ्रिका आणि आशियामधे पसरलं आणि पहिल्या महायुध्दाच्या झंजावाती वादळात उन्मळून पडलं. इ. स. १२९९ पासून १९१७ पर्यंत या एकाच ओथमन घराण्याने त्या देशासाठी ३५ सुलतान दिले. त्याच वंशाने साम्राज्य उभारलं, विस्तारलं आणि संपवलं.

१३ व्या शतकातील एका ओथमनचा या पहिल्या महायुध्दात अंत झाला होता. त्या पहिल्या महायुध्दालाही शंभर वर्ष झाली आता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

# तरुण तुर्क-यंग टर्क्स.

ओथमन साम्राज्याच्या इतिहासात यंग टर्कस् नावाच्या चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण ओथमन तरुणांनी सुरू केलेल्या या चळवळीमुळेच ओथमन देशातील सुलतानशाही संपली आणि प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली.

एकेकाळच्या भटक्या जातीच्या ओथमन घराण्याच्या वारसांनी एकेक प्रदेश जिंकत हळूहळू राष्ट्र निर्माण केलं. त्यात त्यांचा बाहेरच्या युरोपशी संबंध यायला लागला. त्यांच्या संस्कृतीशी ओळख व्हायला लागल्यावर शिक्षणाचं महत्त्व कळायला लागलं. त्यातच १९ व्या शतकात ओथमन साम्राज्याच्या शेजारच्या युरोपातच अनेक वैचारिक, शैक्षणिक, राजकीय आणि औद्योगिक क्रांतींनी जन्म घेतला. फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टने फ्रेंच राजसत्तेचा अंत करुन ओथमन सुलतानशाहीसुध्दा बदलता येऊ शकते हे ओथमन तरुणांना दाखवून दिलं. छापखान्यांमधून प्रसिध्द झालेलं युरोपियन वैचारिक लिखाण ओथमन तरुणांच्या हाती पडू लागलं. त्यातून साम्राज्यातील विचारवंतांना लोकतंत्र कारभाराची बीजं सापडली. आपण जगाच्या स्पर्धेत मागे आहोत कारण आपल्या देशातील सुलतानांमुळे प्रगती होत नाही आहे हे लक्षात यायला लागलं.

तेव्हा १९ व्या शतकाच्या सुरुवातीला तांझिमात या चळवळीचं बीज रोवलं गेलं. अब्दुल मजीद सुलतानाच्या कारकीर्दीत ही पावलं पडायला लागली. इ. स. १८३९ मधील सुलतानाने हाताने लिहिलेलं “हात्ती शरिफ गुल्हाने” हे फर्मान म्हणजे ओथमन साम्राज्याचं “मॅग्ना चार्टा” ठरलं. या फर्मानामुळे ओथमन साम्राज्यातील सर्वधर्मीय आणि सर्ववंशीय यांना समान हक्क मिळाले. पोस्ट आणि टेलिग्राफ या तांत्रिकी शोधांनी छापील मजकूर सुदूर पसरू लागला आणि ओथमन साम्राज्यातील विचारवंतांना, अभ्यासकांना, सुशिक्षितांना, आपलं घसरणीला लागलेलं साम्राज्य वाचवायचं असेल तर संसदीय राज्यघटनेची जरुरी प्रकर्षाने जाणवायला लागली. या नवविचारांना मूर्त रुप देण्याचं काम मिध्दत पाशा, फौद पाशा, अली पाशा यांनी सुरु केलं. हे तिघे एकीकडे सुलतानाच्या हाताखाली दरबारात काम करत होते आणि दुसरीकडे ओथमन तरुणांच्या विचारांना नवीन दिशा देत होते. त्यामुळे ओथमन तरुणांमधे लोकसत्ताक प्रजातंत्राबद्दल आस्था उत्पन्न व्हायला लागली.

तोपर्यंत सुलतानांच्या घराण्यातील तख्तावर येणारे वारसही असमर्थ आणि कमकुवत नेतृत्व गुणांचे ठरू लागले होते. वजीरांच्या हाती कारभार तर कधीच गेला होता. ओथमन देश आर्थिक, सामाजिक, दृष्ट्या कमकुवत झाला होता. मोठा प्रदेश लढायांमधे गमावून भौगोलिक आकारानेही लहान झाला होता. त्याउलट युरोपात युध्दशस्त्रांमधे अत्याधुनिक शस्त्रं आल्यामुळे युरोपियन देश बलवान झाले होते. सुलतान अब्दुल अझीझच्या काळात मुख्य वजीरपदावर असलेला मिध्दत पाशा हा ओथमन देशाची राज्यघटना लिहिणारा पहिला अभ्यासू, प्रजासत्ताक देशाचा घटनाकार. त्याला साथ मिळाली ती फौद पाशा, अली पाशा यांची. हे सारे समर्थ विचारवंत देशाच्या उन्नतीच्या विचाराने झपाटले होते.

सुलतान अब्दुल अझीझ सन १८७६ मधे मरण पावला आणि लगेच सुलतानपदावर आला तो अब्दुल हमीद द्वितीय. मिध्दत पाशा हा इ. स. १८७२ मधे सुलतान अब्दुल अझीझच्या काळापासून वजीरपदावर होता. पण सुलतानाबरोबर आर्थिक मतभेदांमुळे त्याला अवघ्या २ महिन्यांमधेच वजीरपद सोडावं लागलं होतं. त्याच्या जागी रशिद पाशाची नेमणूक अब्दुल अझीझ सुलतानाने केली. पण ४ वर्षांनी उद्भवलेल्या एका संकटामुळे मिध्दत पाशा परत वजीर बनला. एका हॉलमधे सर्व मंत्री आणि मुख्य वजीर रशिद पाशा जमले असतांना सर्वांवर प्राणघातक हल्ला झाला. त्यात रशिद पाशा मुख्य वजीर मारला गेला. आणखी ५ लोक मारले गेले. त्यानंतरच्या गोंधळाच्या परिस्थितीमुळे परत मिध्दत पाशाला सुलतान अब्दुल अझीझने वजीर पदावर नेमलं होतं. इ. स. १८७६ ला ओथमन साम्राज्याची पहिली राज्यघटना मिध्दत पाशाने तयार केली आणि संसदीय राज्यपध्दतीचा अवलंब केला जाईल हे जाहीर केलं. या राज्यघटनेमुळे सर्व धर्मीय आणि सर्व वंशीय प्रजाजनांना समान वागणूक, समान हक्क घोषित झाले. लोकांचे प्रतिनिधी निवडले जातील आणि पार्लमेंट तयार होईल हेही जाहीर केलं. या सर्वामुळे मिध्दत पाशा जनतेत कमालीचा लोकप्रिय झाला.

पण कारभार हातात आल्याबरोबर अब्दुल हमीद सुलतानाने ४ महिन्यांमधेच पहिला घाव घातला. पण तो डाव अपयशी झाला आणि सुलतानाला मिध्दत पाशालाच परत मुख्य वजीर करावं लागलं. दुसरा प्रयत्न सुलतान अब्दुल हमीदने केला तेव्हा मात्र पूर्ण तयारीनिशी केला. एक दिवस मिध्दत पाशाला आपल्यासमोर हाजीर व्हायचा निरोप ठेवला. यावेळी सुलतानाने बॉस्फरसच्या बंदरावर एक जहाज तयार ठेवलं होतं. सुलतानासमोर हजर झालेल्या मिध्दत पाशाला तिथल्या तिथे अटक होऊन हद्दपार करण्यात आल्याचं सुलतानाने जाहिर केलं. मिध्दत पाशाला दक्षिण इटालीतील ब्रिंडिसीमधे नेऊन ठेवलं. पण इंग्लंडच्या दबावामुळे सुलतानाला मिध्दत पाशाला परत आणावं लागलं तो दिवस होता, २६ सप्टेंबर १८७८. आणि तो काळ होता रशियाबरोबर चाललेल्या ओथमन युध्दाचा. मग सुलतानाने मिध्दत पाशाची सिरियाचा सुभेदार म्हणून नेमणूक केली आणि त्याला तिथे पाठवून दिलं. १८८१ पर्यंत मिध्दत पाशा सुलतानाच्या सेवेत होता. पण अचानक एक दिवस त्याला अटक झाली. आणि सुलतानाने त्याच्यावर सुलतान अब्दुल अझीझच्या खुनाचा ठपका ठेवला. न्यायालयीन चौकशीचं रीतसर नाटक झालं त्यात शिक्षा म्हणून दूर अरेबियाच्या तुरुंगात मिध्दत पाशाला पाठवण्यात आलं आणि इ. स. १८८४ मधे त्याला फाशी देण्यात आली. मिध्दत पाशा हाच खरा प्रजासत्ताक ओथमन राष्ट्राचा आणि घटना तयार करणारा पहिला ओथमन राष्ट्रप्रेमी. घटनाकार मिध्दत पाशा संपला पण तोपर्यंत ओथमन जनतेत पसरलेलं लोकतंत्राचं बीज तरुणांच्या मनात रुजलं होतं. त्यांच्यासमोर आदर्श जपानचा होता.

सुलतान अब्दुल हमीद द्वितीयही आपला अधिकार गाजवण्याच्या आणि तख्त वाचवण्याच्या मागे लागला. यापुढचा संघर्ष हा राजसत्ता आणि प्रजासत्ता यांच्यात होणार हे स्वच्छ होतं. या नवीन सुलतानाने सुधारणा आणि लोकस्वातंत्र्याचं गती मिळालेलं चाक उलटं फिरवायला सुरुवात केली. इस्लाम धर्माचा आणि मुसलमानांचा पुरस्कर्ता हे नवीन धोरण त्याने स्वीकारलं. सुलतानाच्या फतव्यामळे सर्वांना समान वागणूक हा नियम मातीला मिळाला. ख्रिश्चनांना मिळालेले अधिकार काढून घेण्यात आले. त्यातून मुसलमान आणि ख्रिश्चन यांच्यातील वैर वाढलं. समाजातील नवविचारांनी आपल्या सत्तेला धोका आहे हे ओळखून सुलतान हमीद

द्वितीयने वृत्तपत्रांवर बंदी आणली. देशात छापला गेलेला प्रत्येक मजकूर नियंत्रणाखाली आला. नवविचारांना समूळ उखडून लावण्यासाठी त्याने देशाच्या आत बाहेर करणाऱ्या प्रवाशांवरही निर्बंध आणले. त्यांचं सामान तपासलं जाऊ लागलं. तोपर्यंत युरोपात टाईपरायटरचा शोध लागला होता, त्यामुळे हॅम्लेटसारखी राजाचा वध दाखवणारी नाटके देशात येऊ शकली नाहीत. नवीन विचार मांडणारे लेखही सुलतानाच्या अधिकाऱ्यांच्या पाळतीखाली आले. सुशिक्षितांच्या घरांवर छापे टाकून छापील साहित्य जप्त करण्यात येऊ लागलं. कॉफी पिण्याच्या जागी तरुण एकत्र येतात आणि विचारांचं आदान प्रदान होतं म्हणून एकत्र जमण्यावर बंदी घातली गेली. हा जुलूम इतका वाढला की सुलतानाने गुप्तहेरांची फौजच आपल्या जनतेवर पाळत ठेवण्यासाठी उतरवली. त्याचा अतिरेक म्हणजे या गुप्तहेरांवरही पाळत ठेवणारे गुप्तहेर होते. एकमेकांशी बोलणं, एकत्र जमणं कठीण होऊ लागलं. या दडपशाही, हुकूमशाहीमुळे अनेक नागरिक स्थलांतरित झाले, काही कैदेत पडले, काही ठार झाले आणि काहींना बॉस्फरसच्या सामुद्रधुनीत जलसमाधी मिळाली.

या सर्वाचा एकच परिणाम झाला. तो म्हणजे देशातील तरुण, सुधारणावादी, लोकतंत्रवादी कुटुंबाला सोडून परदेशात स्थलांतरीत झाले आणि तिथे एकत्र जमायला लागले. याच तरुणांनी स्थापन केलेली संघटना म्हणजे यंग टर्क्स. सुलतान अब्दुल हमीद द्वितीयची जुलमी वागणूक हे या संघटनेचं निमित्त. देशात अनेक कारणांमुळे लोकांचं मन प्रजासत्ताक देशाकडे झुकू लागलं होतं. त्यातील आणखी एक कारण म्हणजे ज्या मुसलमान मुलांचा युरोपियन मुलींशी विवाह झाला होता, त्यांच्या मुलांवर बाहेरच्या देशातील मुक्त विचारांचा संस्कार होऊ लागला होता. दुसरं म्हणजे सुलतानाने जर्मनीशी केलेली मैत्री इंग्लंड आणि ओथमन साम्राज्यातील दरी वाढवण्याला कारण झाली. ओथमन विचारवंत आणि अभ्यासक इंग्लंड आणि फ्रान्समधे आसऱ्याला गेले होते. त्यांनी तिथून हुरियत नावाचं वृत्तपत्र चालू केलं. त्यामुळे ओथमन देशात जनजागृती जोरात होऊ लागली. सुलतानाला पदच्युत करुन नवीन राज्यपध्दत स्थापन करण्याच्या विचारांना या सगळ्या घडामोडींनी वेग आला. इ. स. १८९१ मधे या सुधारणावादी ओथमन तरुणांनी एक गुप्त संघटना जिनिव्हा इथे स्थापन केली. याची सुरुवात कॉंस्टंटिनोपलच्या एका मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांपासून ६ फेब्रुवारी १८८९ मधे झाली होती. आपले विचार पत्रकांमधून इतर कॉलेजांमधे पसरवायला त्यांनी सुरुवात केली. बघता बघता सर्व महाविद्यालयांमधे हे विचार पसरायला लागले आणि विचारांची देवाणघेवाण सुरु झाली. देश वाचवायचा असेल तर काय करायला पाहिजे याचा विचार सुरु झाला. त्यात हुरियतच्या लिखाणांची भर पडली. सुलतानाला याची कुणकुण लागताच मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरु झाली. ही बातमी पसरताच हजारो ओथमन तरूण भूमीगत झाले. काही पकडले गेले आणि काही मारले गेले. हे यंग टर्कस् गुप्त संघटनेचे सभासद विखुरले, तरीही संघटना काम करत राहिली. या गुप्त संघटनेने जी पार्टी स्थापन केली तिचं नाव कमिटी ऑफ युनियन अँड प्रोग्रेस. (सीयुपी) अहंमद रिझा हा त्यांचा महानायक.

आपली यंग टर्क्सची संघटना वाढवण्यासाठी अत्यंत गुप्तपणे विश्वासातील लोकांना भरती करुन घेतलं जाई. आधी पारख आणि खात्री झाल्यावरच मग त्याला डोळ्यांना पट्टी बांधून गुप्त ठिकाणी नेलं जाई. त्याची पूर्ण चौकशी झाल्यावर आणि संघटनेच्या अधिकाऱ्यांना खात्री वाटल्यावरच मग त्याला परत त्याचे डोळे बांधून मूळ जागी सोडलं जाई. या संघटनेत हळूहळू स्त्रियाहि सामील होऊ लागल्या. संघटनेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी

काही कार्यकर्ते डूल, माळा, रिबिनी विकणारे फेरिवाले बनून घरोघर हिंडत. त्यामुळे पोलिस आणि गुप्तहेरांच्या नजरेतून सुटत. निरोप देणे आणि पोचवणे ही दोन्ही कामे सहज होत. कधी एखादा कार्यकर्ता गुप्तहेरांकडून वा पोलिसांकडून पकडला गेला आणि कितीही हाल झाले तरी त्याच्या तोंडून गुप्त बातमी बाहेर पडत नसे. इतक्या गुप्तपणे संघटना चळवळ पसरु लागली.

या संघटनेत हळूहळू सरकारी बाबू, डॉक्टर्स, वकील, सारे उच्चशिक्षित, सुशिक्षित, सज्ञानी, आणि देशाच्या उध्दारासाठी भारलेले श्रीमंत, मध्यम वर्गीय, गरीब हे सर्व स्तरातील लोक सामील होऊ लागले. ते वेगवेगळ्या सरकारी खात्यांमधे कामाला असत. या संघटनेला कुणीही अध्यक्ष नव्हता, कुणीही नेता नव्हता, सर्व सारख्या पातळीवरचे राष्ट्रभक्तीने भारलेले सदस्य होते. या संघटनेचा खर्च चालवण्यासाठी प्रत्येक सभासदाला आपल्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा संघटनेला द्यावा लागे. मुख्य म्हणजे ही यंग टर्क्स संघटना शेतकरी कामकरी अशा तळागाळातील लोकांकडून सुरु झाली नव्हती तर सुशिक्षित आणि विचारवंतांच्या बौध्दिक पायावर उभी होती. यात ज्यू, अरब, सर्व धर्माचे आणि वंशाचे नागरिक सामील होते. सगळे राष्ट्रप्रेमाने भारलेले होते. ओथमन साम्राज्यातील सर्व भागातून गोळा झालेले होते. आपापल्या कचेऱ्यांमधून गुप्तपणे नागरिकांना आपल्या चळवळीत सामील करुन घेत होते.

याच दरम्यान १८९५ सालात, सुलतानशाहीचा आणखी एक भयंकर क्रूर प्रकार घडला. तो म्हणजे आर्मेनियन हत्याकांड. प्रचंड मोठा नरसंहार यात झाला. आर्मेनियन वंशाचे रहिवासी हे अनातोलियाच्या पूर्व पठारावर शतकानुशतके रहात होते. ओथमन सम्राटांनी आर्मेनिया जिंकल्यावर ते त्या राष्ट्राचे नागरिक बनले. यांची वस्ती ओथमन साम्राज्यात ६ ठिकाणी मोठ्या प्रमाणात होती, तशी रशियाच्या हद्दीतील भागातही होती. यांचे सहनिवासी लोक होते कुर्दीश लोक. पोलिस आणि न्यायालये यांच्याकडून आर्मेनियन स्थानिक लोकांना न्याय्य वागणूक मिळत नसे त्यामुळे ओथमन समाज आपल्याला सामावून घेत नाही अशी या आर्मेनियन लोकांची समजूत होती. आपण दुर्लक्षित आहोत ही त्यांची भावना, तर उलट आर्मेनियन परदेशाशी संधान बांधून असतात आणि ओथमन साम्राज्याच्या विरुध्द वागतात हा ओथमन तुर्कांचा संशय होता. या आर्मेनियन समाजात जसजसे सुशिक्षित वाढू लागले, तसतसा त्याचा समाज सुधारु लागला. वकील, डॉक्टर्स, लष्कर, नौदल, यात मोठ्या पदांवर नोकऱ्या मिळवून ते श्रीमंत होऊ लागले. आणि त्यातूनच आपल्यालाही स्वतंत्र देश पाहिजे ही कल्पना त्यांच्यातील सुधारणावाद्यांच्या मनात घर करु लागली. त्यासाठी त्यांचे इ. स. १८७७ आणि १८९० मधे फेडरेशन आणि बेल हे दोन पक्षही निघाले पण त्या संघटनांना पाठबळ मिळालं नाही. ओथमन राज्यघटनेनं कबूल केलेलं समानतेचं स्वप्नही आर्मेनियन जनतेपासून दूर राहिलं.

इ. स. १८९४ मधे सुलतान अब्दुल हमीदने त्यांच्यावर जास्त कर बसवला. तो कर आर्मेनियन लोकांनी नाकारला तेव्हा सुलतानाने हे बंड मोडून काढण्यासाठी प्रचंड मोठं शिरकाण केलं. २०,००० आर्मेनियन लोक लष्कराकडून मारले गेले. परकीय देशच या सुलतानाला घालवू शकेल हा विचार त्यांच्यात बळावू लागला. याचा परिणाम म्हणजे आर्मेनियन लोक सुलतानाच्या विरुध्द गेले आणि गुप्त यंग टर्क संघटनेला सामील होऊ लागले. दुसरीकडे मॅसेडोनियामधेही शेतकरी कामकरी नाराज होते. या भागात राहणारे नागरिक हे बहुतांशी ग्रीक, सर्वियन

आणि बल्गेरियन होते. आपल्या जनतेचे चाललेले हाल पाहून सुलतानाची राजवट उलथवायला हेही तीन देश आतुरतेने वाट पाहात होते.

या काळात सुलतानही गुप्त संघटना शोधून आणि मोडून काढण्याच्या कामाला लागला. त्यासाठी सुलतानाने तरुणांना भरपूर लाच आणि आकर्षक आमिष दाखवायला सुरुवात केली. त्याने देशातील मुसलमान आणि ख्रिश्चनांमधे फूट पाडायचाही प्रयत्न केला. एवढंच नव्हे तर सुलतानाने मोठं वैर निर्माण केलं ते धर्मभावनेचा आधार घेऊन. मॅसेडोनियातील सनातन ग्रीक चर्चचा सनातनी ग्रीकांवर आणि बल्गेरियनांवर मोठा प्रभाव होता. सुलतानाने या दोन समुदायांमधे फूट पाडली. बल्गेरियन जनतेला ग्रीकांपासून वेगळं व्हायला चिथावलं. त्यावरून दोन्ही वंशीयांमधे चर्चच्या ताब्यावरून भांडणं सुरू झाली. त्याची मजल हिंसाचारापर्यंत गेली. ती इतकी वाढली की दोन्ही समुदाय एकमेकांच्या वस्त्या, गावं जाळण्यावर उतरले. कारण सीमेवर असलेले ग्रीक, बल्गेरिया, सर्विया हे देश आपापल्या नागरिकांना सैनिकांची मदत पुरवू लागले. स्थावर जंगमाची आणि जीवांची या जाळपोळीने दोन्ही पक्षांचीं अपरिमित हानी झाली. सुलतानाने ही दंगल मिटवण्यासाठी काहीही हालचाल केली नाही. उलट वालाकियांच्या असंतोषाची याच मुद्द्यावरून त्यात आणखी भर घातली.

एकीकडे तरुण तुर्कांची गुप्त संघटना फोफावू लागली होती, दुसरीकडे मॅसेडोनियात दोन चर्चवरून ग्रीक आणि बल्गेरियनांमधे हिंसाचार उफाळला आणि तिसरीकडे ओथमन फौजही, कमी पगार, तोही वेळच्यावेळी नाही, पदोन्नती नाही, फाटके गणवेश, या सुलतानी जुलूमाला कंटाळली होती. शत्रूंच्या लष्कराचे चकचकीत पोशाख, सुदृढ शरीरं, भरपूर पगार यांनी तेही सुलतानाविरुध्द जायच्या मनस्थितीत होते. या साऱ्याचा परिणाम एकच होता तो म्हणजे सुलतानी राजवटीचा शेवट होणे.

यंग टर्क्सची गुप्त संघटना वेगाने पसरू लागली. तेव्हा त्यांची पहिली बैठक पॅरिसमधे ४ फेब्रुवारी इ. स. १९०२ या दिवशी झाली. या सभेत प्रिन्स सबाउद्दीन याचे पक्षाच्या धोरणांवरून मतभेद झाले आणि त्याने आपला नवीन पक्ष काढला तो म्हणजे लिग ऑफ प्रायव्हेट इनिशिएटिव्ह अँड डिसेंट्रालायझेशन. त्याच्या मते ओथमन सरकारात विकेन्द्रीकरण आणि युरोपियन देशांच्या सहभागाची आवश्यकता होती. तो सर्वांना पटला नाही. त्यामुळे चळवळीच्या राजकारणाचेआता दोन पक्ष झाले.

सन १९०६ मधे कमिटी ऑफ युनियन अँड प्रोग्रेसने (सीयुपी) आपलं आपलं पॅरिसचं कार्यालय मॅसेडोनियातील सलोनिकाला हलवायचं ठरवलं त्याला अनेक कारणं होती. १. सलोनिका मॅसोडेनियातील उत्कृष्ट बंदराचं ठिकाण होतं. त्यामुळे जलमार्ग आणि भूमार्ग दोन्ही हाताशी राहणार होतं. २. कॉंस्टंटिनोपल या ओथमन साम्राज्याच्या राजधानीपासून सलोनिका सुरक्षित अंतरावर होतं. ३. देशाचा लष्करी तळ इथे होता, त्यामुळे देशाचं लष्कर क्रांतीच्या उठावाच्या वेळी जवळ असणं जरुरीचं होतं. या लष्कराची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. कमी पगार, कित्येकांना पदोन्नती मिळाली नव्हती कारण त्यात प्रचंड भ्रष्टाचार होता, निकृष्ट राहणीमुळे सैनिकांच्या ताकदीवर आणि शरिरावरही अनिष्ट परिणाम झाला होता. त्याउलट युरोपियन सैनिकांचे उत्तम गणवेश, मोठे पगार, सुदृढ देहयष्टी पाहून त्यांच्यात कमालीचा असंतोष पसरला होता. त्याचा फायदा चळवळीच्या कार्यकर्त्यांनी घेतला होता आणि अनेक लष्करी अधिकारी आणि सैनिक यांना सुलतानापासून फोडून आपल्या चळवळीत सामावून

घेतलं होतं. ही असंतुष्ट फौज चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या लगामी होती. ४. इंग्लंड आणि रशियाच्या नुकत्याच झालेल्या नवीन करारात मॅसेडोनियात नवीन सुधारणा घडवून आणायचा विचार होता. युरोपातील ग्रेट पॉवर्स अशी ओळख असलेले फ्रान्स, ऑस्ट्रिया, इंग्लंड आणि रशिया हे देश मॅसेडोनियात शिरून ते काबीज करण्याचा धोका होता. त्यांना विरोध करण्यासाठी अशावेळी लष्कराची गरज भासणं शक्य होतं. नाहीतर आपला देश आपल्या हातून निसटून जाईल अशी भीती यंग टर्क्सना वाटली. ५. या शहरात ग्रीक, युरोपियन, ज्यू, अरब, बल्गेरियन, सर्बियन, अशी अनेक देशांच्या नागरिकांची मिश्र वस्ती असल्यामुळे त्यांच्या वेगवेगळया वसाहती होत्या. त्यांना आपापल्या देशांच्या मदतीची शक्यता होती. अशावेळी लष्कर आपल्या हाती राहणं महत्वाचं होतं. ६. या शहरात सुलतानाच्या फौजा होत्या तरी अनेक देशांचे रहिवासी असलेल्या या शहरात, संघटेनेने गुप्त हालचाली केल्या तरी गुप्तहेरांना संघटनेचा छडा लावणंही कठीण होणार होतं. यंग टर्क्सच्या या महान प्रयत्नांना इतकं यश आलं की त्यांची सभासद संख्या १५ हजारांवर गेली. देशातील सर्व थरातील गुप्तपणे या संघटनेचे सभासद झाले होते. सर्व सरकारी कार्यालयांचा, लष्करात यांचा वावर सुरू झाल्यामुळे त्यांचीही गुप्तहेरांची फौज तयार झाली आणि सरकारी फतव्यांचा गुप्त संघटनेला पुरवठा होऊ लागला. सुलतानाची सेकंड आर्मी आंद्रेओनोपलला होती. देशात ठिकठिकाणी होणारे बंडावे मोडून काढण्यासाठी या फौजा बाहेर हिंडत त्यावेळी लष्करात असलेले संघटनेचे कार्यकर्ते समितीला गुप्त माहिती कळवत असत.

या संघटनेचा प्रमुख अहंमद रिझा मात्र पॅरिसला राहिला. युरोपियन देशांशी संबंध ठेवणे, पत्रकं काढणे आणि सगळीकडे पसरलेल्या गुप्त संघटनेच्या संपर्कात राहणे हे काम त्याला करता येत असे. सीयुपीची दुसरी बैठक १९०७ साली पॅरिस इथे झाली. यात जो ठराव झाला त्यात हे एकमताने मान्य करण्यात आलं की १. सुलतानाला पदच्युत करणे. २. ओथमन साम्राज्यातील सर्व वंशीय आणि सर्वधर्मीय नागरिकांना घेऊन देश चालवणे. ३. सर्वांसाठी समान कायदा लागू करणे. ४. मिध्दत पाशाने तयार केलेल्या राज्यघटनेप्रमाणे देश चालवणे.

नियाझी बेग. याच काळात यंग टर्क्सचा आणखी एक नायक आपली एक लष्करी आघाडी चालवत होता. त्याचं नाव अहंमद नियाझी बेग. हा मॅसेडोनियातील रिसिनिचा रहिवासी. तरुणपणी लष्करात शिरला. मग जर्मन मिलिटरीत त्याने प्रशिक्षण घेतलं. या काळात केमाल पाशाच्या विचारांनी तो प्रभावित झाला आणि राष्ट्रभक्ती शिकवण्यात आपलं शिक्षण कमी पडतं हे त्याच्या लक्षात आलं. सुलतानाच्या फौजेला थर्ड आर्मी म्हणत.

अहंमद नियाझी बेग यानंतर सीयुपी या संघटनेच्या संपर्कात आला आणि मग संघटनेचा सभासद बनला. त्याचवेळी लष्करातही कामाला लागला. सुलतानाने त्याचं काम बघून आपला एडिसी नेमण्याचं ठरवलं तेव्हा नियाझीने ते नाकारलं आणि रिसीनीला जाऊन राहिला. सन १९०३ मधे इन्टर्नल मॅसेडोनियन रिव्होल्युशनरी ऑर्गनायझेशनने त्याच्या हाताखाली लाईट इन्फंट्रीची एक लष्करी तुकडी दिली. नियाझीचं झपाटलेलं काम बघून संस्थेने त्याला रिसीनी मधेच ठेवलं आणि लष्कर उभारायला सांगितलं. यंग टर्क्स संघटनेचा कॅप्टन झाल्यावर, नियाझी बेगने गावातील महापौर हाकाकमाल इफेन्डी बरोबर रिसीनीमधील दारुगोळयाच्या गुदामावर हल्ला केला आणि आपल्या लाईट इन्फंट्री तुकडीला घेऊन जवळच्या पर्वतरांगांमधे पसार झाला. तिथूनच आपल्या गनिमी कारवाया करु लागला. पर्वतांमधल्या त्याने घेतलेल्या आश्रयाचं अनुकरण मग इतरही काही गुप्त संघटनांनी केलं.

अशा सगळ्या बाजूने तयारी चालू असतांना संघटनेने सर्व अभ्यास करून १९०९ या वर्षी क्रांतीचा उठाव करण्याची योजना आखली. पण अचानक यात एक मोठा अडथळा आला. रशियाचा झार निकोलस द्वितीय आणि आणि इंग्लंडचा राजा एडवर्ड सातवा यांची १९०८ सालात भेट झाली. या भेटीनंतर हे दोघेही सम्राट आपली चळवळ मोडतील आणि आपला देश वाटून घेतील अशी भीती गुप्त संघटनेच्या नेत्यांना वाटली. आपला देश आपल्या हातून सुटून जाईल म्हणून त्यांनी क्रांतीचा उठाव सन १९०९ च्या ऐवजी एक वर्ष आधीच करायचं ठरवलं. त्यानंतर दुसरं पाऊल त्यांनी उचललं ते हे की, संघटनेच्या समितीने सर्व युरोपियन देशांना एक मॅनिफेस्टो पाठवला. त्यात, आमच्या देशातील कारभार आम्हीच करु, त्यात बाहेरच्यांनी लक्ष घालू नये अशी विनवणी केली. मॅसेडोनियातील आपल्या सुधारणांची जाणीव आणि माहिती आहे, तेच त्या सुधारणा घडवतील हेही त्यात लिहून पाठवलं. ह्या मॅनिफेस्टोची माहिती सुलतानाच्या युरोपातील गुप्तहेरांनी सुलतानाला कळवली. तेव्हा तो हादरला. आपल्या सिंहासनाला मोठाच धोका आहे हे त्याने ओळखलं. ही त्याच्यासाठी आणीबाणीची वेळ होती तशीच सीयुपीवरही आली. त्यातच नियाझी बेग लष्करातून फुटून काही सैनिकांसह पर्वतरांगांच्या आश्रयाला गेल्याची बातमी सुलतानाला कळली. या संघटनेला संपवण्यासाठी ४८ बटालियन फौज, आशिया साम्राज्यातून सलोनिकात पाठवण्याचे आदेश सुलतानाने लष्कराला दिले. ही बातमीही यंग टर्क्सना कळली.

यावेळी मॅसेडोनियातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. एकीकडे निरनिराळ्या देशांचे नागरिक जाळपोळ, हिंसाचार, खून, लुटालूट यात दंग होते, शेतकरी हवालदिल होता, सुलतानाच्या फौजा हा अत्याचार मोडून कढण्यासाठी कठोरपणे वागत होता. आणि यंग टर्क्स त्यांच्या हालचाली वाढवत होत्या. सगळंचअस्थिर वातावरण होतं.

अशा वातावरणात रशिया आणि इंग्लंड यांच्या भेटीचा प्रचंड मोठा परिणाम नियाझी बेगवर झाला. आणि त्याने या क्रांतीच्या गुप्त दबलेल्या प्रवाहाला अचानक वेग दिला. आधीच त्याने आपल्या हाताखाली सर्व धर्मीय जवानांची एक तुकडी तयार केली होती. सर्व देशांचे नागरिक जेव्हा लुटालूट करण्यात दंग होते तेव्हा नियाझी बेगच्या या तुकड्या जात धर्म न पाहाता, सर्वांच्या मदतीला धावत होते.

२८ जून: - मोनिस्टिरमधे नियाझी बेगला इंग्लंड रशियाच्या कराराची नवीन बातमी मिळाली आणि त्या बातमीने, अस्वस्थपणामुळे त्याला तीन रात्री झोप आली नाही एवढी घनघोर चिंता त्याला ग्रासायला लागली. या दिवसांमधे अनेक विचारांचं मंथन झाल्यावर तो उठला आणि आपल्या मित्राकडे गेला. पोलिस कमिशनर ताहिर इफेंडी, म्युनिसिपल अध्यक्ष जमाल बेग आणि इतर काही मित्रांची भेट घेऊन त्याच रात्री त्याने गावातील सर्व सभासदांची बैठक बोलावली. संघटनेचे सर्व ५० सभासद जमल्यावर त्या गुप्त बैठकीत त्याने आपले विचार बोलून दाखवले. तो म्हणाला,

"मित्रांनो, इंग्लंड आणि रशियाच्या नुकत्याच झालेल्या करारानंतर आपला देश संकटात आहे याची मला जाणीव झाली आहे. क्रांती करायची वेळ आताच आली आहे. आपल्या देशासाठी आपण सर्व प्रापंचिक सुखं आणि प्राणत्याग करायची देशाला गरज आहे. ही वेळ निघून गेली तर आपण कायमच युरोपियन देशांच्या पंजात अडकू आणि आपला देश आणि आपलं स्वातंत्र्य गमावून बसू. ही लढाई फक्त मुसलमानांसाठी नाही तर या

देशाच्या सर्व नागरिकांच्या स्वातंत्र्यासाठी आणि सुलतानाची जुलमी राजवट उलथून पाडण्यासाठी आहे. त्यासाठी मला तुमच्या मदतीची गरज आहे. या उठावाला आपणच सुरुवात करायची आहे. त्यासाठी लागणारी सर्व योजना, शस्त्रं, पैसा, मी पुरवीन. तुम्ही फक्त पराक्रम आणि शौर्य गाजवायचं आहे. जे मदत करायला तयार आहेत त्यांनी होकार द्यावा. असं म्हटल्यावर उपस्थित सर्व सभासदांनी एकमुखाने नियाझी बेगला आपला पाठिंबा जाहीर केला आम्ही आमचं हृदय आणि आत्मा देशासाठी समर्पित करायला तयार आहोत असं सांगितलं. मग कुणाला संशय येऊ नये म्हणून२/३ लोक घोळक्या घोळक्याने बाहेर पडले. मग नियाझी बेगने ताबडतोब सलोनिकाच्या समितीला आपला हा बेत सविस्तर सांगायला आणि समितीची परवानगी घ्यायला ताहिर इफेन्डीला सलोनिकाला पाठवलं. दोन दिवसात समितीची परवानगी घेऊन ताहिर इफेन्डी मोनिस्टिरला परतला.

मग नियाझी बेगने सर्व योजना आखली. मोनिस्टिरमधील सुलतानाचा मुख्य वजीर हिल्मी पाशाला निर्वाणीचा खलिता पाठवून, सुलतानाने देशात संसदीय राज्य घटना घोषित करावी, अन्यथा मी आणि माझे २०० जवान राजधानीवर चालून येऊ. देशाला जुलमी राजवाटीतून मुक्त करु. तेव्हा जर सुलतानाने हे केलं नाही तर जो तेव्हा जर रक्तपात, हिंसाचार झाला तर त्याला कारण सरकार असेल हेही त्यात लिहिलं. देशाची जुलमी सत्ता संपवण्यासाठी प्राण देणाऱ्या देशभक्तांच्या मागे जे गुप्तहेर तुम्ही पाठवले आहेत, त्यांना सर्वांना एका ट्रेनने सर्वांना इथून घालवून द्यावं, त्यासाठी मंत्रीमंडळाची बैठक बोलवावी, असाही निर्वाणीचा इशारा त्यात लिहिला. अशीच पत्रं नियाझी बेगने इतरही लष्करी अधिकाऱ्यांना लिहिली आणि सुलतानाला मदत कराल तर तुम्हाला ठार करु असा सज्जड दमही दिला. हिल्मी पाशाने तो खलिता सुलतानाकडे पाठवल्यावर नियाझी बेगने हिल्मी पाशाला, सुलतानाचं उत्तर येईपर्यंत आपल्या कैदेत ठेवलं.

३ जुलै:-३ जुलै १९०८ हा क्रांतीचा पहिला दिवस उजाडला. पहाटे उठून आपलं सर्व आवरुन आणि युनिफॉर्म घालून नियाझी बेग लष्करी तळाच्या गेटपाशी आला. तिथे त्याचे साथीदार सैनिक त्याची वाट पाहात उभे होते. गेटपाशी नियाझी बेगने आपली तलवार उंचावून जमावाला इशारा दिला. त्याबरोबर सगळे १५० जवान गेटच्या आत शिरले. प्रवेशद्वारावरच्या सुरक्षा अधिकाऱ्यांना, ती नियाझीचीच माणसं असल्यामुळे संशय आला नाही. नियाझी बेगने मग लष्करी चेस्टमधून ५०० डॉलर्स आणि काही रायफल्स उचलल्या आणि तो बाहेर पडला. बल्गेरियन बंडखोरांवर हा चालला आहे अशीच सुरक्षा अधिकाऱ्यांची समजूत होती.

सर्व जमावाला घेऊन तो शहराच्या हमरस्त्यावर आला. तिथे त्याने परत एक सभा घेतली. त्यात जमलेल्या सैनिकांना यापुढची वाटचाल खडतर आहे, आपल्याला चालत सगळ्या गावांमधे शिरायचं आहे, माझा हुकूम आणि शिस्त पाळायची आहे, म्हणून ज्यांना झेपणार नाही, त्यांनी आताच परत जावं असं शेवटचं निक्षून सांगितलं. सर्व त्याच्याबरोबर यायला तयार होते, मग तो लष्करी शिस्तीत चालू लागला. मग एकेक गाव पार करत तो चालू लागला. गावोगावचे लोक त्याच्या मदतीला आले. त्याच्या फौजेला जेवणखाण पुरवू लागले. नियाझीचं गावागावात मोठं स्वागत होऊ लागलं आणि लोकांचा पाठिंबा मिळू लागला आहे आणि नियाझी बेग फौज घेऊन राजधानीकडे चालू लागला आहे ही बातमी सुलतानाला मिळाली तेव्हा सुलतान अब्दुल हमीद द्वितीयने अनातोलियाहून मोठी फौज नियाझी बेगला मारण्यासाठी पाठवली.

१९ जुलैला नियाझी बेग ऑरिडमधे पोचला. तिथे असतांना सलोनिकाहून तातडीचा खलिता कमिटीने नियाझी बेगला पाठवला. त्यात कमिटीने २००० सैनिक गोळा करुन ताबडतोब मोनिस्टिरला पोचायला सांगितलं. आता उठाव तिथेच करायचा आहे आणि त्वरेने करायचा आहे हा निरोप मिळाल्यावर नियाझी बेगने निवडक शूर आणि विश्वासू सैनिक गोळा करुन मोनिस्टिरचा रस्ता धरला. त्यासाठी पूर्ण खबरदारीने योजना केली. बाकी लोकांना ऑरिडमधेच ठेवलं.

मोनिस्टिर हे सुलतानाच्या लष्कराचं मुख्य केंद्र होतं. तिथे सुलतानाचा सेनापती ओस्मान पाशा सर्व कारभार समर्थपणे सांभाळत होता. त्याला उडवून लष्कर हाती ठेवणं महत्वाचं होतं, म्हणून कमिटीने नियाझी बेगला तिथे पाठवलं. रात्र पडल्यावर अंधारात नियाझी फौज घेऊन चालू लागला. काही अंतर चालून गेल्यावर त्याला अचानक बंदूकांचा आवाज ऐकू येऊ लागला, तेव्हा नियाझीने काही लोकांना काय चाललंय ते पाहायला पाठवलं. तेव्हा त्या लोकांनी सांगितलं की या जंगलात राहणाऱ्या आणि पिढ्यान पिढ्या वैर असणाऱ्या दोन आदिवासी टोळ्या आपल्याला पाठिंबा देण्यासाठी एक झाल्या आहेत. नियाझीला याचा अत्यंत आनंद झाला.

मोनिस्टिरपासून काही मैलांवर जवळ आल्यावर नियाझी बेगने आपल्या तुकडीला आपण काय करायला आलो आहोत याची माहिती दिली. मग सर्व तुकड्यांना वेगवेगळ्या मार्गाने मोनिस्टिरमधे शिरायची योजना आणि कामगिरी सांगितली. तिथे सर्व सैनिकांनी जेवण आणि थोडी विश्रांती घेतली. तिथेच नियाझी बेगला लष्करी अधिकारी लेफ्टनंट ओस्मान इफेन्डी भेटायला आला. मग सगळे गुप्तपणे आवाज न करता लष्करी तळाकडे चालू लागले. काही सरकारी ऑफिसचा ताबा घ्यायला गेले, काही ओस्मान पाशाच्या निवासस्थानाकडे गेले. आधी त्यांनी ओस्मान पाशाच्या घराच्या टेलिग्रफच्या वायर्स कापल्या. निवासस्थानापाशी पोचल्यावर तिथल्या सुरक्षा अधिकाऱ्यांना ठार करुन त्यांनी ओस्मान पाशाच्या घरात प्रवेश केला. आणि आपल्या बेडरुममधे निद्रिस्त असलेल्या ओस्मान पाशाला ताब्यात घेतलं. जाग आलेल्या ओस्मान पाशाला लगेच वास्तवाचं भान आलं. ओस्मान पाशा नियाझीबेगच्या कैदेत पडला. त्याला जीवाची हमी देण्यात आली.

नियाझी बेगचं कारस्थान यशस्वी झालं होतं. नियाझी बेगचं यश गावोगाव पोचल्याबरोबर लगेच सर्व ठिकाणच्या क्रांतीकारकांनी उठाव केला.

२३ जुलै - मोनिस्टिरमधे हे घडत असतांना कॉंस्टंटिनोपलच्या राजप्रासादात सुलतान अब्दुल हमीदने सर्व मंत्रीमंडळाला चर्चेला बोलावलं होतं. त्याआधी सुलतानाने आपला मुख्य वजीर फेरिद पाशाला काढून टाकून त्या जागी दरबारातील जुने, जाणते, अनुभवी, मुत्सद्दी सैद पाशा आणि कयामल पाशा यांना मुख्य वजीर म्हणून नियुक्त केलं होतं. नियाझी बेगचा खलिता सुलतानाकडे पोचला होता. २३ जुलैला सगळे मंत्री जमले. राज्यघटना द्यायची की नाही, प्रजातंत्र आणायचं की नाही यावर चर्चा रात्रभर प्रत्येकजण राजसत्ता-लोकसत्ता यावर बोलत राहिले. त्याला अंत नव्हता. पहाटेपर्यंत वादविवाद घडत राहिले. शेवटी मुख्य वजीर सैद पाशाने सर्व मंत्र्यांना प्रत्येकाचं वैयक्तिक मत द्यायला सांगितलं. तेव्हा मात्र सगळे गप्प बसले. तेव्हा सैद पाशाने तुमचं मौन हेच तुमचं उत्तर आहे, असं म्हणून सर्व मंत्री संसदीय राज्यपध्दतीच्या मताचे आहेत हे सुलतानाला कळवलं.

२४ जुलै - शेवटी सुलतानाने राज्यघटना देशातील नागरिकांसाठी मंजूर करत असल्याचं असल्याचं मान्य केलं. ती बातमी टेलिग्राफने वाऱ्यासारखी देशभर पसरली आणि देशभर जल्लोष सुरु झाला. राजधानीतील सर्व देशांचे नागरिक जथ्याने जल्लोष करत हिंडायला लागले. त्यांच्या मनावरचं दडपण नाहीसं झालं होतं.

**२४ जुलै १९०८ हा दिवस ओथमन तुर्कांच्या आयुष्यातील क्रांतीकारक दिवस ठरला. प्रजातंत्राची नवीन पहाट उजाडली होती.**

सुलतानाने राज्यघटना मान्य केली पण पुढे काही दिवस सुलतानाचं फर्मान निघणं वगैरे काहीच होईना. सीयुपीच्या कार्यकर्त्यांना सुलतानाबद्दल परत शंका वाटायला लागली. म्हणून त्यांनी मॅसेडोनियातील फौज आणून राजवाड्याभोवती उभी केली मग कमिटीच्या सभासदांनी सुलतानाची भेट घेऊन धमकीवजा बोलणी केली आणि घटनेचा इरादे-फर्मान -फतवा काढायला भाग पाडलं. तेव्हा कुठे उठाव यशस्वी झाला याची खात्री जनतेला झाली. नियाझी बेगच्या कैदेत असलेल्या हिल्मी पाशाला जीवदान मिळालं. कमिटीच्या हाती सत्ता आली. देशभरचे गुप्तहेर सुलतानाने माघारी बोलावले. सुलतानाने तडीपार केलेले हजारो विचारवंत, नागरिक देशात परतले. देशात प्रजातंत्राचं वारं वाहू लागलं होतं. आता निवडणुका, सरकार, सत्ता याचं नवीन युग अवतरलं होतं. या उठावाचा शिल्पकार होता नियाझी बेग. ओथमन साम्राज्याच्या इतिहासात प्रथमच प्रजेला राज्यकारभाराचा अधिकार मिळाला. मग निवडणुका झाल्या. तोपर्यंत ऑटोमन सोशालिस्ट पार्टी, फ्रिडम ऑफ ऑकॉर्ड पार्टी, ऑटोमन लिबरल पार्टी, असे अनेक पक्ष तयार झाले होते. यावेळी १८ ग्रीक, १ सर्बियन, १ ज्यू, ४ बल्गेरियन आणि २ आर्मेनियन निवडून आले.

पार्लमेंटच्या उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी १७ डिसेंबर १९०८ ला सुलतानाने भाषण केलं. त्यात तो म्हणाला की जोपर्यंत या देशातील सर्व नागरिक देश चालवायला समर्थ होत नाहीत, तोपर्यंत हे पार्लमेंट तात्कालिकच राहील. या त्याच्या उद्गाराने परत सर्व जनतेच्या मनात शंका नर्माण झाली आणि तसंच घडलं. १३ मार्च १९०९ या दिवशी सुलतानाच्या सैन्याने यंग टर्क्सचं मंत्रीमंडळ उलथवलं. सलोनिकाच्या संघटनेला ही बातमी रात्री मिळताच सुलतानाला पदच्युत करण्यावाचून पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात आलं आणि लगेच संघटनेच्या लष्कराने महंमद शौकत अलीच्या नेतृत्वाखाली कॉंस्टंटिनोपलमधे प्रवेश करुन मार्शल लॉ लागू केला. मोठी धरपकड केली. २६ एप्रिलला सुलतान अब्दुल हमीद पाशा द्वितीयला अटक करुन सलोनिकाला नेलं. पण सलोनिका ग्रीकांच्या हाती पडल्यावर सुलतान अब्दुल हमीदला परत राजधानीत आणून तिथे कैदेत ठेवलं. १० फेब्रुवारी १९१८ ला सुलतानाचा कैदेतच मृत्यू झाला. अब्दुल हमीद सुलतानाला पदच्युत केल्यावर त्याच्या जागी त्याचा भाऊ रिशिद इफेन्डीला उर्फ महंमद पाचवा याला २७ एप्रिलला सुलतान बनवलं.

यंग टर्क्स सरकार स्थापन झालं तरी आर्मेनियन लोकांकडे त्यांचं दुर्लक्षच झालं. परकीयांशी त्यांनी संधान बांधलं आहे अशी शंका नवीन सरकारला आली. १९१३ साली तलत पाशा, केमाल पाशा, अन्वर पाशाच्या हाती सत्ता आली. त्यात तलत पाशाचा कल इंग्लंड, अमेरिकेकडे होता तर अन्वर पाशाचा जर्मनीकडे. याच काळात पहिल्या महायुध्दाने युरोपात पेट घेतला होता. यंग टर्क्स हे नवीन सरकार या युध्दाचा भाग बनलं. आणि अन्वर पाशाच्या दबावामुळे जर्मनीला सामील झालं. १९१२-१३ सालच्या बाल्कन युध्दात ओथमन देशाचा मोठा

पराभव झाला. युरोपातील मोठा प्रदेश त्यांच्या हातून गेल्यावर त्या देशातील मुसलमान पूर्व अनातोलियाच्या हद्दीत शिरले. त्यामुळे आधीचे ख्रिश्चन रहिवासी आणि नवीन ढकलले गेले मुसलमान यांच्यात भांडणं लागली. त्यातून जे रशियाच्या हद्दीतील भागात राहणारांना एकीकडून ओथमन सरकार आणि दुसरीकडून रशियन सरकार यांच्यात आपल्याकडे या लोकांना खेचून घेण्यासाठी दबाव आणणं सुरू झालं. या लढाईत परत एकदा ९० टक्के आर्मेनियन ठार झाले इतका मोठा नरसंहार झाला.

युध्द संपलं. रिपब्लिक ऑफ टर्कीचा जन्म झाला. ओथमन तरुणांनी नव्या युगाची नवीन राज्यपध्दत नवीन पिढीसाठी अंमलात आणली. यंग टर्कच्या चिवट लढ्याला यश मिळालं. अब्दुल हमीद सुलतानानेही सत्ता जाऊ नये, ओथमन घराणं संपू नये म्हणून खूप प्रयत्न केले पण यंग टर्क्स या ओथमन तरुणांनी ते सगळे हाणून पाडले.

प्रजा जिंकली. राजा हरला…

- - - - - - - - - - - - - - -




सध्याचा नवीन देश रिपब्लिक ऑफ टर्की.२०२०.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. स्मिता दामले यांचे हे आठवे पुस्तक.**

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत. डॉ. दामलेंसारखे ज्येष्ठ लेखक आपली अनेक पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (आठ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१९ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी (११) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।